म. ग्रं सं ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २६८९

RFBK-0004812



नि० १६४९



न व भा र त ग्रं थ मा ला

६

भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न

नवभारत ग्रंथमालेचीं

लवकरच प्रसिद्ध होणारीं पुस्तकें

नागरिकनीति

लेखक, प्रो॰ श्रीकृष्ण वेंकटेश पुणतांबेकर

देशांतील नागरिक सुसंपन्न, सुसंस्कृत व सुविनीत कसा बनेल हाच प्रश्न सर्व देशोद्धारकांच्या डोळ्यांसमोर प्रामुख्याने असतो. नागरिकाच्या जीवनाच्या सर्व अंगांचा विचार करणारें पाश्चात्य देशांत जरी एक शास्त्रच —Civics— बनलें असलें तरी आपल्याकडे तशा तऱ्हेचा विचार अद्याप फारच थोडा झालेला आहे. अशा स्थितींत बनारस युनिवर्सिटीतील राजकारण व तत्सम शास्त्रें यांचे अध्यापक प्रो. पुणतांबेकर यांनी लिहिलेलें हें पुस्तक मराठी वाङ्मयांत अपूर्वच होईल हें सांगणें नको.

कालिदास

लेखक, प्रो. वासुदेव विष्णु मिराशी

खुद्द कविकुलगुरु कालिदासाविषयीं विवेचक दृष्टीने लिहिलेलें व आजतागायत माहितीने युक्त असें पुस्तक मराठींत कोठे आहे? विष्णुशास्त्र्यांचा निबंध उत्कृष्ट आहे; परंतु तो कांहीसा एकांगी असून आता माजी झाला आहे. तेव्हा प्रो. मिराशींच्या अधिकारयुक्त लेखणींतून उतरलेल्या ह्या सर्वांगपरिपूर्ण ग्रंथाने मराठींतील मोठीच उणीव भरून निघेल यांत शंका नाही.

फलज्योतिष

लेखक, श्री. दाजी नागेश आपटे

फलज्योतिष हा आता भोळ्या भाबड्या अशिक्षितांचाच विषय राहिलेला नसून सुशिक्षितांमध्येंही त्याचें प्रस्थ झपाट्याने बाढत चाललें आहे. पुष्कळ चिकित्सक विद्वानांचें या विषयाकडे लक्ष लागलें असून त्यांचा या विद्येवर चांगलाच विश्वास बसला असल्याचें दिसून येतें. अशा स्थितींत प्राच्य व पाश्चात्य फलज्योतिषाचे विख्यात तज्ज्ञ श्री. दाजीसाहेब आपटे यांचा, विषयाचें सांगोपांग व सरहस्य विवेचन करणारा हा प्रबंध सर्वांसच अवश्य वाचनीय वाटेल.

मालेचे कांही ग्रंथ व ग्रंथकार

❀ ❀ ❀

ऋग्वेद

प्रो. अ. बा. गजेंद्रगडकर

❀

उत्क्रांतिवाद

प्रो. शं पु. आघारकर

❀

प्राचीन शिक्षणपद्धति

डॉ. अ. स. अळतेकर

❀

सापेक्षतावाद

भारद्वाज

❀

आधुनिक मराठी काव्य

ग. त्र्यं. माडखोलकर

❀

वनस्पतींचें जीवन

प्रो. श्री. ल. आजरेकर

❀ ❀ ❀

यांशिवाय

प्रो. वि. ब. नाईक, डॉ. श्री. कृ. बेलवलकर,
प्रो. ना. के. बेहेरे, प्रो. वा. म. जोशी,
श्री. ना. गो. चाफेकर, श्री. गो. कृ. देवधर,
प्रो. द. वा. पोतदार, प्रो. वि. ना. थत्ते,
प्रो. चि. वि. जोशी, प्रो. ना. के. भागवत
इत्यादि सुप्रसिद्ध विद्वानांचे ग्रंथही मालेमधून
प्रसिद्ध होणार आहेत.

M.P.S.K. 30.3.6

भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न

लेखक

विठ्ठल रामजी शिंदे, बी. ए.

'भारतीय निराश्रित साहाय्यकारी मंडळी' चे संस्थापक. इ० इ०

REFBK-0004812

नवभारत ग्रंथमाला कार्यालय

शके १८५५] नागपूर [इ. स. १९३३

मुद्रकः—पांडुरंग नारायण वनहट्टी, बी. एस्सी.,
व्यवस्थापक, नारायण मुद्रणालय, घनतोली, नागपूर.

प्रकाशक—वेंकटेश शामराव बलकुंदी, बी. ए., एलएल. बी.
व्यवस्थापक, नवभारत ग्रंथमाला, कांग्रेसनगर, नागपूर.



श्रीमंत युवराज

श्रीमंत
सयाजीराव महाराज

श्रीमंत राणीसाहेब



अर्पण पत्रिका

पतितपावन

श्रीमंत सर सयाजीराव महाराज गायकवाड

सेनाखासखेल, समशेर बहादुर,

फर्झंद-इ-खास-इ-दौलत-इ-इंग्लिशिआ;

जी. सी. एस्. आय्; जी. सी. आय्. ई; एल्एल्. डी.

ह्यांच्या मननीय अस्पृश्योद्धारकार्याचें

अल्पसें स्मारक म्हणून

हा ग्रंथ

महाराजांच्या खास परवानगीने

त्यांना अत्यादरपूर्वक अर्पण केला असे.

विठ्ठल रामजी शिंदे

प्रस्तावना

इ. स. १९०८ च्या सुमारास अस्पृश्यतेसंबंधीं मी माझा मराठींतील पहिला विस्तृत निबंध लिहिला. तो **'बहिष्कृत भारत'** ह्या मथळ्याखालीं इ. स. १९०८ च्या डिसेंबर महिन्याच्या 'मनोरंजन' मासिकांत सचित्र प्रसिद्ध झाला. तोच पुढे श्रीमंत गाईकवाड महाराजांच्या आज्ञेने पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाला. ह्यापूर्वी इ. स. १९०४ सालापासून ह्याच विषयावरील माझे इंग्रेजींतील लेख, आकडे व इतर प्रमाणांसह, 'टाइम्स ऑफ इंडिया,' 'सोशल रिफॉर्मर' वगैरे पत्रांतून प्रसिद्ध होत होते. अस्पृश्यतानिवारणासाठी आमच्या देशांत गेल्या शतकापासून कोणते व कसे प्रयत्न झाले ह्याचा समग्र पण संक्षिप्त इतिहास मी इ. स. १९२३ सालीं लिहिला, तो मराठी 'ज्ञानकोशांत' प्रसिद्ध झाला आहे. तथापि अस्पृश्यतेची उत्पत्ति, विकास, आणि ती घालविण्याचा पद्धतशीर उपाय ह्या विषयावर समाजशास्त्राच्या दृष्टीने सोपपत्तिक विचार अद्यापि झाला नाही. निदान तो कोणी केलेला माझे तरी आढळांत नाही.

हिंदुस्थान सरकाराने खानेसुमारीचा अहवाल, डिस्ट्रिक्ट आणि इंपीरियल गॅझेटियर्स, एथ्नॉग्राफिक सर्व्हे इ. ग्रंथावली सुरू केल्यापासून, कांही प्रसिद्ध पाश्चात्य समाजशास्त्र्यांचें लक्ष्य भारतीय वर्णव्यवस्थेकडे लागलें आहे. इबेट्सन, सिनार्ट, नेसफील्ड, रिस्ले, रस्सल इ. शोधकांनी जातिभेदाची मीमांसा करतांना ओघाने 'अस्पृश्यां'विषयीं कांही प्रासंगिक विचार प्रकट केले आहेत. पण प्रत्यक्ष अस्पृश्यता ही संस्था जगांत कशी निर्माण झाली, व तिचा विकास विशेषतः भरतखंडांत कोणकोणत्या कारणांनी व टप्प्यांनी घडून आला ह्या चित्तवेधक विषयासंबंधीं म्हणण्यासारखी एकादी उपपत्ति कोणी ठरविलेली माझे आढळांत अद्यापि आलेली नाही. मुंबई विश्वविद्यालयांतील तरुण पदवीधरांकडून वेळोवेळीं अस्पृश्यता ह्या विषयावर एक पारितोषक निबंध मागविण्यांत येत असतो. परीक्षणासाठी हे निबंध मजकडे येत असतात. त्यावरून पाहतां वृद्धांप्रमाणेंच तरुणांनीही ह्या विषयाच्या उपपत्तीकडे आजवर दुर्लक्ष्यच केलेलें मला आढळलें. रा. सातवळेकरांनी 'स्पर्शास्पर्श' नांवाचें एक सुंदर पुस्तक संस्कृतांतील उतारे

देऊन प्रसिद्ध केलें आहे. कांही विद्वान ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं विवक्षित 'अस्पृश्य' जातींची स्थिति प्रत्यक्ष निरीक्षण करून निःपक्षपाताने प्रसिद्ध केली आहे. तथापि अशा त्रुटित ग्रंथांतूनही एकादी ऐतिहासिक उपपत्ति ठरविण्याचा नुसता प्रयत्नही झालेला दिसत नाही. एकंदरींत नव्या, जुन्या, तरुण, वृद्ध, स्वकीय, परकीय इ० कोणत्याही विद्वानांच्या डोळ्यांवर हा विषय शास्त्रीय दृष्टीने अद्यापि यावयाचाच आहे. व्यवहारिक गोंधळ मात्र बराच गाजत आहे. त्यांत सरकारचा डफ, कांग्रेसचें तुणतुणें, हिंदुमुसलमानांचा नाच आणि ब्राह्मण–ब्राह्मणेतरांच्या टाळ्या, ह्यांचा एकच कल्लोळ माजला आहे. ह्या गोंधळाचा प्रस्तुत प्रयत्नाशीं मात्र कसलाही संबंध पोचत नाही, हें टीकाकारांनी कृपा करून ध्यानांत राखावें. हा प्रयत्न केवळ शास्त्रीयदृष्टीने व निर्विकार मनाने करण्यांत आला आहे. वाचकांनीही केवळ त्याच प्रकाराने त्याचा स्वीकार करावा.

मजकूर लिहिण्याचे कामीं वगैरे माझे परलोकवासी मित्र कृष्णराव गोविंदराव पाताडे ह्यांची फार मदत झाली. पण हा प्रथम भाग प्रसिद्ध झालेला पाहण्यासही ते जगले नाहीत, ह्याबद्दल मला फार खेद होत आहे. ह्या ग्रंथाचा बराच भाग माझे जवळ बरेच दिवस लिहून पडला होता. तो प्रसिद्ध करण्याचें श्रेय नवभारत ग्रंथमालाकारांनी स्तुत्य चिकाटी दाखवून आपलेकडे घेतलें हें जाहीर करणें माझें कर्तव्य आहे. ह्या विषयाचें माझें अध्ययन अद्याप चालूच आहे. अद्यापि पुढील दोन खंड दुसऱ्या पुस्तकाच्या रूपानें लिहावयाचे आहेत.

श्रीमंत सर सयाजीराव महाराज गायकवाड ह्यांनी हा अल्पग्रंथ त्यांना अर्पण करण्याची परवानगी दिली, ह्याबद्दल मी त्यांचा फार ऋणी आहें.

गुरुवार २० जुलै इ.स. १९३३
अहल्याश्रम, नानाची पेठ,
पुणें शहर.

विठ्ठल रामजी शिंदे.

अनुक्रमणिका

प्रकरण पृष्ठ

खंड पहिला : अस्पृश्यतेचा इतिहास

१. सामान्य आलोचन. १८

व्याख्या, पृ. १०—उदय, पृ. १२—व्याप्ति, पृ. १४—ताबू उर्फ विटाळ, पृ. १४—हिंदी अस्पृश्यतेचें संशोधन, पृ. १७—ऐतिहासिक व प्रागैतिहासिक काल-विभाग, पृ. १७.

२. पुरानत अस्पृश्यतेचें रूपनिदर्शन ... १९–३६

बुद्धादयकालीन अस्पृश्यता, पृ. १९—बुद्धपूर्वकालीन उर्फ प्रागैतिहासिक अस्पृश्यता,:— (१) पाणिनीचा काल, पृ. २१; (२) अव्वल औपनिषद काल, पृ. २२; (३) ब्राह्मणकालीन अस्पृश्यता, पृ. २४; (४) श्रीकृष्ण-काल, पृ. २९; (५) वेदमंत्रकाल, पृ. ३४.

३. बौद्ध कालातील अस्पृश्यता ३७–५०

४. मनुस्मृतिकालीन अस्पृश्यता ५०–५५

५. उत्तरयुगीन अथवा अर्वाचीन अस्पृश्यता ... ५६–७०

६. ब्रह्मदेशांतील बहिष्कृतवर्ग ७०–९०

खंड दुसरा : अस्पृश्यतेचा प्रश्न

७. संख्या आणि लक्षणें ९१–११८

जातींचें वर्गीकरण, पृ. ९४—संख्येची व व्याख्येची ओढाताण, पृ. ९६—लोदियन कमिटीच्या रिपोर्टांतील संकलनात्मक कोष्टक, पृ. १००—अस्पृश्य आणि एकूण हिंदु यांची प्रांतानिहाय संख्या (१९०१), पृ. १०१—स्वच्छ व अस्वच्छ अस्पृश्यांची प्रांतवार संख्या (१९०१), पृ. १०२—प्रत्येक प्रांतांतील स्वच्छ व अस्वच्छ अस्पृश्यांची जातवार संख्या (१९०१), पृ. १०३.

८. नांवांची व्युत्पत्ति व इतिहास... ... ११९–१३५

महार, पृ. ११९—माल, पृ. १२२—मेघ, पृ. १२४

प्रकरण		पृष्ठ

मांग, पृ. १२५—हुलया, पुलया, पृ. १२७—चेरुमा, पृ. १२८—परैय्या, पृ. १२८—येझ्वा अथवा तिय्या, पृ. १३०—पळळन्, पृ. १३१—चक्किलीयन अथवा शेक्कीया, पृ. १३१—चांभार, पृ. १३१—नमशूद्र आणि राजवंशी, पृ. १३२—बाउरी, बाथुरी, पृ. १३२—सवर, शबर, पृ. १३३—बळाई, पृ. १३३—ढाणक, पृ. १३३—तूतारीआंझा, पृ. १३४—संडाला, डूनसंडाला, पृ. १३४—फक्काचून, पृ. १३५

९. धर्म १३५–१५२

१०. सामाजिक स्थिति १५३–१६८

कुणबाऊ गुलामगिरी, पृ. १५६—पाणवठ्याचा हक्क, पृ. १६२—शिक्षण, पृ. १६४—मुरळ्या वाहण्याची चाल, पृ. १६६

११. राजकारण १६९–२२१

वैदिक कालांतील कटकट, पृ. १७१—बौद्धकालीन सुधारणा, पृ. १७६—पुराणकाल, शुक्रनीति, पृ. १७८—इस्लामी क्रांति, पृ. १८३—औट घटकेचें स्वराज्य, पृ. १८५—एका महार वीराचें धारादिव्य, पृ. १८७—मेटे नाइकी, पृ. १८८—गोतांत महाराचा समावेश, पृ. १८९—ऐरणदिव्य, पृ. १९०—खवा दिव्य, पृ. १९१—शिदनाक महार, पृ. १९२—महारांचे बावन हक्क, पृ. १९४—दामाजीपंत व विठ्ठ्या महार, पृ. १९६—बेदरच्या बादशहाचें ताम्रपत्र, पृ. १९८—महारांचीं लग्नें जोशांनी लावण्याबाबत, पृ. २०१—ग्रामसंस्था व अस्पृश्यांची वतनदारी, पृ. २०३—अस्पृश्यांचा इंग्रजांच्या सैन्यांत प्रवेश, पृ. २१०—त्यांस सैन्यांत बंदी, पृ. २१३.

संदर्भ ग्रंथांची यादी २२२–२२३

सूची २२४–२२८

भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न

खंड पहिला : अस्पृश्यतेचा इतिहास

प्रकरण पहिलें

सामान्य आलोचन

अस्पृश्यता ही एक पुरातन सामाजिक जागतिक संस्था आहे. तिचा व्याप सर्व जुनें जग भरून, निदान आशिया खंड भरून तरी, अस. ल्याचे पुरावे प्राचीन इतिहासांत, व हल्लीच्या काळांतही, वर्तमान असलेले आढळतात. पूर्वेकडे चीनांत व जपानांत अस्पृश्यता अद्यापि रेंगाळते. ब्रह्मदेशांत तर मी स्वतः शोधून स्पष्ट पाहिली आहे. पाश्चिमेकडे सामान्यतः भूमध्यसमुद्राच्या पूर्वेकडील प्राचीन राष्ट्रांत, विशेषतः इश्रायल लोकांत, ही संस्था होती. जेथे जेथे देवपूजकांची व पुरोहितांची एक निराळी जात आणि वृत्ति स्थापित झाली आणि अशा वार्तिकांच्या प्रेरणेने राजकर्त्यांच्या व त्यांच्या प्रभावळींतल्या उच्चवर्णीयांच्या रक्ताला जेथे जेथे सोवळेपणा आला, तेथे तेथे ही संस्था जुन्या नव्या जगाच्या इतिहासांत उदयास आली आहे. ह्मणून ही संस्था आर्यांचेंच अगर कोणा एका विशिष्ट मानववंशाचें एक विशेष कृत्य आहे, असें मानण्याचें कारण नाही. तथापि इतकें मात्र निर्विवाद आहे की आपल्या भरतखंडांत, विशेषतः दाक्षिणेकडील द्राविड देशांत, ह्या सामाजिक तोडग्याचा प्रयोग आर्य अथवा द्राविड म्हणविणारांकडून जितक्या पद्धतशीर रीतीने अगदी ह्या घडीपर्यंत करण्यांत आला आहे, आणि ह्या प्रयोगाला येथे जें यश आलें आहे, तो प्रयोग, ती पद्धत आणि तें यश इतरत्र कोठेच—निदान येथील प्रमाणांत तरी—आढळणार नाही. ह्मणून अस्पृश्यता ही भारतीय सामाजिक संस्कृतीचें एक विशिष्ट आणि मुख्य लक्षण आहे, असें म्हणणें इतिहासज्ञाला भाग पडेल, असें मला वाटतें.

व्याख्या

प्रस्तुत विषयासाठी अस्पृश्यतेची थोडक्यांत एक कामचलाऊ व्याख्या करणें अवश्य आहे. सोयेर, सुतक, रजोदर्शन, सांसर्गिक रोग, इत्यादि वैयक्तिक, कौटुंबिक आणि प्रासंगिक बाबींसंबंधीं अस्पृश्यता हल्ली देखील हिंदुस्थानांत, तशीच बाहेरील राष्ट्रांतही, पाळलेली पुष्कळ ठिकाणीं आढळते. फरक इतकाच की पहिल्या तीन बाबी जंगली लोकांत व चौथी सुधारलेल्या देशांतील रुग्णालयांतच आढळते. पण ही नैमित्तिक अस्पृश्यता ह्या निबंधाचा विषय नव्हे. नित्य अस्पृश्यता हीच केवळ ह्या निबंधाचा विषय आहे; आणि ह्या निबंधाच्या हेतूपुरती, ह्या अस्पृश्यतेची कामचलाऊ व्याख्या मी करीत आहें.

विवक्षित जातीच्या जाती उर्फ राष्ट्रें वंशपरंपरेने अस्पृश्य मानणें, त्या जाती अशा अस्पृश्य राहाण्यात म्हणून त्यांना अगदी गांवाबाहेर, पण फार दूर नाही, अशा निराळ्या वस्तींत डांबणें, व जर कोणी स्पृश्यांनी किंवा अस्पृश्यांनी हा बहिष्काराचा नियम मोडला तर त्या दोघांवरही प्रचलित धार्मिक आणि राजकीय कायद्यांची अंमलबजावणी करणें, ह्या तीन्ही गोष्टी भारतीय अस्पृश्यतेचीं मुख्य लक्षणें आहेत. म्हणजे ही अस्पृश्यता केवळ स्थानिक अथवा धार्मिक नसून ती **जातीय** उर्फ **राष्ट्रीय** आणि नित्य स्वरूपाची आहे. एखाद्या मानीव अस्पृश्याने आपला धर्म बदलला, किंबहुना प्रचलित राजसत्तेनेही आपला धर्म बदलला, तरी भारतीय रूढि आणि ह्या देशांत वेळोवेळीं स्थापित होणाऱ्या राजसत्तेच्या कायद्यांनी तिला दिलेली मान्यता कायम असेपर्यंत, अस्पृश्यता ही कायमच असावी अशी भारतीय अस्पृश्यतेची उपपत्ति आहे. मुसलमान भंगी, मजबी शीख, आणि मद्रासेकडील रोमन कॅथॉलिक ख्रिस्ती धर्मांत घेतलेले पारिया, हे हल्ली हिंदु नसूनही अस्पृश्यच आहेत. केवळ अस्पृश्यच नव्हे तर ग्रामबाह्यही आहेत. हल्लीचें हिंदुस्थान सरकार स्वतः ख्रिस्ती म्हणवीत असलें तरी त्याने आपला कायदा, रूढि आणि तिऱ्हाईतपणा ह्या दोन विक्षिप्त आणि लवचीक तत्त्वांवर स्थापिला असल्यामुळें, ह्या कायद्याचा आश्रय अस्पृश्यांना उपपत्तीच्या दृष्टीनेही मिळणें शक्य नाही; मग व्यवहारांत त्याची अंमलबजावणी उलटच होत असल्यास त्यांत

धर्मांतराने अस्पृश्यता नष्ट होत नाही !

आश्चर्य काय ! इ. स १८४३ त हिंदुस्थान सरकारने कायदा करून येथील गुलामगिरी बेकायदेशीर केली; पण अस्पृश्यता अद्यापि कायदेशीरच आहे ! हल्लीची राउंडटेबल परिषद संपली, किंबहुना गेल्या सप्टेंबर महिन्यांत महात्मा गांधींनी केलेल्या प्रायोपवेशनामुळे घडलेला अस्पृश्यांसंबंधाचा "पुण्याचा करार" राजमान्य झाला, तरी अस्पृश्यता ही अवदसा कायमच राहील अशीं चिन्हें दिसत आहेत. जातीय अस्पृश्यता, सार्वत्रिक बहिष्कार आणि कायद्याच्या दृष्टीने सार्वकालिक निराश्रितपणा हीं तीन लक्षणें भारतीय अस्पृश्यतेचीं आजतागायत तरी कायम आहेत. मुसलमानी अमदानींत धर्मांतराने ही अस्पृश्यता नष्ट होत असे. कारण मुसलमानी कायदा हिंदु रूढीला मुळींच जुमानीत नसे. पण ब्रिटिश हिंदी सरकार ह्या बाबतींत अधिक भित्रे आणि कावेबाज आहे. आणि ख्रिस्ती धर्मही महंमदी धर्मापेक्षा अधिक लवचीक आहे. ख्रिस्ती झालेल्याची अस्पृश्यता नष्ट होत नसून केवळ बेपत्ता होते. म्हणजे तिचा नीट नेमका पत्ता न लागल्यामुळें बहिष्काराची कुऱ्हाड तिच्यावर नेमकी उगारणें कठीण जातें. पण जर का पत्ता लागला तर ह्या कुऱ्हाडीच्या उलट आश्रय देण्याचें सामर्थ्य प्रचलित ब्रिटिश कायद्यांतही नाही, ख्रिस्ती धर्मांत तर नाहीच नाही हें उघड आहे. पुण्याच्या शेजारच्याच अहमदनगर जिल्ह्यांत—अहमदनगर शहराला लागूनही—ख्रिस्ती झालेल्यांचे महारवाडे व मांगवाडे ख्रिस्ती न झालेल्यांच्याप्रमाणेंच बहिष्कृत स्थितींत आहेत. ज्यांना ह्या विधानाविषयीं शंका येत असेल त्यांनी मद्रास इलाख्यांतील मागासलेल्या ख्रिस्ती समाजाची आणि मुंबई इलाख्यांतील अहमदनगर, गुजराथ, काठेवाड कडील ख्रिस्ती अस्पृश्यांची स्थिति किती ग्रामबाह्य आणि हलाखीची आहे हें जाऊन पाहावें. जावें त्याच्या वंशा तेव्हा कळे ! 'नित्य विटाळ मानणें, गांवाबाहेरं राहावयास लावणें व कायद्याच्या दृष्टीने निराश्रित असणें, ह्या तीन लक्षणांनी अन्वित एक राष्ट्रीय संस्था अशी आमची व्याख्या तयार झाली; आणि ह्या व्याख्येने ओळखली जाणारी अस्पृश्यता केवळ आमच्या भरतखंडांत आणि शेजारच्या ब्रह्मदेशांतच आढळून येणारी आहे.

उदय

अस्पृश्यता ही एक स्वतंत्र मानवी संस्था आहे. हिचा उदय मानवी जातीच्या अगदी प्राथमिक स्थितींतच झाला असला पाहिजे. भूत, प्रेत, पिशाच्च इत्यादि कल्पना मानवी जातीच्या प्राथमिक म्हणजे अगदी रानटी स्थितींत सर्वत्र पसरलेल्या होत्या. तौलनिक धर्मशास्त्रांत ह्या कल्पनासमुच्चयाला 'भूतवाद' (Animism) असें नांव आहे. हा भूतवाद व ह्याप्रमाणेंच इतर प्राथमिक धर्मांच्या अडाणी कल्पना व त्यांवरून बनलेल्या जादू टोणा, थातुर मातुर इत्यादिकांना मी पुढे 'अपधर्म' असें नांव दिलें आहे. ज्या धर्मांचा पाया मानवी प्रज्ञा आहे तो जरी पुढे निष्काळजीपणामुळें विकृत झाला तरी त्याला मी 'अपधर्म' हें नांव देणार नाही. रागावलेल्या भूतांना संतुष्ट करणें किंवा एखाद्या भूताला लालूच दाखवून किंवा भेवडावून त्याच्याकडून आपल्याला इष्ट असा अर्थ किंवा अनर्थ घडवून आणणें शक्य आहे, अशी प्राथमिक मानवाची समजूत असे. ह्या समजुतीप्रमाणें जादू, टोणा, मंत्र, तंत्र, यंत्र वगैरे जे अपधर्मांचे अनेक प्रकार असत, त्याला 'अभिचार' (Magic) असें एक सामान्य नागर नांव देतां येईल. ह्याचे 'कृष्ण अभिचार' (Black Magic) आणि 'भेषज' (Medicinal) अथवा 'शुक्ल अभिचार' (White Magic) असे दोन मुख्य प्रकार सुधारलेल्या वैदिक काळांतही होते. पहिला प्रकार विशेषतः अथर्व वेदांत आणि दुसरा ऋग्वेदादि वेदत्रयींत विपुल आढळतो. दोन्ही प्रकारचा अपधर्म प्राचीन काळीं सर्व प्राथमिक जगांत होता, इतकेंच नव्हे तर हल्लीच्या रानटी जातींत आणि पुष्कळ ठिकाणीं सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांतूनही अद्यापि आढळतो. तो मी युरोपांत रोमन कॅथॉलिक चर्चमध्यें सौम्य रूपांत आढळणारा स्वतः पाहिला आहे. जन्म, मृत्यु, साथीचे रोग व इतर आकस्मिक आपत्ति ह्यांचा संबंध प्राथमिक जगांत भुतांखेतांकडे आणि क्रुद्ध देवतांकडे लावण्यांत येत असे. त्यांचें निवारण करण्यांत निष्णात असे पंचाक्षरी अथवा वैदू (Medicine Men) होते, तेच पूर्वकाळचे ऋषि आणि पुरोहित असत. त्यांच्या बऱ्या वाईट क्रियांना जादू किंवा अभिचार म्हणतां येईल. ह्याप्रमाणें ह्या जादूचा प्राचीन धर्मांत समावेश झाला, तो अद्यापि पुष्कळ ठिकाणीं सामान्य जनतेंत प्रचलित आहे. ह्या अपधर्मांतच अस्पृश्यतेचा उगम आहे.

प्रथम प्रथम ही अस्पृश्यता वैयक्तिक व प्रासंगिक उर्फ नैमित्तिक होती. बाळंतीण व तिची खोली, मृतांची जागा व आप्त, विशिष्ट रोगी, झपाटलेलीं माणसें, विक्षिप्त झाडें, खुनासारख्या अपघाताचीं ठिकाणें वगैरे बाबी अस्पृश्य आणि वर्जनीय ठरल्या. जादू करणारे जादूगार आणि पुरोहित हे देखील सोंवळे म्हणजे एकप्रकारें अस्पृश्यच असत. देवपूजा करणाऱ्या ब्राह्मणाला आणि यज्ञपरिषद चालू असे तोंपर्यंत सर्व ऋत्विजांना आणि इतर याज्ञिकांना नेहमी सोवळ्यांत म्हणजे अस्पृश्य अथवा अलग स्थितींतच राहावें लागे. कर्नाटकांत मादिग (मातंग) जातीचे ढकलगार म्हणून जे धर्मगुरु आहेत त्यांना स्वतः त्यांचे अनुयायी मादिगही शिवत नाहीत, इतकेंच नव्हे तर त्यांना आपल्या पाणवठ्यांनाही शिवूं देत नाहीत, हें मी प्रत्यक्ष पाहिलें आहे. कर्नाटकांत गदग तालुक्यांत डॉ. कुर्तकोटींच्या बंधूंनी मला हा प्रकार दाखविला. अशा अपधर्माला उत्तरोत्तर जसजसें गूढ आणि दृढ स्वरूप प्राप्त होऊन पुरोहितांच्या द्वारें त्याची परंपरा आणि घटना बनत चालली तसतशी ह्या अस्पृश्यतेच्या वैयक्तिक आणि स्थानिक स्वरूपाची परिणति जातीय आणि सार्वत्रिक ऊर्फ नित्य स्वरूपांत होऊं लागली. निरनिराळ्या मानव जातींत आणि वंशांत पूर्वी अभेद्य शत्रुत्वच असणें साहजिक होतें. मित्रत्व केवळ अपवादच. एका जातीचीं पूजेचीं स्थानें आणि उपकरणें परक्या जातीला अगम्य आणि अस्पृश्य असत.सुधारलेल्या वैदिक काळांत देखील ही परस्पर अस्पृश्यता फार जोरांत होती. इराणी आर्य व हिंदी आर्य हे झरदुष्ट्राच्या काळानंतर विभक्त झाले. त्यानंतर इराणी आपल्यास 'असुरयज्ञ' म्हणजे असुराची पूजा करणारे आणि हिंदी आपणास 'देवयज्ञ' म्हणजे देवांची पूजा करणारे म्हणवूं लागले. हे असुरयाजी व देवयाजी परस्परांना परस्परांच्या यज्ञस्थानांच्या वाऱ्यालाही उभे राहूं देत नसत व तीं स्थानेंही स्वतः अस्पृश्य समजत. म्हणजे परकीयांचें यज्ञस्थान स्वतःला अस्पृश्य आणि त्याज्य व स्वकीयांचें यज्ञस्थान स्वतालाही सोंवळें (अगम्य) अशी वहिवाट असे. एकाचा धर्म तो दुसऱ्याचा अपधर्म आणि दुसऱ्याचा धर्म तो पहिल्याचा अपधर्म अशी समजूत बळावून जातिद्वेष माजत असे. आणि अस्पृश्यतेचें मूळकारण हा जो अभिचारमूलक अपधर्म तो जरी पुढे लुप्त होऊन विस्मृत झाला तरी जातीय अस्पृश्यता शिल्लक

उरलीच. यहुदी लोक शेजारच्या सुमेरिया देशांतील लोकांना अस्पृश्य मानीत असत हें बायबलांतील भल्या सम्यारिटनच्या गोष्टींतील तात्पर्यावरून आजमावितां येतें. येशू खिस्ताला तहान लागली असतां त्याने एका सुमेरियन बाईजवळ पाणी मागितलें; तेव्हा ती म्हणते, "तूं ज्यू असून कसें मला पाणी मागतोस ? कारण ज्यूंचा सुमेरियन लोकांशीं कोणत्याही प्रकारें व्यवहार घडत नाही." (सेंट जॉनकृत शुभवर्तमान अध्याय ४, श्लोक ९ पहा.) अशीं दुसरींही अनेक उदाहरणें सामाजिक इतिहासांतून देतां येतील.

व्याप्ति

वैयक्तिक आणि जातीय अस्पृश्यतेची व्युत्पत्ति वर सामान्यतः सांगितली. असली अस्पृश्यता प्राचीन आर्यांतच होती असें नसून बऱ्याच प्राथमिक राष्ट्रांत, विशेषतः सुधारलेल्या संराष्ट्रांत होती. अस्पृश्यतेचा विकास वैयक्तिक स्वरूपांतून जातीय स्वरूपांत होण्यापूर्वी राज्यांचा विकास साम्राज्यांत झाला असणें समाजवर्धनशास्त्राच्या दृष्टीने आवश्यक आहे. जी जात अथवा राष्ट्र दुसऱ्या सबंध जातीला किंवा राष्ट्राला ज्या काळीं कायमचें अस्पृश्य मानितें व तें राष्ट्र मानून घेतें, ती विजयी जात त्या काळीं सम्राट स्थितीला पोचली असावी लागते. अशा विजयी जातीने दहा पांच इतर मागासलेल्या जातींचा पराजय केल्यावर अशाच एका पराजित जातीला कायमचें हस्तगत करून आपल्या शुश्रूषेस ठेवण्याच्या कल्पनेचा त्या विजयी जातीमध्यें उदय होतो. म्हणजेच साम्राज्याचा उदय होणें होय. आणि तेव्हाच जातीय गुलामगिरीचा उर्फ अस्पृश्यतेचा उदय होणें शक्य असतें. जातीय अस्पृश्यता हा एक गुलामगिरीचाच प्रकार—अर्थात अत्यंत कठोर प्रकार—होय. असा प्रकार असीरिया, बाबिलोनिया इत्यादि द्राविड, इस्त्रायल, आरब वगैरे सेमिटिक, इराणी, मीड इत्यादि आर्य, चीन जपान वगैरे मोंगल—अशा अनेक वंशांच्या अनेक देशांत आढळून येत होता.

ताबू उर्फ विटाळ

वर ज्या अस्पृश्यतेचा उदय आणि व्याप्ति सामान्यत्वेंकरून निर्दिष्ट केली ती कालतः दोन प्रकारची म्हणजे नैमित्तिक आणि नित्य

अशा दोन स्वरूपांची आहे हें वर सांगितलें आहेच. ह्याशिवाय वरील अस्पृश्यतेचे आणखी दोन प्रकार आहेत ते असे. एक तिरस्करणीय व दुसरा आदरणीय. लौकिक मराठी भाषेंत एकाला विटाळ व दुसरीला सोवळें अशीं नांवें आहेत. ह्या दोन्ही प्रकारांची व्याप्ति हिंदुस्थानच्या बाहेरही होती व आहे. ज्याला मराठींत सोवळें असें नांव आहे त्याला इंग्रजींत ताबू (Taboo) असें म्हणतात. अद्यापि जंगली जातींत, विशेषत: आग्नेय आशियांतील बेटांतून राहणाऱ्या जंगली जातीच्या लोकांत, ह्या अस्पृश्यत्वाचा व तद्दर्शक शब्दांचा प्रचार जास्त आहे. ह्या शब्दांत जरी तिरस्करणीय आणि माननीय ह्या दोन्ही अर्थांच्या अस्पृश्यत्वाचा समावेश होतो तरी दुसऱ्या ह्मणजे सोवळेपणाच्या प्रकाराचा प्रचार इंग्रजी शब्दाने जास्त दाखविण्यांत येतो. ह्या विचित्र शब्दाची उत्पत्ति मी वरींच वर्षें शोधीत आहें. इंग्रजी कोशांतून, ह्या शब्दाचें मूळ पॉलिनेशियन जंगली भाषांत आहे, ह्यापेक्षा जास्त खुलासा सांपडत नाही. प. लो. वा. टिळकांचा एक इंग्रजी निबंध "Khaldian and Indian Vedas" (खाल्डियन आणि भारतीय वेद) हा डॉ. सर रामकृष्ण भांडारकर ह्यांच्या स्मरणार्थ लिहिलेल्या निबंधसमूहांत मी वाचला. त्यांत टिळकांनी अथर्ववेदांतील ऋचेचा उतारा दिला आहे. ती ऋचा ही:

ताबुवं न ताबुवं न घे त्वमसि ताबुवम् । ताबुवेना रसं विषम् ॥

अथर्वसंहिता, ५. ३. १०.

प्रो० ब्लूमफील्डने Sacred Books of the East Series, Vol. XLII, Page 28 वर पुढीलप्रमाणें तिचें भाषांतर केलें आहे.—"Tabuvam (or) not Tabuvam, thou (O serpent) art not Tabuvam. Through Tabuvam the poison is bereft of force." अर्थ:— 'ताबुव असो वा अताबुव असो. (रे सर्पा) तूं ताबुव नाहीस. ताबुवामुळें तुझ्या विषाचा जोर नाहीसा होतो.' अथर्ववेदांतील हा ताबुव शब्द आणि इंग्रजी कोशांतील Taboo हा शब्द एकच असावेत अशी मला जबर शंका येऊं लागली आहे. तिला खालील कारणें आहेत. ताबुव शब्दांत मूळरूप 'ताबू' इतकेंच असावें. 'व' हा केवळ आदेश आहे. तो आर्य आणि अनार्य उकारान्त शब्दांना विभक्तींच्या पूर्वी लागणें साहजिक आहे. 'एनसायक्लोपीडिया

ब्रिटानिका' आणि 'हेस्टिंग्स एन्सायक्लोपीडिया ऑफ रिलिजन ॲन्ड एथिक्स' ह्या दोन कोशांतून अशी माहिती मिळते की ताबू हा शब्द प्रथम कॅप्टन कुक ह्यांस पॉलिनेशिआंतील टोंगा नांवाच्या बेटांत इ. स. १७७७ सालीं आढळला. त्यापूर्वी युरोपीय भाषांतून ह्याचा प्रचार नसे. पश्चिम मादागास्करमध्यें 'फादी', मलाया द्वीपकल्पांत 'पंमाल्ली', मलानेसियामध्यें 'ताबु, तापु' वगैरे ह्याच अर्थाचे निराळे शब्द आहेत. एकंदरींत ही ताबूची संस्था हिंदुस्तानांतील सोवळें आणि विटाळ ह्याच स्वरूपाची तंतोतंत आहे. वरील शब्दांपैकी पंमाल्ली हा शब्द द्राविड भाषेंतील 'पंबाडा' ह्या शब्दाशीं संबद्ध असावा. दाक्षिणेंतील मल्याळी, तामीळ व तेलगु भाषांतून अस्पृश्य पारिया जातीच्या पुरोहितांना 'पंबाडा' असें म्हणतात, हें पुष्कळ ठिकाणीं मी पाहिलें आहे. आणि दाक्षिण महासागरांतील बेटांतून ताबू ह्या संस्थेचे जनक तिकडील जंगली जातींचे पुरोहित व नाईक हेच असत. ते सोवळेपणा इतका पाळतात की त्यांना नुसतें पाहाणेंही धोक्याचें असतें असें सांगतात. कर्नाटकांतील मादिग जातीचे पुरोहित ढकलगार हे आपल्या शिष्य मातंगांतही अस्पृश्य असतात हें मी वर सांगितलें आहेच. ते नेहमी एकांतवासांत असतात. त्यांतील एका ढकलगाराला मी एक रुपया देऊं लागलों. तो त्याने जमिनीवर ठेवण्यास सांगितला. हा सोवळेपणाचा मासला ढकलगारांतच नसून हिंदुस्थानांतील वरिष्ठ वर्गांत म्हणजे ब्राह्मण पुरोहितांत नैमित्तिकपणें व ब्राह्मणांच्या जुन्या वळणाच्या बायकांत नित्यपणानेच नांदत आहे. हे सर्व प्रकार तंतोतंत ताबू ह्या संस्थेचेच होत. हे प्रकार उत्तरेपेक्षा दक्षिण हिंदुस्थानांत, विशेषतः द्राविड देशांत आणि त्यांतल्या त्यांत मलबारांत फारच आढळतात हें विशेष ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. कारण फार प्राचीन काळीं मलबार, मादागास्कर बेट व दक्षिण आफ्रिकेचा किनारा ह्यांना जोडणारें 'लिमूरिया' नांवाचें एक खंड होतें. तें आता आरबी समुद्राखाली बुडालेलें आहे असें प्राचीन भूगोलशास्त्र्यांचें मत आहे.

ताबू ह्याचें मूळरूप तापू असून त्यांत ता=खूण करणें अशी धातु असून पु हें एक अतिशयत्वबोधक क्रियाविशेषण असावें असा एनसायक्लोपीडियांतील लेखकाचा कयास आहे. मला वाटतें कानडी

भाषेंत तप्पु=चूक, दोष, असा एक शब्द आहे त्याच्याशीं ताबू ह्या शब्दाचा संबंध असावा. भाषाशास्त्राअन्वयें तप्पूचें तापू=वू=बू अशीं रूपें होण्यास हरकत नाही, असें मला वाटतें. वरील अथर्ववेदांतील जो उल्लेख दिला आहे त्याशिवाय इतरत्र कोठेही हा विक्षिप्त शब्द आढळत नाही. असे विक्षिप्त शब्द व चाली अथर्ववेदांत पुष्कळ आढळतात, ह्यावरून हा भेद आर्येतरांचा असून तो ऋग्वेदाच्याही पूर्वीचा असावा, असा कित्येक विद्वानांचा कयास आहे.

हिंदी अस्पृश्यतेचें संशोधन

असो. आपण येथवर ह्या सामान्य संस्थेचा उगम, उत्पत्ति आणि विकास झाला ह्याचा निर्देश केला. शिवाय प्रस्तुत निबंधापुरती आमच्या विषयाची विशिष्ट व्याख्याही वर दिली. आता ह्यापुढे आमच्या हिंदुस्थानांत वरील तीन लक्षणांनी युक्त अशी अस्पृश्यता केव्हा रूढ झाली ह्या गोष्टीचा छडा लावण्याचा आपण प्रयत्न करूं या. हें काम सोपें नाही. कारण ह्या संस्थेविषयीं ग्रांथिक अथवा शिलालेखीय पुरावा मिळणें अशक्य आहे. तथापि ही संस्था पुरावा नसतांही आमच्या देशांत अगदी अनादि कालापासून होतीच असेंही मानण्याचें कारण नाही. पुढील भागांत शक्य तितका प्रयत्न करून ह्यासंबंधीं जितके ग्रांथिक संदर्भ मिळतील तितके संकलित केले आहेत. इतकेंच नव्हे तर ज्या काळामागे असे संदर्भ सापडत नाहीत त्या काळांत, पुढे अस्पृश्य व तिरस्करणीय ठरलेल्या कांहीं प्राचीन जातींच्या नांवांचा जो केवळ विरळ विरळ उल्लेख आढळतो तो हुडकून त्या जातींचा सामाजिक दर्जा काय होता तोही पुढे निर्दिष्ट केला आहे.

ऐतिहासिक व प्रागैतिहासिक कालविभाग

वेदपूर्वकालीन भारतीय इतिहासाचे पुरावे लेखी मिळणें तूर्त तरी असंभवनीय आहे. आर्यांपूर्वी भारतवर्षांत द्राविड अथवा मिसरी–(मित्री)–इजिप्शियन–लोक आले. तेही बाहेरूनच आले होते. त्यांचें तत्कालीन भारतीय वाङ्मय अद्यापि उपलब्ध नाही. इजिप्त (मित्र–मिस्र–मिसर), असिरियाकडे जें उपलब्ध असेल त्याचा संबंध भारताशीं नाही. आर्यांच्या

आगमनानंतरही पुष्कळ शतकें अखिल भरतखंडांत द्राविड भाषा पसरली होती. पैशाची, बलूची ऊर्फ ब्राहुवी, सिंधी, बंगाली वगैरे प्राचीन व अर्वाचीन राष्ट्रें किंवा भाषाही मुळांत द्राविडी होत्या. बलुचिस्थानांतील हल्लीची ब्राहुवी भाषा वगळली तर बाकीच्या प्राचीन द्राविडी भाषा उत्तर हिंदुस्थानांतील अर्वाचीन देशी भाषांत निरुक्तरूपाने व दक्षिण भारतांत उघड रूपाने अद्यापि विद्यमान आहेत. पण ह्या भाषांतील वाङ्मयावरूनही अस्पृश्यतेच्या उत्क्रमाविषयीं नीट पुरावा मिळविणें अद्यापि सुगम झालें नाही. त्यानंतरच्या इतर सांताळादि भाषांची तीच स्थिति. ह्यापुढच्या पाली आणि प्राकृत भाषांचे कांही ग्रंथ रोमन लिपींत आणि सिंहली लिपींत असल्यामुळें त्यांच्यांतूनही हा पुरावा शोधीत बसणें फार मुष्किलीचें आहे. म्हणून तूर्त येऊन जाऊन संस्कृत वाङ्मयावरच विसंबून राहणें भाग आहे. त्याचा आता विचार करूं.

'आर्य' ह्या नांवाचा एक विशिष्ट मानववंश नव्हता. युरोप आणि आशियांत राहणाऱ्या कांही मानववंशांमध्यें एक सामान्य भाषा रूढ होती असा गेल्या शतकांत शोध लागल्यावरून त्या भाषेच्या सर्व शाखांना 'आर्य' हें नांव पाश्चात्य भाषापंडितांनी दिलें. त्या शाखांचा मूळ संबंध हल्ली ज्या ज्या आशियांतील व युरोपांतील जातींशीं पोहोचतो त्या सर्व जातींना देखील 'आर्य' हेंच नांव कांही पाश्चात्य मानव-वंश-शास्त्री दडपून देतात. पण हें नामाभिधान चुकीचें आहे. हिंदुस्थानांतील ह्या भाषेला संस्कृत असें जें नांव पडलें आहे तें तर अगदी अलीकडचें, पतंजलीच्या नंतरचें, म्हणजे फार तर दोन हजार वर्षांपूर्वीचें आहे. त्यापूर्वी तिला वेंद आणि अवेस्ता ह्या ग्रंथसमूहाची भाषा किंवा 'छांदस' ऊर्फ 'झेंद' भाषा असें नांव असे. ह्या प्राचीन आर्य किंवा छांदस भाषेंत जें वाङ्मय आज उपलब्ध आहे, त्यास वैदिक आणि अवेस्तिक अशीं नांवें आहेत. ह्या वैदिक वाङ्मयांत संहिता, ब्राह्मण, आरण्यकें, उपनिषदें, सूत्रें इतक्यांचाच समावेश होतो. ह्यांच्या काळाला प्राचीन अथवा **प्रागैतिहासिक काळ** असें म्हणतां येईल. ह्यापुढे श्रीगौतमबुद्धाचा उदय (इ. स. पूर्वी ५६७ मध्यें) झाला. येथून **ऐतिहासिक काळ** चालू झाला.

प्रकरण दुसरें

पुरातन अस्पृश्यतेचें रूपनिदर्शन

बुद्धोदयकालीन अस्पृश्यता

गौतम बुद्धाचा उदय म्हणजे भारतीय इतिहासांतील किंबहुना आशियाखंडाच्या इतिहासांतील एक मोठी मुहूर्तमेढ होय. कोणत्याही ऐतिहासिक विषयाचें विवेचन करावयाचें झाल्यास ह्या मेढीपासून पुढे, म्हणजे अलीकडे ऐतिहासिक काळांत, व मागे, म्हणजे पलीकडे प्रागैतिहासिक काळांत, शोध करीत जावें लागतें. आणि आम्हांलाही अस्पृश्यतेचा छडा लावण्यासाठी ह्या दोन भिन्न दिशांनी ह्या मेढीपासून आगेमागे गेलें पाहिजे. म्हणून प्रथम प्रत्यक्ष बुद्धोदयकालीं म्हणजे इ. स. पूर्वी ६०० वर्षांच्या सुमारास अस्पृश्यतेची उपरिनिर्दिष्ट व्याख्येच्या दृष्टीने किती प्रतिष्ठा झाली होती तें पाहूं या. ह्या काळीं उत्तर भारतांत चार वर्णांची आर्यांनी तर पूर्ण स्थापना केली होतीच. ती वर्णव्यवस्था जवळ जवळ जन्मसिद्ध मानली जात असे. इतकेंच नव्हे तर ब्राह्मण आणि क्षत्रिय ह्या दोन्ही जाती डोईजड झाल्या असून त्यांच्यांत परस्पर वर्चस्वासाठी तीव्र तंटा चालू होता. स्वतः बुद्ध आणि महावीर, तसेंच त्यांचे अनुयायी, क्षत्रिय वर्णाला सर्वश्रेष्ठ मानीत आणि ब्राह्मण वर्गास त्यांचे आश्रित समजत. पुढे जीं ब्राह्मणी संस्कृतीचीं पुराणें झालीं त्यांतही राम, कृष्ण इत्यादि अवतारी पुरुष आणि जनकादि तत्त्वद्रष्टे हे क्षत्रियच होते; म्हणून क्षत्रियांविषयींची पूज्यबुद्धि ब्राह्मणांमध्येंही पुढे रूढ झालेली आढळते. तथापि ब्राह्मण आणि क्षत्रिय यांचा जातिमत्सरविषयक तंटा बुद्धाच्या पूर्वीच विकोपाला गेला होता, हें पाली आणि संस्कृत वाङ्मयावरून उघड होतें. ह्या दोन डोईजड वर्णांनी वैश्य नांवाच्या सामान्य आर्य वर्गांलाही तुच्छ मानिलें होतें; मग आर्येतर शूद्रांची काय कथा!

स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यांति परां गतिम्। – भगवद्गीता, ९.३२

ह्या भगवद्गीतेच्या उदार उद्गारावरूनच सिद्ध होतें की त्या काळीं शूद्रांप्रमाणें वैश्यांचा दर्जाही ब्राह्मण–क्षत्रियांकडून कमीच मानला गेला

होता. आध्यात्मिक बाबतींत स्त्रियांचा दर्जा शूद्रांपेक्षाही कमी होता. प्रत्यक्ष गौतम बुद्धालाही स्त्रीसमाजाविषयीं म्हणण्याइतका आदर नव्हता. अशा वेळीं शूद्रत्वाचाही मान ज्यांना मिळाला नव्हता अशा अतिशूद्र वर्गांची स्थिति वरील व्याख्येप्रमाणें पूर्णपणाने बहिष्कृत होती. मानीव चार वर्णांचा हळूहळू लोप होऊन हल्ली दृढ झालेल्या जाती पोटजाती ह्यांची आर्थिक पायावर झपाट्याने उभारणी चालली होती. आणि ह्या उभारणींत अतिशूद्रांना कोणत्याही वृत्तीचा अधिकार अथवा धंद्याची मान्यता दिली गेली नव्हती. अस्पृश्य जाती ग्रामबाह्य ठरून त्या वंशपरंपरागत नीच आणि व्यवहारवर्ज्य उर्फ अनाचरणीय ठरल्या होत्या. म्हणूनच ह्या सर्व अन्यायाला विरोध करण्यासाठी गौतमाचा शुद्ध बुद्धिवाद उदय पावला. त्याच्या काळीं चंडाल, निषाद, वृषल, पुक्कस (पुल्कस) इत्यादि ज्या जाती अस्पृश्य आणि ग्रामबाह्य होत्या त्यांनाही तो उपदेश करी व त्यांतील कोणी योग्य दिसल्यास त्यास आपल्या भिक्षुसंघांतही निःशंक घेई. थोडक्यांत सांगावयाचें तें हें की उत्तर भारतांत, म्हणजे आर्यावर्तांत, चार वर्ण आणि त्यांतील सर्व पोटभेदांचाच तत्कालीन ग्रामव्यवस्थेंत समावेश झाला होता. आणि ह्या वर्णव्यवस्थेबाहेरील अतिशूद्रांची किंवा असत्शूद्रांची गावाबाहेर पण जवळच वस्तीची व्यवस्था झाली होती. आपस्तंब धर्मसूत्र मनुस्मृतीपेक्षा आणि भगवद्गीतेपेक्षाही जुनें आहे.तें बुद्धपूर्वकालीन असावें, निदान बुद्धसमकालीन तरी असावें. त्यांत ब्राह्मणादि उच्च वर्णीयांचा स्वयंपाक सत्शूद्रांनी करावा आणि स्वयंपाक करतेवेळीं आचमन म्हणजे आंघोळ कशी करावी ह्याविषयीं खालील नियम आहे.

आर्याधिष्ठाता वा शूद्राः संस्कर्तारः स्युः ॥ ४ ॥ तेषां स एवाचमनकल्पः ॥ ५ ॥ अधिकमहरहः केशश्मश्रुलोमनखवापनम् ॥ ६ ॥

—आपस्तंब धर्मसूत्र, प्रश्न २, खण्डिका ३.

आर्यांच्या घरीं स्वयंपाक करतांना त्यांच्या देखरेखीखाली सत्शूद्रांनी आर्यांप्रमाणेंच आचमन करून म्हणजे हस्तपादादि अवयव धुवून रोज रोज केस, मिशा, नखें काढून कामाला लागावें, असा संप्रदाय होता. हल्लीही अस्पृश्य मानलेल्या बटलरांना युरोपियन साहेबांच्या बंगल्यांत हेच नियम हुबेहूब पाळावे लागतात. पुढे ह्याच आपस्तंब सूत्रांत म्हटलें आहे की—

अप्रयतोपहृतमन्नं अप्रयतं न त्वभोज्यम् ॥ २१ ॥ अप्रयतेन तु शूद्रेणा उपहृतमभोज्यम् ॥ २२ ॥

रा. सातवळेकरांनी प्रयत शब्दाचा अर्थ स्वच्छ असा केला आहे. त्याचा अर्थ आर्यांच्या नियमनाखाली आलेला किंवा वर्णव्यवस्थेंत स्वीकारलेला शूद्र असाही होईल. शिकवून तयार केलेला—ट्रेन्ड—असा अर्थ होईल. अशा शिकलेल्या शूद्राने आणलेलें अन्न घ्यावें, अप्रयत म्हणजे न शिकलेल्या—अन्ट्रेन्ड—असत् शूद्राचें घेऊं नये, असा अर्थ होतो. ह्यावरून अप्रयत शूद्र हेच ग्रामबाह्य अतिशूद्र असावेत असा तर्क होतो. अशाच एका बहिष्कृत बाईजवळ तथागताने म्हणजे गौतम बुद्धाने प्रथम पिण्यास मागितलें अशी एक बौद्ध कथा वर सांगितलेल्या ख्रिस्ताच्या कथे-सारखीच आहे. सोपाक (श्वपच) नांवाच्या एका चांडाळाला भिक्षुसंघांत घेतलें हें प्रसिद्धच आहे. बुद्धकालीन समाजव्यवस्थेसंबंधीं साधार ऐतिहासिक माहिती पाली वाङ्मयावरून तयार केलेली प्रसिद्ध बौद्धवाङ्मयसंशोधक प्रो. व्हिस डेव्हिड्स ह्यांच्या 'बुद्धिस्ट इंडिया' ह्या ग्रंथाच्या ४ थ्या भागांत चांगली मिळण्यासारखी आहे. ती पुढे यथानुक्रम आढळेल. असो.

आता आपण प्रथम ह्या बुद्धोदयकालाच्या मागे मागे अस्पृश्यतेचा छडा लावीत, प्राचीन वाङ्मयांत मिळतील तितके संदर्भ शोधीत जाऊं. अगदीच गति खुंटल्यावर मागे परतूं. मग तिसऱ्या प्रकरणांत बुद्धोदयकालापुढील बौद्धकालांतील अस्पृश्यतेचें निरीक्षण करूं. तदनंतर क्रमाक्रमाने अगदी आताच्या काळाला येऊन भिडूं.

बुद्धपूर्वकालीन उर्फ प्रागैतिहासिक अस्पृश्यता

१. पाणिनीचा काल

संस्कृतचा आद्य व्याकरणकार पाणिनि ह्याचा काल नक्की ठरत नाही. सर डॉ. भांडारकर त्याच्या कालाचा सुमार इ. स. पूर्वी ६००–७०० असावा म्हणतात. पाणिनीच्या अष्टाध्यायींत पुढील सूत्र आहे.

शूद्राणाम् अनिरवसितानाम् ।

—पाणिनीय अष्टाध्यायी, २. ४. १०.

ह्या सूत्रावर भट्टोजी दीक्षितकृत सिद्धान्तकौमुदींत पुढील टीका आहे :—

अबहिष्कृतानां (अनिरवसितानां) शूद्राणां प्राग्वत्। तक्षायस्कारम्। पात्राद्बहिष्कृतानां तु चण्डालमृतपाः।

हाणजे भावार्थ असा की तक्षा=सुतार, अयस्कार=लोहार वगैरे अबहिष्कृत शूद्रांच्या नांवाचा द्वंद्व समास पूर्वीच्या नियमाप्रमाणें नपुंसकलिंगी आणि चंडाल मृतप इत्यादि बहिष्कृत शूद्रांच्या नांवाचा द्वंद्व समास पुल्लिंगी असा पाणिनिकृत निर्णय आहे. आमचा प्रस्तुत मुद्दा व्याकरणाचा नसून, पाणिनीच्या कालांत बहिष्कृत उर्फ निरवसित अस्पृश्यता इतकी रूढ झाली होती की तिच्या विधिनिषेधाचा प्रवेश व्याकरणाच्या सूत्रांतही आढळावा, हा आहे. निरवसित ह्या शब्दाचा अर्थ भट्टोजी दीक्षितांनी 'पात्राद् बहिष्कृत' असा केला आहे. पात्राद् बहिष्कृत म्हणजे ज्यांनी वापरलेलीं भांडीं वरिष्ठ वर्गास चालत नव्हतीं ते असा अर्थ होतो. अशा अस्पृश्यांना बंगाल प्रांतांत 'अनाचरणीय जाती' अशी संज्ञा अद्यापि आहे. 'ग्रामाद् बहिष्कृत' असा अर्थ केला असता तर आम्ही ठरविलेल्या व्याख्येप्रमाणें पाणिनीच्या काळीं आजकालची अस्पृश्यता रूढ झाली होती असा ठाम सिद्धान्त ठरला असता. तथापि बहिष्काराचा उल्लेख,मग तो 'पात्रात्' असो की 'ग्रामात्' असो, इतका स्पष्ट पाणिनीच्या पूर्वी दुसरा मिळेपर्यंत पाणिनीच्या काळांतच आमच्या प्रस्तुत अस्पृश्यतेचें प्रस्थान ठेवणें तूर्त भाग आहे. पाणिनीचा देश हिंदुस्थानच्या हल्लीच्या पश्चिम शिवेवरचा पेशावर प्रांत होता. अर्थात् हें प्रस्थान उत्तर हिंदुस्थानपुरतेंच ठरत आहे. दक्षिणेकडील अस्पृश्यतेचा विचार पुढील टप्प्यांत करूं.

२. अव्वल औपनिषद काल

चांडाल आणि पौल्कस

सुदैवाने आपल्यास बृहदारण्यकोपनिषदांतील चवथ्या अध्यायांतील तिसऱ्या ब्राह्मणांतील २२ व्या सूक्तांत अस्पृश्यांच्या स्थितीसंबंधीं मोठा मार्मिक उल्लेख आढळतो तो असाः—

अत्र पिताऽपिता भवति माताऽमाता लोका अलोका देवा अदेवा वेदा अवेदा अत्र स्तेनोऽस्तेनो भवति भ्रूणहाऽभ्रूणहा चाण्डालोऽचाण्डालः पौल्कसोऽपौल्कसः श्रमणोऽश्रमणस्तापसोऽतापसोनन्वागतं पुण्येनानन्वागतं पापेन तीर्णो हि तदा सर्वाञ् शोकान्हृदयस्य भवति।

ह्याच्या पूर्वीच्या २१ व्या सूक्तांत आत्मस्थितीप्रत पोचलेल्या प्राज्ञ पुरुषाची जी अत्यंत उच्च स्थिति वर्णिली आहे तिचेंच वर्णन ह्या २२ व्या सूक्तांत अधिक विस्ताराने केलें आहे. ह्याचा भावार्थ हा की, ह्या अत्युंच स्थितीला पोहोचलेला पुरुष बापाला बाप म्हणून अथवा आईला आई म्हणून ओळखीत नाही, ह्या अभेद्य स्थितींत चांडालाचें चांडालत्व पौल्कसाचें पौल्कसत्वही विलय पावतें, इत्यादि इत्यादि. म्हणजे आपल्या नेहमीच्या व्यावहारिक स्थितींत चांडाल व पौल्कस इत्यादि भेद तेव्हा पाळले जात असत असें दिसतें. बौद्ध वाङ्मयांत या स्थितीला प्रज्ञापारमिता असें पारिभाषिक नांव असे. जुन्या मताचे हिंदु चांडालादि वर्णबाह्य लोकांना दूर ठेवीत, केवळ प्रज्ञापारमितावस्थेंतच त्यांचा अभेद कल्पीत असत. तर उलट पक्षीं बौद्धमतवादी व्यावहारिक स्थितींतही त्यांना स्पृश्य मानीत असत, असें सिद्ध होतें. बौद्ध जरी अस्पृश्यता मानीत नव्हते तरी इतर हिंदु ती मानीत असल्याने बुद्धोदयकाळीं ती होती हें आम्ही वर सिद्ध केलेंच आहे. परंतु त्याच्या पूर्वी सुमारें दोनतीनशें वर्षांच्या काळांत म्हणजे बृहदारण्यक व छांदोग्य ह्या उपनिषदांच्या काळांत अस्पृश्यता होती की नव्हती हें ठरविणें कठीण आहे. ह्या काळीं चांडाल व पौल्कस ह्या जाती तिरस्करणीय मानल्या जात होत्या असे उल्लेख सापडतात पण त्या आजच्यासारख्या अस्पृश्य व बहिष्कृत होत्याच असा स्पष्ट उल्लेख नाही. निदान तूर्त सापडत नाही.

ह्याच प्रकारचे दोन उल्लेख छांदोग्य उपनिषदांत आढळतात. हें उपनिषदही जवळ जवळ बृहदारण्यकाइतकें जुनें व विस्तृत आहे. ह्याच्या ५ व्या अध्यायाच्या १० व्या खंडांतील ७ वा श्लोक खाली दिल्याप्रमाणें आहेः—

> तद्य इह रमणीयचरणा अभ्याशो ह यत्ते रमणीयां योनिमापद्येरन् ब्राह्मणयोनिं वा क्षत्रिययोनिं वा वैश्ययोनिं वाथ य इह कपूयचरणा अभ्याशो ह यत्ते कपूयां योनिमापद्येरन् श्वयोनिं वा सूकरयोनिं वा चाण्डालयोनिं वा ॥

अर्थः—पुण्याचरण करणारे पितृयानांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य इत्यादि आर्य उर्फ शुभ योनि प्राप्त करून घेतात व अशुभ आचरण करणारे कुत्रा, डुक्कर किंवा चांडालादि हीन योनीप्रत जन्म घेतात. पुनः

ह्याच उपनिषदाच्या ५व्या अध्यायाच्या २४व्या खंडांतील ४था श्लोक असा आहे.

तस्मादु हैवं विद्वयपि चण्डालायोच्छिष्टं प्रयच्छेदात्मनि हैवास्य तद्वैश्वानरे हुतं स्यादिति।

अर्थः–ह्या खंडांत अग्निहोत्राचें महत्त्व सांगून शेवटीं म्हटलें आहे की जो ब्रह्मविद् आहे त्याने चंडालाला आपलें उष्टें दिलें तरी वैश्वानर आत्म्यामध्यें आहुति दिल्याप्रमाणेंच पुण्य आहे. ह्या दोन्ही श्लोकांचा भावार्थ बृहदारण्यकोपनिषदांतील भावार्थाप्रमाणेंच आहे. एकंदरींत ह्या उपानिषदांच्या काळांत आर्यांचे तीनच वर्ण होते आणि हल्लीचा जाति भेद नव्हता. हे वर्ण केवळ जन्मावरच अवलंबून नसून कर्मावरून आणि ज्ञानावरूनही क्वचित् घडत असत. ह्या तीन वर्णांच्या बाहेरचा मोठा जो आर्येतर समाज त्यांतील कांही जाती आर्यांच्या स्वाधीन होऊन त्यांची परिचर्या करून रहात. त्यांचा शूद्र नांवाचा चौथा वर्ण पुढे बनविण्यांत आला. ह्या चौथ्या वर्णांत समाविष्ट न झालेल्या चांडाळ व पौल्कस इत्यादि तिरस्करणीय जाति वर्णबाह्य अशाच राहात होत्या. यांनाच पुढे अप्रयत शूद्र अशी संज्ञा मिळून पुढे बुद्धोदयकाळीं किंवा त्याच्या आगेमागे आपस्तंब सूत्राच्या काळीं त्यांना हल्लीची अस्पृश्यता प्राप्त झाली असावी. परंतु ह्या अव्वल उपनिषत्काळीं चांडाल पुल्कस इत्यादि जाती जरी हीन मानल्या जात होत्या तरी त्या खरोखरच अस्पृश्य आणि ग्रामबाह्य होत्या की नाही हें ठरविण्यास निश्चित पुरावा नाही. तरी बहुतकरून त्या तशा असाव्यात असाच अंदाज करणें जास्त योग्य होईल.

३. ब्राह्मणकालीन अस्पृश्यता

प्राचीनांत प्राचीन जें बृहदारण्यक उपनिषद त्याच्याही मागे वाङ्मयांत ब्राह्मणकाल आहे. कृष्णयजुर्वेदीय तैत्तिरीय ब्राह्मणाच्या तृतीय कांडांत चांडाल व पौल्कस ह्या दोन राष्ट्रांचा केवळ नामनिर्देश मात्र आढळतो. पण त्यावरून हीं राष्ट्रें अगदी अस्पृश्य व ग्रामबाह्य होतीं असा तर्क काढण्यास मुळींच जागा नाही. त्रैवार्णिक आर्यांहून त्या भिन्न वंशाच्या होत्या. फार तर त्या किंचित् कमी गणल्या जात असाव्यात इतकेंच सिद्ध होतें. ह्या तैत्तिरीय ब्राह्मणाच्या कालांत पुरुषमेध करण्याची चाल अद्याप शिल्लक राहिलेली होती. पण ह्या मेधांत पशूंच्या ऐवजीं ज्या

पुरुषांचा बळी देण्यांत येत असे त्या पुरुषाला ठार न मारतां जिवंत सोडून देण्यांत येत असे. अद्यापि कांही अस्सल मराठ्यांच्या घरीं रानसटवाईची अथवा घोडेसटवाईची पूजा म्हणून एक विधि मूल जन्मल्यापासून त्याचें जावूळ काढावयाच्या अगोदर करण्यांत येत असतो. हा विधि रानांतच करावयाचा असतो. रानसटवाईच्या पूजेंत बकरें जिवंत मारून त्याचा नैवेद्य सटवाईला दाखवावयाचा असतो. पण घोडेसटवाईच्या पूजेंत एक बकरें आणून त्याचा बळी देऊन तें जिवंतच सटवाईच्या नांवाने सोडावयाचें असतें. नैवेद्य व जेवण पुरणपोळीचेंच असतें. माझ्या बाळपणीं माझ्यामागून जन्मलेल्या सर्व भावंडांचें जावूळ काढण्यापूर्वी हा घोडेसटवाईचा विधि माझ्या वडिलांनी केलेला मी स्वतः पाहिला आहे. घोडेसटवाई या नांवावरून पूर्वी घोडे जिवंत सोडले जात असावेत पण गरिबीमुळें ती पाळी बकऱ्यावर, कोंबड्यावर व शेवटीं अंड्यावर आणि लिंबावरही आली असावी. हाच प्रकार तैत्तिरीय ब्राह्मणाच्या तृतीय कांडांत वर्णन केलेल्या पुरुषमेधाचाही आहे. हा पुरुषमेध म्हणजे ऋग्वेदाच्या १०व्या मंडलांतल्या पुरुषसूक्तांतील विराट्पुरुषाच्या मेधाप्रमाणें रूपकवजाच आहे. ह्या तृतीय कांडांतील ४ थ्या प्रपाठकांत निरनिराळ्या लहान मोठ्या देवतांना निरनिराळ्या जातींच्या पुरुषांच्या बळींचा विधि सांगितला आहे. ह्या देवतांच्या महत्त्वाप्रमाणें पुरुषांच्या जातींचें महत्त्व अथवा लघुत्व दिसून येतें. १४ व्या मंत्रांत " बीभत्साये (देवतायै) पौल्कसम " आणि १७ व्या मंत्रामध्यें " वायवे (देवतायै) चाण्डालम् " असे उल्लेख स्पष्ट आहेत. ह्यावरून पौल्कस जातीचे लोक बीभत्स (शिश्नदेवतेची) पूजा करीत असावेत व चांडाल वायु देवतेची पूजा करीत असावेत असा तर्क करावा लागत आहे. वायु देवतेचा संबंध रुद्र उर्फ शिव देवतेशीं पोहोचतो. ह्यावरून चांडाल आणि पौल्कस आताप्रमाणेंच तेव्हाही शक्तीचीं आणि शिवाचीं उपासक राष्ट्रें असलीं पाहिजेत इतकेंच सिद्ध होतें. ह्या पूजेचे प्रकार तेव्हा बीभत्स असले तरी ह्या जाती तेवढ्यावरूनच अस्पृश्य होत्या असा मुळीच ध्वनि निघत नाही.

निषाद आणि वृषल

चांडाल आणि पौल्कस ह्यांशिवाय यास्काच्या निरुक्तांत या जातींचा उल्लेख अध्याय ३ खंड १६ मध्यें पुढीलप्रमाणें आढळतो.

वदिति सिद्धोपमा। ब्राह्मणवत् वृषलवत्। ब्राह्मणा इव वृषला इव।

ह्या मंत्रावर यास्कानेच जें भाष्य केलें आहे त्यांत वृषलाचा अर्थ सांगतांना केलेल्या 'वृषलो वृषशीलो भवति वृषाशीलो वा।' ह्या व्युत्पत्तीवरून वृषल नांवाची एक निराळी जात होती की बैलासारखा एखादा मठ्ठ अनार्य माणूस इतकाच वृषल याचा अर्थ घ्यावयाचा, असा विकल्प प्राप्त होतो. चंद्रगुप्त मौर्याचा गुरु आणि दिवाण चाणक्य केव्हा केव्हा रागाऊन चंद्रगुप्तास 'रे वृषल' ('ए बैला') असा टोमणा मारीत असे. ह्यावरूनही वृषल नांवाची एक निराळी जात नसावी अशी शंका येते.

निरुक्ताचा अध्याय ३ खंड ८ यांत माणसांच्या निरनिराळ्या २५ प्रकारांपैकी पंचजन हा एक प्रकार सांगितला आहे. ह्या पंचजन नांवाचा अर्थ सांगतांना यास्काचार्यांनी 'चत्वारो वर्णा निषादः पञ्चम इति औपमन्यवः।' असा औपमन्यव नांवाच्या प्राचीन स्मृतिकारांचा दाखला दिला आहे. त्याशिवाय 'निषादः कस्मात्? निषदनो भवति, निषण्णमस्मिन् पापकम् इति।' म्हणजे,ज्याच्यामध्यें पाप दृढ होऊन बसलें असतें तो निषाद, असा अर्थ स्वतः यास्काचार्य देत आहेत. परंतु बुद्धोदय-कालाच्या उपनिषदांतून फक्त शूद्र वर्णाचा उल्लेख सापडतो. पांचव्या वर्णाचा उल्लेख औपमन्यवांनीच प्रथम केला आहे. त्यावरून औपमन्यवांचा काळ उपनिषदांचे मागूनचा म्हणजे बुद्धोदयानंतरचा किंवा फार तर तत्कालीन असावा; असें होतें. आणि यास्काचा काळ तर त्याच्याही मागूनचा असें सिद्ध होतें. मनुस्मृतीने यास्काच्याही मागून चांडालांना 'नास्ति तु पंचमः' असें म्हणूनही पुनः ५व्या प्रकारांत गणिलें आहे. त्याचा विचार योग्य स्थळीं करूं.

वर जे यास्क, पाणिनि वगैरे प्राचीन ग्रंथकारांचे उल्लेख आले आहेत त्यांचा संदर्भ वाचकांनी फार सावधगिरीनेच समजला पाहिजे. कारण त्यांच्या कालनिर्णयासंबंधाने विद्वानांत फार वाद माजून राहिला आहे. जसजसें संशोधन जास्त होत आहे तसतसा हा वाद अधिकच माजत आहे. यास्क आधी किंवा पाणिनि आधी, आणि हे दोघेहि बुद्ध-काळापूर्वी किंवा मागून, ही गोष्ट छातीवर हात ठेऊन अद्यापि सांगण्यास कोणी विद्वान धजत नाहीत. साधारणपणें यास्क पाणिनीच्या पूर्वी कित्येक शतकें झाला असावा अशी समजूत आहे. कारण 'पाणिनीने यास्क

शब्द सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे ह्यावरून हा पाणिनीच्या पूर्वी असावा..बृहदारण्यक उपनिषदांत व पिंगल छंदःसूत्रांत ह्याचा उल्लेख आहे,' वगैरे पुण्याचे चित्रावशास्त्री आपल्या 'प्राचीन चरित्रकोशां'त लिहितात. राजवाडे पाणिनीचा काळ इ. स. पू. १२००–९०० इतका मागे नेतात, सर डॉ.भांडारकर७००–६००ठरवितात, पण कित्येक पुरावे असेही मिळतात की, पाणिनि फार तर इ. स. पूर्वी ४००–३५० पेक्षा मागे जाऊं शकतच नाही. राजशेखराची काव्यमीमांसा ख्रिस्ती शकानंतर१०००च्या सुमारास झाली. तिच्यांत उल्लेख आहे तो असा.—

श्रूयते च पाटलिपुत्रे शास्त्रकारपरीक्षा—

अत्रोपवर्षवर्षाविह पाणिनिपिङ्गलाविह व्याडिः ।
वररुचिपतञ्जली इह परीक्षिताः ख्यातिमुपजग्मुः ॥

काव्यमीमांसा, १०. (पृ, ५५).

ह्या पाणिनि पिंगल इत्यादि मंडळीच्या परीक्षा पाटलिपुत्र या राजधानीत झाल्या असल्या तर, पाटलिपुत्र हा गांव उदयी राजाने प्रथम राजधानीचा केला, त्यानंतरच झाल्या असाव्या. त्या उदयी राजाचा काळ इ. स. पू. ४५० हा आहे. हरचरितचिंतामणीच्या २७व्या सर्गात माहिती मिळते की, नंदाच्या पाटलिपुत्र राजधानींत शंकरस्वामीच्या वर्ष नांवाच्या पुत्रापासून पाणिनि हा विद्या शिकला. यावरूनही त्याचा काळ इ. स. पूर्वी ४००–३५०च्या सुमाराचा ठरतो.

तें कसेंही असो. ह्या प्राचीन ऋषींचा कालनिर्णय करण्याचें हें स्थळ मुळीच नव्हे. पण निरुक्ताचा अध्याय ३ खंड ८ यांत माणसाच्या २५ जातींचा उल्लेख केला आहे असें वर म्हटलें आहे, तेथे यास्काचार्यांनी प्रथम—

पञ्चजना मम होत्रं जुषध्वम्। ऋग्वेदसंहिता, १०. ५३. ४.

असा श्रुतिमंत्राचा आधार देऊन त्यावरील भाष्यांत स्पष्ट म्हटलें आहे—

गधर्वाः पितरो देवा असुरा रक्षांसीत्येके। चत्वारो वर्णा निषादः पंचम इत्यौपमन्यवः ॥

येथे पंचजन ह्या शब्दाचे दोन अर्थ स्पष्ट सांगितले आहेत. 'गंधर्व, पितर, देव, असुर, राक्षस' हा एक अर्थ आणि 'चार वर्ण, म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि पांचवा निषाद, म्हणजे वर्णबाह्य मानलेल्यांचा समुदाय,

हा दुसरा अर्थ. आता हे औपमन्यव स्मृतिकार कोण व केव्हाचे असावेत हाच प्रश्न मुद्द्याचा आहे. ब्राह्मणकाळांत आणि अव्वल उपनिषद् काळांत तीनच वर्ण होते. पुढे चौथा शूद्रवर्ण समाविष्ट केला तो अव्वल उपनिषदांचा काळ नव्हे. तो पाणिनीचा काळ; म्हणून हे औपमन्यव पाणिनीच्या, किंबहुना ते ज्या अर्थी पांचवा वर्ण मानतात त्या अर्थी बौद्धांच्या काळीं, किंवा त्या नंतरचे, असावेत असा तर्क होत आहे व त्यांचा उल्लेख ज्या यास्काचार्यांनी केला ते पाणिनीनंतरचे अशी अर्थापत्ति निघत आहे. पण यास्काचार्यांचा काळच बृहदारण्यक उपनिषदाचे वेळीं ठरत असल्यास औपमन्यव त्याहूनही पूर्वीचे ठरून पांचवा वर्ण जो निषादांचा तो इ. स. पू. ८००–९००चा ठरून जवळजवळ श्रीकृष्णाच्या काळापर्यंत मागे जाऊं पाहतो. निषाद म्हणून कोणी एक विवक्षित जात नव्हती. पण शूद्रवर्णाहून ते निराळे व वर्णबाह्य होते हें खरें. तथापि ते आमच्या वरील व्याख्येप्रमाणें अस्पृश्य आणि ग्राम्यबाह्य होते असें ठरत नाही. वाचकांनी ह्या सर्व गोष्टी तारतम्याने व सावधपणानेच विचारांत घ्याव्यात हें बरें.

प्रो. मॅक्डोनेल व कीथ यांनी *Vedic Index* या नांवाचा वेदांतील शब्दांचा कोश तयार केला आहे. त्याच्यांत ४५३ पानावर निषाद शब्दासंबंधीं पुढील खुलासा केला आहे.

Nishada is found in later Samhitas and the Brahmanas. The word seems to denote not so much a tribe but a general term for the Non-Aryan tribes who were settled down but were not under Aryan control as the Shudras were; for, the Aupamanyava took the five people *panchajana* to be the four castes and the Nishadas and the Commentator Mahidhara explains the word as Bhills.

अर्थ:-"निषाद हा शब्द नंतरच्या संहितांमध्यें आणि ब्राह्मणांमध्यें आढळतो. तो शब्द येथे विशिष्टजातिवाचक नसून सामान्यैंकरून ज्या आर्येतर जाति त्या वेळेस वसाहत करून होत्या परंतु शूद्रांप्रमाणें ज्या आर्यांच्या सत्तेखाली आल्या नव्हत्या अशा सामान्य जातींचा वाचक आहे, असें वाटतें. कारण, औपमन्यव हे पंचजन याचा अर्थ चार वर्ण आणि निषाद असा घेतात; आणि भाष्यकार महीधर निषाद शब्दाची भिल्ल अशी व्याख्या करतो."

ह्यावरून निषाद ही जमात चातुर्वर्ण्याच्या बाहेरची होती, तरी ती अस्पृश्य खात्रीने नव्हती; आणि भिल्ल, सांताळ, गोंड वगैरे रानटी जाती आजही अस्पृश्य नाहीत हें ध्यानांत घेण्यासारखें आहे.

४. श्रीकृष्ण काल

बृहदारण्यकोपनिषद् हें सर्व उपनिषदांत अत्यंत प्राचीन असें जर्मन प्रोफेसर पॉल डॉयसन इत्यादिकांनी ठरविलें आहे. त्या काळापर्यंत म्हणजे इ. स. पूर्वी सुमारें ८०० वर्षें तरी—जास्तच पण कमी नव्हे—चांडालांची व पौल्कसांची आताप्रमाणें बहिष्कृत आणि अस्पृश्य अशी स्थिति थोड्याबहुत अंशाने व्हावयास लागली होती. ह्याही पलीकडे आर्येतर शूद्र राष्ट्रांचीं नांवें छांदस वाङ्मयांत फार क्वचित् आढळतात. त्या राष्ट्रांची स्थिति बहिष्कृत आणि अनाचरणीय होतीच असा सबळ पुरावा सापडत नाही. उलट ती तशी नसावी असें समजण्यास जे पौराणिक उल्लेख सापडतात त्यांचा आता निर्देश करूं. ब्राह्मणांच्या मागील काळ म्हणजे भारतीय युद्धाचा काळ. हा श्रीकृष्ण वासुदेवाचा काळ होय. पुराणकालाचा शास्त्रीय, निःपक्षपाती आणि सूक्ष्म असा विचार मि. एफ्.ई. पार्जिटर यांनी आपल्या *Ancient Indian Historical Tradition* ह्या अत्यंत परिश्रमाने तयार केलेल्या पुस्तकांत केला आहे. ह्या ग्रंथाच्या १५ व्या भागांत भारतीय युद्धाचा काळ इ. स. पूर्वी ९५० वर्षांचा असावा असा पुष्कळशा राजकुलांच्या वंशावळ्यांवरून ठरविण्याचा पार्जिटरने प्रयत्न केला आहे. ह्याच्या अलीकडे कोणीही भारतीय युद्ध आणूं शकत नाही. पौरस्त्य पंडित हा काळ दीड हजारांपासून दोन हजार वर्षें मागे नेतात. पण त्यांनी पार्जिटरइतके पुरावे दिले नाहीत.

श्रीकृष्णाचा काळ नक्की कोणताही असो. त्याच्या काळीं भारतांत प्रबळ आर्येतर राष्ट्रें होतीं. त्यांत चांडाल हें राष्ट्र प्रमुख होतें. श्रीकृष्णाच्या अष्टनायिकांत जांबवती नांवाची एक अस्वल(?) जातीची कन्या होती. तिच्याशीं श्रीकृष्णाचा प्रीतिविवाह झाला. ती कृष्णाला इतकी प्रिय होती की तिचे पोटीं पुत्र व्हावा म्हणून त्याने कैलासास जाऊन शंकराचा प्रसाद प्राप्त करून घेतला व त्या योगाने त्याला सांब नांवाचा पुत्र झाला. हाच

पुढे शिबि ह्या नांवाने प्रसिद्ध राजा झाला असा उल्लेख महाभारतांत आहे. हे शिबि नांवाचें आर्येतर राष्ट्र सिंधु नदीच्या आसपास होतें व याच्याशीं यदु ह्या आर्यांचा शरीरसंबंध झाला होता असाही भारतांत उल्लेख आहे. परंतु हाच दाखला आमच्या प्रस्तुत विषयाला बरोबर लागू पडेल अशा रीतीने पाली ग्रंथांतून अधिक स्पष्टपणें सांगितलेला आढळतो. तो येणेंप्रमाणें:—

गाथाः-अत्थि जंबावती नाम माता सिबिराजस्स ॥
सा भारिया वासुदेवस्स कण्हस्स अहोसि पियाऽति ॥ १४८५ ॥

अट्ठकथा (अर्थकथा) :- जंबावतीति सिबिरञ्ञो माता कण्हायनगोत्तस्स दसभातिकानं जेट्ठस्स वासुदेवस्स पिया महेसी अहोसि। सो किर एकदिवसं, द्वारावतीतो निक्खमित्वा उय्यानं गच्छन्तो, चंडाल-गामतो केनचिदेव करणीयेन पविसन्तीं, एकं एकमन्ते ठितं अभिरूपं कुमारिकं दिस्वाऽव पटिबद्धचित्तो हुत्वा, किंजातिकाति पुच्छापेत्वा, चंडालजातिकाऽति सुत्वाऽपि पटिबद्धचित्तताय विप्पटिसारी हुत्वा सस्सामिकभावं पुच्छापेत्वा, अस्सामिकाऽति सुत्वा, तमादाय, ततोऽवनिवत्तित्वा निवेसनं नेत्वा, रतनरासिम्हि ठपापेत्वा, अग्ग-महेसिं अकासि। सा सिविनामं पुत्तं विजायी। सो पितु अच्चयेन द्वारावतिं रज्जं कारेसि तं संधाय इदं वुत्तं इति। सो इमं उदाहरणं आहरित्वा एवरूपोपि नाम खत्तियो चंडालिया सद्धिवासं कप्पेसि, अम्हेसु तिरच्छानगतेसु किंवत्तब्बं अञ्ञमञ्ञं संवासरोचनं नेव पमाणंऽति वत्वा अपरंऽपि उदाहरित्थो आह! —

महाउमग्ग जातक (५४६), गाथा १४८५ (अट्ठकथेसह).

मूळ ग्रंथांतले शब्द जसेच्या तसेच वाचकांस समजावेत म्हणून हा पाली उतारा घेतला आहे. ह्याचा मराठींत भावार्थ असा होतो.—

" शिबि राजाची आई जंबावती नांवाची कृष्ण कुळांतील वासु-देवाची प्रिय भार्या होती," एवढीच मूळची गाथा. तिचेवर पुढील काळीं अट्ठकथा उर्फ भाष्य झालें तें असें. " कृष्णायन गोत्रांतील १० भावांपैकी वडील जो वासुदेव त्याची जंबावती नांवाची प्रिय राणी शिबि राजाची आई होती. तो (वासुदेव) एके दिवशीं द्वारकेच्या बाहेर निघून बागेकडे जात असतां, चंडालवाड्यांतून कांही कामासाठी [मुख्य शहरांत] प्रवेश करणारी एक लावण्यवती कुमारिका एका बाजूला उभी राहिलेली पाहून, आकृष्ट-चित्त होऊन, ती कोणत्या जातीची आहे असें [दुसऱ्याकडून] विचार-

वून, चंडाल जातीची आहे असें ऐकूनही, मोहित झाल्यामुळें विवश होत्साता तिला स्वामी (पति) आहे काय हें विचारून, नाही असें ऐकून, तिला घेऊन, तेथून निघून, घरीं नेऊन रत्नराशीवर बसवून तिला पट्टराणी करिता झाला ! तिला शिबि नांवाचा पुत्र झाला. त्याने बापाच्या मागे द्वारावतीचें राज्य केलें, असें वृत्त आहे. क्षत्रियाने चांडालीशीं विवाह केला ही तर गोष्ट असो; पण मनुष्य आणि पशु अशा भिन्नयोनींच्या मध्येंही संयोग होणें स्वाभाविक आहे. संवासाचें कारण जाति किंवा योनिही नसून केवळ प्रीतिच होय असें दाखविण्यासाठी दुसरें उदाहरण पुढे देत आहे....."

प्रस्तुत विषयावर इतका तपशीलवार स्पष्ट दाखला इतक्या प्राचीन काळांतील दुसरा मिळणें अत्यंत मुष्कील आहे. ह्यांतील मूळ गाथा जी आहे ती फार प्राचीन—बौद्धकाळापूर्वीची—असावी. अट्ठकथा वा भाष्य जें आहे तें मात्र गौतमबुद्धानंतरच्या काळांतील आहे. मी ह्या उताऱ्याविषयींचा एक निबंध भारत-इतिहास-संशोधन-मंडळाच्या एका संमेलनापुढे वाचला, तेव्हा 'भांडारकर इन्स्टिटयूट'चे सेक्रेटरी प्रो. परांजप्ये ह्यांनी असा आक्षेप घेतला की हा संबंध पालींतील उल्लेख व सर्व जातक कथा अलीकडच्या आहेत, इतकेंच नव्हे तर त्यांतून केवळ हिंदु ऐतिहासिक पुरुषांना ठिकठिकाणीं कमीपणा आणण्याचा प्रयत्न केला गेला आहे. त्यामुळें त्या ग्रंथाचें ऐतिहासिक महत्त्व फारसें नाही. परांजप्यांचें म्हणणें कांही असो. केवळ इतिहासाच्या दृष्टीने तुलना करावयाची झाल्यास, हिंदु पुराणें व पाली वाङ्मय यांचे दरम्यान सत्य, सरळपणा, निर्हेतुकपणा व सरसपणा इत्यादि गुणांचें पारडें हिंदु पुराणांपेक्षा पाली वाङ्मयाकडे अधिक झुकतें आहे हें निःपक्षपाती पंडितांना पटेल अशी मला उमेद आहे.

जातकग्रंथ जरी अलीकडचे असले तरी ते हल्लीच्या महाभारताहूनही अलीकडचे असतील असें नाही. शिवाय त्या ग्रंथांत ज्या गाथा आहेत त्यांतील दंतकथांचा अंश प्रत्यक्ष गौतमबुद्धाच्याही काळापूर्वी उत्तर हिंदुस्थानांतच नव्हे तर मेसॉपोटेमियापासून गंगेच्या किनाऱ्यापर्यंत तत्कालीन आठवणींच्या वातावरणांत वावरत होता हें प्राचीनेतिहास-वेत्त्यांना सांगण्याची जरूरी नाही. ह्मणून मला केवळ माझ्या प्रस्तुत

विषयासाठी म्हणजे भारतीय इतिहासाचे टप्पे कसे कसे पडत गेले, हें पाहण्याच्या कामीं हा वरील पाली भाषेंतील उतारा बिनमोल वाटत आहे. त्याचें कारण असें—वरील गाथेंत जांबवती अथवा जंबावती आणि वासुदेव ह्यांच्या नुसत्या नांवाचा आणि नात्याचाच उल्लेख आहे. जांबवती व वासुदेव हे भिन्न वंशांतले होते. पण तेवढ्यावरूनच त्या काळीं अशा भिन्न वंशांत विवाहसंबंध होत नव्हते किंवा जंबावतीच्या वंशाला अस्पृश्य मानण्यांत येत होतेंच असें समजण्यापुरता वरील गाथेंत तरी पुरावा नाही. ह्यावरून प्रत्यक्ष श्रीकृष्णाच्या काळीं आर्येतर लोकांवर—निदान चंडाला-सारख्या राजवैभवी आर्येतरांवर—ग्रामबहिष्कार पडून ते लोक किंवा तें राष्ट्र अस्पृश्य बनलें होतें असें मला वाटत नाही. ह्याच काळीं भीमानेही हिडिंब नांवाच्या आर्येतराची मुलगी हिडिंबा हिच्याशीं विवाह केला. तिच्या पोटीं घटोत्कच नांवाचा पुत्र झाला. बाजीरावाला मस्तानीच्या पोटीं समशेरबहादूर होऊन तो जसा पानिपतच्या युद्धांत हिंदूंच्या बाजूने कामास आला तसाच घटोत्कचही २००० वर्षांपूर्वी घडलेल्या युद्धांत त्याच रणांगणांत कामास आला हें भारतांत सांगितलें आहे. तसाच अर्जुनाचा पुत्र बभ्रुवाहन हाही आईकडून आर्येतरच होता. न जाणों प्रत्यक्ष पांडव आणि त्यांचें सार्थीदार कृष्णायन गोत्र, हेही आर्य होते की द्राविड होते हें ऐतिहासिक रीत्या सिद्ध करणें दिसतें तितकें सोपें नाही. असो; तो आमचा प्रस्तुत मुद्दा नव्हे. आमचा प्रस्तुत प्रश्न इतकाच की भारतीय युद्धाचे काळीं हिंदुस्थानांत हल्लीच्या स्वरूपांत ग्रामबहिष्कार व अस्पृश्यता होती की नव्हती! मला वाटतें, आर्य—आर्येतरांचा शरीरसंबंध झाल्याचीं वर दिल्याप्रमाणें अनेक उदाहरणें प्राचीन ग्रंथांत सापडतात त्यावरून अस्पृश्यता त्या काळीं नव्हती. होती असा सिद्धान्त कोणी करूं पाहील तर त्याला इतक्या प्राचीन वाङ्मयांत पुरावाच तूर्त मिळत नाही. हा पुरावा पुढे बृहदारण्यकोपनिषदापासून मिळूं लागतो; व तो बुद्धाच्या काळीं भरपूर मिळून, तेव्हा मात्र अस्पृश्यतेची संस्था हल्लीच्या स्वरूपांत स्थापित झाली होती असें म्हणण्यास फारशी हरकत वाटत नाही.

वरील पाली भाषेच्या उताऱ्यांतील जी गाथा आहे तिची वासलात अशी लागली. पण जें भाष्य आहे तें मात्र नंतरच्या ज्या काळांत हल्लीचीं विस्तृत भारत रामायण हीं काव्यें रचलीं गेलीं, त्या नागरसंस्कृत व

नागरपाली ह्या काळांतील असावें असा माझा तर्क आहे. ह्या काळीं चंडालवाडे उर्फ महारवाडे मुख्य नगराच्या बाहेर वसविले जात होते. जंबावती बाजूला उभी होती. (मलबारांत हल्ली देखील स्पृश्य वाटेने जाऊं लागला असतां अस्पृश्य मनुष्य बाजूला उभा राहतो.) ती चांडाल जातीची आहे असें ऐकूनही तिच्याशीं श्रीकृष्णाने विवाह केला हें जें आश्चर्य वाटत आहे तें नंतरच्या काळांतल्या भाष्यकाराला वाटणें साहजिक आहे पण प्राचीन गाथाकारांना वाटण्याचें कारण नाही. त्यांच्या काळीं अस्पृश्यता नव्हती. प्रत्यक्ष कृष्णाचा म्हणजे भारती यद्धाचा काळ, किंबहुना पाली गाथाकारांच्याही काळ, पाली अट्ठकथाकारांच्या बराच पूर्वीचा, किमान पक्षीं पांचसहाशें वर्षें तरी अगोदरचा, असावा. गाथा आणि अट्ठकथा एकाच ग्रंथांत आहेत, एवढ्याचवरून त्यांचा काळही एकच असावा असें गृहीत धरतां येत नाही. त्यांतील विषयावरून तरी तसें खास म्हणतां येत नाही. संशोधक राजवाडे यांनी पालीभाषेचा काळ शालिवाहन शकापूर्वी १५०० वर्षें धरला आहे. पाणिनीय संस्कृताचाही काळ तितकाच प्राचीन धरला आहे. राजवाडे यांची अतिशयोक्तीकडे असलेली प्रवृत्ति ध्यानांत घेतली असतां पाणिनीचा काळ इतका मागे खेचतां येत नसला तरी पाली गाथांचा काळ भारतीय युद्धाचे काळापर्यंत मागे नेण्यास हरकत दिसत नाही. आणि ह्या काळांत कृष्णवासुदेव आणि पांडव व इतर ऐल (सोमवंशी) उर्फ आर्य क्षत्रिय हिंदुस्थानांत त्यांच्याही पूर्वी आलेल्या सूर्यवंशी–म्हणजे मिसरी उर्फ इजिप्शियन अथवा द्राविड–क्षत्रियांशीं बेटीव्यवहार करीत असत, इतकेंच नव्हे तर शूद्र, नाग अथवा चांडालादि इतर क्षत्रिय कुलांशींही बेटीव्यवहार करीत असत, हें निर्विकार इतिहासज्ञांस कबूल करणें फारसें जड जाईल, असें मला वाटत नाही. अशा विधानास ग्रांथिक पुरावा मिळाल्यास तें चांगलेंच. पण तो दुर्मिळ असल्यास त्याच्याविषयीं आग्रह धरण्याचें संशोधकास कारण नाही. असा कोणी आग्रहच धरल्यास वरील पाली उतारा महत्त्वाचा आहे, असें मी समजतों. पण हा उतारा म्हणजे केवळ सिद्धांतच आहे, असेंही माझें म्हणणें नाही, ही गोष्ट वाचकांनी ध्यानांत बाळगावी. प्रागैतिहासिक काळांत प्रवेश केल्यावर प्रत्येक वाचकाने स्वतःच

संशोधक बनावें. इतरांनी व्यर्थ वादांत पडूं नये. वरील पाली गाथेचा व तिच्यावरील अट्ठकथेचा कालतः तारतम्यपूर्वक बारीक विचार केला असतां असें दिसतें की श्रीकृष्णाच्या कालीं हल्लीची अस्पृश्यता मुळीच नसून केवळ अनाचरणीयता असावी. ती केवळ परकीयासंबंधींच असावी. आणि तीही श्रीकृष्णाने उल्लंघिली.

५. वेद–मंत्र काल

ज्ञानकोश, भाग तिसरा, पान ३६३ वर 'वेदकालांतील शब्दसृष्टि' ह्या मथळ्याखालीं वेदकालीन जातींचीं जीं नांवें दिलीं आहेत त्यांतून हीन जातींचीं नांवें निवडून पुढे दिलीं आहेत.

संहितेंतील नांवें

(ऋ ग्वे द)

अनृतदेव	दस्यु	वृषल
कितव(जुगार खेळणारा)	दास	शिश्नदेव
कृष्णयोनि	मूर-(मूढ)-देव	शूद्र

(कृ ष्ण य जु र्वे द)

तस्कर	पुंजिष्ठ (कोळी)	श्वपति (कुत्रें खाणारा)
निषाद (निषध ?)	श्वनि (कुत्रें नेणारा)	स्तेन

(अ थ र्व वे द)

अंग	कैरातिका	

संहितेतर श्रौत वाङ्मयांतील नांवें

क्रैव्य	पुलिंद	मूतिब
पुंड्र (पोडु–हल्ली बंगाल्यांत आढळतात.)	पौंश्चलेय (पुंश्चली=पुरुषाच्या मागे धावणारी, तिचा पुत्र,) मूचीप	शबर

वरील यादींचा वेदकाल म्हणजे मंत्र, आरण्यक, उपनिषद् व सूत्रकालापर्यंतचा काल असें ज्ञानकोशकारांनी म्हटलें आहे. खास ऋग्वेदसंहितेंत वृषल हेंच एक नांव आढळतें. दहाव्या मंडळाशिवाय जातिवाचक शब्दच आढळत नाहीत असें, ऋग्वेदाचा अगदी बारकाईने अभ्यास ज्यांनी चालविला आहे, त्या गुरुवर्य प्रि. राजवाड्यांनी सांगितलें. तथापि

अधिक शोधाअन्तीं जीं जातिवाचक नांवें आढळलीं तीं पुढे दिलीं आहेत. जींत 'वृषल' हा शब्द आहे ती ऋग्वेदांतिल ऋचा अशी आहे.

पूर्वाह्णे अश्वान्युयुजे हिं बभ्रून्। सो अग्नेरन्ते वृषलः पपाद ॥

ऋग्वेदसंहिता, १०. ३४. ११.

अर्थ—जो (जुगार खेळणारा) सकाळीं तांबडे घोडे रथास जुंपून निघाला, तो दिवसाच्या (अग्नीच्या) शेवटीं वृषल ह्मणजे बैल हाकणारा होऊन पडला, म्हणजे जुगारांत हरला. येथेही वृषल ह्याचा अर्थ अस्पृश्य असा मुळीच होऊं शकत नाही. ह्यावरून अस्सल मंत्रवाङ्मयांत अस्पृश्यतेचा मागमूसही नाही हेंच सिद्ध होतें.

अस्पृश्यतेचा जरी प्रत्यक्ष पुरावा मंत्रकालांत मिळत नाही, तरी ऋग्वेदाच्या सातव्या मंडळांत कांही ऋचा आढळतात त्यावरून कांही परधर्मी परजातींविषयीं आर्य ऋषींना किती भयंकर तिटकारा वाटत होता तें दिसतें. ह्यांपैकी कांहींचा पदविच्छेद करून त्या पुढे देत आहें.

किमीदिन

(१) इंद्रासोमा सम् अघऽशंसम् अभि अघम् तपुः ययस्तु चरुः अग्निवान्ऽइव ।
ब्रह्मऽद्विषे क्रव्यऽअदे घोरऽचक्षसे द्वेषः धत्तम् अनवायम् किमीदिने ॥

ऋग्वेद पदपाठ, ७. १०४. २.

अर्थः—हे इंद्रा आणि सोमा, दुष्ट किमीदिनाभोवती त्याचें पाप विस्तवांत तापणाऱ्या हांड्याप्रमाणें तापत राहो. प्रार्थनेचा शत्रु, कच्चें मांस खाणारा, भयानक डोळ्यांचा जो किमीदिन त्याच्याशीं निरंतर द्वेष राख.

(२) मा नः रक्षः अभि नट् यातुऽमावताम् अप उच्छतु मिथुना या किमीदिना ।
पृथिवी नः पार्थिवात् पातु अंहसः अन्तरिक्षम् दिव्यात् पातु अस्मान् ॥

ऋग्वेद पदपाठ, ७. १०४. २३.

अर्थः—जादूगार राक्षस आम्हांजवळ न येऊं देत. उषा किमीदिनांच्या जोडप्यांना हाकून देवो. पृथ्वी आम्हांला पार्थिव संकटांपासून राखो. आणि आकाशांतून येणाऱ्या विघ्नांपासून अंतराळ राखो.

यातुधान

(३) यः मा अयातुम् यातुऽधान इति आह यः वा रक्षाः शुचिः अस्मि इति आह ।

इन्द्रः तम् हन्तु महता वधेन विश्वस्य जन्तोः अधमः पदीष्ट ॥
ऋग्वेद पदपाठ, ७. १०४. १६.

अर्थः—मी राक्षस नसून मला जो राक्षस म्हणतो आणि स्वतः राक्षस असून आपण राक्षस नाही असें म्हणतो, अशा दोघांनाही इंद्र तीव्र शस्त्राने मारो. सर्वांत अत्यंत नीच अशा राक्षसांचा नाश होवो.

मूरदेव

(४) इन्द्र जहि पुमांसम् यातुऽधानम् उत स्त्रियम् मायया शाशदानाम् ।
विग्रीवासः मूरऽदेवाः ऋदन्तु मा ते दृशन् सूर्यम् उत्ऽचरन्तम् ॥
ऋग्वेद पदपाठ, ७. १०४. २४.

अर्थः—रे इंद्रा ! जादुविद्येंत जय मिळविणाऱ्या आणि एकत्र रमणाऱ्या पुरुष व स्त्री राक्षसांना ठार मार. ज्यांचे देव मूर्ख आहेत आणि माना वाकड्या आहेत, अशा दुष्टांचें पतन होवो. ते कधींच उदयास येणाऱ्या सूर्याला न पाहोत.

शिश्नदेव

(५) न यातवः इन्द्र जूजुवुः नः न वन्दना शविष्ठ वेद्याभिः ।
सः शर्धत् अर्यः विषुणस्य जन्तोः मा शिश्नदेवाः अपि गुः ऋतम् नः ॥
ऋग्वेद पदपाठ, ७. २१. ५.

अर्थः—हे बलवान् इंद्रा ! कोणाही दुष्ट शत्रूंनी आपल्या काव्यांनी आमचा पराभव केला नाही. आमचा खरा देव त्यांच्या कळपांना जिंको. हे बीभत्स-पूजक आमच्या उपासनास्थानाजवळ न येवोत.

(६) सः वाजम् याता अपदुःऽपदा यन् स्वःऽसाता परि सदत् सनिष्यन् ।
अनर्वा यत् शतऽदुरस्य वेदः घ्नन् शिश्नऽदेवान् अभि वर्पसा भूत् ॥
ऋग्वेद पदपाठ, १०. ९९. २.

अर्थः—तो (अग्नि) अत्यंत शुभ मार्गाने युद्धास जातो. स्वर्गातील ज्योति मिळविण्याकरितां तो झटतो. तो आपल्या विद्येने न अडखळतां शंभर दरवाज्यांच्या किल्ल्यांतील भांडार लुटतो, आणि शिश्नदेवांना ठार करतो.

प्रकरण तिसरें

बौद्ध कालांतील अस्पृश्यता

हा काळ हिंदुस्थानच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाचा आहे. ह्याच काळांत ह्या प्रचंड देशांत अनेक दृष्टींनी अनेक क्रांत्या झाल्या. त्या अशा.

१ येथूनच हिंदुस्थानाच्या ऐतिहासिक काळाला सुरुवात झाली. ह्या पूर्वीच्या प्रागैतिहासिक काळांतील घडामोडी बहुतेक निश्चित पुराव्याच्या अभावीं अनुमानानेच ठरवाव्या लागतात.

२ ह्या काळीं हिंदुस्थानचें आद्ययुग अथवा युगें संपून, मध्य युगाला सुरुवात होते. ह्या मध्ययुगाचा अंमल जवळ जवळ दीड हजार वर्षें म्हणजे हिंदुस्थानावर मुसलमानांच्या स्वाऱ्या होऊन त्यांचें आधिराज्य व त्यांच्या संस्कृतीचा परिणाम होऊं लागेपर्यंत चालू होता.

३ वैदिक आणि तत्सम इतर बाह्य संस्कृतींचा जो बरा वाईट परिणाम हिंदी समाजस्थितीवर ह्या काळापर्यंत होत होता त्याला येथून पुढे बौद्धजैनांनी चालविलेल्या सुधारणांचा विरोध होऊं लागला. ह्या कलहांत जी कालेंकरून तडजोड झाली तिला बौद्ध-ब्राम्हणी संमिश्र संस्कृति असें नांव देतां येईल. ह्या मिश्र संस्कृतीचा काळ म्हणजे हें मध्ययुग होय.

४ ह्याच युगांत संस्कृत वाङ्मयाच्या जोडीला उत्तरदेशांत पाली व प्राकृत, तशीच दाक्षिण देशांत तामीळ कानडी इत्यादि तद्देशीय वाङ्मयाची भर पडली.

५ ह्या युगापूर्वीच उत्तर हिंदुस्थानांत बाहेरून आलेल्या आर्य, शक वगैरे प्रतापी अभिजात मानववंशांची व त्यांच्या संस्कृतीची पूर्ण प्रतिष्ठा झाली होती. ह्या वंशांचा व संस्कृतीचा ह्या मध्ययुगाच्या आरंभापासून दाक्षिण हिंदी द्वीपकल्पांत जोराचा शिरकाव होऊन सुमारें खिस्ती शकाच्या आरंभींच म्हणजे अर्धसहस्रकांतच हें 'दाक्षिणापथ' नांवाचें द्वीपकल्प भरतखंडांत, एकजीव झालें नाही तरी, सामील झालें.

६ ह्याच मध्ययुगाच्या आरंभीं अलेक्झांडरच्या स्वारीमुळें उत्तर हिंदुस्थानाचा, पश्चिम आशियाशींच नव्हे तर पूर्व युरोपखंडाशींही

संबंध जडला. इतकेंच नव्हे तर ह्या स्वारीला ज्या मौर्य साम्राज्याने यशस्वी रीतीने मागे हटविलें त्या प्रतापी आणि अस्सल हिंदी साम्राज्याने उत्तर आणि दक्षिण ह्या दोन भिन्न व तुटक हिंदी देशभागांची एकाच छत्राखाली संयुक्त घटना (फेडरेशन) केली. इतकेंच नव्हे तर पूर्वेकडे ब्रह्मदेश, सयाम, मलाया द्वीपकल्प आणि दक्षिणेकडे सिंहलद्वीप येथपर्यंत आपल्या संस्कृतीचे हात पसरिले.

७ ह्या मध्ययुगापूर्वी भारतांत, निदान आर्यावर्तांत, ब्राह्मणी संस्कृतीचाच वरचष्मा होता. ही संस्कृति बहुश: 'आध्यात्मिक,' भावनात्मक, वाङ्मयविषयक उर्फ शाब्दिक होती. मौर्य साम्राज्याचा व्यवहारवाद आणि बौद्धजैनांचा शुद्ध बुद्धिवाद ह्यांचें सहकार्य ह्या मध्ययुगांत घडून ह्या नवीन शक्तींशीं ब्राह्मणी संस्कृतीला तडजोड करावी लागली.

८ ह्याच मध्ययुगांत हिंदी समाजाची पुनर्घटना वर्णाश्रमधर्म वगैरेसारख्या अल्पसंख्याप्रेरित भावनात्मक पायांवरून अर्थशास्त्राच्या आणि बहुजनसत्तेच्या नवीन पायावर झाली.

९ ह्याच मध्ययुगांत हिंदी समाजस्थितीची सुधारणा व लोकस्थितीची ऐहिक भरभराट जशी झाली तशीच भावी दुर्बळतेचीं आणि परवशतेचीं बीजेंही कायमचीं पेरलीं गेलीं !

येणेंप्रमाणें हा काळ चांगलाही आहे आणि तितकाच वाईटही आहे. कारण ह्या सबंध काळांत बौद्ध आणि ब्राह्मणी संस्कृतीची सारखी तडजोड चालली होती. आणि अशा मिश्रणाचा परिणाम भरतखंडाच्या भवितव्यतेवर पुढील म्हणजे अर्वाचीन युगांत अनिष्टच झाला ह्यांत नवल नाही !

असो. आम्हांला ह्या कालांत आमचा प्रस्तुत विषय जी अस्पृश्यता तिचा विकास कसा झाला हें पाहावयाचें आहे.

अस्पृश्यतेचा व्याप आणि घटना कमी अधिक मानाने सर्व जगभर आहे हें वर सांगितलेंच आहे; तरी हिंदुस्थानांत ह्या घटनेला विशेष स्थैर्य आणि यश आलें आहे ही गोष्ट ध्यानांत घेण्यासारखी आहे. आणि हिच्या कारणांचा शोध व मीमांसा शक्य तोंवर करणें जरूर आहे. हिंदुस्थानांतही त्यांतल्या त्यांत उत्तरेपेक्षा दक्षिण भागांत अस्पृश्यतेचा पाया अधिक खोल व दृढ रोविला असून त्याचा परिणाम

किती तरी अधिक तीव्र दिसतो, ह्याचें कांही तरी विशेष कारण असलें पाहिजे. कदाचित् आर्यांच्या आगमनापूर्वीही ह्या देशांत ही संस्था होती किंवा काय अशी शंका मनांत येते. पण ह्या शंकेचें समाधान होण्यासारखा एकही पुरावा मिळण्याचें कांही साधन आता उरलें नाही. उत्तर हिंदुस्थानांतील अस्पृश्यतेचा जो विकास आम्ही वर पाहिला आणि त्यासंबंधीं आर्यांच्या वाङ्मयांतून बौद्ध काळाच्या मागे मागे जाऊन जे मिळालेले उल्लेख वर उद्धृत केले आहेत त्यांवरून एक अनुमान असें निघत आहे की, आर्यांपूर्वी ह्या देशांत कायमची वसति करून राहिलेल्या धनसंपन्न मानवजाति होत्या त्यांच्या सहवासाने कदाचित् अस्पृश्यतेचा शिरकाव आर्यांच्या समाजघटनेंत झाला असावा. हा सहवास जसजसा जास्त काळ व जास्त प्रमाणावर झाला तसतसा हा शिरकाव जास्त झालेला दिसत आहे. येरव्ही आर्य ग्रंथांतून शोध घेत जसजसे मागे जावें तसतसे अस्पृश्यतेचे दाखले कमी कमी कां आढळावे ह्या गोष्टीचा उलगडा नीट होत नाही.

मी दक्षिण हिंदुस्थानांत तामिळ देशांत समाजशास्त्राचें संशोधन करीत असतां बऱ्याच मुदलियार, पिल्ले वगैरे द्राविड पंडितांनी मला सांगितलें की आर्यांप्रमाणें अत्यंत प्राचीनकाळीं द्राविड देशांतही एक-प्रकारचें चातुर्वर्ण्य होतें. १किनाऱ्यावर राहणारे, २अंतर्देशांतील मैदानांत राहणारे, ३जंगलांत झाडींतून राहणारे व ४ डोंगरपाठारावर राहणारे, असे हे चार भिन्न समाज होते. सांपत्तिक दृष्ट्या ह्यांच्यांत उच्चनीच भाव होता. पण आर्यांप्रमाणें तो भेद सामाजिक होता की नाही हें तेव्हा मला समजलें नाही. बिशप कॉल्डवेल ह्यांनी 'द्राविड भाषांचें तौलनिक व्याकरण' (*Comparative Grammar of Dravidian Languages*) ह्या नांवाचा जो एक अत्यंत परिश्रमाने लिहिलेला अमूल्य ग्रंथ आहे त्यांत Depressed Classes म्हणजे दलितवर्गांसंबंधीं एक निबंध आहे. त्यांत बिशप कॉल्डवेल म्हणतात, "द्राविड देशांत जे लोक आपल्यास शूद्र म्हणवितात, ते स्वतःस शूद्र म्हणजे आर्येतर येवढ्याच अर्थाने समजतात, नीच ह्या अर्थाने नव्हे. मात्र शूद्र म्हणजे द्राविड देशाचे अस्सल रहिवासी असाहि एक अर्थ शूद्र म्हणून घेण्यांत आहे. मानीव अस्पृश्य ह्यांना ते शूद्र हें बहुमानाचें नांव देत नसत. मुदलीयार ह्या शब्दाचा यौगिक

अर्थच 'मूळचा' असा आहे. ह्यावरून अस्पृश्य जे पारिया लोक त्यांना परके समजण्यांत येत असे, असें दिसतें. ह्यावरून प्राचीन द्राविडांतही अस्पृश्यता स्वतंत्र रूपाने होती अशी शंका येते. पण ह्या कल्पनेस शिलालेखी अगर वाङ्मयीन आधार नाहीत.

अस्पृश्यता रूढ होण्याचीं दोन स्वाभाविक कारणें उघड आहेत.पहिलें जातिद्वेष अथवा वर्णद्वेष आणि दुसरें वृत्तिमत्सर. उत्तर हिंदुस्थानांत आर्यांचा जम हळूहळू बसूं लागल्यावर त्यांनी जेव्हा वर्णांची व्यवस्था लाविली तेव्हा त्या व्यवस्थेंत शुभ्र, ताम्र, पीत आणि कृष्ण (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र) अशा भिन्न वंशांचा समावेश यथानुक्रम करून घेतला आहे. सर्व ब्राह्मण पांढरे, सर्व क्षत्रिय तांबडे अथवा जांभळ्या वर्णाचे, सर्व वैश्य पिवळे आणि शूद्र तितके एक जात काळेच होते असें माझें म्हणणें नाही. कातडीच्या रंगावरून वर्णांची लाविलेली उपपत्ति इतिहासज्ञ कै. राजवाड्यांची आहे. माझी नव्हे. मला ती पसंत नाही. मात्र हे सगळेच रंग आताच्या ह्या सगळ्याच वर्णांत व पोट-जातींत आढळतात, त्याअर्थी ते पूर्वीही आढळले असावेत असा माझा तर्क आहे. रामकृष्ण काळे होते. न जाणों वसिष्ठ वाल्मीकि कश्यप हेही काळे असतील. तेव्हा शुभ्रकाय ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य यांच्यामध्यें एतद्देशीय तांबड्या, पिवळ्या, काळ्या ब्राह्मण–क्षत्रिय–वैश्यांचा गुण-कर्मानुसार परिस्थितिवशात् शिरकाव झाला असावा; आणि ज्यांच्या गुणकर्मांचा–केवळ बाह्य रंगाचाच नव्हे–तिटकारा आला अशा घोर जंगली जातींना दूर ठेवण्याची प्रवृत्ति पूर्वीच्या आर्येतरांच्या सहवासाने आर्यांचीही झाली असावी, असें मला वाटतें. पण पुढे अर्थशास्त्राच्या पायावर आर्यांमध्यें निरनिराळ्या वृत्तींचा उर्फ धंद्यांचा विकास झाला तसतशी वर्णद्वेषांत वृत्तिमत्सराची भर पडून पूर्वीच दूर ठेवलेल्या जाती-मध्यें वृत्तिबहिष्कृत अशा लोकांची भर पडूं लागून अस्पृश्यतेचा विस्तार होऊं लागणें संभवतें. पुढे आर्यांच्या वसाहती दक्षिण हिंदुस्थानांत जस-जशा होऊं लागल्या तसतसा वर्णद्वेष आणि वृत्तिद्वेष ह्या जोडगोळीमुळें दक्षिणेकडे **अगोदरच असलेल्या** अस्पृश्यतेला अधिक ऊत आला असावा हें उघड दिसतें. येरव्ही दक्षिणेकडील व उत्तरेकडील अस्पृश्यतेंत इतका तीव्र फरक का असावा हें कळत नाही.

प्रो. टी. डव्ल्यु. ऱ्हिस डेव्हिड्स ह्या विद्वान शोधकांनी आपल्या *Buddhist India* ('बौद्धकालीन हिंदुस्थान') ह्या पुस्तकांत (प्रकरण ४, पान ५३–५५) आर्यांच्या वर्णव्यवस्थेंत बौद्धकाळीं आर्थिक वृत्तिव्यवस्थेची भेसळ कशी होऊं लागली हें पाली भाषेंतील निरानिराळ्या जातक ग्रंथांतून मार्मिक उतारे देऊन स्पष्ट केलें आहे. पुढे दिलेल्या भाषांतरित उताऱ्यावरून त्यांचा आशय स्पष्ट होईल.

भरतखंडावर स्वारी करणाऱ्या ज्या आर्य जमाती त्यांच्या नायकांशीं आपला वंशसंबंध जोडणारे 'क्षात्रिय' हे तत्कालीन समाजाचे म्होरके होते....यज्ञयाग करणाऱ्या पुरोहितांच्या वंशावर हक्क सांगणाऱ्या ब्राह्मणांची पायरी त्यांच्यानंतरची होती. त्यांच्याखाली शेती कसणारा सामान्य जनसमाज म्हणजे वैश्यवर्ग होता. सर्वांच्या शेवटीं अनार्य वंशांत जन्मलेल्या शूद्रांची गणना होत होती. हे लोक मजुरी, हस्तकौशल्याची कामें किंवा सेवाचाकरी करीत. हे वर्णाने इतरांपेक्षा अधिक काळे होते. .....

येवढ्यानेच हें परिगणन संपलें असें नाही. चाऱ्ही वर्णांच्या तळाशीं म्हणजे शूद्रांच्या खालच्या पायरीवर हलक्या जमाती व हलक्या धंद्यांचे लोक ('हीन जातीय' आणि 'हीन शिप्पाणि') असत. 'हीन जाती'मध्यें चटया विणणारे, फासेपारधी व गाड्या तयार करणारे यांचा समावेश होत असे. हे लोक हिंदुस्थानांतील मूल वंशांपैकी असून वंशपरंपरेने हीं तीन कामें करणारे होते. 'हीन शिल्पी'–बुरूड, न्हावी, कुंभार, कोष्टी, चांभार इ.– जे असत त्यांच्यामध्यें जन्मतः निश्चित झालेला पृथक्पणा नसे. या 'हीन शिल्पांपैकी एखादा धंदा सोडून दुसरा धंदा त्यांस स्वीकारतां येत असे व कित्येक तसें करीतही असत. उदाहरणार्थ, पांचव्या जातकामध्यें एक प्रेमसंबंधांत निराश झालेला क्षत्रिय, बिलकुल मानहानि किंवा दंड सोसावा न लागतां, कुंभाराचा, बुरूडाचा, वेतकाम करणाऱ्याचा माळ्याचा, आणि स्वयंपाक्याचा–इतके धंदे एकामागून एक करतांना दिसतो. सहाव्या जातकामध्यें एक वैश्य शिंप्याचा व कुंभाराचा धंदा करीत असलेला आढळतो; असें असूनही त्याच्या नातेवाईकांची त्याजविषयींची आदरबुद्धि ढळलेली दिसत नाही.

अखेर, या 'हीन जाति' व 'हीन शिल्पां' पेक्षाही तिरस्कृत असलेल्या चंडाल व पुल्कस या मूलवासीयांच्या जमाती जैन व बौद्ध ग्रंथांतून उल्लेखिलेल्या दिसून येतात.

ह्या उताऱ्यावरून दिसून येतें की आर्यांच्या चातुर्वर्ण्यांत आपसांत वाटेल तशी आदलाबदल झालेली चालत असे; पण ह्या चातुर्वर्ण्याबाहेर ज्या बहिष्कृत व तिरस्कृत जाती असत त्यांचा आंत शिरकाव होत नसे.

ह्याच भागांत प्रो. व्हिस डेव्हिड्स ह्यांनी पान ५६, ५७ वर खालील दहा उदाहरणें जातकांच्या संदर्भांसह दिलीं आहेत.

१ एका क्षत्रिय राजपुत्राने आपल्या प्रीतिपात्रासाठी कुंभार, बुरूड, मालाकार इत्यादिकांची वृत्ति पत्करली तरी त्याचा सामाजिक दरजा कमी झाला नाही.

२ दुसऱ्या राजपुत्राने आपल्या राज्याचा वाटा आपल्या बहिणीला बहाल करून आपण वैश्यवृत्ति स्वीकारिली.

३ तिसऱ्या राजपुत्राने एका व्यापाऱ्याजवळ राहून हाताने काम करून पोट भरलें.

४ एका उमरावाने पोटासाठी तिरंदाजी केली.

५ एका ब्राह्मणाने वैश्यवृत्तीने पैसे मिळाविले.

६ दुसऱ्या दोन ब्राह्मणांनी तसेंच पोट भरलें.

७ दुसरा एक ब्राह्मण एका तिरंदाजाचा मदतनीस झाला.

८,९ ब्राह्मणांनी शिकारी आणि फासे पारध्याची वृत्ति चालविली.

१० एक ब्राह्मण सुतार झाला.

ब्राह्मण उघडपणें शेतकी करून शेळ्या मेंढरें राखीत असत. क्षत्रियाने टाकलेल्या बायकोशीं ब्राह्मणाने विवाह केला (जातक ५. २८०). अनुलोमच नव्हे तर प्रतिलोम विवाहही होत असत. म्हणजे वरिष्ठ वर्णाच्या बायका कनिष्ठांशीं लग्न करून राहात. वर उद्धृत केलेलें उम्मग्ग जातकांतील श्रीकृष्णाने जांबवतीशीं केलेल्या विवाहाचें उदाहरण लक्षांत घेण्यासारखें आहे. तरी शेवटीं, सर्वश्रेष्ठ क्षत्रियापासून तों अतितिरस्कृत चंडालापर्यंत जरी भेदभाव डळमळीत होता तरी भेदाचा खुंटा हालून हालून अधिक बळकटच होत होता अशी प्रो. डेव्हिड्सलाही कबुली द्यावी लागली आहे (पान ६०).

गौतम बुद्धाच्या वेळची डळमळीत स्थिति मौर्य साम्राज्याच्या वेळीं अस्पृश्यांपुरती तरी बळकट झालेली दिसते. मोठमोठ्या शहरांत, विशेषत: पाटलीपुत्र (पाटणा) नगराच्या निरनिराळ्या भागांत निरनिराळ्या धंद्यांच्या लोकांची वसति वसल्याचीं वर्णनें मेगास्थिनीसच्या लेखांतून आणि कौटिलीय अर्थशास्त्र ह्या ग्रंथांतून आढळतात. ह्या ग्रंथाचें अधिकरण २ रें, प्रकरण २२, भाग चौथा, पान ५४ वर स्पष्ट उल्लेख आहे कीः—

पाषंडचंडालानां स्मशानान्ते वासः ।

हे पाषंड कोण नीटसें समजत नाही. बौद्ध जैन नसावेत. ते चार्वाक, लोकायतिक, पाशुपत असावेत. पण ते बहिष्कृत असल्यास मोठें आश्चर्य होय. पण चंडालांची वसति मात्र गांवाबाहेरील स्मशानाच्या पलीकडे असल्याचा हा पुरावा महत्त्वाचा आणि स्पष्ट आहे.

आर्यांची भारतीय ग्रामसंस्था फार प्राचीन आहे. आर्य हे ह्या देशांत उपरे असल्यामुळें त्यांचा अभिजात आर्येतरांशींच केवळ नव्हे तर अनभिजात आर्येतरांशींही व्यवहार फटकून राहण्यापेक्षा मिळतें घेऊन राहाण्याचाच जास्त होता, व असणें जरूर होतें; कारण ते जरी उपरे होते तरी दक्षिण आफ्रिकेंतील हल्लीच्या शुभ्रकायांप्रमाणें त्यांच्या वसाहती मूळ देशांशीं संबंध ठेवणाऱ्या दीर्घसूत्री व दृढ नव्हत्या. हिंदी आर्यांना येथील भिन्न भिन्न आर्येतरांशीं जमतें घेऊन वेळोवेळीं समरस झाल्याशिवाय त्यांच्या ग्रामसंस्थांची उभारणी होणें शक्य नव्हतें. ते उपरे असले तरी भारतवर्षांत कायम राहण्यास आले होते. मूळदेशांशीं त्यांचे लागेबांधे नसून त्यांच्यामागे इंग्रज राजकर्त्यांप्रमाणें 'होमचार्जेस'(Home charges) चा उर्फ घरच्या देण्याचा ससेमिरा नव्हता. त्यामुळें आद्य आर्यांनी भारतवर्षांत आर्येतरांशीं जे मुदतबंदी मजुरीचे आणि अलुत्याबलुत्याचे नियम केले ते हल्लीच्या गौरकायांपेक्षा अधिक सढळ हाताने, अधिक संभावितपणाने केलेले आढळतात, हें खालील उताऱ्यावरून दिसतें.

नमस्तक्षभ्यो रथकारेभ्यश्च वो नमो, नमः कुलालेभ्यः कर्मारेभ्यश्च वो नमो, नमो निषादेभ्यः पुञ्जिष्टेभ्यश्च वो नमो, नमः श्वनिभ्यो मृगयुभ्यश्च वो नमः ॥

माध्यन्दिन (शुक्लयजुर्वेद) संहिता, १६. २७.

यज्ञकर्माला निरनिराळी कर्मज, खनिज, प्राणिज सामग्री लागत असे, तिच्यासाठी मोठमोठे ऋत्विज वर सांगितलेल्या सच्छूद्रांच्याच नव्हे, तर निषाद, पुक्कस, श्वनि म्हणजे कुत्रे पाळणारे आणि मृगयु म्हणजे भिल्ल, इत्यादि जंगली लोकांच्याही पाया पडत. नवरात्रांत 'घटाला वावरी,' दिवाळींत 'रँगोळी' असा मोठ्याने आवाज काढून रस्त्यांतून ओरडत जाणाऱ्या वैदू बायांशीं किंवहुना 'शॉन (शेण) घ्या व शॉन०' असें ओरडणाऱ्या भोकरवाडींतील मांगिणींशीं देखील सदाशिव पेठेंतील ब्राह्मणांच्या बायका किती आर्जवाने वागतात, त्याचें वरील यजुर्वेदांतल्या नमस्कारांशीं फार साहश्य भासतें ! परंतु बौद्ध आणि जैन धर्माच्या प्रसारामुळें व सहवासामुळें यज्ञक्रिया संपुष्टांत आल्यावर पुढे लौकरच म्हणजे मनुस्मृतीच्या काळांत सुतारलोहारादि कुशल पांचाळांची मान्यता जरी वाढलेली दिसते तरी अकुशल श्रम करणाऱ्या व अंगीं विशेष क्षात्रतेज नसलेल्या आर्येतरांची गणना अस्पृश्यांत होऊन त्यांना गांवाबाहेर डांबून ठेवण्यांत आलेलें आढळतें. बौद्ध आणि जैन धर्म जरी जातिभेद मानीत नसत तरी त्यांच्या अमदानींत अनेक नवीन जातिसंघांना पूर्वापेक्षाही अधिक मान्यता मिळून अशोक मौर्यांच्या साम्राज्यानंतर कुशलांची वैश्य वर्गामध्यें विशेष चढती आणि अकुशलांची सामान्य शूद्रांत गणती होऊन जातिभेदाचे पर्याय फार वाढले. बौद्धांच्या व जैनांच्या उदार विचारांमुळें यज्ञविषयक हत्या व अत्याचार यांना जरी आळा बसला, तरी सामाजिक रचनेची संकीर्णता कमी न होतां उलट फार वाढली यांत शंका नाही. विशेषतः ग्रामबाह्य हीन मानिलेल्या जातींचे सारे व्यवहार हत्या व हीन कर्मांशींच अधिक अधिक निगडित होत गेल्यामुळें, त्यांची अस्पृश्यता व बहिष्कार उत्तरोत्तर दुणावत व दृढावत जाणेंच क्रमप्राप्त होतें. बौद्धांची अहिंसा व जैनांचा कडकडीत शाकाहार ह्यामुळें ह्या दोघांही उदारधींचा ओघ अस्पृश्यतानिवारणापेक्षा दृढीकरणाकडेच होणें स्वाभाविक होतें. उलटपक्षीं यज्ञयागादि हत्येच्या अत्याचारांत वावरणाऱ्या ब्राह्मणांचा सहवासच ह्या बहिष्कृत वर्गांशीं अधिक असण्याचा संभव जास्त आहे, हें शूलगवादि गृह्यसूत्रांतील विधीवरून व हल्लीच्या मरीआईच्या भयंकर जत्रांवरून स्पष्ट दिसतें. मरीआईच्या जत्रेंत ज्याप्रमाणें रेड्याचें डोकें कापून तें गांवाभोंवतीं फिरवून शिवेवर

नेऊन पुरतात किंवा वाटून खातात तशाच प्रकारचा विधि गृह्यसूत्रांत शूलगव नांवाचा होता. असो. एक पक्षीं बौद्ध जैनांचा सोवळेपणा, औदासीन्य आणि वैराग्य आणि दुसरे पक्षीं ब्राह्मणधर्मीयांचा हत्याप्रिय कर्मठपणा— ज्याला राजवाड्यांनी आचरटपणा हें निरुक्तसिद्ध समर्पक नांव दिलें आहे— ह्या दोन भिन्न प्रवृत्तींचा मिलाफ होऊन बिचाऱ्या अस्पृश्यांचा बुडता पाय बहिष्काराच्या चिखलांत कायमचा जो रुतला तो रुतलाच !

मौर्य साम्राज्याच्या विस्तारामुळें आर्यांचें आणि तत्समांचें सामाजिक वर्चस्व नर्मदेच्या उत्तरेपेक्षा दक्षिणेकडे विशेष आढळतें. त्यामुळें जरी बौद्ध आणि जैन ह्या उदार धर्मांचा दक्षिणेकडे प्रसार झाला तरी त्याबरोबरच मायावी आर्य राज्यव्यवस्था, कृत्रिम वर्णव्यवस्था आणि स्वार्थी ग्रामसंस्था आणि ह्या सर्वांची विषारी नांगी जी अस्पृश्यता तिचा विशेष विकास उत्तरेपेक्षा दक्षिणेकडे अधिक झालेला समाजशास्त्राच्या दृष्टीने पाहणाऱ्यास स्पष्ट दिसत आहे. ह्या बाबतींत प्रसिद्ध समाजशास्त्री हेन्री मेन व सेन्सस रिपोर्टर आर. व्ही. रसेल ह्यांच्या ग्रंथांतील कांही उल्लेख फार महत्त्वाचे आहेत, त्यांचें भाषांतर पुढे देतों.

" मद्रासेकडे मिरासी वतनबाबीचा जो कायदा आहे तो प्राचीन ग्रामसंस्थेचा कदाचित् अवशेष असावा. ह्या कायद्याअन्वयें जमिनीच्या मालकीचा हक्क फक्त कांही थोड्या वरिष्ठ जातींना देण्यांत आला. पुढे भोवतालच्या पडिक जमिनी वाहण्याचा मक्ता ह्या थोड्या आद्य मालकांकडेच राखून ठेवण्यांत आला. ह्यांनीच प्रथम ही नवीन जमीन लागवडीस आणल्याशिवाय इतरांना अशा जमिनी संपादन करण्याचा हक्कच नसे. पारिया किंवा इतर अस्पृश्य वर्गांना तर जमिनीच्या मालकीचा हक्कच नाही. "

Russel's *Tribes and castes of the Central Provinces*. पान ४१.

ह्या आद्यमालकांना हल्ली मुदलियार असें नांव आहे. मोदल (मुद्दल) हा शब्द तामीळ भाषेंतील विशेषण असून त्याचा अर्थ पहिला, अव्वल, पूर्वीचा असा आहे. मोदलियार हें अनेकवचनी रूप आहे. ह्यावरून मोदलियार म्हणजे प्रथम वसाहत करणारे शिष्टजन असा अर्थ होतो. ह्यावरून ही ग्रामसंस्था आर्यांच्याही आधीची द्राविडी दिसते. मलबारांत नंबुद्री ब्राह्मण हे आर्य

आहेत. त्यांनी हीच द्राविडी संस्था अधिक बळकट करून सारी जमीन आपल्याच मुठींत वळून, तद्देशीयांना पशूप्रमाणें त्याच जमिनीवर राबविण्याची जी अमानुष रूढि पाडली आहे ती अद्यापि जारी आहे. रसेलने सर हेन्री मेन यांच्या प्रसिद्ध 'ग्रामसंस्था' (Village Community) ह्या ग्रंथांतून पान १२७ वर पुढील निर्णायक उतारा दिला आहे.

"मध्य आणि दक्षिण हिंदुस्थानांत अशीं कित्येक खेडीं (गांव) आहेत की ज्यांच्या शिवेला लागूनच कांही जातींची वस्ती आहे. ह्या जातींच्या माणसांचा संबंध ह्या गावांतील कोणत्याही स्वाभाविक व सांघिक स्थितीशीं येणें शक्य नसतें. हे लोक निसर्गतःच अस्पृश्य समजण्यांत येतात. त्यांना गांवांत मज्जाव असतो किंवा कांही राखीव जागेंतच जाण्यास त्यांना परवानगी असते. तेव्हांही त्यांचा स्पर्श टाळण्यांत येतो. स्वतःच्या शरीरावर आपल्या मूळ जातित्वाचीं स्पष्ट चिन्हें वाहण्याची त्यांच्यावर सक्ती असते. त्यांचा गांवांत जरी शिरकाव नसतो तरी गांवाच्या बऱ्यावाईटाशीं अभेद्य संबंध असलेला एक चिकटवलेला भाग म्हणून ह्या लोकांची वस्ती असते. त्यांची वृत्ति (कामें) निश्चित असते. त्यापैकी गांवांच्या परस्पर मर्यादांचा निश्चय करणें हा एक त्यांचा मुख्य अधिकार असतो. ह्या बाबतींत त्यांचा निकाल शेवटला समजण्यांत येतो. ह्यावरून ह्यांचा वंश भिन्न असून गांवांत राहणाऱ्या वसाहतवाल्यांनी ह्यांच्या जमिनी बळकावल्या आहेत हें उघड दिसतें."

सर हेन्री मेन हे ह्या देशांत परके असल्याने वर वर्णिलेला प्रकार 'कित्येक' खेड्यांत आहे असें त्यांनी म्हटलें आहे. कारण त्यांना सर्व खेडीं पाहणें शक्य नव्हतें. वस्तुतः वरील प्रकार सर्वच खेड्यांत आहे. म्हणूनच गांव आहे तेथे महारवाडा आहे अशी मराठींत म्हण पडली आहे. ह्या प्राचीन ग्रामसंस्थेचें दृश्य जितकें अद्यापि महाराष्ट्रांतील खेड्यांत स्पष्ट दिसतें त्याहून अधिक स्पष्ट हिंदुस्थानांत किंबहुना सर्व जगांत कोठे आढळणार नाही. उत्तरेकडील मौर्यांच्या साम्राज्यपीठाचा अपहार शुंग आणि कण्व ह्या ब्राह्मणी नोकर घराण्यांनी केल्यामुळें व हीं दोन्ही घराणीं दुर्बळ व राजकारणांत गौरवाकर्ष ठरल्यामुळें तीं अल्पकाळांत नष्ट झालीं. अशोकाच्या मागे लवकरच दाक्षिणेंत शातवाहन नांवाचें

बादशाही घराणें उदयास आलें. त्याने मगध देशापर्यंत आपल्या राज्याची हद्द उत्तरेकडे नेली व दाक्षिणेंत त्याच्या शिवेवर तिन्ही बाजूंला समुद्राचें वलय होतें, अशा अर्थाचे किंचित् अतिशयोक्तीचे शिलालेख आढळतात. मौर्यांइतकें बादशाही सामर्थ्य शुंग व कण्व ह्यांच्यांत नव्हतें म्हणून दक्षिणेकडील शातवाहनांना बादशाही स्थापण्यास संधि मिळाली. ती त्यांनी उत्तरेपर्यंत भिडविली. हे शातवाहन उर्फ साळवी मराठी मुलखांतून रट्ट अथवा महारट्ट आणि तेलगू व कानडी मुलखांतून रड्डी ह्या नांवाने अद्यापि प्रसिद्ध आहेत. जमिनीची बहुतेक सर्व मालकी अथवा मिराशी ह्या अफाट प्रदेशांत ह्यांचेकडेच आहे. कृष्णा आणि तुंगभद्रा ह्यांच्या मधला, आणि उत्तरेला माळव्यांत थेट शोणभद्रेच्या खोऱ्यापर्यंत, सर्व मध्यदेश ह्यांच्या निशाणाखाली आला. ह्याला महाराष्ट्र असें मधून मधून लोक संबोधीत असत. ह्यूएन संग ह्या चिनी प्रवाशाने 'महोलोख' म्हणून जें नांव योजिलें तें ह्याच महाराष्ट्र शब्दाचा अपभ्रंश असून त्या प्रवाशाने ज्या राष्ट्राची स्वभावलक्षणें वर्णिलीं आहेत तीं सर्व मराठ्यांना व रड्डींना तंतोतंत जुळतात. ह्याच महाराष्ट्रांत हेनरी मेनने वर वर्णिलेली ग्रामसंस्था अद्यापि जीव धरून आहे. ह्यांतील कोणत्याही खेड्यांत जा, तेथे महार (माल), मांग (मादिग), चांभार (समगार) ह्यांचे प्रत्येक गांवानजीक वाडे आणि बलुत्याचे वगैरे बावन हक्क आणि कामें अद्यापि कोणाही संशोधकाला तपशीलवार स्पष्ट दिसतील. खेड्यांतील पाटील उर्फ गौडा (ग्रामडा)-ग्रामणी असेंही वेदकालचें नांव पुष्कळ ठिकाणीं आढळतें-हा हल्ली मराठी, तेलगू, कानडी, गुजराथी, अथवा हिंदी ह्यांपैकी कोणतीही भाषा बोलत असो, त्याचा धर्मपंथ आज वैष्णव, शैव, नाथपंथी, मानभावी, लिंगायत, जैन, किंबहुना मुसलमानही असो, परंतु त्याचा वंश रट्टच आढळणार. ह्या रट्टांचे अथवा रेड्डींचे व त्यांच्या प्रभावळींत गोविलेल्या महार, मांग, चांभार ह्या भिन्न वंशांचे सहवास, सहकार्य व सहवीर्य पुरातन काळापासून आजवर अखंड चालत आलेले आहेत. सहवीर्य ह्या शब्दावरून रड्डींचा व ह्या वहि ष्कृतांचा शरीरसंबंध होत असावा असें सुचविण्याचा माझा इरादा नाहीं. तसा पुरावा मिळाल्यास तेंही विधान मी आनंदानें करीन. महार मांग

व रेड्डींनीं शूरत्वाचीं कृत्यें सहकार्याने केलीं येवढाच येथे अभिप्राय आहे. केवळ आडनांवांचाच प्रश्न असता तर रट्टांच्या कुळींचीं नावें 'अस्पृश्यांनी' आश्रय–आश्रित संबंधाने घेतलीं असावींत असें सांगून कोणीही मोकळा होईल. पण देवकें, दैवतें, सोएर सुतक, स्मशानविधि, पांचवी, सट, बारसें, लग्नविधि व तत्संबधीं पुरातन चालीरीती, इ० समाजशास्त्राने महत्त्वाची मानलेल्या जाळ्यांची गुंतागुंती ह्या आश्रय–आश्रितांमध्यें निरखीत जाऊन जर कोणी त्यांचा माग काढीत मुळाकडे धैर्याने मागे मागे जाऊं लागला, तर तो ज्ञातवाहनांच्याच काय, पण गौतमबुद्धाच्याही मागे प्रागैतिहासिक काळांत जाऊन भिडेल. सारांश काय, तर महाराष्ट्रांतील ग्रामसंस्था वेदांपेक्षाही जुनी असूं शकेल, किंबहुना ती आर्यांचीच विशेष आहे की तत्पूर्वीच्या द्राविडांच्या समाजव्यवस्थेंतही अंगभूत होती ह्याचा ठाम निर्णय करणें अशक्य होईल.

आर्यांच्या वर्णव्यवस्थेशीं भारतीय अस्पृश्यतेच्या उगमाचा व विकासाचा जितका संबंध आहे त्याहूनही जास्त आर्यांच्या व कदाचित द्राविडांच्याही ह्या सर्वगामी ग्रामसंस्थेशीं आहे. दुसऱ्या भागेंत हीच गोष्ट सांगावयाची झाल्यास, परजातिद्वेष हें राजकीय अथवा सामाजिक कारण जितकें ह्या अस्पृश्यतेच्या मुळाशीं व वाढीशीं संबद्ध आहे, त्याहूनही जास्त स्वकीय वृत्तीचा लोभ आणि परकीयांचा मत्सर हें आर्थिक कारण भारतीय अस्पृश्यतेच्या मुळाशीं, विशेषत: दक्षिण भारतांतील अस्पृश्यतेच्या वाढीशीं व दृढतेशीं गुंतलेलें आहे, असें दिसतें. जेथे जेथे उपऱ्या जेत्यांनी तद्देशीयांच्या जमिनी व राज्यें बळकावलीं आहेत, तेथे तेथे असल्या ग्रामसंस्था उर्फ मालकी व बलुत्याचे विपरीत संबंध निर्माण झाले आहेत. आधुनिक मुदतबंदी मजुरीची पद्धत आणि वसाहतींतील आगमानिर्गमाचे सर्व कायदेकानू असल्या ग्रामसंस्थांची म्हणजे स्वकीय वृत्ति-लोभाची व परजाति-द्वेषाची स्पष्ट द्योतकें होत ह्यांत काय संशय आहे!

भारतीय वर्णव्यवस्थेंत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हे त्रैवर्णिक आर्य समजले जातात; आणि शूद्र हा मागाहून ह्या व्यवस्थेंत आर्यांनी आपला सा करून घेतलेला भिन्न वंश सामान्यतः सर्व भारतांत–विशेषत: दक्षिण भारतांत–द्राविडवंशी समजला जातो. हा भेद केवळ मानीव वर्ण–

व्यवस्थेच्या दृष्टीने झाला. पण ग्रामसंस्थेच्या आर्थिक दृष्टीने पाहतां मालकी अथवा मिराशी आणि बलुतें ह्यांचा निकष लावला तर आर्य आणि द्राविड ह्यांची सर्वत्र भेसळ झालेली आढळेल. पुष्कळ ठिकाणीं द्राविड-वंशी शूद्र समंजले जाणारे ग्रामणीचा उर्फ मालकीचा किंवा मिराशीचा हक्क भोगणारे संपन्न अवस्थेंत आढळतात; तर उलट पक्षीं वर्णगुरु म्हणविणारे ब्राह्मण जोशी, वैद्य, देवपूजक, गुरव इत्यादिकांच्या हीन वृत्तीवर किंवा बलुत्याच्या हक्कावर तृप्त असतात. तसेंच कांही अर्धवट रजपूत मध्य-प्रांतांत हालब, रामोशी, जागले, चौघुले ह्या नात्याने अशांच्या हीनवृत्ति चालवून गुजराणा करतांना आढळतात. पण ह्यांपैकी कोणीही अस्पृश्य झाले नाहीत, किंवा अशा हीन वृत्तींना कायमचे चिकटले नाहीत. हल्लीच्या अस्पृश्य जातीच मात्र ह्या बलुत्यांचे चिरंतन गुलाम बनलेल्या आहेत. इतकेंच नव्हे तर ह्या वतनावर पाणी सोडून स्वतंत्रपणें कोणी निर्वाह चालवूं म्हटल्यास त्याच्यावर वरिष्ठ वर्गांकडून जबरी होते. बाहेर तर काय, प्रत्यक्ष हिंदुस्थानांतील युरोपिअनाने चालविलेल्या चहाच्या व निळी-च्या मळ्यांवर मुदतबंदीने राबणाऱ्या एखाद्या मजुराचा खून झाला तरी त्याची लवकर दाद लागत नाही; त्याचप्रमाणें एकाद्या महाराने मेलेलें ढोर ओढण्याचें नाकारलें म्हणून त्याचा खून झाल्याच्या आरोपावरून हायकोर्टापर्यंत खटले चालूनही पुराव्याच्या अभावामुळें कोणास शासन न झाल्याचीं उदाहरणें अद्यापि आढळतात ! एकंदरींत ह्या ग्रामसंस्थेमुळें वरील चार वर्णांपैकी समजले जाणाऱ्या सर्व ग्रामस्थांचा योगक्षेम नीट चालून, ग्रामबाह्यांच्या मात्र उन्नतीच्या सर्वही वाटा बंद झाल्या आहेत. "असुनि जन्मभूमी ज्याची होत बंदिशाळा । परवशतापाश दैवें ज्यांच्या गळां लागला ॥" ही चोराची उलटी बोंब पुनः ह्याच वरिष्ठांच्या तोंडून त्यांच्या दुष्कर्मविपाकामुळें हल्ली ऐकू येत आहे !

अस्पृश्यांचीं बलुतीं आणि बावन वतनें म्हणजे वेदांतांत वर्णिलेला शुकनलिका न्याय होय. पिंजऱ्यांतला पोपट दार उघडलें की पळून जाईल, पण पारध्याची नलिका आपल्याच पायाने घट्ट धरिलेला पोपट प्रत्यक्ष पारधी येऊन ओढूं लागला तरी ती सोडीत नाही असें जें हरिदास रसभरित रीतीने सांगत असतात त्यांत मोठें धार्मिक तत्त्व आहे. ह्या बलुत्यांच्या हक्कापायीं भारतीय अस्पृश्य जातींची मानसिक अवनति किती झाली

आहे आणि मुदतबंदी मजुरीचा प्रयोग निदान हिंदुस्थानांत तरी किती पूर्ण यशस्वी झाला आहे ह्याचीं हीं क्षुद्र बलुतीं स्पष्ट द्योतकें आहेत. अलीकडे अस्पृश्यांनी अस्पृश्योद्धारासाठी ज्या परिषदा भरविल्या आहेत व जे प्रयत्न चालविले आहेत त्यांतून चालू असलेली त्यांच्यांतील सुधारक-उद्धारकांची खेचाखेची म्हणजे वरील शुक्कनलिकान्यायच होय. डॉ० आंबेडकर ह्यांचें वतनी बिल ह्या न्यायामुळेंच पास होत नाही. ह्याला कारण स्वतः अस्पृश्यच !

प्रकरण चवथें

मनुस्मृतिकालीन अस्पृश्यता

मनुस्मृतीचा काळ अद्यापि नक्की ठरत नाही. पण मनुस्मृति हल्ली ज्या स्थितींत आढळते ती गुप्तसाम्राज्याच्या वेळची असावी असा तर्क करण्यास पुष्कळ जागा आहे. ह्या वेळीं बौद्ध संस्कृतीचा पूर्ण नायनाट झाला नसला तरी ती घसरणीला खास लागली होती आणि त्याच मानाने ब्राह्मणी संस्कृतीची मेढही प्रतिष्ठित झाली होती. इतर गोष्टी कशाही असोत, आमच्या पूर्वोक्त व्याख्येबरहुकुम असलेली अस्पृश्यता उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम म्हणजे सर्वच भरतखंडांत रूढ झाली होती. मानवधर्मशास्त्राच्या उर्फ मनुस्मृतीच्या १०व्या अध्यायांत चंडाल, पुक्कस, निषाद वगैरे मानव वंशांची जी ऐतिहासिक मीमांसा केलेली आहे ती शुद्ध इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत निराधार आहे. ह्या काळीं वर्णव्यवस्था बौद्ध संस्कृतीच्या शेगडींतून जळून पोळून वर्णत्वाचा तिचा आत्मा नाहीसा होऊन हल्लींच्या जातिभेदाच्या स्वरूपाला येऊन पोहोंचली होती. चंडालादि स्वतंत्र मानववंश असून त्यांची उपपत्ति ब्राह्मण स्त्रिया आणि शूद्र पुरुष ह्यांची संकरजात अशी करणें म्हणजे केवळ वर्णद्वेषाचें खूळ होय. हें खूळ गुप्तकाळापासून पुढे आतापर्यंत सारखें वाढतच आहे. वर्णसंकर झाला नाहीं असें कोणाचेंही म्हणणें नाही. पण हल्लींच्या सर्व जाती केवळ वर्णसंकरामुळेंच झाल्या आणि ब्राह्मण शिवाय करून सर्व जाती वर्ण-संकरजन्यच आहित, आणि त्यांतल्या त्यांत अस्पृश्य वंश म्हटले की,

केवळ वर्णसंकरापलीकडे त्याला अस्तित्वच नाही, ही उपपत्ति खास ऐतिहासिक नाही. मनुस्मृतीच्या १०व्या अध्यायांतला चवथा श्लोक खालील प्रमाणें आहेः--

ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यस्त्रयो वर्णा द्विजातयः।
चतुर्थ एकजातिस्तु शूद्रो नास्ति तु पंचमः॥

अर्थः--ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हे तीन वर्ण दोनदा जन्मतात; म्हणजे एकदा सृष्टिक्रमाने व मागून उपनयन संस्काराने. शूद्र सृष्टिक्रमाप्रमाणें एकदाच जन्मतो. ह्या चारांपेक्षा पांचवा असा वर्णच नाहीं.

पांचवा वर्ण नाही, आणि अस्पृश्य जातीची लोकसंख्या तर भारतांत चोहोंकडे पसरली आहे हें पाहून त्यांच्या उपपत्तीची काळजी ह्या स्मृतिकाराला पडली. आणि त्यांच्या हीनत्वाचा नगारा मोठ्याने वाजविण्यासाठी वर्णसंकराशिवाय दुसरा तोडगा त्याला कोणता मिळणार! तो तोडगा त्याच अध्यायांत श्लोक १२मध्यें येणेंप्रमाणें वर्णिला आहेः--

शूद्रादायोगवः क्षत्ता चंडालश्चाधमो नृणाम्।
वैश्यराजन्यविप्रासु जायन्ते वर्णसंकराः॥

अर्थः--शूद्र पुरुष आणि त्याहून श्रेष्ठ अनुक्रमें वैश्य, क्षत्रिय आणि ब्राह्मण जातींतील स्त्री ह्यांच्यामध्यें प्रतिलोम म्हणजे उलट्या शरीरसंबंधामुळें जी प्रजा होते तिला अनुक्रमें आयोगव, क्षत्ता आणि चंडाल अशीं नांवें आहेत; त्यांत शूद्र पुरुष आणि ब्राह्मण स्त्री ह्यांची जी संतति तिलाच मात्र चंडाल समजून अत्यंत नीच आणि अस्पृश्य मानण्यांत आलें आहे. मनूने वर्णसंकराचा जो निषेध केला आहे तो प्रतिलोमाचाच, म्हणजे खालच्या जातीचा पुरुष आणि वरच्या जातीची स्त्री ह्यांच्या संबंधाचाच केला आहे. ह्याच्या उलट जो अनुलोम संकर त्याचा निषेध केला नाही, इतकेंच नव्हे तर उलट गौरवच केला आहे. त्याच १०व्या अध्यायांत खालील दोन श्लोक ध्यानांत घेण्यासारखे आहेत:

शूद्रायां ब्राह्मणाज्जातः श्रेयसा चेत्प्रजायते।
अश्रेयान्श्रेयसीं जातिं गच्छत्यासप्तमाद्युगात्॥ ६४॥
शूद्रो ब्राह्मणतामेति ब्राह्मणश्चैति शूद्रताम्।
क्षत्रियाज्जातमेवं तु विद्याद्वैश्यात्तथैव च॥ ६५॥

अर्थः--शूद्र कन्येला ब्राह्मणापासून कन्या झाली, त्या कन्येला पुनः ब्राह्मणापासूनच कन्या झाली आणि अशा सात पिढ्या झाल्यावर ती

अगदी ब्राह्मणच उपजली असें होतें. ह्याप्रमाणें शूद्राचा ब्राह्मण व ब्राह्मणाचा शूद्र बनतो आणि ह्याचप्रमाणें क्षत्रिय आणि वैश्यही समजावे.

ह्यावरून त्या काळच्या वर्णव्यवस्थेच्या कल्पना किती अनैतिहासिक, अस्वाभाविक, एकांगी आणि डोईजड झाल्या होत्या हें उघड होतें. अशा व्यवस्थेमुळें चोहोंकडेच सर्वांचाच वर्णसंकर होऊन वर्ण बाह्य अस्पृश्य जातींशिवाय शुद्ध जात कोठेच उरली नव्हती असा ह्या भयंकर तोडग्याचा खरा अर्थ होतो हें ह्या स्मृतिकाराच्या लक्षांत आलेलें दिसत नाही. ह्यांत चार वर्णांतील पुरुषांचाच अपमान होतो असें नसून स्त्रीजातीलाही हीन मानल्यामुळें तिचाही भयंकर अपमान केला गेला आहे. पुरुष म्हणजे बीज, स्त्री म्हणजे क्षेत्र, बीजालाच सर्व महत्त्व आणि क्षेत्राला कांहीच नाही, अशी ही एकांगी उपपत्ति आहे. दुसऱ्या भाषेंत सांगावयाचें म्हटलें तर दुसऱ्याच्या बायका बळकावायच्या आणि आपल्या बायकांना पडद्यांत व सोवळ्यांत डांबावयाचें ही हल्लीची मुसलमानांची नीति मनुस्मृतींत चांगली वर्णिलेली आहे. 'स्त्रीषु दुष्टासु जायते वर्णसंकरः' हा भगवद्गीतेचाही भावार्थ आहे. तोही ह्याच काळाला शोभतो. अस्सल बौद्ध काळांत असले अनुलोम प्रतिलोम दोन्ही शरीरसंबंध होत होते, पण वरील कल्पनांचा गाधा-गोंधळ मात्र नव्हता. बौद्ध संस्कृति किंबहुना तत्पूर्वीची खरी आर्यसंस्कृति निर्वीर्य झाल्यावरच असल्या एककल्ली विचारांना मान्यता मिळणें शक्य आहे. सामान्य वर्णव्यवस्थेचें कसेंही असो. अस्पृश्य मानिलेल्यांच्या दुःखावर हा नवीनच विषारी डाग जो दिला गेला आहे तोच आमचा प्रस्तुत मुद्दा आहे. वर्णद्वेष आणि वृत्तिलोभ ह्या जोडगोळीने मानीव अस्पृश्यांना हतवीर्य करून त्यांना कायमचें शारीरिक आणि बौद्धिक गुलाम बनवून, पुनः त्यांच्या वंशाची उपपत्ति अशी लावणें, म्हणजे अविवेकाचाच नव्हे तर अन्यायाचा कळस होय!

नुसती उपपत्ति लावूनच स्मृतिकार तृप्त झाले नाहीत. ह्या मानीव वर्णसंकराच्या गुन्ह्याला खरी, कायमची आणि कडेलोटीची पुढील शिक्षा ह्याच १० व्या अध्यायांत फर्मावि‌ण्यांत आली आहे.

चंडालश्वपचानां तु बहिर्ग्रामात्प्रतिश्रयः।
अपपात्राश्च कर्तव्या धनमेषां श्वगर्दभम्॥ ५१॥
वासांसि मृतचेलानि भिन्नभांडेषु भोजनम्।

काष्णायसमलंकारः परिव्रज्या च नित्यशः ॥ ५२ ॥
न तैः समयमन्विच्छेत्पुरुषो धर्ममाचरन् ।
व्यवहारो मिथस्तेषां विवाहः सदृशैः सह ॥ ५३ ॥
अन्नमेषां पराधीनं देयं स्यान्भिन्नभाजने ।
रात्रौ न विचरेयुस्ते ग्रामेषु नगरेषु च ॥ ५४ ॥
दिवा चरेयुः कार्यार्थं चिह्निता राजशासनैः ।
अबांधवं शवं चैव निर्हरेयुरिति स्थितिः ॥ ५५ ॥
वध्यांश्च हन्युः सततं यथाशास्त्रं नृपाज्ञया ।
वध्यवासांसि गृह्णीयुः शय्याश्चाभरणानि च ॥ ५६ ॥

अर्थः— चांडाल, श्वपच इत्यादि जातींनी गावाबाहेर राहावें; त्यांच्याजवळ फुटकीं भांडींच असावींत; कुत्रीं आणि गाढवें हेंच त्यांचें धन; प्रेतांवरील कपडे हींच त्यांचीं वस्त्रें; त्यांनी फुटक्या मडक्यांतच खावें; काळ्या लोखंडाचे अलंकार ल्यावे; नित्य भटकत असावें; इतरांनी यांच्याशीं कसलाही व्यवहार (सामोपचाराचाही) करूं नये; त्यांचे विवाह त्यांच्यांतच व्हावे; त्यांना अन्न द्यावयाचें असल्यास दुसऱ्याकडून खापरांतून द्यावें; शहरांत किंवा खेड्यांत त्यांनी रात्रीं येऊं नये; दिवसा कामासाठी कायद्याने ठरविलेलीं चिन्हें धारण करूनच यावें; तें काम म्हणजे बेवारशी प्रेतें नेणें, देहान्तशिक्षा झालेल्यांचा राजाज्ञेने वध करणें व त्यांचे कपडे, दागिने वगैरे घेणें, हें होय.

वर छांदोग्य उपनिषदाच्या ५ व्या अध्यायाच्या २४ व्या खंडांतील ४ था श्लोक (पान २४ पहा) उद्धृत केलाच आहे. त्यांत स्पष्ट म्हटलें आहे की चांडालाला उष्टें दिलें तरी वैश्वानर आत्म्यामध्यें आहुति दिल्याप्रमाणें पुण्य आहे. हें छांदोग्याचें औदार्य कोणीकडे आणि ज्या मनुस्मृतीच्या ४ थ्या अध्यायांतील खालील श्लोकांत शूद्रालाही उच्छिष्ट देऊं नये आणि चांडाल–पुक्कसांच्या तर वाऱ्यालाही उभें राहूं नये असें फर्माविलें आहे, तिचा कडकडीत तुसडेपणा कोठें ! बुद्धपूर्व आणि बुद्धोत्तर काळांत केवढा हा फरक !

न शूद्राय मतिं दद्यात् नोच्छिष्टं न हविष्कृतम् ।
न चास्योपदिशेद्धर्मं न चास्य व्रतमादिशेत् ॥ ८० ॥

अर्थः—शूद्राला सल्ला देऊं नये; उच्छिष्ट किंवा हवन होऊन शिल्लक उरलेलें अन्न देऊं नये; प्रत्यक्ष धर्मोपदेश किंवा प्रायश्चित्तोपदेशही देऊं नये.

साध्या शूद्रावर जर असा बहिष्कार, तर अतिशूद्राविषयीं खालील श्लोकांत वर्णिल्याप्रमाणें कट्टा द्वेष असावा ह्यांत काय नवल !

न संवसेच्च पतितैर्न चांडालैर्न पुल्कसैः ।
न मूर्खैर्नावलिप्तैश्च नान्त्यैर्नान्त्यावसायिभिः ॥ ७९ ॥

अर्थः—पतित, चांडाल, पुल्कस, मूर्ख, गर्विष्ठ, अंत्य व अंत्यावसायि ह्यांच्या बरोबर (एका वृक्षाच्या ठिकाणीं) एकत्र बसूं नये ह्या श्लोकावर भाष्यकारांनी खालील अर्थाची पुरवणी जोडली आहे;—शूद्रजातीय स्त्रीचे ठिकाणीं निषादापासून झालेला जातीने पुल्कस होत असतो; अंत्य म्हणजे परीट, चांभार, बुरुड वगैरे; चांडालापासून निषाद स्त्रीचे ठिकाणीं झालेले अंत्यावसायि होत.

मनुस्मृतीनंतर हल्लीच्या स्वरूपांत आढळणाऱ्या अठरा महापुराणांचें व अनेक उपपुराणांचें विशाळ मध्ययुगीन संस्कृत वाङ्मय लिहिलें जात होतें. ह्याचा बौद्ध जैन संस्कृतीशीं उघड हेवादावा आणि विरोध चालत होता. ह्या (सुमारें ५०० वर्षांच्या) काळांत ब्राह्मणी संस्कृतीची घडी बौद्धादिकांच्या विरोधाने विस्कटलेली पुनः बसून अर्वाचीन समाजस्थितीचा पाया घातला जात होता. ह्या वाङ्मयांतून उतारे देऊं गेल्यास ग्रंथविस्तार मर्यादेपलीकडे जाईल. अस्पृश्यतेची घडी वरील स्मृतीने जी बसविली ती अगदी आजतागायत जशीच्या तशीच शाबूत दिसत असल्यामुळें त्या पुराणवाङ्मयांतून नवीन ऐतिहासिक माहिती मिळण्याचीही कांही आशा नाही. म्हणून जी मिळते ती देऊन जागा अडविणें इष्ट दिसत नाही. वर्णसंकराची उपपत्ति जुळवून क्षत्ता, आयोगव इत्यादि ज्या अनेक संकरजन्य उपजातींचा उल्लेख मनुस्मृतिकार करितात त्यांचा आता, किंबहुना पूर्वीही, प्रत्यक्ष मागमूस आढळत नाही. चांडाल, पुल्कस, निषाद वगैरे थोड्या नांवांपलीकडे, आजच्या समाजस्थितींत, महार, मातंग, ढोर, घेड, पारिया, चिरुमा, नामशूद्र, मेघवाल, बळहई, वगैरे अनेक मानीव अस्पृश्य जातींचीं नांवें आढळतात त्यांचा उल्लेख मनूंत अथवा इतर स्मृतींत किंवा पुराणांतूनही आढळत नाही. आणि ह्या जाती तर ह्या विशाल देशाच्या सर्व अंगांतून व काना कोपऱ्यांतून राजरोस आढळतात. ह्यावरून येवढेंच सिद्ध होत आहे की आजकालच्या मानीव अस्पृश्यांची उत्पत्ति केवळ वर्णव्यवस्थेच्या काल्पनिक धोरणावरून लावीत न बसतां,

ती राजकीय, समाजिक आणि विशेषतः आर्थिक कारणांवरून लावण्याचा आम्ही जो वर प्रयत्न केलेला आहे त्याच दिशेने पुढील शोधकांनी प्रयत्न चालविणें अधिक शास्त्रीय ठरेल.

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें स्मृति व पुराणें हल्ली प्रचलित असलेल्या अनेक जातींची अथवा त्याच्या नांवांची मीमांसा करण्याचीं योग्य साधनें नव्हत, ह्यात कांही मोठेसें आश्चर्य आहे असें मुळींच नव्हे. हे ग्रंथ म्हणजे आताच्या 'सेन्सस रिपोर्ट' अथवा 'एथ्नोग्राफिक सर्व्हे' ह्यांप्रमाणें आधुनिक शास्त्रीय पद्धतीनुसार लिहिलेले ग्रंथ नव्हत. बोलून चालून हे पक्षाभिनिविष्ट ग्रंथ होते. अनुलोम प्रातिलोम शरीरसंबंध बंद पाडून कांही विशिष्ट मानीव वर्णांचा टेंभा मिरविण्याचा त्यांचा उघड उद्देश होता. हा उद्देश साध्य करण्यास त्यांना कृत्रिम इतिहास प्रतिष्ठित करावयाचा होता. आज देखील डोईजड जाती अथवा वर्ग असले बनावट इतिहास तयार करून जगाला झुलवीत आहेतच, मग आमच्या स्मृति-पुराणांनी तर मानवी स्वभावाविरुद्ध काय केलें आहे म्हणून आश्चर्य मानावयाचें आहे! अगोदर वर्णसंकराची उपपत्ति बसावावयाची, मग त्या संकराला निषिद्ध मानावयाचें आणि मग क्षत्ता, आयोगव इत्यादि संस्कृत उर्फ कृत्रिम नांवें घ्यावयाचीं हा सर्व प्रकार केवळ अहंमन्यतेचा विलास होय. महार, ढोर, पारिया, चिरूमा, नमशूद्र, बळहई इत्यादि आजकालच्या "अस्पृश्यांचीं" नांवें निरनिराळ्या प्रांतांतून आढळतात, तीं ह्या पुराणग्रंथांतून कां आढळत नाहीत, हाही प्रश्न उद्भवतच नाही. भिन्न धंदे, भिन्न परिस्थिति, वगैरेवरून हीं नांवें ह्या ग्रंथांनंतरच्या अलीकडच्या काळांत पडलेलींच असावींत. ह्या बाबीचा विचार दुसऱ्या खंडांतील "नांवांच्या व्युत्पत्ति" ह्या प्रकरणांत करण्यांत आला आहे. ह्यांतील कांही नांवें पुराण-स्मृतिग्रंथांच्या पूर्वीही होतीं. उदाहरणार्थ, चंडाल, पुल्कस (पुलय), मेघ (मघ) वगैरे. पण त्या जमातींचीही पूर्वपीठिका समाजशास्त्रान्वयें ठरवितांना स्मृतीचा पुरावा घेणें अगदीच अप्रयोजक आहे हें वाचकांनी ध्यानांत घ्यावें.

प्रकरण पांचवें

उत्तरयुगीन अथवा अर्वाचीन अस्पृश्यता

येथपर्यंत मध्ययुगीन अस्पृश्यतेचें विवेचन झालें. आता तिसरा टप्पा जो उत्तरयुगीन म्हणजे ज्या काळीं बौद्ध धर्माचा नायनाट जैन, शैव, वैष्णवादिकांनी अनुक्रमाने चालविला आणि त्यानंतर मुसलमानांची धाड येऊन तो (बौद्ध धर्म) नाहींसा झाला, तो काळ होय. ह्या काळांतील अस्पृश्यतेचें एक मुख्य लक्षण म्हणजे तत्कालीन अस्पृश्यांच्या संख्येमध्यें निरनिराळ्या प्रांतांतून आंधळें राजकारण आणि जुलमी राज्यक्रांति ह्यामुळें भली मोठी ठोकळ भर पडली, हें होय. तरी तिकडे आपण आता वळूं. इ.स. १८९४ सालीं मद्रास येथे थिऑसॉफिकल सोसायटीने तेथील पारियांची स्थिति सुधारण्यासाठी प्राथमिक शिक्षणाच्या शाळा सुरू केल्या. ह्या प्रयत्नास प्रोत्साहन देण्यासाठी ह्या सोसायटीचे तत्कालीन उदारधी अध्यक्ष कर्नल ऑल्कॉट यांनी सन १९०१ सालीं *The Poor Pariah* ('बिचारा पारिया') ह्या नांवाची एक इंग्रजी चोपडी प्रसिद्ध केली. तिच्या २४ व्या पानापासून शेवटपर्यंत एका नवीन कल्पनेचा निर्देश आणि पुरस्कार केला आहे. ती कल्पना म्हणजे हल्लीचे पारिया हे एके काळीं बौद्ध होते, आणि पुढील धर्मक्रांतीच्या काळीं ते हिंदुधर्मात सामील न झाल्यामुळें राजशासनावरून त्यांना अस्पृश्य ठरवण्यांत आलें, ही होय. १८९८च्या सुमारास कर्नल ऑल्कॉटकडे पारिया जातीचे कांही पुढारी आले आणि म्हणू लागले की अशोकाचे वेळीं आपण बौद्ध होतों, म्हणून आमच्यासाठी ऑल्कॉट साहेबांनी बौद्धांचा एक नवीन संघ काढून त्यांत आम्हांस घ्यावें. ऑल्कॉट साहेबांनी त्यांना कोलंबो येथील H. Sumangala (एच्. सुमंगल) ह्या मुख्य बौद्ध भिक्षूकडे नेलें. त्यांनी एका मोठ्या जाहीर सभेंत त्यांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली. परंतु हे लोक पूर्वी बौद्ध होते ह्याविषयींचा पुरावा ऑल्कॉट साहेबाला मिळाला नाही. अश्वघोषाचा कांही लेख आपणाजवळ होता असें पारियांचें म्हणणें होतें. पण तो लेख त्यांना त्यांचेकडून मिळाला नाही. तथापि असा पुरावा

पुढे मागे मिळेल अशा ऑल्कॉट साहेबांची खात्री होती. कोलंबो येथील एक तामिळ हिंदु मि. व्ही. जी. टी. पिल्ले यांनी सिद्धांतदीपिका नांवाच्या एका मासिकांत लिहिलेल्या लेखांतून पान २५ वर खालील उतारा दिला आहे:- " इ. स. ५३४ च्या सुमारास सिलोनच्या एका बौद्ध राजाने पुष्कळ तामिळ शैव ग्रंथांचा नाश केला, त्यावरून शैवांचा बौद्ध किती तिटकारा करितात हें कळणें कटीण नाही. उलटपक्षीं जेव्हा तामिळ हिंदूंनी सिंहलद्वीपावर स्वारी केली तेव्हा त्यानी तालवृक्षाइतके उंच बौद्धधर्माचे ग्रंथ जाळिले आणि बौद्धांचा नायनाट केला. मदुरेच्या बौद्ध राजा कण्ह पांड्य याने इ. स. च्या सहाव्या शतकांत शैव धर्म स्वीकारिल्यापासून बौद्धांच्या ऱ्हासास सुरवात झाली." तामिळ भाषेंतील सर्वांत मोठें आणि सन्मान्य काव्य 'कुरळ' हें होय. ह्याचा कर्ता तिरुवल्लुवर हा पारिया होता. (वाल्मीक ऋषिच म्हणावयाचा!) इ. स. १८८५ च्या मॅन्युअल ऑफ ॲडमिनिस्ट्रेशनमध्यें पान ३३-३६ वर म्हटलें आहे की तामिळ पारिया हे दुसऱ्या कोणत्याही जातीपेक्षा शारीरिक गुणाने श्रेष्ठ ठरतात. सर्व दक्षिण देशांत यांचें महत्त्व अधिक आहे. पारिया हे वायव्य दिशेने आर्यांच्या पूर्वी दक्षिण हिंदुस्थानांत येऊन तेथील राज्यकर्ते झाले असावेत असें ह्या मॅन्युअलमध्यें म्हटलें आहे. ऑलकॉट यांच्या चोपडींत पान २९ वर 'हालस्य महात्म्यं' नावाच्या ग्रंथांत ६१व्या भागामध्ये८००० द्रविडियनांना ज्ञानपूर्ण ह्या नांवाच्या एका संन्याशाने शैव धर्मांत कसें घतलें ह्याचा उल्लेख केला आहे. ह्यांपैकी जे शैव धर्मांत येण्यास नाखूष होते त्यांचे हालहाल करून शिरश्छेद केले. तेलाच्या घाण्यांत त्यांचीं डोकीं घालून रगडलीं आणि त्यांचीं शरीरें सुळावर लोंबत टेवून कोल्ह्या-कुत्र्यांकडून फाडविलीं. ह्याचें एक दृश्य चित्र मदुरा येथील मीनाक्षी-च्या भव्य देवालयाच्या भिंतीवर कोरलेलें आहे. ऑल्कॉट साहेबांनी आपल्या चोपडीच्या शेवटच्या पानावर ह्या चित्राचा ब्लॉक दिला आहे.

ह्याप्रमाणें कर्नल ऑल्कॉट यांनी आपल्या वरील कल्पनांना अनुकूल व प्रतिकूल असलेली व आपणास सहज उपलब्ध झालेली माहिती प्राजलपणें जशीच्या तशी दिली आहे. पण ती माहिती अर्थातच अपुरी आहे. ह्याच मुद्द्यावर दुसऱ्या अनपेक्षित दिशेने मुदैवाने बळकट पुरावा सांपडत आहे, तो खाली दिला आहे:—

आंध्रदेशांतील विजयनगर येथील कॉलेजांतील दोन तरुण प्रोफेसर एम्. एस्. रामस्वामी आयंगार आणि व्ही. शेषगिरिराव यांनी मिळून बऱ्याच श्रमाने प्राचीन तामिळ वाङ्मयाचें अवगाहन करून *Studies in South Indian Jainism* ('दक्षिणेंतील जैन धर्माचें अध्ययन') ह्या नांवाचा एक विस्तृत शोधग्रंथ अलीकडे प्रसिद्ध केला आहे. आयंगार हे वैष्णव व राव हे तेलगु ब्राह्मण असून ते केवळ संशोधक असल्यामुळें पक्षपाताचा आरोप त्यांच्यावर येण्याचा संभव नाही. त्यांनी दक्षिणेंत शैव आणि वैष्णव ब्राह्मणांनी बौद्धांचा आणि विशेषत: जैनांचा किती अनन्वित छळ केला हें अगदी निर्भीडपणें ठिकठिकाणीं वर्णिलें आहे. मदुरेच्या कण्हपांड्य राजाला तिरुज्ञानसंबंदर या शैव संन्याशाने आणि कांचीच्या महेंद्रवर्मा नांवाच्या पल्लव राजाला तिरुना बुक्करसर उर्फ आप्पार नांवाच्या शैव आचार्याने जैन धर्मातून शैवधर्मांत घेतल्याने जैन धर्माच्या उलट जो इ.स. ७५० सालच्या सुमारास भयंकर वणवा पेटला त्यांत ८००० दिगंबर जैन साधूंना सुळावर चढवून ठार करण्यांत आलें, ही गोष्ट दंतकथा नसून ऐतिहासिक आहे अशी येथे पुष्टि देण्यांत आली आहे. कर्नल ऑल्काटच्या 'हालस्य महात्म्यां'तील वरील उताऱ्याला याप्रमाणें दुजोरा मिळत आहे. वरील दोन प्रोफेसरांनी पारियांच्या बाबींत कांहीच उल्लेख केला नाही हें खरें आहे. या बाबतींत संशोधकांनी आणखी पुष्कळ श्रम केल्यास अधिक पुरावा मिळण्याची निराशा बाळगण्याचें कारण नाही.

इ. स. १९०८ सालीं मी जेव्हा मद्रास येथे डिप्रेस्ड क्लासेस मिशनची एक शाखा स्थापण्यासाठी गेलों तेव्हा तेथील प्रेसिडेन्सी कॉलेजांतील तेव्हाचे भौतिकशास्त्राचे प्रोफेसर लक्ष्मीनरसु यांची गांठ घेतली. त्यांनी त्या पारिया लोकांत बौद्ध धर्माचा प्रसार करण्याची त्यावेळीं चळवळ चालविली होती. हे थिऑसॉफिस्ट नाहीत. पूर्वाश्रमीचे हिंदु नायडू असून ते आता सहकुटुंब बौद्ध झाले आहेत. त्यांनी आता पारियांचा एक बौद्ध संघ स्थापिला असून स्वत: त्या संघाचे ते अध्यक्ष आहेत. तामिळ आणि मल्याळ देशात विशेषत: पश्चिम व पूर्व किनाऱ्यावरील 'अस्पृश्य' वर्गाची स्थिति मी स्वत: बारकाईने जसजशी अधिक निरखून पाहूं लागलों तसतसें ऑल्काटच्या म्हणण्याप्रमाणें हे लोक फार पूर्वी ह्या

प्रांतांतील राज्यकर्ते असावेत व मध्ययुगांत त्यांचा धर्म बौद्ध अगर जैन असावा असे अंधुक पुरावे दिसूं लागले. मलबारांत मलयगिरीवर पुलया (पुल्कस) नांवाच्या अस्पृश्य वर्गीयांचे कांही जुने किल्ले आढळले. त्यांच्या देवांना 'चाटन' म्हणजे 'शास्ता' ह्या बौद्ध नांवाचा प्रचार कांही ठिकाणीं आढळला. 'चाटन' हा शब्द शास्ता ह्या संस्कृत शब्दाचें अपभ्रष्ट रूप आहे. शास्ता=चाट; 'न' असा आदेश द्राविड भाषेंत प्रत्येक नांवापुढे येतो. उदाहरणार्थ, राम=रामन्. शास्ता हें एक बुद्धाचें नांव अमरकोषांत आढळतें. असो. 'चिरुमा' आणि विशेषतः 'यझवा' अथवा 'तिय्या' या अस्पृश्य जाती पूर्वीपार संस्कृतचें उत्तम अध्ययन करीत असलेल्या आढळल्या. तिय्या जातीमध्यें नारायणस्वामी नांवाच्या एका संन्याशाने आत्मोद्धाराची नवीन धार्मिक चळवळ मोठ्या जोरांत चालविलेली पाहिली. या आत्मोद्धाराच्या चळवळीचें मुख्य लक्षण म्हणजे हजारों रुपयांचे फंड जमवून ह्या तिय्या जातीच्या लोकांसाठी ठिकठिकाणीं सुंदर व प्रशस्त देवळें बांधणें व त्यांतून संस्कृत उत्तम शिकलेले त्याच जातीचे तरुण देवपूजक तयार करणें व त्यांच्या वृत्तीची योजना करणें, हें होय. ह्या तपस्वी स्वामींची मी पुनःपुन्हा भेट घेऊन त्यांच्या चळवळीचें आध्यात्मिक स्वरूपही निरखून पाहिलें. या अस्पृश्य जातीमध्यें शेंकडो सुशिक्षित इंग्रजी पदवीधर सरकारी नोकरींत हायकोर्ट जजाच्या पायरीपर्यंत चढलेले, व्यापारांत मोठमोठ्या पेढ्या स्थापन केलेले, वकील, डॉक्टर इत्यादि नवीन धंदे यशस्वी रीतीने चालविलेले, नव्या कौन्सिलचे सभासद आणि लोकधुरीण असे झालेले असून त्यांची संख्या उत्तरोत्तर वाढतच आहे. तथापि त्यांनाही हिंदु देवळाच्या वाटेवर चालण्याची मुभा नाही. हा विपरीत प्रकार पाहून ऑल्कॉटच्या वरील म्हणण्याचा पुरावा मिळविण्याची निराशा मला तरी वाटत नाही.

ढोबळ मानाने तूर्त इतकेंच म्हणतां येईल की ब्राह्मणी संस्कृतीची वर्णव्यवस्था बौद्ध आणि जैन धर्मांची अमदानी जोरांत होती तेव्हा शिथिल झाली असली तरी नष्ट झाली नव्हती. ह्या क्रांतीच्या काळीं ब्राह्मणी संस्कृतीच्या हिंदूंनी जेथे जेथे आपल्या वसाहती केल्या तेथे तेथे त्यांच्या ग्रामसंस्थेमुळें मूळच्या तद्देशीयांचें अधिराज्यच नव्हे तर वैयक्तिक मालकी हक्कही नष्ट होऊन, ते केवळ बलुतेदार बनून ग्रामबाह्य व अस्पृश्य ठरले.

महाराष्ट्रांत चलुतेदारी तरी त्यांना मिळाली पण दक्षिण देशांत तामिळ, मलबारकडे ते केवळ गुलामगिरींत गडप झाले. अशा वसाहती पुष्कळशा बौद्ध धर्माच्या अमदानींतच आणि कांही तत्पूर्वीही झाल्या असाव्यात. शेवटीं जेव्हा दक्षिणेकडील व पूर्वेकडील प्रांतांत ह्या पाखांडी म्हणून समजले जाणाऱ्या धर्मांचा उच्छेद झाला तेव्हा त्यांतील वरच्या दर्जाच्या लोकांचा, गरजेपुरता आणि परिस्थितीप्रमाणें, नवीन हिंदुधर्मांत समावेश होऊं शकला. परंतु खालच्या तेजोहीन, मांसाहारी, हीनकर्मी व केवळ अकुशल श्रमजीवी बहुजनसमाजाची भर ठोकळ मानाने 'अस्पृश्य' आणि ग्रामबाह्य वर्गांत होणें अगदी साहजिक आहे. मागे पान ४३ वर "पाषंडचंडालानाम् स्मशानाते वासः।" असा जो कौटिलीय अर्थशास्त्राचा उतारा दिला आहे त्यांतील पाषंड याचा अर्थ मगध देशांत जरी बौद्ध जैन असा होणें कठीण असलें, तरी खाली दक्षिण देशांत बौद्ध–जैनांच्या नायनाटानंतर पाषंड म्हणजे बौद्ध–जैनच असा होणें साहजिक आहे. मनुस्मृतीने ब्राह्मणप्रधान वर्णव्यवस्थेचा करडा अम्मल चालविल्यावर तेजोहीन खालच्या वर्गाची, विशेषतः पाषंडी मतांची, अशीच अवनति होणें सहज आहे. मनुस्मृतींत स्पष्ट खालील आज्ञा राज्यकर्त्यांना फर्माविल्या आहेत.

यो लोभाद्धर्मो जात्या जीवेदुत्कृष्टकर्मभिः।
तं राजा निर्धनं कृत्वा क्षिप्रमेव प्रवासयेत्॥

मनुस्मृति, १०. ९६

अर्थः—अधम जातीचा जो कोणी उत्कर्षाच्या लोभाने वरिष्ठ जातीची वृत्ति चालवील त्याचें राजाने सर्वस्व हरण करून ताबडतोब त्याला देशोधडीला लावावें. कारण

शक्तेनापि हि शूद्रेण न कार्यो धनसंचयः।
शूद्रो हि धनमासाद्य ब्राह्मणानेव बाधते॥

मनुस्मृति. १०. १२९

अर्थः—शूद्राला धनसंचय करण्याला परवानगी असूं नये. तो ब्राह्मणास बाधक होईल.

ह्याच भीतीने ह्या निराधार पाखंड्यांना महाराष्ट्रांतल्याप्रमाणें चलुतेदारही न बनवितां केवळ पिढीजाद पशुतुल्य गुलामगिरीची सनद दक्षिण देशांत विशेषतः मलबारांत दिलेली आज आढळते. हे प्राणी

एके काळीं स्वत:च्याच असलेल्या शेतांत नंबुद्री ब्राह्मण आणि त्यांचे हस्तक नायर क्षत्रिय ह्यांच्या तैनातींत बंदे गुलाम बनले आहेत. हे मनुस्मृतीचें जुलमी राजकारण !

वरील एकंदर विवेचनावरून द्राविड आणि मलबार देशांतील हल्लीच्या प्रचंड संख्येच्या अस्पृश्यांच्या विकासांचे तीन टप्पे होतात असें मला वाटतें. (१) पान ३९–४० वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें द्राविड देशांत अस्पृश्यतेची संस्था आर्यांच्या आगमनापूर्वीही असावी. पण ही कशी व किती उग्र स्वरूपाची होती ह्याचा पुरावा आता उपलब्ध नाही. (२) उत्तरेकडे बौद्ध जैनाचा विजय होऊन आर्यांच्या वर्णव्यवस्थेला जो अडथळा झाला त्या वेळीं, किंबहुना कदाचित् त्यापूर्वीही, आर्यांच्या दक्षिणेकडे ज्या थोड्या नंबुद्री ब्राह्मणांच्यासारख्या वसाहती झाल्या त्यांच्या ग्रामसंस्थेमुळें अस्पृश्यतेचा दुसरा मजला तयार झाला. (३) नुकतेंच वर वर्णिल्याप्रमाणें हट्टी पाखांड्यांची मोठ्या प्रमाणांत अस्पृश्यांत गणना करून हल्लीचा प्रचंड तिसरा मजला तयार झाला.

ह्या शेवटच्या टप्प्यासंबंधीं दक्षिण हिंदुस्थानांत जरी भरपूर पुरावा अद्यापि गोळा करण्यांत आला नाही तरी तो उत्तर आणि पूर्व हिंदुस्थानांतील संशोधकांना सुदैवाने निश्चित उपलब्ध झाला आहे. तो कसा तें पुढील परिच्छेदांत पाहूं.

वर वर पाहतां अखिल भरतखंडांत हिंदूंची वर्णव्यवस्था रूढ झालेली जरी दिसत आहे तरी तिचा तपशील आणि जोर निरनिराळ्या प्रांतात अगदी निराळा आहे. ह्या भिन्नतेचें कारण ब्राह्मणी आणि बौद्ध संस्कृतीची भिन्नभिन्न काळीं भिन्नभिन्न कारणांनी झालेली झटापट हें होय. पंजाब आणि वायव्येकडील प्रांतांत जी व्यवस्था आहे, ती बिहार, बंगाल ओरिसाकडे आढळत नाही आणि खाली द्राविड देशांत अगदीच निराळी आहे. बिहार, बंगाल देशांत बौद्ध धर्माचा उदय आणि अंमल जारी असल्याने आणि हिंदुस्थानांत याच भागांत बौद्ध धर्म उदय पावून तो येथेच सर्वांत अधिक काळ टिकल्याने येथील जातिभेदाची रचना इतर प्रांताहून अगदी निराळी दिसते. येथे ब्राह्मण आणि क्षत्रिय या दोन उच्च वर्णांची जी तुरळक वस्ती आहे ती बाहेरूनच आलेली आहे. वैद्य, कायस्थ हा जो मोठा मध्यम वर्ग आहे तो क्षत्रिय आणि

वैश्य यांचें मिश्रण आहे. आणि बाकी उरलेला जो मोठा बहुजनसमाज तो निर्भेळ आर्येतर आणि एकेकाळीं पूर्ण बुद्धानुयायी होता. बाराव्या शतकांत मुसलमानांची अकस्मात् धाड येऊन जी राज्यक्रांति झाली तिचा धक्का जीर्ण झालेल्या बौद्धधर्माला लागून, तो नष्ट झाला. मुसलमानी हल्ल्याची ही लाट ओसरून गेल्यावर बौद्धांच्या ठिकाणीं ब्राह्मणांनी तत्कालीन क्षत्रिय राजांच्या साह्याने समाजाची हल्ली रूढ असलेली पुनर्घटना केली. ह्या घडामोडींत बल्लाळसेन हा राजा प्रमुख होता. त्याने नवीनच स्मृति बनवून केवळ ब्राह्मणांच्या दृष्टीने आचरणीय, अनाचरणीय, अस्पृश्य आणि ग्रामबाह्य वगैरे जनसमूहाचे नवीन वर्ग बनाविले. अर्थात् ह्या उलाढालींत नवीनच एका मोठ्या अस्पृश्य वर्गाची समाजांत भर पडली. ही गोष्ट आधुनिक संशोधनामुळें कशी सिद्ध होत आहे तें पाहूं.

संशोधनाचे कामीं बंगाली पंडितांनी अलीकडे बरीच आघाडी मारली आहे. हिंदुस्थानांतून बौद्ध धर्म अजीबाद नष्ट झाला आहे अशी अझून पुष्कळांची समजूत आहे. पण खरा प्रकार तसा नसून बंगाल्यांतील कांही भागांतून आणि विशेषतः ओरिसांतील कांही कानाकोपऱ्यांत हा धर्म कांही अप्रसिद्ध आणि मागासलेल्या जातींत अद्यापि प्रचलित आहे; व त्याची गणना चुकून हिंदुधर्मांतच होते, असा शोध प्रसिद्ध संशोधक महामहोपाध्याय हरप्रसाद शास्त्री ह्यांनी केला आहे. ओरिसांत मयूरभंज म्हणून एक लहानसें संस्थान आहे. तेथील महाराजांच्या साह्याने बाबू नगेंद्रनाथ वसू, बंगाली विश्वकोशाचे संपादक, ह्यांनी १९०८ सालीं त्या संस्थानच्या जंगलांत प्रवास केला, तेव्हा त्यांना जे शोध लागले ते त्यांनी इ. स. १९११ सालीं *Modern Buddhism and its followers in Orissa* ('आधुनिक बौद्धधर्म आणि त्याचे ओरिसांतील अनुयायी') ह्या नांवाच्या पुस्तकाच्या रूपाने प्रसिद्ध केले आहेत. त्या पुस्तकाला सदर हरप्रसाद शास्त्री यांनी आपली विस्तृत आणि अधिकारयुक्त प्रस्तावना जोडिली आहे. पान २४ वर शास्त्री महाशय लिहितात: "इ. स.च्या १२वे शतकाचे शेवटीं मुसलमानांची टोळधाड हिंदुस्थानावर पडली. त्यांनी प्रमुख बौद्ध मठांचा आणि विश्वविद्यालयांचा नाश करून त्या ठिकाणीं आपल्या लष्कराचें ठाणें केलें. हजारों साधूंचा शिरश्छेद करून त्यांची संपत्ति लुटली, पुस्तकालयें जाळलीं,...ब्राह्मणांनी ह्या संघर्षाचा

फायदा घेऊन बौद्धधर्म हिंदुस्थानांतून समूळ नाहीसा झाला असें भास-विण्यास सुरवात केली. सुशिक्षित आणि बुद्धिवान बौद्ध मारले गेले, अथवा दूरदेशीं पळून गेले. मागे त्यांचा प्रांत ब्राह्मणांच्या कारवाईला मोकळा झाला. पुष्कळ बौद्धांना जबरीने किंवा फुसलाऊन मुसलमानी धर्मांत कोंबण्यांत आलें. अशिक्षित बौद्ध बहुजनसमाज कोकरांच्या कळपाप्रमाणें निराश्रित झाला. त्याला मुसलमानी किंवा हिंदु धर्माचा नाइलाजाने आश्रय घ्यावा लागला. अशा निराश्रितांपैकी जे पूर्णपणें आपल्या कह्यांत येण्यास कबूल होते, त्यांनाच दुराग्रही ब्राह्मणांनी हिंदु धर्मांत घेतलें. अशांना नवशाखा शूद्र अशी बंगाली समाजांत संज्ञा आहे. ह्याशिवाय इतर जो बौद्धांचा मोठा भाग स्वतंत्रपणें राहूं लागला, तो बहिष्कृत होऊन अनाचरणीय उर्फ अस्पृश्य ठरला."

ह्या अनाचरणीय जाती हल्ली जरी अस्पृश्य हिंदु समजण्यांत येत आहेत तरी त्या पूर्वी चांगल्या सन्माननीय बौद्ध होत्या. त्यांपैकी हल्ली सर्वच अस्पृश्य नाहीत. नुसत्या अनाचरणीय म्हणजे ज्यांचें पाणी ब्राह्मणांस चालत नाहीत अशा होत. वणिक् सोनाराची जात अतिशय श्रीमंत व वजनदार असूनही ती अशीच अनाचरणीय आहे. त्यांची गणना नवशाखा शूद्रांपेक्षाही अधिक खालची गणली जात आहे. ते पूर्वी चांगले बौद्ध होते. पण त्यांच्यावर ह्या धांदलीच्या काळांत बल्लाळसेन ह्या हिंदु राजाचा कांही झनानी कारस्थानामुळें राग होऊन ते असे खाली दडपले गेले. मग इतर सामान्य पण स्वातंत्र्येच्छु जाती अगदी हीन व अस्पृश्य बनल्या ह्यांत काय नवल! मुसलमानांची पाहिली धडाडी संपून त्यांचा जम बसल्यावर आणि बौद्धधर्म दडपून गेल्यावर बंगाल्यांत हिंदु धर्माची नवी घडी पुनः बसूं लागली. ह्यासंबंधीं ह्या शास्त्रीपंडितांचें असें मत आहे की लोकांना आपल्या पूर्वापार खऱ्या संबंधाचा विसर पडला. आणि ब्राह्मण सांगतील त्याप्रमाणें हल्लीचे जातिभेद संकरजन्य अगर बहिष्कारजन्य आहेत असा समज दृढ झाला. ह्या नवीन रचनेच्या शिरोभागीं ब्राह्मण विराजमान झाले. इतकेंच नव्हे तर उलटपक्षीं कित्येक कुशल कारागीर जाती आणि संपन्न व्यापारी वर्ग देखील जे पूर्वी सन्मान्य बौद्ध होते ते या मनूंत हीनत्वाप्रत पोचले. ज्यांच्या पूर्वजांनी कांही शतकांपूर्वी बुद्धधर्माचीं तत्त्वें तिबेट आणि चीन देशांत पसरलीं, ज्यांनी जल-

प्रवास करून हिंदुस्थानचा उद्योग आणि व्यापार वाढविला अशी 'मनसार भाषान्' इत्यादि आद्य बंगाली ग्रंथांतून भडक वर्णनें आहेत, तेच आज केवळ ब्राह्मणांच्या कटाक्षामुळें अनाचरणीय व तिरस्करणीय बनले आहेत ! (*Modern Buddhism* प्रस्तावना पान २३ पहा.)

पण अशा विपन्नावस्थेमध्येंही बौद्ध धर्म अगदीच नष्ट झाला नसून तो गुप्तरूपाने हीनदीन समाजाच्या वहिवाटींत अद्यापि असला पाहिजे अशी बळकट शंका आल्यावरून तो शोधून काढण्याचें काम गेल्या शतकाचे शेवटीं व चालू शतकाचे आरंभीं धाडसी आणि सहानुभूतिसंपन्न शोधकांनी चालविलें होतें. अशांपैकी एक संशोधक बाबू नगेंद्रनाथ वसु हे ओरिसा प्रांतांतील मयूरभंज संस्थानचे मालक महाराज श्री रामचंद्र-भंज देव ह्यांच्याबरोबर त्या संस्थानांतील जंगलांत फिरत होते. ते खिचिंग नांवाच्या खेड्याजवळ पोहोचले असतां त्यांना 'पान' नांवाच्या अस्पृश्य जातीच्या कांही तरुण पोरांनी मनोहर गाणीं गाऊन दाखविलीं. 'धर्मगीना' नांवाच्या जुन्या ग्रंथाशीं त्याचा संदर्भ जुळल्याने नगेंद्र बाबूंना साश्चर्य आनंद झाला. त्यानंतर त्यांना कांही वृद्ध माणसें भेटलीं. त्यानी जुन्या बुद्धानुयायी पाल राजांचीं गाणीं गाऊन दाखविलीं. अशा रीतीने ह्या ओसाड जंगलांत विस्मृतिगर्तीत दडपून गेलेल्या बौद्ध धर्माचा आकस्मिक सुगावा लागल्यामुळें या बाबूंनी आपला शोध पुढे नेटाने चालविला. बडसाई आणि खिचिंग गांवांजवळ त्यांना ओरिया भाषेतील कांही हस्तलिखित पोथ्या, एक जुना बौद्ध स्तूप, धर्मराज आणि शीतला ह्या महायान बौद्ध पंथाच्या मूर्ति व इतर खाणाखुणांचा शोध लागला. पण सर्वांत आश्चर्याची गोष्ट ही की ह्या सर्व गत वस्तु आजवर भक्तीने संभाळून ठेवल्याचें सर्व श्रेय नगेंद्रबाबू बाथुरी अथवा बाउरी या हीन व अस्पृश्य मानिलेल्या जातीलाच देत आहेत !

सोळाव्या शतकांतील ओरिसाचा राजा प्रतापरुद्र ह्याच्या कारकीर्दीत बलरामदास नांवाचा कवि होऊन गेला. हा प्रतापरुद्राच्या छळाला भिऊन आपला बुद्ध धर्म छपवून ठेऊन हिंदुधर्मांत मिळून मिसळून रहात होता. त्याने आपल्या 'गणेश विभूति' नांवाच्या ओरिया भाषेतील काव्यावर आपणच 'सिद्धांताडंबर' नांवाची टीका केली आहे. त्यांत त्याने बाथुरी जातीची पूर्वपीठिका अशी सांगितली आहे.

खालील उताऱ्यावरून आपल्यास जातां जातां ओरिया भाषेशीं मराठीचें किती साम्य आहे हेंही दिसेल.

निराकार दक्षिणरु विप्र होए जात ॥
उत्तर अङ्गरु जान गोपाल सम्भूत ॥ १७ ॥
वदन अंतरे विश्वामित्र मुनि कहि ॥
ताहांकु अङ्गरे दाउरि जात होइ ॥ १८ ॥
तार तहु तेर सुत हइल जनम ॥
ताहार पत्नीर नाम पद्मालया जान ॥ २५ ॥
कनिष्ट पत्नीरे चित्र उर्वशी तार नाम ॥
गंधकेशी बलीण तार दुतिय भार्य्या जान ॥ २६ ॥
वायुरेखा वलिण से चतुर्थक काहि ॥
वार सुत जन्म हेले चारि पत्नी तेहि ॥ २७ ॥

भावार्थः—निराकाराच्या (शून्य ब्रह्माच्या) उजव्या कुशींतून विप्र जन्मले, डावींतून गोपाल. तोंडांतून विश्वामित्र, त्याच्यापासून बाउरी जात उद्भवली. पद्मालया, उर्वशी, गंधकेशी आणि वायुलेखा अशा चार पत्नींपासून विश्वामित्राला १२ पुत्र झाले.

भाष्यः—एवे वाउरि वार पुत्र नामक हिवा। पद्मालयापुत्र दुलि वाउरि अटन्ति ब्राह्मणसङ्गे वेद पढु यान्ति। ब्राह्मण ज्येष्ठ वाउरि कनिष्ठ। ए पढुथिले राजा प्रतापरुद्रङ्क ठारु गोप्य करि राखि अच्छान्ति। ..... पद्मालयापुत्र वायेकांडी परमानन्द भोइ राधी शासमल।

Modern Buddhism, पान १५–१६

ऋग्वेदाच्या ऐतरेय ब्राह्मणांत विश्वामित्राचे पुत्र शंबर असें म्हटलें आहे. त्याच्याशीं वरील माहितीचा संदर्भ नगेंद्र बाबूंनी जुळविला आहे. पण ह्याशिवाय या बलरामदासाच्या मताला दुसऱ्या कुठल्याही हिंदु अथवा बौद्ध पुराणांचा आधार नाही असें नगेंद्र बाबू कबूल करितात.

पुढे आणखी 'गणेश विभूतीं'त म्हटलें आहे की :—

पद्मालया तिन पुत्र जेष्ठ से प्रमाण।
विष्णुङ्क सङ्गते से च्हुयुन्ति सम्भाषणं ॥
सङ्खासुर मारि प्रभु सङ्ख ताङ्कु दिले।
पञ्चजन सङ्ख तुम्म सम्माल वोइले ॥

न.भा.६...८

आउ नव भाइ अश वकुइ न जुगाइ।
विचारि जानिलेटी संशय केला सेहि॥ १२॥ (पान १७)

अर्थः—पद्मालयाच्या पांच पुत्रांना विष्णूने आपला शंख दिला पण इतर तीन बायकांच्या मुलांना मात्र विष्णूने आपणास स्पर्शही करूं दिला नाही.

ह्या वाक्यांतील सङ्घ ह्या शब्दाचा अर्थ नगेंद्रबाबू बौद्ध संघ असा करतात व शून्य पुराणांत सङ्घ हें पद संघ ह्या अर्थाने योजिलेलें आढळतें, असा दाखला देतात. अशिक्षितांमध्यें संघाचा अपभ्रंश संख होणें सहाजिक आहे. वरील वाक्याचा लाक्षणिक अर्थ असा होईल की बाउरी जातीच्या प्रमुख ग्रामणीने आपल्या शत्रूंचा संहार करून संघाचें आधिपत्य मिळविलें. म्हणजे बाउरी जातीचाच बौद्ध धर्मांत शिरकाव होऊन ते मान्यतेला पावले. बाकीच्या शबर जाती बौद्ध धर्माचा स्वीकार न करितां तशाच जंगली स्थितींत राहिल्या. (*Modern Buddhism*, पान २०)

'गणेशविभूतीं'त गणेशाला पुढे बाउरी जातीसंबंधीं हेंही गुह्य सांगण्यांत आलें आहेः—

कलियुगे न छुइव। वाउरि छुइले सकल पातक क्षय हव।
वोलि विष्णुमाया करि गोप्य कोरि रखि अच्छन्ति।
शुन हे गणेश वड गहनए गुप्त करि थुइथु।
एथि सकाशरु वाउरिगार काटिले ब्राह्मण निभाइ पारन्ति नहि।
मूर्ख्या पातक क्षय हव वोलि शाप्यकु मानियान्ति॥ (अध्याय १२)

अर्थः—कलियुगांत बाउरींना शिवूं नये; शिवल्यास सकळ पापांचा क्षय होतो, म्हणून जो तो त्यांना शिवेल यासाठी त्यांना अस्पृश्य ठेवण्यांत विष्णूची माया आहे.

वर सिद्धांताडंबरामध्यें सांगितल्याप्रमाणें हल्लीच्या बाथुरी उर्फ बाउरी ह्या अस्पृश्य जातीचा ब्राम्हणांशीं कांही संबंध आहे काय ह्या प्रश्नाला नगेंद्रबाबू खालील उत्तर देत आहेत—"मयूरभंज संस्थानांत शोधांतीं आम्हांला जी अनेक प्रकारची सामग्री मिळाली आहे तीवरून हल्लीची बाथुरी ही जात खरोखरी आर्यवंशीय असावी असें आम्हांस वाटतें. ह्या प्रांतांत ही सामग्री भरपूर आहे. मयूरभंज संस्थानांतील

सिंहलीपाल दुर्गावरील सुंदर इमारतीचे अवशेष, प्राचीन 'आठरा देऊळ' नांवाचें दगडी मंदिर, जोशीपूर किंवा दासपूर नांवाचा चिरेबंदी किल्ला वगैरे पुराव्यांवरून बाथुरी हे आर्य आहेत, इतकेंच नव्हे तर ह्या प्रांतीं हे लोक पूर्वी पराक्रमी राजकर्ते, मंत्री व सेनानी होते, अशी जी थोड्याच दिवसांमागे समजूत होती ती साधार आहे, असें दिसतें. अद्यापि हे लोक ब्राह्मणांप्रमाणें जानवीं घालतात, दहा दिवसांचें सुतक पाळतात, श्राद्ध करितात, आणि ह्यांच्या श्राद्धांचें जेवण ब्राह्मण आणि वैश्यही जेवतात. ह्या जातीच्या प्रमुखाला आजही महापात्र हा किताब आहे. खरा बाउरी ब्राह्मणाच्याही हातचें खात नाही; त्याच्या जातीमध्यें त्याला फारच मान आहे. ह्याच्या पूर्वजांनीच हल्लीच्या भंजराजाला राज्यस्थापनेमध्यें मदत केली. पूर्वी ह्या राजाचे २२ सामंत होते. त्यांत सिंहलीपाल, आदिपूर, दासपूर आणि करुंजा येथील अनुक्रमें चार जमीनदार बाउरी जातीचे होते. ह्यांना भंजांकडून रुप्याच्या छत्रचामराचा मान होता. पण आता ह्या सर्व गत गोष्टी झाल्या. हे सर्व कर्जबाजारी होऊन खायाची भ्रांत, अशी कठीण स्थिति झाली आहे. भोंवतालच्या कोळी, सांताळ लोकांत मिसळून त्यांच्याच चालीरीती आचरूं लागले आहेत." (*Modern Buddhism* पान ३२).

जी अवस्था बाउरींची पश्चिम बंगाल व ओरिसामध्यें तीच पोडांची (पौंड्र?) मध्य बंगाल्यांत आणि नामशूद्रांची (चांडाल) पूर्वबंगाल्यांत आहे. इ. स. १९०१च्या खानेसुमारींत ह्या दोन जातींसंबंधाने पुढील उल्लेख आहेः— "नामशूद्र १८,६१,००० आणि पोड ५,००,००० आहेत. पण ह्यांच्यापैकी फार मोठी संख्या मुसलमान झाल्याने ह्यांचा खरा विस्तार दृष्टीआड झाला आहे. पूर्व बंगाल्यांत १,०५,००,००० मुसलमान आहेत. पैकी निदान ९,००,००० ह्याच जातींतून गेले असावेत. दंतकथेवरून ह्यांचा संबंध प्राचीन पौंड्रवर्धन राजाशीं पोहोचतो. ह्याची राजधानी खारातोय नदीवर होती. ह्यांनी आपल्या पूर्वीच्या बौद्धधर्माची अद्यापि आठवण राखिली आहे. धर्मराज व धर्मठाकूर ह्या रूपाने ते अद्यापि बुद्धाचीच पूजा करितात. ह्यांचा वंश बहुशः मोंगली (मांगोलियन) आहे. हे प्रथम ब्रह्मपुत्रानदीच्या दरींतून ईशान्येकडून उत्तर बंगाल्यांत शिरले असावेत. तेथेच त्यांचें राज्य असावें. तेथून मग कोच, राजवंशी, इत्यादि लोकांनी त्यांना

हुसकून लाविल्यामुळें ते खाली समुद्रकिनाऱ्यापर्यंत आले असावेत. गेल्या १० वर्षांत नामशूद्र शेंकडा १० व पोड शेंकडा ११ ह्या प्रमाणांत वाढले आहेत."

सन १९२३ आणि सन १९२८ ह्या दोन सालीं मी ब्राह्मसमाजाच्या प्रचारकार्यासाठी पूर्व बंगाल्यांतील जेसोर जिल्ह्यांत फिरतीवर होतों. दोन्ही वेळां सुमारें माहिनाभर ह्या नामशूद्रांच्या खेड्यांत त्यांच्याशीं अगदी मिळून मिसळून राहिलों. ह्या लोकात आमच्या 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन'च्या शाळा व हायस्कुलें त्यांनी स्वतः चालविलेल्या बऱ्या चालल्या आहेत. ह्यांच्या धार्मिक उपासना व समाजिक चालीरीती, ह्यांचीं नांवें व गृह्यसंस्कार वगैरेचें बारीक निरीक्षण केल्यावरून, ही मोठी जात पूर्वी बौद्धधर्मानुयायी असून ह्यांनी राजवैभव एके काळीं चांगलें भोगिलें असावें अशी माझी खात्री झाली. हे हल्ली शेतीचा धंदा यशस्वी रीतीने करितात. विशेषतः ताडीच्या झाडांपासून गूळ करण्याचे कारखाने घरोघरीं दिसले.

असो. एथवर या उत्तरयुगांतील टप्प्याचीं लक्षणें सांगितलीं. ह्या युगांत अस्पृश्य समाजांत जी भली मोठी भर पडली ती प्राचीन युगांतल्या वर्णव्यवस्थेमुळें किंवा मध्ययुगांतल्या ग्रामसंस्थेमुळें नसून भलत्याच अवांतर कारणांनी म्हणजे हिंदूंच्या दुष्ट राजनीतीमुळें व आत्मघातकी कोतेपणामुळें किंवा वृत्तिमात्सर्यामुळें पडली आहे. दक्षिण हिंदुस्थानांत बुद्धधर्माचा नायनाट इ.स. ८००–९०० या शतकांत झाला तसा तो उत्तर हिंदुस्थानांत १२००–१५००च्या दरम्यान झाला. दक्षिणेंत हा अत्याचार शैव आणि वैष्णव पंथांनी केला पण उत्तरेस त्या विध्वंसाचें अपश्रेय जें एकट्या मुसलमानांच्याच कपाळावर कांही बंगाली पंडित व संशोधक चिकटवूं पाहतात, त्याची मात्र खात्री पटत नाही. मुसलमानांचें आगमन केवळ निमित्तमात्र होतें. दक्षिणेकडे हें निमित्तही कोठे दिसत नाही. त्याअर्थी उत्तरेकडेही ह्या निमित्तावर फारसा भर इतिहाससंशोधकांनी टेवून चालावयाचें नाही. मुसलमानांनी फार तर पुष्कळशा बौद्धांची कत्तल केली असेल व पुष्कळांना जबरीने बाटविलें असेल. पण बाकी उरलेल्यांना अस्पृश्य करा आणि गांवाबाहेर ठेवा असा कांही हिंदु वरिष्ठ वर्गांना त्यांचा आग्रह असणें शक्य नाही. ह्या बाबतींत महामहोपाध्याय हरप्रसाद शास्त्री

यांचे स्पष्टोद्गार फारच मार्मिक आणि निर्भीड आहेत. ते ह्मणतात कीं मुसलमान आले तेव्हा पूर्व आणि उत्तर हिंदुस्थानांतील समाजाचा बौद्ध धर्मीय जातीच वरिष्ठ आणि वजनदार असा वरचा भाग हाच म्हणून त्याच मुसलमानांच्या डोळ्यावर आल्या. त्यांची अशी वाताहत झाल्याबरोबर दुराग्रही ब्राह्मणांनी तत्कालीन शिल्लक उरलेल्या हिंदू राजवटींतून आपलें वर्चस्व वाढविण्याकरितां मुसलमानांच्या छळांतून जिवंत उरलेल्या बौद्ध बहुजनसमाजाला बहिष्कृत करून कायमचें दडपून टाकिलें. सन १९२१ आक्टोबरच्या *Dacca Review* ('डाक्का रिव्हयू') नांवाच्या मासिकाच्या अंकांत हरप्रसाद शास्त्री पुनः लिहितात की, "ज्यांना हल्ली डिप्रेस्ड क्लासेस असें लेखण्यात येतें, त्या जाती एकेकाळीं बंगाल्यात राज्य करीत असलेल्या—नव्हे साम्राज्य भोगीत असलेल्या—बौद्ध जातींचेच अवशेष आहेत ...नेपाळांतल्या दाखल्यावरून असें दिसतें की बंगाल्यांतील आजचे तिरस्कृत वर्ग कांही शतकांपूर्वी बौद्धधर्मी असून तेव्हा ते हिंदुधर्मीयांशीं जोराची स्पर्धा करीत असावेत. मुसलमानी स्वारीचा धक्का ह्यांनाच अधिक जाणवला ह्याचें कारण बौद्ध हे राज्यकर्ते होते आणि ब्राह्मण वाचले ह्याचें कारण त्यांना त्या वेळीं कसल्याही प्रकारचें महत्व नव्हतें." शास्त्री महाशय स्वतः ब्राह्मण असूनही ते जोराजोराने आज गेलीं ३० वर्षें हा आपला सिद्धांत प्रतिपादन करीत आहेत. नेपाळांतील त्यांचा दाखला विशेष रीतीने लागू पडतो, तो असा की, "तेथील बौद्धधर्मीयांचें राज्य गुरखे नांवाच्या हिंदु क्षत्रियांनी बळकाविल्याबर तेथील ब्राह्मण आणि क्षत्रिय वृत्तीचे लोक तेवढे सारे हिंदू बनून बाकी उरलेल्या व्यापारी, कारागीर आणि श्रमोपजीवी जाती एक जात जशाच्या तशाच बौद्धधर्मीय उरल्या आहेत. त्याचप्रमाणें बंगाल्यांत नेपाळच्याही वर मजल गेली आहे. म्हणजे वरिष्ठ वर्ग मुसलमान अथवा हिंदू बनून उरलेल्या वैश्य, शूद्र जाती अनाचरणीय, बहिष्कृत आणि तिरस्करणीय झाल्या आहेत. ते खरोखरीच हीन नसून केवळ ब्राह्मणांच्या दृष्टीने अंत्यज आहेत." शास्त्री महाशयांचा हा सिद्धांत खरा असून ध्यानांत घेण्याजोगा आहे. बंगाल्यांत जो अत्याचार ब्राह्मणांना मुसलमानांच्या वावटळींत करतां आला तो अत्याचार द्राविड देशांत जैन राजांना बाटवून तेथील शैवाचार्यांनीं केला, ह्या कर्नल ऑल्कॉट

यांच्या ह्मणण्याला विजयनगर कॉलेजमधील दोन ब्राह्मण अध्यापकांकडून अर्ध्या अधिक पुराव्याचें पाठबळ मिळत आहे. पूर्वीच्या दोन युगांतील प्रकार घडला असेल तसा असो. पण बुद्धोत्तरकालीन ह्या तिसऱ्या युगांत मात्र केवळ दडपशाहीनेच अस्पृश्यतेच्या पेवांत आजकालची भली भयंकर भर पडली हें उघड दिसतें.

आधुनिक युग डोळ्यांसमोरच आहे. आता ह्या डोळस युगांत मागील पापांचें नुसतें संशोधनच नव्हे तर निश्चित गणनाहि दर दहा वर्षांला सार्वजनिक खर्चाने चालू आहे. ह्या शिरगणतीच्या रिपोर्टांवरून ह्या भरतखंडाचा निव्वळ सहावा हिस्सा अस्पृश्य ठरला हें जगजाहीर झालें आहे. हा सहावा हिस्सा एकदम आणि पूर्वीपासून स्वयंसिद्ध नसून तो कोणत्या कोणत्या टप्प्यांनी बनत आला आहे, हें उपलब्ध प्रमाणांनी संक्षेपतः व ढोबळ मानाने निर्दिष्ट करण्याचा वर प्रयत्न करण्यांत आला आहे.

पुढील ६ व्या प्रकरणांत ब्रह्मदेशांतील अस्पृश्यांची काय स्थिति आहे तें पाहूं.

प्रकरण सहावें

ब्रह्मदेशांतील बहिष्कृत वर्ग

ब्रह्मदेशाची यात्रा करण्याचें मनांत आणून मी जेव्हा इ. स. १९२७ च्या फेब्रुवारींत कलकत्त्याहून निघालों, तेव्हा माझे मनांतील मुख्य उद्देश केवळ बौद्ध धर्माचें साधन प्रत्यक्ष पाहण्याचाच होता. हा निर्वेधपणाने साधावा म्हणून इतर माझे व्यवसाय आणि अभ्यास कांहीं काळ तरी बाजूस ठेवावेत, असें मला वाटत होतें. पण मी जेव्हा या विचित्र देशांत संचार करूं लागलों, तेव्हा प्राचीनवस्तुशास्त्र, तुलनात्मक भाषाशास्त्र, मानववंशशास्त्र इत्यादि ज्या माझ्या आवडीच्या गोष्टी त्यांनी मजवर एकदम हल्ला चालविला. ब्राह्म धर्माचा प्रचारक या नात्याने तुलनात्मक धर्मशास्त्राचें अवलोकन मला आजन्म करणें भाग आहे. आणि वरील शास्त्रें तौलनिक धर्मशास्त्राच्या अगदी हद्दीवरचीं व त्याशीं सजातीय असल्याने त्यांच्या अध्ययनापासून, विशेषतः इतक्या भिन्न परिस्थितींत आल्यावर, स्वतः अलिप्त राहणें मला फार कठीण पडलें.

ब्रह्मदेशांत हिंदुस्थानांतला जातिभेद मुळीच नाही, ही गोष्ट खरी आहे. तेवढ्यावरून येथे कोणत्याही प्रकारचा बहिष्कृत वर्ग मुळीच नाही, किंवा पूर्वी नव्हता, असा माझा समज होता. इतकेंच नव्हे, तर या देशांत पुष्कळ वर्षें राहून वरवर पाहणाराचाही असाच समज असलेला मला दिसून आला. पण खरा प्रकार असा नसून, अगदी अलीकडच्या काळापर्यंत या देशांत बहिष्कृत स्थितींत निदान एक हजार वर्षें तरी खितपत पडलेले चार पांच तरी मानववर्ग मला आढळले. श्वे यो या टोपणनांवाच्या एका इंग्रजाने लिहिलेल्या *Burman – His Life & Nation* या इंग्रजी ग्रंथांत मी जेव्हा या निरानिराळ्या बहिष्कृत दासवर्गांचें वर्णन वाचिलें तेव्हा मला फार आश्चर्य वाटलें. जातिभेद नसतांही बहिष्कृत वर्ग असूं शकतो, ही गोष्ट अमेरिकेंतील अत्यंत सुधारलेल्या संयुक्त संस्थानांतील सामान्य लोकांचें तेथील निग्रोशीं जें वर्तन घडतें व दक्षिण आफ्रिकेंतील गौरकायांचें इतर वर्णीयांशीं जें वर्तन घडतें, तें ज्यांनी पाहिलें आहे, त्यांना सहज पटण्यासारखी आहे.

गेल्या वर्षीं भारत-इतिहास-संशोधक-मंडळापुढे 'अस्पृश्यतेचें मूळ आणि तिचा हिंदुस्थानांतील विकास' या विषयावर मी माझा निबंध वाचला. तेव्हापासून या विषयाचा मी अधिकच शोध करीत आहें. ब्रह्मदेशांतील बहिष्कृत वर्गांची मला जी माहिती शोधाअंतीं मिळाली व प्रत्यक्ष निरखिली, तिच्यामुळें माझ्या स्वीकृत विषयावर अधिक प्रकाश पडणार आहे, म्हणून मी पुढील माहिती संक्षेपाने देत आहें.

ब्रह्मदेशांतील बहिष्कृत वर्गांचा उगम ब्रह्मदेशांतील गुलामगिरीच्या संस्थेंत आहे. ब्रिटिश राज्याची संस्थापना ब्रह्मदेशांत इ. स. १८८५ सालीं पूर्णपणें झाली. यापूर्वीच्या स्वराज्यांत या देशांत गुलामगिरीची संस्था होती. ती तेथे किती पुरातन होती हें ठरविण्याची निश्चित साधनें तूर्त उपलब्ध नाहीत. अनेकविध सामग्री जमवून मि. जी. ई. हार्वे, आय. सी. एस. यांनी नुकताच एक ब्रह्मदेशाचा नमुनेदार आमूलाग्र इतिहास दिलेला आहे. त्यांत त्यांनी इसवी सनाच्या चालू सहस्रकाच्या आरंभीं सुरू झालेल्या पगान येथील राजघराण्यापासून विश्वसनीय इतिहास दिला आहे. हें घराणें अनिरुद्ध नांवाच्या पराक्रमी थोर पुरुषाने स्थापिलें. या देशांत मन्वंतर घडवून आणण्यासाठी अनेक राष्ट्रीय

हिताचीं जी कामें ह्या राजाने केलीं, त्यांत देशांतील बौद्ध धर्माची सुधारणा करून मोठमोठीं बौद्ध देवस्थानें बांधिलीं, हें एक काम होय. हीं देवळें बांधण्यासाठी खेड्यांतून शेतकीवरील पुष्कळशा लोकांना जबरीने धरून आणून गुलाम करून त्यांच्याकडून काम घेतलें. याशिवाय कायमच्या गुलामगिरीचें दुसरें एक कारण ब्रह्मदेशांत असें आहे. देवस्थानांत झाडलोट व इतर राखणदारीचीं कामें करणें, हें गुलामांचेंच काम आहे. कित्येक भाविक लोक गुलामगिरी आपण होऊन पत्करीत असत. पण साधारणपणें राजाज्ञेने हा जबरीचा गुरवपणा खेड्यांतून धरून आणिलेल्या लोकांवर किंवा लढाईंत जिंकून आणिलेल्या लोकांवर लादण्यांत येत असे. मि. हार्वे यांनी पान ३३१ वर एक इ.स. ११७९ च्या शिलालेखाचा उतारा दिला आहे. त्यांत 'अभिनंदथू नांवाच्या एका श्रीमंत दरबारी गृहस्थाने एक मोठें देऊळ बांधून त्याच्या साफसफाईसाठी स्वतःला, आपल्या बायकोला व मुलांना गुलाम म्हणून वाहिलें,' असा उल्लेख आहे.

अशा देवळी गुलामांवर व त्यांतल्या त्यांत लढाईंत जिंकून आणिलेल्या गुलामांवर वंशपरंपरेचा बहिष्कार पडत असे. त्यांच्याशीं इतर साधारण स्वतंत्र समाज मिळून मिसळून राहत नसे. म्हणजे ब्रह्मदेशांत जातिभेद मुळींच नसला तरी स्वतंत्र आणि गुलाम असे दोन मुख्य सामाजिक भेद असत. व घरकामाकरितां ठेविलेल्या गुलामांना जरी समाजांत वावरण्यास मुभा असली, तरी देवळी गुलामांना फारच हीन व तिरस्करणीय समजण्यांत येत असे. याप्रमाणें गुलामगिरींतून ब्रह्मदेशांतील बहिष्कृत वर्गाचा उगम झाला असावा. एकंदरींत ब्रह्मदेशांतील हल्लीची धार्मिक संस्कृति व कांहीं अंशीं घरगुती व सामाजिक संस्कृतीही हिंदी संस्कृतींतून आली आहे, असें दिसतें. निदान कांही वर्गांची ग्रामबहिष्कृतता तरी हिंदुस्थानांतूनच गेली असावी, असें म्हणण्यास हिंदी बौद्ध संस्कृतीच्याच पुरावा नसून इतरही असा पुरावा आहे की, हल्लीही जे हीन स्थितींतले बहिष्कृत वर्ग तेथे आढळतात, त्यांचीं संडाला, डून संडाला, तुबायाझा अशीं जीं नांवें आहत, तीं हिंदी भाषेंतून तिकडे गेलीं आहेत. तीं नांवें चंडाल, डोम चंडाल, अशुभराजा या हिंदी नांवांचेच अपभ्रंश होत, यांत संशय नाही. संस्कृत अथवा पाली भाषांतील शब्दाचे उच्चार ब्रह्मी लोकांना नीट न करतां आल्यामुळें त्या भाषेंतील च श र या अक्षरांच्या उच्चारांचा

ब्रह्मी भाषेंत अनुक्रमें स त य असा विपर्यास व्हावा, असा ब्रह्मी अपभ्रंशाचा नियम आहे, त्याबरहुकूम ब्रह्मी बहिष्कृत वर्गांचीं नांवें हल्ली तेथे प्रचारांत आहेत. अशुभराजा यांतील पहिल्या अचा लोप झाला व वरील नियमाप्रमाणें तुबायाझा असें शेवटलें नांव सिद्ध झालें आहे.

ब्रह्मदेशांत ब्रिटिश राज्य स्थापन होईपर्यंत खालील पांच प्रकारचे बहिष्कृत हीन वर्ग आढळत असत.

(१) युद्धांत जिंकलेले कैदी आणि त्यांचे वंशज यांना देवळांतील सेवेला वाहिलेले गुलाम करण्यांत आलेलें असे. यांना **फयाचून** हें नांव आहे. फया हा शब्द बुद्ध या शब्दाचा चिनी भाषेंतून आलेला अपभ्रंश आहे. बुद्ध–बुढ–भुर–फुर–फया अशी ही अपभ्रंशपरंपरा आहे. फया हा शब्द ब्रह्मदेशांत बुद्ध, त्याची मूर्ति, देऊळ आणि कोणी मोठा सन्माननीय माणूस या सर्वांबद्दल उपयोजिला जातो. चून म्हणजे नोकर असा अर्थ आहे.

(२) स्मशानांतील मार्तिकादि अशुभ संस्कारांशीं संबंध असलेलीं, थडगीं खणण्याचीं व तीं सांभाळण्याचीं वगैरे हीन कामें करणारे ग्रामबाह्य वर्ग यांना **तुबायाझा** (अशुभराजा), **संडाला, डून संडाला,** अशीं नांवें आहेत.

(३) केवळ भिक्षेवर निर्वाह करणारे महारोगी व इतर असाध्य रोगांनी पछाडलेले, हातपाय किंवा दुसरा एकादा महत्त्वाचा अवयव तुटून अपंग बनलेले यांना **केबा** असें नांव आहे. केबा हें नांव तुबायाझांनाही लावण्यांत येतें, कारण तेही भीकच मागतात. के=मदत, बा=हो (संबोधन). 'मला मदत करा', असें म्हणत भीक मागणारे असा या नांवाचा मूळ अर्थ आहे.

(४) माफीचे भयंकर गुन्हेगार.—अशा गुन्हेगारांना पूर्वी स्वराज्यांत राजाच्या विशेष कृपेने किंवा इतर कारणांनी माफी मिळून त्यांना पोलीसचें, जेलरचें, फांशीं देण्याचें वगैरे तिरस्कृत कामें आणि अधिकार मिळत असत. त्यांना **पॅगवे** म्हणजे पोलिस, **लेयाट्टों**=चोपदार, छडीदार अशीं नांवें असत. अशा अधिकाऱ्यांचा जनतेमध्यें मोठा दरारा असला तरी त्यांच्याविषयीं सर्वत्र तिरस्कार असून ते समाजबाह्य मानले जात.

(५) ह्याशिवाय तु–डै–डो म्हणजे राजे लोकांचे हलालखोर म्हणून एक वर्ग पूर्वी असे. व यांचा एक लहान गाव मंडालेपासून १०–१२ मैलांवर आहे, असें माझे ऐकण्यांत आलें. पण प्रत्यक्ष जाऊन पाहण्यास मला वेळ मिळाला नाही. ह्यांचा समावेश वरील दुसऱ्या वर्गांत मी केला असता, पण हल्ली हे फारसे ग्रामबाह्य नाहीत, असेंही मीं ऐकलें.

वरील पांचही बहिष्कृत वर्गांतील लोकांची हल्लींची संख्या हिंदुस्थानांतील बहिष्कृतांच्या मानाने फारच थोडी म्हणजे फार तर साऱ्या ब्रह्मदेशांत ५।६ हजार असेल. यांची स्थितीही हिंदुस्थानांतल्या इतकी करुणास्पद नाही. हे आपलें ठिकाण सोडून, धंदा सोडून व मूळ लपवून सर्वसाधारण समाजांत छपून गेल्यास हल्लीच्या राज्यांत कोणी पर्वा करीत नाहीत. हे जरी आपल्या मूळ गावींच बहिष्कृत स्थितींत राहिले तरी, व पूर्वीदेखील, हिंदुस्थानांतल्या इतक्या कडक रीतीने यांना अस्पृश्य मानण्यांत येत नसे. तरी पण त्यांना गावांत येण्याला व इतर धंदे करण्याला व लोकांत मिसळण्याला परवानगी नसे. म्हणून अजूनी हे मागासलेल्या विपन्नावस्थेंत खितपत पडलेले मी प्रत्यक्ष गावोगावीं मुद्दाम जाऊन पाहिले. ब्रह्मदेशांत कडक अस्पृश्यता नव्हती–निदान हल्ली नाही–हें खरें असलें तरी तेथील बहिष्कृतांचा व अंतःकृतांचा भेटीव्यहार पूर्वी होत नसे व आताही होत नाही; मग रोटीव्यवहार व बेटीव्यवहाराची गोष्टच नको. हल्ली देखील कोणी उघडपणें आपलें मूळ वरील चार पांच प्रकारांपैकी एकांत आहे, असें सांगेल, तर त्याच्याशीं ब्रह्मदेशांतील पुराणमतवादी बहुसंख्या नुसता भेटीव्यवहार करण्यासही तयार नाही. म्हणजे गृह्य आणि सामाजिक प्रसंगीं समानतेने बहिष्कृतांस आमंत्रण करण्यास अंतःकृत वर्ग अद्यापि तयार नाही. ब्रह्मदेशांतील पुराणमतवाद हिंदस्थानांतल्यापेक्षा कमी दृढमूल आहे व जो आहे तो झपाट्याने मावळत आहे, तरी पण तो मुळीच नव्हता किंवा नाही असें नाही. म्हणून तेथील बहिष्कृत वर्ग हा एक संशोधनीय विषय आहे.

वरील पांचही प्रकारच्या बहिष्कृतांचा इतिहास माझ्या अल्पशा संशोधनांत जो आढळला तो मी संक्षेपाने पुढे देत आहें. ब्रह्मदेशाचा इतिहास अद्याप तयार व्हावयाचा आहे. उपलब्ध साधनसामग्रीचा भारतीय सामाजिक इतिहासाशीं निकट संबंध भासत आहे आणि तो रंजक व तसाच बोधकही आहे.

फयाचून:—ह्या नांवाचा अर्थ देवळी गुलाम असा आहे. ब्रह्मदेशांतील देवस्थानें अत्यंत पवित्र मानलीं जातात; इतकीं कीं, युरोपियनांना देखील पादत्राण घालून देवळांतच नव्हे तर भोंवतालच्या विस्तीर्ण आवारांतही पाय टाकण्याची छाती होत नाही. अशा बाबतींत युरोपियनांचेही खून पडले म्हणून पादत्राण घालून मंदिरांतच नव्हे तर प्राकारांतही प्रवेश करण्यासंबंधीं सरकारी ठराव आणि वटहुकूम मोठमोठ्या पाट्यांवर आवारापासून कांही अंतरावर जाहीर केलेले आढळतात. देवळें पवित्र तरी देवळी गुलाम अपवित्र, हें मोठें कोडेंच मला पडलें! शोध करितां देवळी गुलामच नव्हे तर देवळांत वाहिलेल्या इतर, फळें, फुलें, सुगंधी पदार्थ व नैवेद्य, इत्यादि सर्वच वस्तु मनुष्यांना अग्राह्य आहेत. ह्या न्यायाने फयाचून म्हणून जो देवळी गुलाम वर्ग आहे तोही पूर्वी अग्राह्य असला पाहिजे. तो कालांतराने त्याज्य व नंतर अपवित्र मानला असणें अगदी संभवनीय आहे. ह्या गुलाम वर्गांत पूर्वी बहुतेक घरून आणलेले राजकैदी असत. ह्याचें एक उदाहरण अत्यंत हृदयद्रावक पण अगदी इतिहासप्रसिद्ध आहे, तें असें.

दक्षिण ब्रह्मदेशांत मोलमेन शहराचे उत्तरेस २०।२२ मैलांवर किनाऱ्यालगत थट्टून म्हणून एक इतिहासप्रसिद्ध प्राचीन राजधानीचा गांव आहे. तेथे इ.स. च्या ११ व्या शतकाच्या मध्यसमयीं मनुहा नांवाचा तेलंग राजा राज्य करीत होता. ह्या प्रांतांत द्रविड देशांतून कांची येथून गेलेला 'हीनयान' बौद्ध धर्म जोरावत होता. उत्तरेकडे ऐरावती नदीचे कांठीं पगान येथे अनिरुद्ध नांवाच्या ब्रह्मी जातीच्या राजाने जेव्हा पहिली ब्रह्मी बादशाही स्थापिली, तेव्हा दक्षिणेंत थट्टून येथे मनुहा राज्य करीत होता. अनिरुद्धाला उत्तरेकडील भ्रष्ट बौद्ध धर्माची सुधारणा करावयाची होती. थट्टूनकडून एक नामांकित बौद्ध भिक्षु पगान येथे जाऊन अनिरुद्धाच्या राष्ट्रीय कार्यांत मार्गदर्शक झाला. त्याने, थट्टून येथे बौद्ध त्रिपिटक ग्रंथाच्या प्रती आहेत, त्या मिळविण्याचा अनिरुद्धास मंत्र दिला. सामोपचाराने मागून मनुहा त्रिपिटक ग्रंथ देत नाही; म्हणून त्यावर रागावून अनिरुद्धाने मनुहाच्या राज्यावर मोठी चाल करून त्रिपिटकच नव्हे तर त्याचें अक्षरशः सर्वस्व हरण केलें. म्हणजे त्याच्या राज्यांतील सर्व मौल्यवान चिजा ऐनजिनशीं आपल्या राज्यांत नेल्या, इतकेंच नव्हे तर प्रजाही गुलाम म्हणून आपल्या राज्यांत नेली. तेव्हा-

पर्यंत दक्षिण ब्रह्मदेशांतील संस्कृति दाक्षिण हिंदुस्थानांतील आंध्र आणि द्राविड देशांतून दक्षिण ब्रह्मदेशांत हीनयान बौद्ध संस्कृतीचे मार्गाने गेली होती. ती या युद्धापुढे उत्तर ब्रह्मदेशांत पसरूं लागली. थटूनचे बौद्ध ग्रंथ, बौद्ध भिक्षू, आचार्य आणि कारागीर नेले इतकेंच नव्हे, सर्व राजघराणें आणि दरबारही गिरफदार करून पगान येथे नेण्यांत आलें. शेवटीं त्या थटून राजघराण्यासह सर्व नामांकित प्रजेला पगान येथे बांधलेल्या असंख्य नवीन पगोडांमध्यें बहिष्कृत देवळी गुलाम म्हणून कायमचे वंशपरंपरा नेमण्यांत आलें. मी थटून आणि पगान हीं जुन्या संस्कृतीचीं दोन्ही ठिकाणें शिल्पशास्त्र, समाजशास्त्र आणि धर्मशास्त्र अशा तीन्ही दृष्टीने निरखून पाहिलीं. दक्षिण ब्रह्मदेशांत ब्रिटिशांचा अंमल जसा इ. स.१८२५ चे सुमारास बसला, तसाच तो उत्तर ब्रह्मदेशांत १८८५ सालीं बसून सर्व ब्रह्मदेश नव्या मनूंत आला. ह्या साठ वर्षांच्या अंतरामुळें मला दक्षिण देशात बहिष्कृत वर्ग कोठेच आढळला नाही. तो पाहण्यास उत्तरेकडे पगानला जावें लागलें. पगान येथील बहिष्कृत वाड्यात मनुहा राजाचें घराणें, वाडा व त्याचा हृदयस्पर्शी लवाजमा अद्यापि आहे. शेवटचा पुरुष उ बा ल्विन हा २६ वर्षें वयाचा बाणेदार तरुण व त्याची खानदानी वृद्ध आई यांना मीं डोळ्यांनी पाहिलें. त्यांचीं गाऱ्हाणीं ऐकलीं. न्यऊ ह्या बंदराजवळ श्वेझीगो नांवाच्या मोठ्या राष्ट्रीय पगोडाजवळ एक फायाचूनांचें वेगळें खेडें आहे. त्याचा थजी उर्फ पाटील म्हणून ब्रिटिश सरकारने उ बा ल्विनची नेमणूक केली आहे. कारण तो मोठ्या राजवंशांतील पिढीजाद फयाचून आहे !

फयाचून हे लोक लहान मोठ्या देवळांत हल्ली फुलें, माळा, उदकाड्या, मेणबत्त्या विकण्यासाठी दुकानें मांडून बसलेले आढळतात. हा धंदा किफायतीचा असल्याने अलीकडे फयाचून नसलेल्या इतर अंतःकृत लोकांचींही अशीं दुकानें आहेत. उलट फयाचूनही आपलें मूळ लपवून व हा धंदा सोडून अंतःकृत वर्गांत सरासर मिसळत आहेत. ह्यामुळें खरा फयाचून कोण, हें ओळखून काढणें मोठें मुष्किलीचें काम आहे. विशेष तपशील निरीक्षण नं. ४ ह्यांत पुढे दिला आहे.

तुबायाझा:—ह्या नांवांतील मूळ शब्द वर सांगितल्याप्रमाणें 'अशुभ राजा'. ह्यासंबंधीं मीं एक दंतकथा ठिकठिकाणीं ऐकली ती

अशी :– एकदा एका ब्रह्मी राजाची एक गर्भवती राणी अत्यवस्थ आजारी पडली. ती मेलीच, असें समजून तिला स्मशानांत पाठविलें. थडग्यात उतरवितांना ती जिवंत आहे, असें आढळलें. स्मशानांत नेलेली राणी राजाने पुन्हा स्वीकारणें शक्यच नव्हतें. तिला थडगें खणणाऱ्या संडाल जातींतच ठेवून दिलें व तिचे पोटीं पुढे जो राजपुत्र झाला त्याला ' अशुभ राजा ' हें नाव पडलें. त्याला संडालांचें मुख्य पद मिळून, स्मशानांतील धार्मिक संस्कारांत बौद्ध फौंजीला (भिक्षूला) जी दक्षिणा मिळेल तितकीच या राजवंशालाही मिळावी, असें राजशासन मिळालें. ही दंतकथा मला पगान येथील तुबायाझाच्या खेड्यातील पाटलाने व सगाईन येथील एका सभ्य गृहस्थानेही स्वतंत्रपणें सांगितली. कथा खरी असो नसो, ब्रह्मी चंडाल उर्फ संडाला लोक राजवंशाशीं आपला संबंध कसा पोंचवितात, हें ह्यावरून दिसतें. मलबारांतील पुलया व चिरूमा ह्यांचाही अन्य रीतीने राजवंशाशीं कसा संबंध येतो, हें मी हिंदुस्थानांत पाहिलेलें मला स्मरलें. तुबायाझा हे बहिष्कृत असले तरी कधी जित नव्हते, असें त्यांचें म्हणणें आहे. हे संडाला, डून-संडाला लोक मणिपूरच्या बाजूने हिंदु संस्कृतीच्या राजाने प्राचीन काळीं ब्रह्मदेशांत नेले असावेत. याशिवाय माझा तर्क दुसरा धावत नाही. अलीकडे दाक्षिण हिंदुस्थानांतील लक्षावधि, परैया, पुलया इत्यादि अस्पृश्य जातींचे लोक पोट भरण्यासाठी ब्रह्मदेशांत अगदी हीन धंदा करून राहिले आहेत. ते मुळीच बहिष्कृत नाहीत. पण हे संडाल मात्र प्राचीन काळीं गेलेले अद्यापि तुरळक तुरळक आपल्या जुन्या वतनाच्या गांवीं थडगें खणण्याचें आपलें जुनें वतनच चालवीत असलेले आढळतात; त्याअर्थी हें प्राचीन हिंदी संस्कृतीचें वतन प्राचीन हिंदी राजांनींच स्थापिलें असेल असें माझें मत आहे. विशेष तपशिलासाठी पुढे निरीक्षण नंबर १ व ३ हीं पहा.

केबा:—पूर्वीप्रमाणें हे महारोगी अपंग बेवारशी भिकारी लोक अझून मोठमोठ्या देवळांच्या वाटेवर याचना करीत बसलेले आढळतात. असे अपंग याचना करीत बसलेले इतालीसारख्या प्राचीन अमदानींतल्या रोम व इतर क्षेत्राच्या ठिकाणीं मी युरोपांतही प्रत्यक्ष पाहिले. आमच्या हिंदुस्थानांतल्या क्षेत्रांतल्या भिकाऱ्यांचा येथे

उल्लेखही करण्याची गरज नाही हा वर्ग समाजबाह्य आहे, ह्यांत कांहींच नवल नाही. मंडालेपासून ८।१० मैलांवर असलेल्या मेंढाई नांवाच्या खेड्याजवळ केवांची मीं एक स्वतंत्र लहानशी वसाहतच पाहिली. ती मीं पुढे एका निरीक्षणामध्यें विस्ताराने वर्णिली आहे.

चौथा वर्ग जो माफीचा गुन्हेगार तो हल्ली ब्रिटिश अमदानींत कोठेच आढळणें शक्य नाही. पूर्वीच्या स्वराज्यांत 'राजा कालस्य कारणम्' हें तत्व जोरावर होतें. राजाची वैयक्तिक मर्जी संपादन केल्यावर 'प्याद्याचा जसा फर्जी' तसाच सात खून करूनही आपली हुशारी दाखविणाराला माफी मिळून उलट शहर कोतवाली मिळविणारांचीं उदाहरणें पाहाण्यासाठी संशोधकाला ब्रह्मदेशापर्यंत लांब जावयास नको. हल्लीच्या कोठल्याही लोकछंदानुवर्ती ब्यूराक्रसीच्या सी. आय. डी. मध्यें असले पाणीदार माफीबहादूर शोधीत बसल्यास मिळणार नाहीत, अशी कोण हमी घेईल ? मात्र पूर्वीच्या ब्रह्मी स्वराज्यांत अशा लोकांना दरबारांत जरी वेतन मिळे, तरी तेवढ्यावरून समाजांत त्यांना मान्यता न मिळतां उलट बहिष्कार पडे, असें मीं ब्रह्मदेशाच्या वाङ्मयांत वाचिलें आहे. पॅगवे हें अशा पोलीस व जेलर लोकांना नांव पडण्याचें कारण ह्यांच्या गालांवर ह्यांनी पूर्वी केलेल्या गुन्ह्याची कायमची निशाणी म्हणून एक गोलाकार शिक्का मारलेला असे. अलीकडच्या कांही गुन्हेगारांना पाश्चात्य सुधारलेल्या समाजाकडून सोन्याच्या तलवारी नजर करण्यांत आल्या आहेत ! हा जुन्या नव्यांत एक फरक ध्यानांत धरण्यासारखा आहे. एरव्ही पाणीदार गुन्हेगारांना उगाच शिक्षेंत खितपत न टाकतां आताप्रमाणेंच पूर्वीही कोठे कोठे समाजकार्याला लावण्यांत येत होतें, हें ह्या ब्रह्मदेशांतील उदाहरणांवरून उघड होतें.

तु ङै डो ह्या पांचव्या वर्गाचें प्रत्यक्ष निरीक्षण करावयाला मला वेळच मिळाला नाही म्हणून त्यांचें जास्त वर्णन मला करतां येत नाही ह्याबद्दल मी दिलगीर आहें.

असो. येथपर्यंत मी पांच बहिष्कृत वर्गांचा उल्लेख व वर्णन केलें. ब्रह्मदेशांत जाईपर्यंत व गेल्यावरही कित्येक आठवडे तेथे आमच्या देशांतल्याप्रमाणें ग्रामबहिष्कृत वर्ग असेल, अशी कल्पनाही

माझ्या मनाला शिवली नाही. पण वर सांगितल्याप्रमाणें अकस्मात मी जेव्हा असे वर्ग कांही विवक्षित प्राचीन ठिकाणीं आढळण्यासारखे आहेत असें ऐकलें तेव्हा मी त्याचा फारच जारीने शोध चालविला. दक्षिण ब्रह्मदेशांतील पुराणमतवादी अशिक्षित ब्रह्मी लोकांकडून मला त्यांची थोडीबहुत माहिती मिळाली पण तीही उडवाउडवीनेच मिळूं लागली. म्हणून मी उत्तर ब्रह्मदेशांत बौद्ध धर्माचें खरें साधन पाहावयास गेलों असतां खालील पांच खेडीं मीं या निरनिराळ्या वर्गांची वस्तुस्थिति प्रत्यक्ष घरोघर जाऊन निरीक्षण करण्याकरितां निवडून काढिलीं. त्यांपैकी तु–डै–डो या (हलालखोर) वर्गाचें खेडें मात्र प्रत्यक्ष पाहण्याला मला वेळ मिळाला नाही. पण बाकीच्या चार ठिकाणीं मात्र मी चांगल्या सुशिक्षित जाणत्या ब्रह्मी दुभाष्याला घेऊन घरोघरीं फिरून या निरनिराळ्या वर्गांतल्या वृद्ध आणि वजनदार लोकांना भेटून त्यांनी दिलेल्या उत्तरावरून व शिवाय प्रत्यक्ष स्थिति निरखून पाहून तयार केलेलीं खालचीं सविस्तर टिपणें लिहिलीं आहेत. तीं माझ्या रोजनिशीवरून येथे थोडक्यांत उतरून घेत आहें. प्रोम शहराजवळील खेड्यांत मात्र माझी जी खडतर निराशा झाली, ती पुढे दिलीच आहे.

येथे मला एक गोष्ट नमूद करणें अवश्य वाटत आहे की, ह्या बहिष्कृत वर्गाची स्थिति आता अगदी झपाट्याने सुधारत आहे. आणखी दहापंधरा वर्षांत, मला दिसलीं तितकीं तरी कुटुंबें मी पाहिलेल्या स्थितींत पुढील संशोधकांस आढळतील की नाही याची मला जबर शंकाच वाटत आहे. फार तर काय, आताही या बहिष्कृत वर्गांना त्यांच्या मूळ नांवाने संबोधणें हें मोठें शिताफीचें व धैर्याचें काम आहे. ब्रह्मी लोकांचा समाज अत्यंत चिडखोर, उतावळा व तापट आहे. थोड्या कारणावरून हे लोक वर्दळीला येऊन हातघाई करितात. त्यामुळें दुभाष्याचें काम करून ही नसती उठाठेव करण्यास मला शांत व समंजस माणसें मिळणेंही बऱ्याच वेळां मुष्किलीचें झालें; व पुष्कळदा अर्ध्या दमाच्या दुभाष्यांनी माझी ऐन वेळीं निराशा करून माझा बेत ढासळून टाकला. म्हणून माझा सर्व भार माझ्या दुभाष्यावर किंवा वाटाड्यावर न टाकतां अगोदर अनेक उपायांनी खालील ठिकाणच्या लोकांचा विश्वास मला संपादावा लागला. ब्रह्मी लोक जितके उतावळे तितकेच

मोळे व दिलदारही आहेत. विश्वास बसल्यावर ते आपलें हितगुज आपल्या उलट असलें तरी मोकळ्या मनाने सांगतील, हा भरंवसा मला अंत:कृत आधुनिक सुशिक्षणाने अर्धवट भाजून निघालेल्या ब्रह्मी लोकांच्या समागमाने जो आला नाही, तो तेथील बहिष्कृतांच्याच समागमांत आला. हिंदुस्थानांत काय किंवा कोटेही काय, वरिष्ठ म्हणून गाजलेल्यांपेक्षा त्यांनी पायांखाली तुडविलेल्या कनिष्ठ वर्गांतच त्या त्या राष्ट्रांच्या खऱ्या माणुसकीचीं व स्थानिक स्वभावाचीं लक्षणें सूक्ष्म संशोधकांना जास्त आढळून येण्यासारखीं आहेत, हें मी माझ्या निरनिराळ्या देशांतील आजन्म घेतलेल्या अनुभवावरून म्हणूं शकतों !

निरीक्षण पहिलें: सगाईन— सोमवार ता. १४ मार्च १९२७ रोजीं चौथे प्रहरीं ४ वाजता सगाईन शहरांतून सगाईन टेकडीकडे जाण्यासाठी आम्ही उं माँ माँ चे मोटारींतून निघालो. ऐरावती नदीचे कांठीं मंडालेपासून ८–१० मैलांवर हें शहर आहे. माझेबरोबर रा. भिडे व वृद्ध ब्रह्मी पेन्शनर गृहस्थ उ पो त्विन हे तुबायाझा ह्या लोकांची वस्ती दाखविण्यासाठी होते. ह्या शहरच्या स्मशानाजवळ आम्ही मोटारींतून उतरलों. तेथे सुमारें २०–२५ तुबायाझा लोकांची लहान वस्ती होती. हे लोक स्मशानांतील थडगीं खणण्याचा धंदा व इतर मार्तिकासंबंधीं कामें करितात. हे लोक आपणांस फयाचून लोकांपेक्षा श्रेष्ठ समजतात. फयाचून हे साधारण देवळी गुलाम असून तुबायाझा हे आपण राजवंशांतील आहों असें समजतात; कारण 'याझा' हें यांच्या नांवांतील शेवटलें पद 'राजा' या शब्दाचा अपभ्रंश आहे. 'तुबा' हें 'शुभ' याचा अपभ्रंश आहे. पूर्वी हा शब्द अशुभ अमा होता, त्यांतील अ जाऊन शुभ–तुबा हा अपभ्रंश उरला. ह्या राजवंशाने भिक्षेशिवाय दुसरा कोणताच धंदा करतां कामा नये, ह्यामुळें ह्यांना केबा (मला मदत करा) हें नांवही पडलें असेंही कोणी सांगतात. वस्ती एकंदरीत स्वच्छ व नीटनेटकी दिसली. तरुण मुलींना लिहितां वाचतां येत होतें. वस्तीच्या मध्यावरील झोपडी चांगली प्रशस्त बंगलीवजा होती. ती म्युनिसिपालिटीने बांधिली आहे. या लोकांनी वस्तींत आपलें स्वत:चें चांगलें देवस्थान उभारलें आहे. त्यांत म. गौतम बुद्धाच्या व नाटांच्या (भूत यक्षाच्या) पुष्कळ मूर्ति होत्या. फौंजी (बौद्ध

भिक्षू) ह्यांच्याकडे जेवणाला, भिक्षेला व धार्मिक कृत्याला येत आहेत; तरी यांच्यांत विशेष महत्त्वाकांक्षा दिसली नाही. एकंदर स्थिति मागासलेली व करुणास्पद दिसली. माझे बरोबरीचे उपोविन हे वृद्ध व श्रीमंत गृहस्थ असूनही ह्या लोकांबरोबर उघडपणें बसून जेवण्यासही आपण तयार आहों, असें म्हणाले. ह्या लोकांना मीं विचारलें की, तुम्ही इतरांप्रमाणें सुशिक्षण मिळवून मोठीं हुद्यांचीं कामें कराल काय? तेव्हा ह्या प्रश्नाचा अर्थच त्यांना कळला नाही. कारण हें कसें घडेल? हें अशक्य कोटींतलें त्यांना वाटलें. एकंदर स्थिति अज्ञानाची, आत्मविश्वासाच्या अभावाची व अल्पसंतुष्टतेची दिसली. पुष्कळ अंशीं हिंदुस्थानसुद्धां हल्ली हाच प्रकार आहे!

निरीक्षण दुसरें : मेंढाई—ऐरावती नदीच्या किनाऱ्यावरील अमरपुरा शहराजवळ केबांचा हा गांव ता. १८ मार्च १९२७ रोजीं शुक्रवारीं सकाळीं पाहिला. ऐरावतीच्या किनाऱ्यापासून पूर्वेकडे एक मैलाच्या आंत मेंढाई नांवाचा सुमारें २५० लोकवस्तीचा एक गाव आहे. त्याला लागून २।३ फर्लांगांवर केबांची एक लहान वस्ती आहे. या वस्तींत सुमारें ५।७ झोंपड्या व त्यांत २०।२५ बायका व पुरुष पाहिले. सर्व कोष्टयाचा धंदा करितात. गुजराथेंत व नागपुराकडे घेड लोक नुसती खादी विणतात पण हे केबा उत्तम रेशमी कापडही विणतात. गुजराथेंत तर ह्या अस्पृश्यांना वणकर असेंच नांव आहे. येथील केबा खाऊन पिऊन स्वतंत्र आहेत. ते केबा हें आपलें नांव सांगत नाहीत म्हणून माझ्या दुभाष्याला त्यांच्या स्वतःविषयीं जातिवाचक माहिती विचारण्याचें धैर्यच होईना. तथापि ते केबाच होते, याची त्याला खात्री होती. पुढे आम्ही मेंढाई गांवांत जाऊन चौकशी केली. मेंढाईचे लोकही सर्व विणकराचा धंदा करीत होते. त्यांतील एका प्रमुख विणकराच्या घरीं गेलों. तो ब्रह्मी राष्ट्रीय शाळेंत थोड्याच दिवसांपूर्वी शिक्षक होता. हा मनुष्य उ. उत्तमाच्या राष्ट्रीयपंथाचा आहे. त्याने सांगितलें की, जवळच्या केबांशीं मेंढाईचे लोक संबंध ठेवीत नाहीत, तरी त्यांच्यांत व मेंढाईचे लोकांत कांही फरक नाही. रोटी बेटी किंवा भेटीव्यवहार होत नाही, याचा अर्थ ते अस्पृश्य आहेत, असें मुळींच नव्हे. ब्रह्मदेशांत अस्पृश्यता अशी पूर्वीही नव्हती, आता तर मुळींच नाही. अशीं विधानें जरी ह्या एका व्यक्तीन केलीं तरी पण या बहिष्कृत लोकांना

लग्नामुंजींत किंवा अशा सामाजिक प्रसंगीं वरिष्ठवर्ग भेटीव्यवहाराचें आमंत्रण करीत नाहीत, हा खरा प्रकार आहे. पूर्वी त्यांना गावांत येण्याचीही मनाई होती. भिक्षेपुरतें यावें, पुनः बाहेर जावें. पण यांची स्थिति आता इतकी सुधारली आहे किंवा मनु पालटला आहे की, त्यांना कोणीही उघड आमंत्रण करीत नसलें तरी त्यांना 'दूर सर' म्हणण्याची कोणाचीही छाती नाही. फौंजीच्या शाळेंत त्यांचीं मुलें जाऊं शकत, पण सरकारी शाळेंत कोठे कोठे जाऊं शकत नाहीत. त्यांच्याकडे फौंजी भिक्षेलाही पूर्वी येत नसत, पण आता येतांना मीच पाहिलें. फार तर काय, त्यांची ग्रामबाह्यता आता पुष्कळ ठिकाणीं नष्ट होत चालली आहे, धंद्यामुळें त्यांना पूर्वीच्या रिवाजाला चिकटून राहावें लागतें. स्थान व धंदा बदलला तर कोणी त्यांचें मूळ विचारीत नाहीं. ते साधारण समाजांत मिसळून जातात. हिंदुस्थानच्या व ब्रह्मदेशाच्या बहिष्कारांत हा विशेष फरक आहे की, हिंदुस्थानांत ह्याला केवळ लौकिक व सामाजिक रूप आहे. हिंदूंतील ब्राह्मणादि वरिष्ठ वर्ग बहिष्कार कडकडून पाळतात, पण ब्रह्मदेशांत फौंजी ह्यांची भिक्षा आतां मर्रास उघडपणें घेतात व त्यांना शाळांतून शिकवितात. मात्र त्यांना पूर्वी फौंजीची दीक्षा मिळण्यास अडचण पडे, कारण ती दीक्षा देण्यापूर्वी तो मनुष्य स्वतंत्र पुरुष असावयास पाहिजे, दास स्थितींत असून चालायचें नाही, असा नियम आहे. आता हे लोक स्वतःच फौंजी होऊं शकतात. ब्रह्मदेशांतला फौंजी व हिंदुस्थानांतला वैदिकी करणारा ब्राह्मण ह्यांत असा हा फरक आहे. यानंतर मेंढाई येथील नाथाचें देऊळ पाहिलें. बौद्ध धर्मापूर्वी ब्रह्मदेशांत नाथ ऊर्फ नाट् म्हणजे भूत अथवा पिशाच ह्यांची पूजा चालत असे. खालील व पुष्कळशा वरील वर्गांतही अद्यापि ती चालू आहे. हीं नाथाचीं देवळें मीं पुष्कळ ठिकाणीं पाहिलीं. या देवळांत दोन मूर्ति आसनावर व एक घोड्यावर अशा बसलेल्या पाहिल्या. हे पूर्वी मुसलमान बंधु होते. किनाऱ्यावर यांची नाव बुडाली, तेव्हा ते ब्रह्मी राजाच्या आश्रयाला राहिले. ते मेल्यावर त्यांचीं हीं क्षुद्र देवळें झालीं. मुसलमानाशिवाय सर्व लोक त्यांना भजतात. वार्षिक यात्रा होते, तेव्हा या गावासाठी एक रेल्वेचें स्वतंत्र स्टेशन करावें लागतें. या (मुसलमान) नाथांचीं नावें श्वेफिजी श्वेफिगल

अशीं आहेत. कोणी प्रसिद्ध पुरुष अपघाताने मेला तर त्याचें देऊळ होतें, त्याला नाट म्हणतात.

निरीक्षण तिसरें: पगान—पगानचे दक्षिणेकडे एक मैलावर नदीकाठीं टॉटवा नांवाचें तुद्यायाझाचें एक स्वतंत्र खेडें आहे. तें पगानच्या स्मशानालगतच आहे. २६ मार्च रोजीं शनिवारीं सकाळीं ९वाजतां मी प्रिन्सिपाल उ सैन (लॅकर स्कूलचे) यांच्यासह तेथे गेलों. गांवांत सुमारें ७० घरें व लोकसंख्या ४०० आहे. ही तपासणी तीन तासांवर बारकाईने केली. गांव नदीकांठावर असल्यामुळें पाण्याची सोय नैसर्गिक आहे. म्युनिसिपालिटीची शहरांतच विशेष सोय नाही, मग ह्यांना कोठून मिळणार? सर्वत्र शाळा नाहीत, पण फौजींच्या शाळांत सर्वांबरोबर शिकण्यास ह्यांना हरकत नाही. तेथे मुलांमुलींचा भेद नाही. पण फौजींच्या मठांत मुलींना शिकतां येत नाही. येथे भिक्षुणीचा मठ नसल्याने मुली घरीं शिकतात. दोनचार बायकांना लिहितां वाचतां येतें. ब्रिटिश राज्य होईपर्यंत ह्यांच्यावर कसलाही कर नव्हता. कारण हे बहिष्कृतच होते. आता कर आहेत पण त्याचा उपयोग मात्र त्यांच्या उन्नतीकडे होत नाही. हाच प्रकार हिंदुस्थानांत आहे. ब्रिटिश राज्याचा "घेऊं जाणें परि देऊं ना जाणें" हा भोळेपणा सर्वत्र प्रसिद्धच आहे! माझ्यासमक्ष फौजींना भिक्षा शिजलेल्या भाताचीच मिळाली. थडगें खणणें, टेप विणणें, वैद्यकी करणें, शिवाय सर्वमान्य भिक्षा मागणें इ. यांचीं हक्काचीं कामें आहेत. कित्येक घरांचीं दारें लागलेलीं होतीं; कारण पुरुष, बायका, मुलें सगळींच भिक्षेस गेलीं होतीं. भिक्षेचे तांदूळ स्वस्त दराने विकून पैसा करितात. मग त्यांनी इतर कबाडकष्ट कां करावेत? राहणी आमच्याकडील चांभारांपेक्षा पुष्कळ बरी दिसली. तरी पण गांवांत घाणेरडेपणा, बागबगीचे, टापटीप यांची मिसळ दिसली. सर्वसाधारण ब्रह्मदेशांत घराभोवतीं पुष्कळ जागा असतेच. त्यांत कुंड्यांतून गुंफा लावून फुलझाडें आणि भाजीपाला करण्याची चाल चहूकडे आहे. ब्रह्मी लोक (बहिष्कृतांसह) फुलांच्या माळांचे मोठे शोकी! या महारवाड्यासारखीं कांही स्वच्छ आंगणें व फुलांच्या वेलींचे मंडप मला हिंदुस्थानांतील खेड्यांमधून ब्राह्मणांच्या सुद्धा परसांत आढळतील की नाही, याची शंकाच आहे! तरी पण या खेड्यांत मला कुजलेल्या मांसाची दुर्गंधि येतच होती. अशा खेड्यांतून डुकरें कोठेच दिसलीं

नाहीत, पण गावगुंड कुत्रीं मात्र ब्रह्मदेशांत वतनदार इनामदारांप्रमाणें वावरत आहेत. जेथे जावें तेथे त्यांचें स्वागत आहेच्च ! नंतर आम्ही खालील ७ घरें बारकाईने पाहिलीं.

पहिलें घर—वृद्ध मालकीण बैलासाठी सुंभी काढण्या वळीत बसली होती. इतरांप्रमाणें सर्व घर सहा फूट उंच खांबावर बांधिलें होतें. तें सर्व लांकूड व बांबूचें होतें. पक्ष्याच्या घरट्याप्रमाणें शोभत होतें; हवेचा तोटा नव्हता. पुढे पडवी, बाजूस सैंपाकाची खोली, नंतर माजघर, त्याचे बाजूस निजावयाची खोली, अशी प्रशस्त सोय होती. प्रत्येक खोली अजमासें १२×१० फूट लांब रुंद होती. स्वयंपाकाचीं भांडीं मातीचीं, माजघरांत एक मोठा आरसा, भिंतीस पूर्वेकडचे बाजूस पूजेसाठी बुद्धाचें चित्र, निजावयाचे खोलींत मच्छरदाणी असें सामान होतें. भिंती व जमीन बांबूच्या कुडाच्याच होत्या. आई, मुलगा, सून अशीं तीन माणसें. पैकी मुलगा व सून भीक मागावयास गेली होती ! हें मध्यम प्रकारचें घर म्हणावयाचें.

दुसरें घर—मालक तरुण व धडधाकट होता. धंदा भीक मागण्याचा.

तिसरें घर—मालकाचें वय ७३ वर्षें, त्याच्या बायकोचें वय ७७ वर्षें. त्याचा पहिला मुलगा वय ५५, बायको व तीन मुलें. दुसरा वय ५०, बायको व तीन मुलें. तिसरा वय ४०, बायको व दोन मुलें. अशा एकंदर सोळा माणसांचें हें कुटुंब होतें. म्हाताऱ्याचा धंदा वैद्यकीचा, शिवाय भिक्षा ही आहेच. मधला मुलगा दुसरीकडे आपल्या बायकोच्या घरीं राहात होता. नवराबायकोशिवाय सर्व माणसें भिक्षेला गेलीं होतीं. कारण सकाळची भिक्षेची वेळ. चमत्कार हा की, स्वतः भिक्षा मागणाऱ्या बहिष्कृतांचे घरीं सर्वांत पूज्य व श्रेष्ठ मानिलेला फौंजी वर्ग सकाळीं भिक्षा मागायला येत होता. घराला प्रशस्त व स्वच्छ अंगण होतें. उजव्या बाजूस चांगला लतामंडप व भोंवतालीं कुंड्यांतून फुलझाडें होतीं. मंडपांत एक लाकडी मंचक होता. बसावयाची ही आरामवाटिका होती. डाव्या बाजूस स्वतंत्र स्वयंपाकाची जागा होती. हें पहिल्या प्रकारचें घर म्हणावयाचें.

चौथें घर—मालकाचें वय ५२, धंदा वैद्यकीचा, भिक्षा मागत नाही. घर दोन मजली व मजबूत लाकडी होतें. बायकोचें वय ४२, चार मुलें. कोणासही लिहितां वाचतां येत नव्हतें.

पांचवें घर–मुख्य मालकीण नवार विणीत बसली होती. नवरा, बायको व मुलें. राहावयास एकच खोली. हें कनिष्ठ प्रकारचें घर.

सहावें घर–मालक तरुण ताजातवाना. धंदा वैद्यकीचा. बायको व तीन सुंदर मुलें. भिक्षा मागत नाही.

सातवें घर–हें सर्व खेड्यांत सुंदर होय. सागवानी लाकडाचें, खालवर बांधिलेलें, वारनीस केलेलें, अगदी पेटीसारखें. पण नवरा-बायकोचा धंदा केवळ भिक्षेचा ! भिक्षेला गेल्यामुळें घर बंद होतें. प्रशस्त अंगणही होतें.

एक देवालय होतें, तें गांवकऱ्यांनी स्वतःच्या खर्चाने बांधिलेलें. पुढे सभामंडप होता. गाभाऱ्यांत उंच कट्ट्यावर १० लहान मोठ्या बुद्धाच्या मूर्ति होत्या. त्या सर्व सोनेरी वर्खाने मढविलेल्या होत्या. शिवाय दोन मूर्ति संगमरवरी दगडाच्या सुंदर होत्या. चातुर्मास्यानंतर (नवंबरच्या सुमारास) वार्षिक महोत्सव होतो. त्यावेळीं पगान गावांतील सर्व लोक देवास नैवेद्य आणितात. त्यांत मांस, मासे, इ० सर्व प्रकार असतात पण देवळापुढे बळी मारला जात नाही. गांवांत कॉलरा, देवी वगैरे आजार झाल्यास ह्यांतील एका मूर्तीचा छबिना शांतिप्रीत्यर्थ गावांतून मिरविण्यांत येतो. येणेंप्रमाणें मरीआईचें काम बुद्धाला आणि महार मांगाचे अधिकार ह्यांना आहेत. हा सर्व हिंदू परिणाम. फौंजी येऊन ह्या लोकांच्या मुलांचे उपनयनाविधि ह्या सभामंडपात करितात. हीं मुलें फौंजीच्या शाळेमध्यें इतरांबरोबर समान दर्जाने राहतात. फौंजीच्या मठांत भेदभाव नाही. ह्या लोकांतील भिक्षुणी इतर भिक्षुणींच्या संघांत राहूं शकतात. अशी एक भिक्षुणी सध्या आहे.

प्रिन्सिपाल सैन यानी दुभाष्याचें काम उत्तम कौशल्याने व धोरणाने केलें म्हणून ह्या लोकांचा विश्वास आम्हांवर बसला. त्यांनी आपला खरा वृत्तांत सांगितला, एरव्ही उडवाउडवीच केली असती. आम्ही जाऊं तेथे स्त्रीपुरुषांचा घोळका जमत असे. नागडीं, उघडीं, शेंबडीं मुलें काखेंत व जात्याच्या खुंट्याएवढा मोठा चिरूट तोंडांत धरून धुराचे लोट हवेंत सोडीत बायका भोवतालीं जमत असत. प्रथम ज्यांनी भुंकून हैराण केलें तींच कुत्रीं तपासणी चालली असतां पायाशीं स्वस्थ निजून राहात. जणूं काय भुंकणारे वेगळेच होते !

शेवटीं मीं सभामंडपांत मंडळीस बसावयास सांगून ब्राह्मसमाज आणि डिप्रेस्ड क्लासेस मिशन ह्यांवर सुमारें १५ मिनिटें व्याख्यान दिलें. तें प्रि. सैन यांनीं ब्रह्मी भाषेंत समजावून सांगितलें. मंडळींना तें आवडलें. असेंच मिशन ब्रह्मदेशांत काढावें, अशी त्यांनी कळकळीची इच्छा दाखविली. प्रि. सैन 'आपण या कामीं मदत करूं' म्हणाले. वेळवाच्या टोपल्यांवर लाख मढवून सुंदर भांडीं करण्याच्या सरकारी शाळेचे ते प्रिन्सिपाल आहेत. त्याला लॅकर (लाख) स्कूल (शाळा) असें नांव आहे. पण त्या शाळेंत ह्यांच्या मुलांना घेण्यास मात्र प्रि. सैन तयार नव्हते. कारण यांची शाळा निघून तीन वर्षें झालीं, तरी ती अद्यापि प्रयोगाचे अवस्थेंत आहे. यांचीं मुलें आल्यास वरिष्ठ वर्गांचीं मुलें शाळा सोडतील ही त्यांना अद्यापि भीति आहे! हो सर्व तपासणी व माझें डिप्रेस्ड क्लासेस मिशन प्रि. सैनच्या पत्नीला फार आवडलें. दोन प्रहरीं पत्ते खेळतांना तिने जो पैसा जिंकला होता तो सर्व ह्या कामासाठी द्या, असें म्हणाली!

निरीक्षण चौथें : न्याँऊ—२७ मार्च १९२७ रविवारीं सकाळीं ९ वाजतां आम्ही न्याँऊ पश्चिम येथे पोचलों. श्वेझिंगो पगोडा पाहिला. हा अनिरुद्धाने (इ. स. १०४४—१०७७) बांधण्यास सुरवात केली. याची पूर्ति त्याचा समजला गेलेला मुलगा कॅझिटा ह्या राजाने (इ. स. १०८४—१११२) केली. अनिरुद्धाने थाटूनचा राजा मनुहा ह्याला युद्धांत जिंकून त्याच्या सगळ्या प्रजेला कैदी करून पगानला आणिलें. मनुहाने इ. स. १०५९ त "मनुहाचें देऊळ" म्हणून प्रसिद्ध असलेला पगोडा पगानमध्यें बांधिला. शेवटीं त्याला असें मोकळें ठेवणें इष्ट न वाटल्यामुळें, अनिरुद्धाने त्याच्या कुटुंबांतील सर्व माणसें व त्याचे सर्व लहानथोर चाकर व अनुयायी यांना देवळी गुलाम करून त्यांचा सामाजिक दर्जा अत्यंत क्रूरपणाने अतिशय नीच करून टाकिला. श्वेझिंगो देवळाची झाडलोट करण्याचे कामावर इतरांप्रमाणें मनुहाची नेमणूक झाली. त्यापूर्वीही देवळी गुलाम होतेच. मात्र मनुहाच्या वंशाला अशा देवळी गुलामांचें 'राज्यपद' देऊन दुःखावर अपमानाचा डाग दिला. अगदी आतापर्यंत श्वेतछत्र, पायात सोन्याचा कलाबतूचा जोडा, घराला सरळ उभा जिना इ. राजचिन्हें मात्र

मनुहाच्या वंशजास अद्यापि कायम आहेत. मात्र त्यांना देवाचा नैवेद्य व देव्हाऱ्यावरच्या देणगीशिवाय उपजीविकेचें साधन दुसरें नव्हतें. हें त्यांना पूर्वी मुबलक मिळत असावें. एरव्ही त्यांना अशा लवाजम्याने कसें राहतां येईल !

अशा देवळी नोकरांना फयाझून–देऊळ + नोकर–अशी संज्ञा आहे. तुबायाझा आणि फयाचून हे एकमेकांस महाराष्ट्रांतील महारामांगांप्रमाणें कमी लेखितात. तुबायाझांचें म्हणणें आपण कधी जिंकलेले गुलाम नव्हतों. फयाझुनांपैकी मनुहाच्या खानदानी अनुयायांचें म्हणणें तर उघडपणेंच आपण श्रेष्ठ असून कोणतेंही हलकें काम आपण केलें नाहीं. पण ज्याअर्थी ते जिंकलेले गुलाम आहेत, त्याअर्थी कोणी त्यांच्याकडे तिरस्काराशिवाय पाहणार नाहीत. आम्ही ह्या गांवीं या लोकांचा राजा म्हणा, पाटील म्हणा, जो होता, त्याची भेट घेतली. त्याचें नांव उ बा ल्वीन (Ubalwin) वय २७. हल्ली हा आपल्या बायकोच्या घरीं राहतो. तिचा बाप खाऊन पिऊन सुखी व स्वतः रुबाबदार दिसला. बायकोच्या माहेरचें मध्यम प्रकारचें दुकान व तिच्या बापाचा वैद्यकीचा धंदा आहे. घर दोन मजली व भोंवतालीं स्वच्छ आंगण, लतामंडप, भोंवतालीं कुंड्यांतून फुलें दिसलीं. उ बा ल्वीन आता फायाझुन गांवचा राजा अथवा थजी ऊर्फ पाटील झाला आहे. ह्यांनी सरकारी रजिष्टर काढून दाखविलें. त्यावरून ह्या फायाझून वाडींत ५०९ घरें आहेत, असें आढळलें. लोकसंख्या सुमारें २००० असावी. ह्या गावासाटी एक सरकारी प्राथमिक मोफत शाळा आहे. पण ह्या लोकांवरचा बहिष्कार पूर्वीप्रमाणें आता कडक नाही. ह्यांच्या विहिरींतील पाणी वरचे वर्ग खुशाल पितात. उघड रोटी बेटी व भेटी व्यवहार मात्र अद्यापि होत नाहीत. ह्यांच्यापैकी बरेच लोक दुसरीकडे खाऊन पिऊन सुखी आहेत, व ते बिनबोभाट वरच्या वर्गात मिसळून जातात.

पक्कोक म्हणून एक जिल्ह्याचा गाव आहे, तेथे एक गृहस्थ ४०।५०हजाराचे मालक आहेत. ते म्युनिसिपालिटीचे सभासद आहेत, घरीं स्वतःच्या मोटारी आहेत, लाखेची भांडीं व इतर बरेच धंदे करितात. तुबायाझाप्रमाणें थडगीं खणणें व भिक्षा मागणें हें ते करीत नाहीत. मात्र देवळाचे दारांतून फुलें, मेणबत्या, उदकाड्या, पंखे वगैरे

विकणाऱ्या दुकानांची जी रांग असते, ती ह्याच लोकांची. नंतर आम्हांला उ बा ल्वीन यांनी पगानचे रस्त्याचे पश्चिम बाजूकडील वाडींत असलेला आपला वंशपरंपरागत खास राजवाडा दाखविला. हा खरोखरच आमच्याकडील खेड्यांतील एकाद्या श्रीमंत पाटलास शोभण्यासारखा आहे. वाड्याच्या नैऋत्य कोपऱ्याला लागून एक लाकडी मनोरा दिसला. तो सर्व घरांपेक्षा उंच होता. ह्यावर रखवालदार बसून रात्रीं पहारा करण्याची ही जागा. वाडा इतर घरांप्रमाणें खांबाच्या एका मजल्यावर उभा केला होता. सर्व घर एकच मजली पण भक्कम व रुबाबदार दिसलें. पूर्वी ह्याला दोन जिने (एक समोर व दुसरा आडवळणाचा भिंतीला समांतर असा) होते. समोरचा जिना पडल्यामुळें आता दिसला नाही. ह्या समोरच्या जिन्याच्या पायऱ्या चढण्यास मात्र देशाच्या बादशहाशिवाय इतरांला अधिकार नसे. सफाईदार सागवानी लाकडाचें सर्व काम होतें. खिडक्यांना व्हेनिशिअन शटर्स (झडपें) होतीं. दरवाजे विशेष सफाईदार दिसले. दिवाणखाना, निजण्याच्या खोल्या, स्वयंपाक घर हीं सर्व ऐसपैस, उंच व रुंद होतीं. एक मोठा रुंद लाकडी पलंग व त्यावर सुंदर मच्छरदाणी होती. घरांतील चटयाही खानदानी थाटाच्या होत्या. एकंदरींत थाट मोडकळीस आलेल्या इनामदारीचा दिसला, हें पाहून वाईट वाटलें.

उ बा ल्वीन पाटलाची आई ६० वर्षांची वृद्ध आहे. तरी तिचें वय दिसण्यांत सुमारें ५० वर्षांचें दिसलें. चेहरा शांत प्रसन्न खानदानीचा दिसला. तिचे सर्व दांत स्वच्छ, बळकट, डोळे मोठे व पाणीदार दिसले. हिचा नवरा उ नान पाटील वारून आता १८ वर्षें झालीं, असें तिने सांगितलें. त्याच्यामागें तिच्या दोन मुलांला पाटिलकीचीं वस्त्रें मिळालीं. तेही वारल्यामुळें सर्वांत लहान मुलगा उ बा ल्वीनला आता पाटिलकी मिळाली आहे. मी हिंदुस्थानांतील एका उदार (ब्राह्म) धर्माचा प्रचारक, विशेषत: निकृष्ट वर्गाचा एक सेवक आहें, असें तिला सांगण्यांत आलें होतें, त्यामुळें ह्या देशांतील फौंजीपुढे जमिनीवर लवून त्रिवार नमस्कार करितात, तसा तिने मलाही नमस्कार केला. आमचें संभाषण चाललें असता तिने माझें काम व हुद्दत लवकर ताडलें. त्यामुळें तिचे पाणीदार डोळे दाबून ठेविलेल्या विरळ अश्रूनें स्निग्ध झालेले दिसूं लागले. शेवटीं सरकारला सांगून कांही तरी आपली दाद लावा,

अशी स्पष्ट विनंती केल्यावाचून तिला राहवेना. हें माझ्या हातून या धांवत्या सफरींत व उतार वयांत कसें व्हावें, हें आठवून मीही किंचित् गडबडलों. मी केवळ मनःपूर्वक आशीर्वाद देऊन माझें समाधान करून घेतलें.

दक्षिण ब्रह्मदेशांत मोलमेनच्या उत्तर किनाऱ्यालगत थट्टून हें शहर इतिहासप्रसिद्ध आहे. ह्या स्थानीं दक्षिणेकडील सिंहली हीनयान बुद्ध धर्माची पहिली उठावणी झाली. येथे कांची येथूनही बुद्ध धर्माची लाट आली. येथील राजे आंध्र वंशांतील हिंदी क्षत्रिय कुळांतील असून तेलंग ह्या नांवाने एक हजार वर्षांपूर्वी त्यांचा दबदबा साऱ्या ब्रह्मदेशांत होता. पण इ. स. १०५० चे सुमारास पगानचा ब्रम्ही राजा अनिरुद्ध याने थट्टून राज्यावरून सफाई नांगर फिरवून ह्या क्षत्रियांना आता अत्यंत हीन बनविलेलें प्रत्यक्ष पाहण्याची पाळी माझ्यावर आली ! इतिहासाची पुनरावृत्ति चहूकडेच होते. आमच्या देशांत ज्या आज महार,मांग,पारिया, चिरुमा, नामशूद्र, इ० अनेक नांवांच्या जाती आहेत, त्यांनीही एकेकाळीं राज्यवैभव भोगिलें, असें माझ्या संशोधनांत आढळलें आहे. पण इतका अलीकडचा उघड पुरावा मला आजवर मिळाला नव्हता; त्यामुळें मला संशोधनाच्या दृष्टीने आनंद होत होता, किंवा मानवी स्वभावांतील आनुवंशिक विषारीपणाचा मासला प्रत्यक्ष पाहून दुःख होत होतें, हें उघड सांगण्यांत कांही तात्पर्य नाही. मी करीत आहें, हें कार्य पवित्र आहे, येवढेंच मला पुरें आहे.

निरीक्षण पांचवें—शुक्रवार ता. १ एप्रील १९२७ रोजीं सायंकाळीं प्रोम येथील श्वेमानडो ह्या मुख्य पगोडाच्या बाजूस असलेला तुवायाझाचा गाव पाहिला. गाव गरीब लोकांचा दिसला. गाव दाखवावयास एक इंग्रजी जाणणारे ब्रह्मी गृहस्थ बरोबर होते; परंतु ह्या खेड्यांत शिरून चौकशी करण्याचें त्यांना धैर्य झालें नाही. एकाद्याची खासगी चौकशी करण्याची ब्रह्मी लोकांस फार भीड व भीति वाटते, असें दिसतें. मोलमेनमध्यें मला हाच अनुभव आला. ह्या गृहस्थांनी मला मुकाट्याने गावापासून दूर नेलें. मला ब्रह्मी येत नसल्याने स्वतः चौकशी करितां आली नाही व हे गृहस्थ तर फारच भित्रे दिसले. माझी खडतर निराशा झाली. तेव्हा मी जवळच्या पगोड्यांत गेलों. तेथे एका वृद्ध गृहस्थाजवळ थोडी चौकशी

केली. 'हे तुमचेयाझा आहेत' ह्यापलीकडे हे गृहस्थ कांही सांगूं शकले नाहीत. आटपलें.

येणेंप्रमाणें ब्रह्मदेशांतील मूळ बहिष्कृत वर्गांची हल्लीची स्थिति आहे. हिंदुस्थानांतून अलीकडे गेलेले अस्पृश्य जातींचे लोक ब्रह्मदेशांत ठिकठिकाणीं पोटासाठी अनेक हलकीं सलकीं व काबाडकष्टाचीं कामें करून पुष्कळ आहेत; पण ते बहिष्कृत नाहीत.

भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न

खंड दुसरा : अस्पृश्यतेचा प्रश्न

प्रकरण सातवें

संख्या आणि लक्षणें



अखिल हिंदुस्थानांत म्हणजे ब्रिटिशांच्या व एतद्देशीय संस्थानांच्या अमलाखाली असलेल्या प्रांतांत आणि शिवाय ब्रिटिश साम्राज्याखाली आलेल्या सरहद्दीवरील देशांत अस्पृश्य गणलेल्या मोठ्या जनसमूहांत किती भिन्न भिन्न जातींचा समावेश होतो आणि त्या प्रत्येकाची संख्या किती आहे, तसेंच ह्या अनेक जातींचें किती मुख्य लक्षणांनी पुनः वर्गीकरण होऊं शकतें ह्या गोष्टी ह्या प्रकरणांत पाहावयाच्या आहेत.

ह्या अफाट देशावर ब्रिटिशांचें आधिराज्य झाल्यावर येथील एकंदर जनतेची पहिली शिरगणती इ.स. १८६७ ते ७२ च्या दरम्यान झाली. पण त्या वेळीं कित्येक मोठ्या संस्थानांतील जनतेची गणती झाली नाही. पुढे दोन दशकांनी म्हणजे इ. स. १८८१ आणि १८९१ सालीं अधिक अधिक पूर्णत्वाने खानेसुमाऱ्या झाल्या. पण आधुनिक समाजशास्त्राच्या दृष्टीने सर्वांगपूर्ण अशी खानेसुमारी इ. स. १९०१ सालच्या मार्च महिन्याच्या पहिल्या तारखेच्या रात्रीं झाली. ह्या गणनासत्राचे मुख्य अध्वर्यु एच्. एच्. रिस्ले आणि त्यांचे साथीदार इ. ए. गेट हे होते. ह्यांच्या बहुमोल रिपोर्टांचीं अखिल हिंदी साम्राज्यांचीं आणि प्रांतवार अजस्र पुस्तकें इ. स. १९०३ सालीं प्रसिद्ध झालीं. ह्याच वर्षी मी माझा विलायतेंतील ऑक्सफर्ड विद्यालयांतील तौलनिक धर्म आणि समाजशास्त्राचा अभ्यास आटपून स्वदेशीं परत आलों. ब्राह्म समाजाचा

प्रचारक म्हणून पुढील कित्येक वर्षें हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांत फिरण्याचा मला सुयोग घडला. तेव्हा अखिल भारतांतील मानीव अस्पृश्यांची स्थिति सुधारण्याकरितां सुसंघटित प्रयत्न करणारी एक अखिल भारतीय मंडळी स्थापण्याचा मी संकल्प केला. त्याची तयारी म्हणून प्रथम मला ह्या खंडवजा देशांत ह्या मानीव अस्पृश्यांची संख्या किती आहे, हें नक्की ठरविणें अवश्य वाटलें. ह्या रिपोर्टांत शोधून पाहतां अस्पृश्यांचे जातवार आणि प्रांतवार जे आकडे मिळाले, ते एकत्र करितां एकूण ५,३२,३६,६३२ हा अवाढव्य आकडा तयार झालेला पाहून मी स्वतःच आश्चर्याने थक्क झालों. पुनः पुनः तपासून पाहिलें तरी हा आकडा बळकटच झाला. शेवटीं तो मी इंग्रजी दैनिकांतून आणि मराठी मासिकांतून, शिवाय स्वतंत्र पुस्तक रूपाने प्रसिद्ध केला. तोंवर अस्पृश्यांची संख्या खरोखर एवढी मोठी असेल अशी कोणाची कल्पनाच नव्हती. आश्चर्य सर्वांनाच वाटलें. पुष्कळांनी कुरकूर केली. पण सांगोपांग विचार करून हा आकडा कमी आहे असें कोणीच सिद्ध करावयाला पुढे आलें नाही. सन १९०१ ह्या वर्षी अखिल भारताची जन-संख्या २९,४३,६१,०५६ होती. तिच्यापैकी ५ कोटीहूनही जास्त वरील संख्या अस्पृश्यांची ठरली. त्यामुळें **एक षष्ठांश भारत अस्पृश्य** हें एक पुढे म्हणदवाक्यच बनून राहिलें ! त्याला अद्यापि बाधा आलेली नाही.

त्यानंतर आजवर तीन दशवार्षिक खानेसुमाऱ्या झाल्या; तरी प्रस्तुत लेखाकरितां मला स. १९०१ सालच्या खानेसुमारीचा हवाला घ्यावा लागत आहे. ह्याचीं कारणें अशीं. हिंदी–विशेषतः हिंदू–समाजाचे लौकिक दृष्ट्या जे दर्जे ठरविण्यांत आले आणि त्या दृष्टीने भिन्न वर्गांचे एकूण आकडे प्रसिद्ध झाले ते ह्याच १९०१ सालीं. ह्या पद्धतीचा स्वीकार मागील दशकांत झाला नव्हताच, पण पुढील दशकांतही झाला नाही हें आश्चर्य ! दुसऱ्या कित्येक दृष्टीने दर्जे ठरविण्याची ही पद्धत अप्रिय, अनिष्ट व कांही प्रांतीं तर अशक्य ठरली होती, तरी, ही योजना (Social Grouping) रिस्ले साहेबांनी इतकी मेहेनत घेऊन व विरोध सोसून तयार केली नसती व तिला अनुसरून प्रांतवार आकडे मागवून प्रसिद्ध केले नसते तर अस्पृश्यांचा वरील आकडा ठरविण्यास दुसरा मार्गच उरला नसता. ह्यांचेच साथीदार इ. ए. गेट हे

पुढील म्हणजे १९११ सालच्या खानेसुमारीचे प्रमुख होते, तरी त्यांनी ह्या योजनेप्रमाणें आकडे निराळे प्रसिद्ध केले नाहीत. कर्झनशाहीची कारवाई, बंगालची फाळणी, राजकारणी अस्वस्थता, हिंदु–मुसलमानांचें परस्पर संख्याबळ ठरविण्याचें महत्त्व, वगैरे आगंतुक कारणांनी अस्पृश्यांचें संख्यामापन ही अधिक नाजूक बाब होऊं लागली. तथापि ह्या संख्येंत म्हणण्यासारखा मोठा फरक पडला असावा असें वाटत नाहो. संख्याशास्त्राच्या अनुसारें तीस वर्षांत या संख्येंत भरच पडलेली असणार. उतार होण्याचें कारण नाही. अस्पृश्यतानिवारकांच्या प्रयत्नांनी अस्पृश्यतेचा जोर कमी झाला आहे. पण त्यामुळें अस्पृश्य ठरलेल्यांची संख्या कमी होण्याचें कारण काय !

वरील कारणामुळें आणि गेल्या दोन दशकांचे रिपोर्ट मिळविणें-ही फार त्रासाचें व खर्चाचें झाल्यामुळें मी १९०१ सालचेच आकडे पुनः ह्या लेखासाठी तपासून पुढील याद्या तयार केल्या आहेत. सत्तावीस वर्षांपूर्वी प्रांतवार अस्पृश्यांच्या कांही प्रमुख जातींची संख्या प्रसिद्ध केली होती. आतां लहान सान मिळतील तितक्या सर्व जातींची संख्या शोधून ती पुढे दिली आहे. पूर्वी प्रसिद्ध केलेली प्रांतवार संख्येची एकुणात ५,३२,३६,६३२ झाली तर आतां दिलेली सुमारें ३०० भिन्न जातींची एकुणात ५०,७,२९,२२४ झाली आहे. ही सुमारें २५ लाखांची तूट आलेली आहे ह्याचें कारण त्या वेळीं अस्पृश्य मानलेल्या सर्व जातींचा ह्या नवीन यादींत समावेश केलेला नाही. उदाहरणार्थ, छोटा नागपूर प्रांतांतील ओरावन, सांताळ वगैरेंचा समावेश नवीन यादींत केलेला नाही. कारण त्या जाती केवळ जंगली आहेत; त्या-पैकी सर्वच अस्पृश्य नाहीत. मुंबई इलाख्यांतील सुमारें २ लाख बेरडां-चाही समावेश केला नाही. कारण ह्या लोकांनी शंकराचार्याकडे दाद लावून घेऊन स्वतःची स्पृश्यता शाबीत करून घेतली आहे. नवीन यादींत सर्वच अस्पृश्य जातींचा समावेश झाला आहे, असेंही म्हणवत नाही. खरा आकडा ठरविणें फार कठीण, जवळ जवळ अशक्य काम आहे. पण तो आंकडा पूर्वीच्याच एकुणातीजवळ अधिक आहे असें धरून चालण्यास हरकत नाही. कांही झालें तरी एक षष्ठांश भारत अस्पृश्य ह्या विधानाला कांही अद्यापि हरताळ लागत नाही.

पुढील नवीन यादींत ३००च्या वर निरनिराळ्या अस्पृश्य मानलेल्या जातींचीं नांवें व त्यांची संख्या दिली आहे. त्यांच्या अस्पृश्यतेचीं कारणें पुढीलप्रमाणें निरनिराळीं पांच असूं शकतात. ह्या पांच लक्षणांनुसार कांही प्रमुख जातींचें येथे प्रथम वर्गीकरण करून दाखविलें आहे.

१. धंद्याच्या हीनपणामुळें

१. मोची, चांभार, ढोर, खालपा, भांबी, डबगर (कातड्याची कामें करणारे).
२. धोबी, रंग्रज (रंगारी).
३. पाशी, पारधी, बेडर, भिल्ल, बिल्लव, बागरी, किरात, वेट्टुवन.
४. भंगी, हलालखोर, म्हेतर, डोम.
५. सुणगार, चुन्नर, सुन्नरी (चुना करणारे).
६. पान, होलया, भूमीज, भोई, धाशिया, ढाणक (शेतांतले गुलाम).
७. सिंयाल (ताडीवाले), कल्लार, शानार (दारु गाळणारे).
८. कोळी, जालीया, कैवर्त (मासे धरणारे).
९. तुबयाझा, डोम, चंडाळ, महार (मसणवटींत काम करणारे).
१०. बांसफोर, बासोर,बुरूड (वेळूची कामें करणारे).
११. वणकर, तांती, जिनगर (शिवणें अगर विणणें करणारे).
१२. धनगर, तांबट, तेली, कुंभार (विशिष्ट प्रांतांतच हे अस्पृश्य आहेत).
१३. मुसाहर (उंदीर धरणारे).
१४. चक्कलियन, शिकलगार, शक्की (चाकावर धार लावणारे आणि कातडी कामें करणारे).
१५. मघ, मेघ, गुरुडा, पंबाडा, दास, नाथ, जोगी, वर्णब्राह्मण, कपाली, दावली (निषिद्धधर्मी व हीन जातींचें पौरोहित्य करणारे).
१६. खाटीक, कसाई.
१७. सनाई, बाजगी, वाजंत्री, परैय्या (ढोल बडविणारे).

२. प्राचीनकाळीं स्वतंत्र, पण पुढे जिंकले गेल्यामुळें

१. मेघ, म्हेर, म्हेतर, म्हार, मोघिया, मोगेर.
२. मांग, मादिग, मातंग.

३. बळहाई, ढाणके, डोम.
४. नमशूद्र, पोड (पौंड्र), राजबंसी, कोच, मेच्च, गारो.
५. नाग, नायकडे, नायाडी.
६. माल, मालो, माळी.
७. हाबर, बाथुरी, बावुरी.
८. पुलया, चिरुमा, परैया, पळ्ळ, व्हलया.
९. कोल, गोल्ल, कोरी, कोरवी.
१०. येझवा, येळवा, तिय्या.
११. तुवयाझा (अशुभ राजा), फयाचून.
१२. चंड, मुंड, कंड, खोंड, गंड, गोंड.
१३. ओरावन, सांताळ, हो.

२. बौद्ध व इतर पाषंड मानलेल्या धर्मांतून हिंदुधर्माच्या अंमलाखाली बिनशर्त न आल्यामुळें

परैय्या, नमशूद्र, पोड (पौंड्र), बावुरी, सवर, येझवा, येळवा, तिय्या वगैरे.

४. जंगली अवस्थेंत राहिल्यामुळें

भिल्ल, गोंड, खोंड, फासेपारधी, आडवीचिंचि, वगैरे. [ह्या जाती क्वचित् अस्पृश्य भासतात. पण त्यांना सरासर अस्पृश्य कोटींत घालतां येणार नाही.]

५. मनुस्मृतींत वर्णिलेल्या प्रतिलोमामुळें, (व्यभिचारी अथवा गुन्हेगार)

भामटे, ठग, देवदासी, वाघे, मुरळ्या, मातंगी वगैरे.

[पण ह्यांपैकी कोणीच अस्पृश्य झालेले दिसत नाहीत. शेवटची मातंगी अस्पृश्य आहे, पण ती मांग जातीची म्हणून, व्यभिचार करते म्हणून नव्हे. ह्या गोष्टीवरून, मनुस्मृतींत, जी प्रतिलोम शरीरसंबंधावरून म्हणजे ब्राह्मण स्त्री व शूद्र पुरुष ह्यांच्यापासून निर्माण झालेली संतति, तिला चांडाल हें नांव देऊन तिला अस्पृश्य व बहिष्कृत ठरविलें आहे, तें मत कसें निराधार आहे तें उघड होतें.]

वरील वर्गीकरणांत कांही जातींचीं नांवें पुनः पुनः आलेलीं आढळतील. विशेषतः पांचही लक्षणांच्या जातींतील सर्वच नसल्या तरी बऱ्याच व्यक्ति आता अगदी हीन धंदे करीत असलेल्या आढळणें साहजिक आहे. ज्या जाती पूर्वी स्वतंत्र आणि सुसंपन्न होत्या त्या कालवशात् जित झाल्याने अस्पृश्य व बहिष्कृत केल्या गेल्यावर त्यांना हीन धंदे करणें प्राप्त झालें. आधुनिक काळांत त्यांना थोडा वाव मिळाल्यामुळें त्या जातींपैकी पुष्कळशा व्यक्ती वरिष्ठ धंदे करूं लागल्या आहेत. बंगाल्यांत नमःशूद्र, मद्रासेकडे (मलबारांत) येझवा, बिलवा वगैरेमध्यें पुष्कळ विश्वविद्यालयाचे मोठमोठे पदवीधर, वकील, डॉक्टर, कौन्सिलर्स, पेढीवाले व पुढारी म्हणून आता चमकूं लागले आहेत. तांबट, तेली, धोबी, माळी, आणि कुंभार, धनगर अशा स्वच्छ जातीही कांही कानाकोपऱ्यांतील प्रांतांतून अस्पृश्य असलेल्या खानेसुमारींत पाहून आश्चर्य वाटतें. गुजराथेंतील ढाणके व माळव्यांतील बळहाई (बलाई) ह्या जाती केवळ कृषिकर्म व मोलमजूरी करणाऱ्या असून व्यवहारांत मुळीच अस्पृश्य नाहीत. आता अशा जातींची अस्पृश्यता व्यवहारांत बहुतेक नष्ट झालेली आहे. पण एकेकाळीं अशांनाही हा डाग लागला होता, ह्यावरून अस्पृश्यतेच्या प्रश्नाची व्यापकता किती मोटी आहे हें दिसतें. म्हणून ह्यांचा उल्लेख करावा लागला आहे. ह्या जाती स्वच्छ धंदे करणाऱ्या असून, आणि पूर्वीपासून ह्या अस्पृश्य होत्याच असा पुरावा नसून, त्या आता अस्पृश्य मानल्या जाण्याचें कारण, ह्या मध्यन्तरींच्या काळांत बौद्ध झाल्या असल्या पाहिजेत व ह्या लवकरच ब्राह्मणी हिंदू धर्माच्या हुकमतीखालीं न आल्यामुळें अस्पृश्य मानल्या गेल्या. ह्या बाबीचा विचार पहिल्या खंडांत झालाच आहे.

संख्येची आणि व्याख्येची ओढाताण

इ. स. १९०७–८ चे सुमारास मी इ. स. १९०१ च्या खानेसुमारींतून प्रथम हिंदुस्थानांतील एकंदर अस्पृश्य मानलेल्या लोकांची वट्ट संख्या पांच कोटी बत्तीस लक्ष छत्तीस हजार सहाशें बत्तीस (५,३२,३६,६३२) ही प्रसिद्ध केल्यापासून ह्या प्रचंड संख्येचीच नव्हे तर माझ्या व्याख्येची सारखी ओढाताण चाललेली पाहून केव्हा केव्हा

बरीच करमणूक होते ! ह्याच सुमारास बंगाल्यांत फाळणीची मोठी चळवळ उडाली. त्या वेळीं हिंदू–मुसलमानांची मोठी तेढ पडली. अस्पृश्यांना ज्याअर्थी हिंदु इतके वाईट वागवीत आहेत त्याअर्थी त्यांच्यांतील जवळ जवळ एक चतुर्थांश मानीव अस्पृश्य भागाची गणना हिंदु समजून त्यांच्यांत न व्हावी अशा मुसलमानांच्या सूचना येऊं लागल्या. उलट हिंदूंना अस्पृश्य भाग निदान राजकारणापुरता तरी आपल्यांतून बाहेर फुटून जाईल की काय ही भीति पडून त्यांनी हा भाग अस्पृश्य असला तरी हिंदूच आहे असा आग्रह धरिला. पुढे लवकरच १९११ची खानेसुमारी होणारी होती. सरकारांनी आपलें १९०१ सालचें धोरण बदलून, हिंदु समाजाच्या निरनिराळ्या दरजांच्या निरनिराळ्या वट्ट संख्या प्रसिद्ध करण्याचें स. १९११ च्या खानेसुमारींत टाळलें. अस्पृश्य वर्ग हे सर्व हिंदू नसून त्यांच्यांतील बराच भाग पिशाचपूजक (Animist) असावा असें भासविण्याचा ते विचार करूं लागले. तथापि कोणी म्हणण्यासारखा उद्योग करून वरील वट्ट आंकडा आणि व्याख्या परिणामकारक रीतीने बदललेली माझ्या तरी ऐकिवांत नाही. मात्र ही संख्या वरच्याहून लहान ठरेल तर बरें, अशी हिंदु, मुसलमान व सरकार ह्या सर्वांचीच अंतर्गत इच्छा–मग ती कितीही भिन्न हेतूने असो–आहे हें खरें, पण केवळ इच्छेने आकडा कसा बदलावा !

पुढील कोष्टकें पाहिल्यास, आर्य, द्राविड, सिथियन, मोगल इत्यादि वंश दृष्टीने गणना करून दिलेली अस्पृश्यांची वट्ट संख्या सन १९०१ सालीं ५,३१,९६,६३२ झाली आणि हल्लीच्या सुमारें ३०० निरनिराळ्या अस्पृश्य मानलेल्या जातींची प्रांतवार संख्या ५,१७,३८,६७३च भरली. असें दिसून येईल. (पृ. १०१, १०२ पहा.) ह्यांत तफावत जवळ जवळ १५ लाखांची येते तिचीं कारणें मी वर दिलेलींच आहेत. ह्यांपैकी मुंबई इलाख्यांतच १० लाखांची तूट, तर पंजाब, काश्मीर, राजपुताना ह्या भागांत जवळ जवळ १२ लाखांची वाढ दिसून येते. ही तफावत कांही

जातींची गणना एके ठिकाणीं अस्पृश्यांत झाल्यामुळें व दुसरीकडे त्या जातींचीं न होतां निराळ्याच जातींची झाल्यामुळें पडलेली असली पाहिजे. माझें हें म्हणणें, प्रत्यक्ष खानेसुमारींतील सर्व प्रांतांचे आकडे पुढे ठेवून आकडे मोडण्याची दगदग केल्याशिवाय कोणाच्या लक्षांत यावयाचें नाही. ह्या तीस वर्षांत अस्पृश्यतानिवारणाच्या प्रयत्नाने ही संख्या फार थोडी कमी झाली असावी. उलट अखिल हिंदुस्थानची लोकसंख्या पांच साडेपांच कोटींनी वाढलेली आहे त्या वाढीचा हिस्सा अस्पृश्यांना मिळून त्यांची संख्या ६ कोटीजवळ जाणें संभवनीय आहे. निदान ५॥ कोटींच्या खाली जाण्याचे कांही कारण नाही.

मुंबई इलाख्यांत दोन वर्षांपूर्वी स्टार्ट कमिटीने चौकशी केली. तिने ज्या जातींचा समावेश केला आहे त्यांची वट्ट संख्या सुमारें १४ लाखच दिली आहे. पण त्यांचे तपशीलवार आकडे न देतां त्यांनी हा वट्ट आकडाच कोठून मिळविला हें कळत नाही. माझा आकडा २१ लाख आहे, तो २० वर्षांपूर्वीचा आहे.

ह्या संख्येचा असा गोंधळ आणि ओढंताण होण्याचें दुसरें एक मुख्य कारण असें की अस्पृश्यांची व्याख्या ठाम करणें आणि ती ठरली तरी तशा व्याख्येबरहुकूम खानेसुमारींतील भाडोत्री गणकांकडून नेमकी गणना होणें ही सोपी गोष्ट नाही. हिंदुस्थानांत, मी पहिल्या खंडांत ठरविलेल्या व्याख्येप्रमाणें "अस्पृश्य" ठरणारे वर्गच नुसते आहेत असें नव्हे, तर जंगली जाती, आणि जंगली असोत नसोत, गुन्हेगार समजले जाणारे इतर वर्ग आहेत. ह्या दुसऱ्या दोन भिन्न वर्गांची संख्या होतां होईल तोंवर माझ्या वरील कोष्टकांतून मी येऊं दिलेली नाही. ह्या तीन्ही, म्हणजे १ अस्पृश्य, २ जंगली आणि ३ गुन्हेगार वर्गांचा एकमेकांत गणनेच्या वेळीं भेसळ होणें, कितीही खबरदारी घेतली तरी अगदी सहज आहे. राजकारणाच्या, राज्यकारभाराच्या, धर्माभिमानाच्या, सामाजिक इज्जतीच्या अगर इतर कोणत्याही अशाच आगंतुक सबबीमुळें वरील खबरदारींत ढिलाई झाली की अस्पृश्यतेची मुळीं व्याख्याच बदलते;

आणि ती तशी बदललेली वरील कोणाही बेखबरदार व पक्षाभिमानी माणसांच्या, अगर त्यांच्या अडाणी हस्तकांच्या मुळीं लक्षांतच येत नाही. त्यामुळें हा संख्येविषयीं वाद वेळोवेळीं माजतो. ह्या सर्व गोष्टी पूर्णपणें लक्ष्यांत घेऊनच मी वरील कोष्टकें जबाबदारीपूर्वक पुनः पुनः तपासून प्रसिद्ध करीत आहें. दहापांच लाख संख्या कमी झाली काय किंवा वाढली काय, ही मोठी गोष्ट नाही. साधारण मानाने हिंदुस्थानाच्या वट्ट लोकसंख्येचा एक षष्ठांश आणि हिंदूंच्या वट्ट लोकसंख्येचा एक चतुर्थांश भाग अस्पृश्य मानला जात आहे, हें खानेसुमारीचें विधान दुर्दैवाने अद्यापि अढळच आहे !

अस्पृश्यांच्या संख्येची व व्याख्येची अशी ओढाताण चालली असतां अलीकडे दोन तीन वर्षें हिंदुस्थानची राज्यपद्धति सुधारण्याचा विचार ब्रिटिश पार्लमेंट करूं लागली आहे त्यामुळें तर सर्व जाती आणि पक्ष ह्यांमधून धुमाकूळ चालला आहे. अशा परिस्थितींत वरील ओढाताण अधिकच वाढली आहे. लॉर्ड लोदियनच्या प्रमुखत्वाखाली जी फ्रँचाइझ कमिटी नेमली होती तिचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे. त्यांत ह्या व्याख्येचा व संख्येचा सर्व बाजूंनी विचार करूनही त्यांना निर्णायक मत देतां आलें नाही अशी कमिटीने कबुली दिली आहे. तरी शेवटीं जी कामचलावू व्याख्या त्यांनी ठरविली ती मी वर केलेली आहे तशीच ठरविली. म्हणजे, धंदा, दर्जा, सांपत्तिक अथवा शैक्षणिक स्थिति कशीही असो, ज्यांना रूढीमुळें वरिष्ठ म्हणाविणारे हिंदू अस्पृश्य आणि बहिष्कृत मानतात, ते सर्व अस्पृश्य होत.ह्या लोदियन रिपोर्टाचें पुस्तक पहिलें पान ११९ वर, अखिल हिंदुस्थानांतील अस्पृश्यांची संख्या निरनिराळ्या कमिट्यांनी अगर खात्यांनी कशी निरनिराळी ठरविली आहे तें एका कोष्टकांत दिलें आहे. हें कोष्टक खाली उद्धृत केलें आहे. यांतील आकडे १० लाखांचे आहेत. ह्यांत संस्थानांतील अस्पृश्यांचा समावेश केला नाही. पण यानंतर येणाऱ्या माझ्या कोष्टकांतील आकड्यांत संस्थानी आकडे अंतर्भूत आहेत.

लोदियन कमिटीच्या रिपोर्टांतील संकलनात्मक कोष्टक

प्रांत	सौथबरो कमिटी	सर हेनरी शार्प हिंदुस्थानचे शिक्षण अधिकारी	१९२१ ची खाने-सुमारी	सायमन कमिशन	१९३१ ची खाने-सुमारी	प्रांतिक सरकारें १९३२	प्रांतिक कमिट्या १९३२	शेरे
मद्रास	६·४	५·७	६·४	६·५	७·०	७·१	७·१	
मुंबई	·६	१·६	२·८	१·५	१·८	१·७	१·७	
बंगाल	९·९	६·७	९·०	११·५	१०·३	११·२	·०७	कांही समासदांनी हा आकडा ११·२ दिला आहे.
संयुक्तप्रांत	१०·१	८·४	९·०	१२·०	१२·६	६·८	·६	मि. ब्लंटच्या मतें ९·२
पंजाब	१·७	२·१	२·८	२·८	१·३	१·३	१·३	
बिहारओरिसा	९·४	१·२	८·०	५·०	३·७	५·८	४·३	
मध्यप्रांत	३·८	३·०	३·३	३·३	२·९	२·९	२·९	
आसाम	·३	२·७	२·०	१·०	१·९	·६५	·६५	
एकूण	४२·२	३१·५	४३·३	४३·६	४१·५	३७·४५	१८·६२	

अखिल हिंदुस्थानांतील ब्रह्मदेशाशिवाय अस्पृश्य आणि एकूण हिंदूंची प्रांतानिहाय संख्या

(१९०१च्या खानेसुमारीवरून)

वंश	प्रदेश	अस्पृश्य	एकूण हिंदु
आर्य	पंजाब, काश्मीर, राजपुताना इ० ...	३६,३८,७४५	१,९७,३१,५९२
सिथियो–द्रविड	मुंबई, बडोदा, कुर्ग....	३४,३९,०८४	१,६७,३४,९५२
द्रविड	(अ) मद्रास, म्हैसूर, हैद्राबाद, त्रावणकोर, कोचीन.	१,५३,७४,०७३	५,२६,२६,३६६
	(ब) छोटा नागपूर इ०	३९,३७,७९९	६४,००,३६०
	(क) वऱ्हाड आणि मध्यप्रांत	२३,४५,२१०	१,३३,३२,३९८
आर्य–द्रविड	(अ) संयुक्त प्रांत	१,००,४८,८५८	४,०६,४९,३९१
	(ब) बिहार	४१,१६,०८३	१,[illegible],[illegible],[illegible]३
मोंगल–द्रविड	(अ) बंगाल	७९,५८,७२१	१,७७,२१,०४०
	(ब) ओरिसा	११,०६,७९३	३७,६६,५२०
मोंगल	आसाम, सिकिम इ०..	१२,३१,२६६	२७,६८,३६९
	एकूण	५,३१,९६,६३२	[illegible],२७,१९,७३६

[एकूण हिंदूंच्या संख्येंत अस्पृश्यांची संख्या अर्थात् अंतर्भूत आहे असें समजावें.

अखिल हिंदुस्थानांतील अस्पृश्यांची प्रांतवार संख्या

(१९०१च्या खानेसुमारी वरून पुनः तपासून तयार केलेली)

ह्यांत संस्थानांचा व ब्रह्मदेशाचा समावेश आहे.

प्रांत	स्वच्छ अस्पृश्य	अस्वच्छ अस्पृश्य	एकूण
अजमीर, मेरवाड	१२,९२३	७९,६९५	९२,६१८
आसाम (ब्रम्हपुत्रा खोरें)	१,८५,३४३	२,९५,६१७	४,८०,९६०
आसाम (सुरमा खोरें)	१,८२,७३०	३,४६,४३४	५,२९,१६४
बंगाल	७६,१४,३५१	३३,०८,३७१	१०९,२२,७२२
ओरिसा	८७,७५९	४,८७,०२९	५,७४,७८८
बिहार	२३,४५,४०१	२९,६७७	२३,७५,०७८
बऱ्हाड	१७,०६७	४,५०,९५३	४,६८,०२०
मुंबई	१,३९,१७१	२०,५०,०१४	२१,८९,१८५
ब्रह्मदेश	—	—	६२,३७३
मध्यप्रांत	८,०१,७६६	१५,२२,५९५	२३,२४,३६१
कूर्ग	३,४९५	४६,५६३	५०,०५८
मद्रास	४१,४८,५८४	५२,०१,०४८	९३,४९,६३२
संयुक्तप्रांत	३४,५४,०९६	६५,९४,८२१	१,००,४८,९१७
पंजाब	—	—	३३,८२,८१४
बडोदें	—	—	१,६३,१७६
मध्य हिंदुस्तानां तील संस्थानें	६,४४,२४२	१५,८८,२७४	२२,३२,५१६
ग्वाल्हेर	१,५१,३६५	३,६२,५६२	५,१३,९२७
कोचीन	—	—	८१,६५९
निजाम हैद्राबाद	—	—	२५,९८,३६४
काश्मीर	—	—	१,६३,३१३
राजपुताना	११,५९,१०९	१,७३,७९१	१३,३२,९००

(मागील पानावरील कोष्टक पुढे चालू.)

म्हैसूर	—	—	११,०३,८५१
त्रावणकोर	४,९१,७७४	२,०६,५०३	६,९८,२७७
एकूण			५,१७,३८,६७३

प्रत्येक प्रांतांतील स्वच्छ व अस्वच्छ अस्पृश्यांची जातवार संख्या, (१९०१)

[जातींची संख्या समजण्याकरितां जातींना अनुक्रमांक घातले आहेत. अर्थात् एकदा आलेलीं नांवें दुसऱ्या प्रांतांत पुनः आलीं असल्यास तेथे नवीन आकडा घातलेला नाही.]

अजमीर मेरवाड

खानेसुमारी रिपोर्ट १९०१; पुस्तक २ रें, पान १२६.

स्वच्छ अस्पृश्य	संख्या	अस्वच्छ अस्पृश्य	संख्या
१ मोची	२८२६	९ ढाणके व फांशी	१४३५
२ बाबर	७०	१० चांभार	१९३५०
३ खाटिक	३३१५	११ रेगर	१४२८७
४ बाउरी	१७४	१२ बळई	२२३५०
५ सलगर	३३५	१३ नायक	२४४१
६ गनवरादिया	२३९	१४ नाथ	५३१
७ धोबी	४९९४	१५ आहरी	३
८ ढोली	९७०	१६ कालबेलिया	७४
एकूण स्वच्छ	१२९२३	१७ भिल्ल	५३२४
		१८ मेहतर (भंगी)	५३०६
		१९ बागरी	९
		२० कंजार	२३०
एकूण अस्वच्छ	७९६९५	२१ कोळी	८३५५
		एकूण अस्वच्छ	७९६९५
बहु एकूण	९२६१८		

आसाम (ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यांतील)

खाने० रिपोर्ट १९०१; पुस्तक ४ थें पान १५३

स्वच्छ अस्पृश्य	संख्या	अस्वच्छ अस्पृश्य	संख्या
२२ अहोम	१७७५६२	नाथ	४५०९
२३ ब्रिटियल बनिया	७७८१	२४ मुखी	२५०२
		२५ च्छुतिया	८५४८७
एकूण स्वच्छ	१८५३४३	२६ जुगी व कटाणी	७१०५३
		२७ गोरिया	१९३१५
		२८ हिर्रा	८७०१
		२९ नडिवाळ डोम	८०५०९
		३० नमशूद्र (चंडाळ)	२३५४१
	२९५६१७	एकूण अस्वच्छ	२९५६१७
बट्ट एकूण	४८०९६०		

आसाम (सुर्मा खोरें)

खाने० रि० १९०१; पुस्तक ४ थें पान १५२

३१ गणक	५,७३१	३५ महर	३,४८३
३२ वर्णब्राह्मण	२,७०३	३६ शरनकर	१,०६३
३३ कुशिआरी (राऱ्ह)	१,३८५	३७ शहा व सुंनरी	३६,१७३
धोबा	१४,१२५	३८ नडियाळ	
३४ कैवर्त	४४,६७९	पट्टणी	१,१४,०२२
जुगी	८९,९६३	नमशूद्र	
ढोली	१०,२२७	(चंडाळ)	१,४५,७६६
३५ सूत्रधार	१३,९१७	३९ भुइन माली	४५,९२७
एकूण स्वच्छ	१,८२,७३०	एकूण अस्वच्छ	३४६,४३४
	३,४६,४३४		
बट्ट एकूण	५,२९,१६४		

बंगाल

खाने० रिपोर्ट १९०१; पुस्तक ६ वें पान ३७२

स्वच्छ अस्पृश्य	संख्या	अस्वच्छ अस्पृश्य	संख्या
४० कान	६८	बाउरी	५,९४,८९०
४१ कर्णी	६,१६७	चांभार	११,८७,११५
बागडी (री)	१०,३२,०६३	६४ डोंब	३,५८,०४२
४२ बैटी (चुनारी)	१७,२४०	६५ गारो	३८,११७
४३ बेरुवा	४,७६३	६६ हारी	३,०१,६१६
४४ भास्कर	४१५	६७ कावोरा	१,१२,००३
४५ चाइन	१,२९,००२	६८ कोने	३४,७५५
४६ च्छासाधोबा	२९,५०६	६९ लोधा	८,१७३
४७ च्छासती	४२,६२३	७० माल	१,४५,६७७
धोबा	५,६६,३३१	मोची	४,३९,६२२
४८ नागरार	३,६७०	७१ सियालगिर	५९८
४९ हाजंग	२५,५८८	७२ कोरा	८७,७६३
जालिया कैवर्त	२,६६,५४९		
५० कालु	१,७४,९३७	एकूण अस्वच्छ	३३,०८,३७१
५१ कमाली	१,४३,७४१		
५२ कवाली	१,१७०		
५३ कोताल	१०,६४२		
५४ मालो	२,२७,९८५		
५५ मेच्च	२४,५२१		
५६ तिया	२,६७,२६०		
५७ मुरागिया	२,४५२		
५८ तिपारा	१,०१,५१८		
नाइक	८,२५०		
नमशूद्र (चंडाल)	१८,५८,७८४		

५९	पाटणी	६३,६८७			
६०	पोड	४,६४,९२१			
६१	पूरो	३५,८४०			
६२	राजबंसी व कौंच	२०,६५,९८२	एकूण अस्वच्छ		३३,०८.३७१
६३	शुक्ली (चक्ली)	३८,६७६	एकूण स्वच्छ		७६,१४,३१५
	एकूण स्वच्छ	७६,१४,३५१	वट्ट एकूण		१,०९,२२,७२२

ओरिसा

खाने० रिपोर्ट १९०१; पुस्तक ६ वें, पान ३७७

स्वच्छ अस्पृश्य		संख्या	अस्वच्छ अस्पृश्य		संख्या
७३	सियाल	६,४०६	८१	महुरिया	१,८९९
७४	तौला	२२,१३८	८२	पान	४,४६,५२७
७५	घुसुरिया	२,१४८	८३	सवर	३८,६०३
७६	गोरबा	४६,२०१	एकूण अस्वच्छ		४,८७,०२९
७७	गिरगिरया	४,३००			
७८	खटिया	३,३५८			
७९	सनाई	४९७			
८०	नालिया	२,७११	एकूण अस्वच्छ		८७,७५९
	एकूण स्वच्छ	८७,७५९	वट्ट एकूण		५,७४,७८८

बिहार

खाने० रिपोर्ट १९०१; पुस्तक ६ वें, पान ३७४

स्वच्छ अस्पृश्य		संख्या	अस्वच्छ अस्पृश्य		संख्या
८४	वांटोर	१४३	१००	अघोरी	५,१८५
८५	बेडिया	१२,३०१		मेहतर	२१,३३३
८६	छपाटा	८,१५०		कंजार	३,१५९
८७	छापवाल	४,८२५		एकूण अस्वच्छ	२९,६७७

८८	ढान्ही	४,१७५
८९	दोसाद	११,७५,८७१
९०	गंगाई	६१,४२४
९१	कादर	१८,६९२
९२	कल्लार	७,७२३
९३	खाटिक	७,७४१
९४	खटवे	१,०२,९०५
९५	कुरारियार	६५०
९६	मुसाहार	६,०५,७९७
९७	नैया	८,१९१
९८	नाट	१५,६६८
	फाशी	१,५१,४४७
९९	रजवार	१,५९,६९८
	एकूण स्वच्छ	२३,४५,४०१

	एकूण स्वच्छ	२३,४५,४०१
	एकूण अस्वच्छ	२९,६७७
	बट्ट एकूण	२३,७५,०७८

वऱ्हाड

खाने० रिपोर्ट १९०१; पुस्तक ८वें, पान २०६

स्वच्छ अस्पृश्य	संख्या	अस्वच्छ अस्पृश्य	संख्या
१०१ कोरी	६९१	१०५ढोर	५,३६४
१०२ पारधी	६,६०३	१०६महार	३,५०,९२९
१०३ बेडर	४,७९०	चांभार	२८,०३६
१०४ कसाई	४,९८३	बळाई	६९२
		१०७मादगी	२,२८७
एकूण स्वच्छ	१७,०६७	१०८मांग	४९,११२
		भंगी	१,८४४
		अनिश्चित	१२,६८९
एकूण अस्वच्छ	४,५०,९५३	एकूण अस्वच्छ	४,५०,९५३
बट्ट एकूण	४,६८,०२०		

मुंबई

खाने० रिपोर्ट १९०१; पुस्तक ९ (अ), पान १९२ ते १९८

स्वच्छ अस्पृश्य	संख्या	अस्वच्छ अस्पृश्य	संख्या
१०९ आगर (कानडा जिल्ह्यांतील मीठ करणारे)	२,४०७	भंगी	८१,०९४
		१२०चामठा	१९०
		चांभार	३,११,२९८
११० आलितकर (सुलतनेक)	१३६	१२१चन्नयन (व्हलियार)	१०,२३२
१११ भांबी (खालपा)	१,०४०	१२२हुलूसार	७३१
११२ भावय (तरगल	५,६१७	ढोर	१९,०८९
११३ चुन्नर (चुना करणारे)	८०१	१२३दुरग मुरगी	१५
११४ डबगार(ढोर)	२.४९१	महार (घेड)	१३,२०,१८९
ढाणके	१८,८४९	१२४चलवादी	५२
११५ दुबळा	९७,९२४	१२५मजबी शिख	८,४६६
११६ गारुडी (गरोडा)	२,४१५	१२६मेघवाळ	३३,६९७
११७ सिंधवा	२,१७०	१२७च्छुरा	३१
११८ तुरी	३,१९५	१२८दास (देवडा)	४,६८३
११९ तिरमाली	२,१२६	१२९कोतवाल	८९
एकूण स्वच्छ	१,३९,१७१	१३०मोगेर	४,५०२
एकूण अस्वच्छ	२०,५०,०१४	१३१मुक्ती	५,०८२
वट्ट एकूण	२१,८९,१८५	अनिश्चित	२,५०,५७३
		एकूण अस्वच्छ	२०,५०,०१४

ब्रह्मदेश

खाने० रिपोर्ट १९०१; पुस्तक १२ वें पान ११०

१३२ पळिज	१३,२५०
१३३ परया	२५,६०१
माल	१८,५२२

१३४	तुबयाझा = थडगीं खोदणारे	सुमारें ५,०००
१३५	फयाचून = देवळांतील गुलाम	
१३६	संडाला (चंडाल)	
१३७	डून (डोम) संडाला	
१३८	केबा = भिकारी	
१३९	तू–डै–डो = राजे लोकांचे भंगी	
१४०	लामेंड=राजाचे दास (कुळंबी)	
१४१	तुतांसा=प्रेतवाहक, फाशी देणारे	
१४२	पक्वे= पोलीस, भालदार, चोपदार	
१४३	लेयांडाँ= तुरुंगाचे रखवालदार	
	एकूण	६२,३७३

मध्यप्रांत

खाने० रिपोर्ट १९०१; पुस्तक १३ वें, पान १८०

स्वच्छ	अस्पृश्य	संख्या	अस्वच्छ	अस्पृश्य	संख्या
१४४	औधालिया	६७६		बळई	४३,५६३
१४५	बांसोर	४२,५३८		चांभार	७,३५,२६२
	धोबी	१,३१,२२६		मादगी	५,००१
१४६	गंडा	२,७७,८३०		माल	७,३१३
१४७	घाशीया	३८,७२६		मांग	२०,११८
१४८	कैकाडी	३४१	१५५	मांगन	११०
	कंजार	२,७९८		मेहेतर	९१,८१६
१४९	काटिया	३१,९२४		महार	६,१९,४१२
	कोरी	३५,२८०		एकूण अस्वच्छ	१५,२२,५९५
१५०	कुंभार	९९,२०६			
१५१	पानके	१,३७,८५५			
	पाशी	३,०९८		एकूण स्वच्छ	८,०१,७६६
१५२	सिधिरा	२२४		बहु एकूण	२३,२४,३६१

१५३	सोलहा	१९
१५४	तांती	२५
	एकूण स्वच्छ	८,०१,७६६

कूर्ग

खाने० रिपोर्ट १९०१; पुस्तक १४ वें, पान ५०

स्वच्छ अस्पृश्य		संख्या	अस्वच्छ अस्पृश्य	संख्या
१५६	मेघ	५८४	१५८येझवा (येळवा)	१४,५८६
	बेडर	१७१	व्हलय्या	२६,९८९
१५७	बिल्लव	२,७४०	१५९चिरुमा	५११
	एकूण स्वच्छ	३,४९५		
	एकूण अस्वच्छ	४६,५६३	१६०तिय्या	१,४८१
	बट्ट एकूण	५०,०५८	१६१चक्कलिया	७
			डोंब	१४
			मादिग (मादगी)	२,७६७
			१६२पळ्ळन	६२
			१६३पनयन्	१४६
			एकूण अस्वच्छ	४६,५६३

मद्रास

खाने० रिपोर्ट १९०१; पुस्तक १८ वें, पान १३८ ते १३९

ज्यांचा विटाळ न शिवतांही होतो पण गोमांस खात नाहीत अशा जाती. या स्वच्छ अस्पृश्यांत गणल्या गेल्या आहेत.

(स्वच्छ) अस्पृश्य	संख्या	(स्वच्छ) अस्पृश्य	संख्या
सामीळ		१६६पुलयन्	३,४८४
१६४ कोलियन्	४,८२६	१६७सेम्मान्	२,०००
१६५ पलियन्	७०५	१६८शानान्	६,०३,१८९
पळ्ळन्	८,२५,३९५	१६९वल्लुवन्	५४,७६०

(स्वच्छ अस्पृश्य)	संख्या
मल्याळी	
१७० अरयन्	२,९३७
१७१ अरनादन्	११५
चेरुमन् (चिरुमा)	२,५३,३४७
इळुवन्, येजवन् (येझवा, येळवा)	१,१०९७४
१७२ काडन्	७८९
१७३ कम्मालन्	१,०४,०३३
१७४ कनिसन्	१५,२६३
१७५ कनियन्	५३१
१७६ करिमपालन्	३,५८६
१७७ काट्टुनायकन्	२,४८६
१७८ काउटियन्	५,६७३
१७९ कुरिच्चन्	९,६४२
१८० कुरुमान्	१०,०९२
१८१ मलयन्	६,५०७
१८२ मन्नान्	३१,६४४
१८३ माविलन्	२,१४८
१८४ मुक्कुवन्	१९,२९०
१८५ नायाडी	५३५
१८६ नुलयन्	९६
पानन्	१३,४२४
पनियन्	२९,२४५
१८७ परवन्	५,२४२
पुलियन्	१८३
१८८ पुल्लुवन्	१,८२८
तिय्यन्	५,७८,४५१
१८९ टोक्कलन्	२,३०५
१९० वेट्टुवन्	१५,६९६
१९१ वेल्लन्	३,१२०
१९२ वेल्लर	५९७
विल्लव	१,४२८,९५
१९३ हालेपैक	१७,६८९
१९४ हसल	५५२
१९५ कोरग	५,१०९
१९६ नलकेयव	१,१९४
१९७ पोंवाडा	६३१
१९८ समदार (चर्मकार)	१,७००
एकूण	२८,९३,९०८

गोमांस खाणाऱ्या पण शिवल्याशिवाय ज्यांचा विटाळ होत नाही अशा जाती (स्वच्छ).

तेलंगी	
१९९ बोय	३,९७,१८९
२०० जातापु	७५,७१९
कानडी	
बेडरु	६२,२७३
ओरिया	
बाउरि (बाथुरी)	६६,७५३
एकूण	६,०१,९३४

इतर अस्पृश्य जाती (स्वच्छ)

२०१ गडब	४०,३९५	२०४ पोरोज	९१,८८६
२०२ गोंड	२०,७३४	शाचर	१.८३,१५९
२०३ खोंड	३,१६,५६८	एकूण	६,५२,७४२

वट्ट एकूण स्वच्छ अस्पृश्य ४१,४८,५८४

गोमांस खाणाऱ्या व शिवल्याशिवाय ज्यांचा विटाळ होतो अशा जाती

(अस्वच्छ)

तामळ		चंडाळ	१,२०१
परय्यन्	२१,५२,८४०	२०६ दंडाशी	३९,८४९
तेलंगी		डोंब	५८,१००
चक्कीलियन्	४,८६,८८४	२०७ गोदरी	७९४
मादिग	७,५५,३१६	२०८ हड्डी	२८,०७६
माल	१४,०५,०२७	२०९ जग्गली	५,२५४
२०५ ओजली	८,२३८	२१० पैदी	४९,०१५
कानडी		पान्	६१,२००
व्हलय्या	१,४७,९८७	२११ कोटा	१,२६७

एकूण अस्वच्छ अस्पृश्य ५२,०१,०४८

एकूण स्वच्छ अस्पृश्य ४१,४८,५८४

वट्ट एकूण ९३,४९,६३२

संयुक्त प्रांत

खाने० रिपोर्ट १९०१; पुस्तक १६ वें, पान २५२

(गोमांस न खाणारे)		(गोमांस खाणारे)	
अस्वच्छ अस्पृश्य	संख्या	स्वच्छ अस्पृश्य	संख्या
चांभार	१८,१०,६२१	धोबी	८,०१,४४९
२१२ घासी	१४२	२१४ संप्रेल	१,८००
२१३ अगारिया	१,१८६	२१५ रंगसाज	७९

संयुक्त प्रांत

खाने० रिपोर्ट १९०१; पुस्तक १६वें, पान २५२

स्वच्छ अस्पृश्य	संख्या	अस्वच्छ अस्पृश्य	संख्या
(गोमांस न खाणारे)		(गोमांस खाणारे)	
धोबी	६,०९,४४५	चांभार	५८,९०,६३९
२१२रंग्रेज	१,८००	२२७घरामी	१४२
२१३रंगसाज	७९	२२८अगारिया	१,१८६
कोरी	९,९०,०२७	मुसाहर	४१,१८७
बळाई	४५४	कंजार	१८,१९८
२१४शिकलगार	१,२५०	२२९धनगर	१,५८६
डफगार	६,४५२	२३०कोरवा	६७०
२१५राज	२,८२७	२३१सहारिया	७,५५९
२१६अहेरिया	१७,७७४	भंगी	३,५३,५३०
२१७बहिलिया	३७;८१४	२३२बलहार	१,९३५
नाथ	५६,२६३	बांसोर	३६,५१०
बेरिया (बेडिया)	८,८१०	२३३डोंबार	७,७६४
२१८बंगाली	१,२१४	डोम	२,३३,९१५
ढाणूक	१,२७,५८१	एकूण अस्वच्छ	६५,९४,८२१
२१९दुसाध	७२,१२४		
२२०सुनकार	७४४		
खाटिक	१,९९,५९१		
पासी	१२,३९,२८२		
२२१करमाळी	५९		
२२२बोरिया	१८,६१४		
२२३बांसफोर	११,९३४		
२२४ढारकर	४०,०३७		
२२५बाजगी	५,८१८		
२२६अबुरा	४,१०३		
एकूण स्वच्छ	३४,५४,०९६	एकूण स्वच्छ	३४,५४,०९६
		बद्दल एकूण	१००,४८,९१७

पंजाब

खाने० रिपोर्ट १९०१; पुस्तक १७ वें, पान ३४६

(स्वच्छ-अस्वच्छांचा भेद दाखविलेला नाही.)

चांभार	१२,१३,०१९	दुचगार	१,३२२
२३४चनाल	११,७४४	२४१दावली	१,३७७
२३५डागी(कोल्प)	१,५४,७३९	२४२ड्रेन	२,७८५
२३६हाली	१८,५७०	२४३मल्ला	८९,०९८
२३७सेपी	१,८३०	२४४मेघ	४४,५५७
चुरा	११,९६,४६९	मोची	४,३७,७०२
२३८कुटण	५४,२२१	पाशी	१,२८१
२३९मजबी	१०,८०८	ढाणक	७७,३६५
२४०मुस्सलई	६५,९२७	एकूण	३३,८२,८१४

बडोदें

खाने० रिपोर्ट १९०१; पुस्तक १८ वें, पान ५६०

(स्वच्छ-अस्वच्छांचा भेद दाखविलेला नाही.)

भंगी	२३,९७८	महार	८६७
२४५बुरुड	१३८	मेघवाळ	१,२६५
धेड	१४,३७६	२४७रावळ	३६७
गरोडा	५,९१९	२४८सेनव्वा	५,२०९
२४६खालपा	२९,७४६	२४९तुरी	९८२
मांग	१३६	इतर	१९३
		एकूण	१,६३,१७६

मध्यहिंदुस्थानांतील संस्थानें

खाने० रिपोर्ट १९०१; पुस्तक १९ वें, पान २२०

	गोमांस न खाणारे (स्वच्छ) अस्पृश्य		गोमांस खाणारे (अस्वच्छ) अस्पृश्य	
	बळाई	२,०४,०७२	२७० अरख	२,१४२
२५०	बरगुंडा(बांसोर)	३८,१३५	२७१ भिल	२,०६,०१५

	ढाणू	९,६९८
२५१	चिडोर	७,८७१
२५२	मोघिया	६,३८१
२५३	बटिलिया	१,९३८
	भांबी	६,७७८
२५४	बुंकर	४,५९०
२५५	दहायत	२,३००
२५६	धिरकर	३,४०२
	डोंब	५,२११
२५७	महारा	६,४८६
२५८	मावळ	१,६४७
	मेघवाळ	१,१८४
२५९	मेर	२,६०७
२६०	पणिका	२४,२७६
	पाशी	२८१३
२६१	पावक	९,२८६
२६२	रेबारी	१,७०४
२६३	सेंदो	१०,८८६
२६४	सिखी	८,४९५
२६५	सोर	१४,६७७
२६६	भिलाला	१,३१,२८०
२६७	किरार	९३,७७८
२६८	तेहेरिया	४४,१५३
२६९	दरवान	५९४
	एकूण स्वच्छ	६,४४,२४२
	एकूण अस्वच्छ	१५,८८,२७४
	वट्ट एकूण	२२,३२,५१६

	कोतवाल	३२,३५८
२७२	पाटलिया	१४,१११
२७३	भारुड	९,३६६
२७४	कुरकू	९,६६७
२७५	मिना	९८,२१६
	गोंड	१,९५,०१५
२७६	कोळ	१,२६,३५७
२७७	बांचरा	१,४८४
	नात आणि करनो	१४,३७४
	बागरी	६२,१६०
२७८	बैगा	९,१५८
२७९	बिमारिय्या	१,८०१
२८०	खांगर	१,५२७
	चमार	७,२३,१४४
	मेहेतर	४७,४७१
२८१	बांसुहा	२,८३८
२८२	चिक्कव्वा	१,४४९
	महार	७,८०६
२८३	मुढा	४,२९९
२८४	मुढपाळ	१,०९३
२८५	नहाळ	५,०१७
२८६	तिराकिन्ह	१,१२९
२८७	चिरव्वा	७७६
२८८	कोंडार	७,९१५
२८९	पाखिया	१,१४६
२९०	राठरय्या	२०६
२९१	थोरी	२३४
	एकूण	१५,८८,२७४

ग्वाल्हेर

खाने० रिपोर्ट १९०१; पुस्तक २१ वें, पान १४१

स्वच्छ अस्पृश्य	संख्या	अस्वच्छ अस्पृश्य	संख्या
बळाई	७०,९२६	२९३ बथेरा	२४१
बांसोर	३,२०८	नाथ	१०,३४४
ढाणूक	३,९३२	बागरी	३,२६१
ढोली	५२६	बरगुंडा	१,३३२
२९२ मसर	३९९	बेडिया	२,४०२
चिडार	४,६५३	भामी	१,८५४
कोरी	६६,५१२	भंगी	२३,२२५
मोघिया	१,२०९	चांभार	३,१९,५५७
		डोंब	७६
एकूण स्वच्छ	१,५१,३६५	कंजार	२७०
एकूण अस्वच्छ	३,६२,५६२		
		एकूण अस्वच्छ	३,६२,५६२
बहु एकूण	५,१३,९२७		

कोचीन

(स्वच्छ-अस्वच्छांचा भेद दाखंविलेला नाही.)

खाने० रिपोर्ट १९०१; पुस्तक २० वें, पान १७३

२९४	कनकन्स	५,९१७		परवन्	७३
२९५	कुट्टन	९९	२९६	पीयन्	२
	पुलयन् (चुरुमा)	५९,८४०	२९७	तोटियन्	३९२
	परय्यन्	८,८४१		वल्लूवन्	१४६
	वेट्टुवन्	६,३४९			
				एकूण	८१,६५९

प्रांतानिहाय अस्पृश्य जातींची लोकसंख्या

हैद्राबाद (दक्षिण)

(स्वच्छ अस्वच्छांचा भेद दाखविलेला नाही.)

खाने० रिपोर्ट १९०१; पुस्तक २२ वें, पान २२९

	चक्कला	१,८८,८३३	२९९	येरकुल	
२९८	मांगला	१,१७,२३७		माल	
	कोरवा	५,३३,५५५		वेस्टा	१,२४,४८०
				एकूण	२५,९८,३६४

काश्मीर

(स्वच्छ–अस्वच्छांचा भेद दाखविलेला नाही.)

खाने० रिपोर्ट १९०१; पुस्तक २३ (अ) पान ७६

	मेघ	५५,३३३		चमार	१,८५४
	मोची	३६,४८६		छोरा	८,५३३
	मुसल्ली	१,५६३	३००	राटर	३,८१८
	डुंब	५४,४३६	३०१	सारियारा	९८४
	बागरी	४५	३०२	साझी	२६१
				एकूण	१,६३,३१३

म्हैसूर

(स्वच्छ–अस्वच्छांचा भेद दाखविलेला नाही.)

खाने० रिपोर्ट १९०३; पुस्तक २४ वें

	मोची	१,९६३		डोंब	२,९११
	मादिग	२,७६,८२१	३०३	बेड (व्याध)	२,४४,९९०
	होळिया	५,७७,१६६			
				एकूण	११,०३,८५१

राजपुताना

खाने० रिपोर्ट १९०१; पुस्तक २५ वें, पान १६६–१६७

	स्वच्छ अस्पृश्य (कातड्याचीं कामें करणारे)		अस्वच्छ अस्पृश्य (झाडलोट करणारे)	
	बळई	३,१३,१७१	सनिया	४९६
	बांभी (कातडें कमविणारे)	१,१३३	नाथ	७,०३०
३०४	रायगर	८४,२९६	बांसफोर	४९९
	चांभार व वोला	७,०४,४०३	३०८ घांचा	१३,४७१
	मेघवाल	१९५	३०९ बंगारिआ	१,०८९
	गुरुडा	३८९	रावल	६,२३१
३०५	जातिया	१२,४९७	कालबेलिया(सपेरा)	२,८३१
	सरगर	१३,८६२	ढाणक	२१,५८६
	डबगर	१,४३६	बागरी	७,६३६
३०६	कमार	३,१७०	अहेरी (शिकारी)	९६२
३०७	बरगी	५३८	३१० खानगर	२,५४४
	घेड	११,३७५	भंगी	७६,४३०
	मेहर (महार)	३,०२३	३११ सहरीया	८,३७३
	लहान जाती	९,६२१	३१२ धिधाकिया	१९५
	एकूण स्वच्छ	११,५९,१०९	थोरी	१४,७६५
	एकूण अस्वच्छ	१,७३,७९१	३१३ सानसरी	६,५१०
	वट्ट एकूण	१३,३२,९००	कंजोर	२,५९२
			३१४ सरभंगी	१५२
			लहान जाती	३९९
			एकूण अस्वच्छ	१,७३,७९१

त्रावणकोर

खाने० रिपोर्ट १९०१; पुस्तक २४ वें

स्वच्छ अस्पृश्य (पान २७८)		अस्वच्छ अस्पृश्य (पान ३४१)	
पीझ्वा, पीळवा, तिय्या	४,९१,७७४	पुलय, चिरुमा	२,०६,५०३
एकूण	६,९८,२७७		

प्रकरण आठवें

नांवांची व्युत्पत्ति व इतिहास

आता कांही मुख्य जातींच्या नांवांची मूळ व्युत्पत्ति काय असावी ह्याचें भाषाशास्त्राच्या निर्विकार दृष्टीने विवेचन करून ह्या हीन मानलेल्या जाती खरोखर मुळांतच हीन होत्या, किंवा त्यांच्या नांवांतूनही कांही उज्ज्वल पूर्वेतिहासाचा पुरावा बाहेर डोकावत आहे, हें पाहण्याचा मी प्रयत्न करीत आहें. हें विवेचन करण्यासाठी ज्या थोड्या जाती मी निवडल्या आहेत त्या जातींच्या लोकांमध्यें मी स्वतः बहुशः दोन दोन चार चार महिने, क्वचित वर्ष वर्ष भरही, जाऊन राहिलों आहें. त्यांत माझा हेतु हा होता की त्यांचें खाद्य, पेय, पेहराव, डामडौल, व्यक्तिविषयक आवडी, घरगुती चालरीत, जातीय परंपरा, ह्या गोष्टी समक्ष निरखून पहाव्या. आज माझ्या तीस वर्षांच्या सूक्ष्म निरीक्षणानंतर मला ह्या कित्येक हतभागी जातींचें उर्फ राष्ट्रांचें मूळ उज्ज्वल असावें, असें स्वतंत्रपणें वाटत आहे. पुढील व्युत्पत्तीमध्यें माझें भाषाशास्त्र सपशेल जरी चुकलें असलें, तरी त्यामुळें माझ्या इतर निरीक्षणाला बाधा येत नाही. उलट पक्षीं, माझी व्युत्पत्ति खरी ठरल्यास मात्र तो एक स्वतंत्र पुरावा होईल. एवढ्याच उद्देशाने माझ्या ह्या ऐतिहासिक विषयाला हें जें व्युत्पत्तीचें ठिगळ मी जोडण्याचें धाडस केलें आहे, तें अगदीच अनाठायीं ठरेल, असें मला वाटत नाही.

महार (महाराष्ट्र)

महार ह्या नांवाचा विस्तार मराठी भाषेपुरता अथवा महाराष्ट्रापुरताच नसून पंजाबी, सिंधी, गुजराथी, राजस्थानी, हिंदी, बंगाली ओरिया, तेलगू, आसामी, इतक्या भाषांतून व अनुक्रमें देशांतून आढळतो. तो असाः–महार, म्हार—आधुनिक महाराष्ट्र, मध्य हिंदुस्थान; म्हेतर, म्हेर, मेर—गुजराथ, मारवाड, माळवा, राजपुताना आणि मध्य प्रांताचा हिंदी भाग; मेघ मघ, मेघवाळ, मोघिया—पंजाब, गुजाराथ, ग्वाल्हेर; माल, मालो, माली, मलयन—बंगाल, ओरिसा, आंध्र, मलबार.

महार ह्या नांवाचीं आजवर अनेक निरुक्तें सुचविण्यांत आलीं आहेत. त्यांपैकी कांहीं विक्षिप्त आहेत तर कांहीं विचार करण्यासारखीं आहेत. **महाअरी**=मोठा शत्रु, अशी व्युत्पत्ति जोतीबा फुले ह्यांनी सुचविली आहे. दुसरी अशी आहे.—पार्वतीच्या कपाळावर घामाचा बिंदु आला, तो एका कमळपत्रावर पडला; त्याचें सुंदर मूल होऊन खेळूं लागलें. तें रांगत बाहेर जाऊन एक मेलेली गाय खाऊं लागलें. म्हणून शिवाने रागावून त्यास **महा आहारी** मोटा खादाड होशील असा शाप दिला. तो महार झाला. हीं विक्षिप्त निरुक्तें.

मृताहर. प. लो. वा. डॉ. सर भांडारकर ह्यांनी मृताहर अशी व्युत्पत्ति सुचविली होती. इ. स. १९१२ सालीं पुण्यांत डी. सी. मिशनची पहिली अस्पृश्यता–निवारक परिषद भरली, तिचे अध्यक्ष ह्या नात्याने डॉक्टरसाहेबांनी ही प्रथमतःच पुढे आणिली. मृत + आहर= मेलेलीं गुरें ओढून नेणारा, हा अर्थ ह्या लोकांच्या चालू धंद्याला लागू पडतो. पण संस्कृत वाङ्मयांत ह्या नांवाचा असा प्रचार कोठे आढळत नाही. मार्कंडेय पुराणांतील ३२ व्या अध्यायांत पुढील श्लोक आहेतः–

उदक्याश्च शृगालादीन्सूतिकान्त्यावसायिनः।
स्पृष्ट्वा स्नायीत शौचार्थं तथैव मृतहारिणः ॥ ३३ ॥
व
मृतनिर्यातकाश्चैव परदारारताश्च ये।
एतदेव हि कर्तव्यं प्राज्ञैः शोधनमात्मनः ॥ ४० ॥
अभोज्यसूतिकापंढमार्जाराखुश्वकुक्कुटान्।
पतितान्धचंडालान् मृताहारांश्च धर्मविद् ॥ ४१ ॥
संस्पृश्य शुद्ध्यते स्नानादुदक्याग्रामसूकरौ।
तद्वच्च सूतिकाशौचदूषितौ पुरुषावपि ॥ ४२ ॥

वरील उतान्यांत चंडाल, अन्त्यावसायी, असे शब्द योजून पुनः मृताहार, मृतहारि, मृतनिर्यातक असे शब्द घातले आहेत. मृत ह्याचा अर्थ मृत मनुष्य अथवा प्रेत असाच आहे. मेलेलीं ढोरें अशा अर्थाचा संदर्भ ह्या ठिकाणी मुळीच संभवत नाही. वरिष्ठ जातीच्या माणसांचीं प्रेतें महार नेऊं शकणार नाही, म्हणून मृतांचे आप्त असाच येथे अर्थ आहे. मृताहार म्हणजे मेलेलीं ढोरें ओढणारा असा अर्थ डॉ. भांडारकर ह्यांनी नव्यानेच केलेला दिसतो. महार असें मागाहून संभावित

मराठींत रूपान्तर झालें, त्याचें मूळरूप म्हार असें गांवढळांचे तोंडांत अद्यापि आहे, तेंच रूप पहिलें असावें. माळव्यांत व नागपुराकडे हिंदी भाषेंत म्हेर असें रूप हल्लीही आहे; त्यावरून मराठींत म्हार असें होणेंच जास्त संभवनीय आहे. त्याचा संभावित अपभ्रंश महार असा करून, पुनः त्याचें मृताहर असें संस्कृत रूप मानण्यांत फारच दूरान्वय होत आहे. म्हार हे पूर्वीपासूनच मेलेलीं गुरें ओढणारे होते, ही कल्पना इतिहासाला धरून नाही; म्हणून ही व्युत्पत्ति असमर्थनीय ठरते. माळव्याप्रमाणें गुजराथेंतही म्हारांना म्हेत्तर असें म्हणतात. त्यापासून म्हेर असें रूप होणें शक्य आहे. अजमीर–मेरवाडामध्यें म्हेर असें रूप आहे. म्हेतर (महत्तर) म्हणजे मोठा अथवा जुना माणूस. म्हातारा शब्दाचीही हीच व्युत्पत्ति आहे. आणि हीच व्युत्पत्ति ह्या प्राचीन जातीच्या इतिहासाला अधिक सुसंगत दिसते.

म्हार म्हात्म्य. ह्या पुराणाची हस्तलिखित पोथी इ. स १९०७ साली परळ येथील आमच्या रात्रीच्या शाळेंतील एका भाविक म्हार मुलाने मला दिली. तिची भाषा मासलेवाईक म्हारी आहे. ह्यांत म्हार, म्हादेव, म्हामुनि असे नमुनेदार शब्द आहेत. ह्याच्या दुसऱ्या अध्यायाच्या आरंभीं खालीलप्रमाणें मूळ वर्णिलें आहे.

आद्यन्त तुमच्या वचस्याचे म्हैमा । सेस न वर्णवी झाली सीमा । वेदा न कळे आगमा । सोमववष अपंपार ॥२॥ हे म्हार म्हात्म्य कथा आगळी । जो का धरील हृदयकमळी । तयाचे द्वीतभावाची होळी । करील रूषि मार्कंडी ॥ ३ ॥... तरी हा मार्कंडी मूळ पुरुष । तयापासून म्हाराचा ववस । ऐका सजना हो सावकास । चित्तीं विश्वास धरूनिया ॥ ५ ॥ अनंत यौगापासून । कितीक राजाचे ढळले जन । परी हा म्हार जूनाट पुरातन । न ढळेची कल्पान्ती ॥६॥ देव झाले उदंड । परि हा म्हार अक्षय्य काळदंड । ह्याच्या स्वाधीन नवखंड । केले मुळींच कृत्यांनीं ॥ ७ ॥

मुसलमानाचा संबंध मोठा चमत्कारिक उल्लेखिला आहे.

म्हार आणि मुसलमान । हे दोघे एक वंशे उत्पन्न । चंद्र वंश पूर्ण । सोम म्हणती तयालागे ॥ अ० ३ ओवी १९.

तिसऱ्या अध्यायाच्या आरंभीं आचार विलक्षण सांगितला आहे. ह्या अध्यायाची ७६ वी ओवी अशी आहे.

म्हाराचा मूळ पुरुष सोमाजी नाम । दैवत सिव, देस मार्वड उत्तम । रुषि मार्कंडेय तयाचा उत्तम । घाई पूर्ण गरजतसे ॥७६॥

सहाव्या अध्यायांत ४९ व्या ओवीपासून आद्य शून्यवादाचें वर्णन आहे. ह्यांत महायान बौद्ध धर्माची छटा दिसते. सातव्या अध्यायांत कर्त्याचें नांव आहे.

"पूर्वी व्यास वाल्मिक मुनी । सुखसनकादिक आदि करुनी । तयानें हें म्हार म्हात्म्य रत्नखाणी । कल्पित करोनी ठेविलें ॥ १६ ॥ तयाची चतुरा ऐसी । कलियुगीं अवतरला बाळकदास । त्यांनीं ह्या म्हार म्हात्म्याचा प्रकास । करोनि दाखविला कलियुगी ॥

सातव्या अध्यायाच्या शेवटीं ग्रंथसमाप्तीचें स्थळ व काळ सांगितला आहे.

"पूर्वे सन्निध पने पाकन । पावणे दोन योजन । दक्षिणेस गोदावरी पूर्ण । तीन योजने जाण बा ॥८०॥ पश्चिमेस नीराबाई मध्ये । उत्तरभागी पाडेगाव आहे । ग्रंथ कर्त्याचा अवतार पाहे । तेथे झाला जाणिजे ॥८१॥ शके १८८८ (?) । सर्वधारी नाम संवत्सर प्रवेसी । वैशाख वद्य पंचमीस । ग्रंथ समाप्त झाला पै ॥ ८२ ॥ चंद्रवार ते दिसि । सोमवंश प्रवेसी । प्रथम प्रहारासी । ग्रंथ समाप्त केला हो ॥ ८३ ॥

शके १८८८ असें चुकून पडलें असावें. शके १७८८ असावें. येरवीं पुढील ओवीचा प्रास जुळणार नाही. शके १८८८ पुढे यावयाचें आहे.

माल (बंगाल, आंध्र)

माल, मालो, माली : ह्या नांवाच्या जाती बंगाल, ओरिसा, तेलंगण देशांत पुष्कळ आहेत. त्या अगदी महाराप्रमाणेंच आहेत. हे वंशाने एकच असावेत असें म्हणवत नाही. त्यांचा आपसांत रोटी बेटी व्यवहारही होत नाही. त्यांची व्युत्पत्ति मल्ल आणि मार ह्या दोन भिन्न शब्दांपासून संभवते. गौतम बुद्धाचे काळीं, झल्ल, मल्ल नांवाची

क्षत्रिय राष्ट्रें शाक्यांच्या शेजारीं राहात होतीं. किंबहुना तींही शाक्यांचीच पोटजात असावींत. कालवशाने हीं राष्ट्रें झालो, मालो ह्या नांवाने अस्पृश्यतेप्रत पोचलीं असावींत. तुकारामाच्या अभंगांत साळो, मालो म्हणजे यःकश्चित माणूस ह्या अर्थाने हा शब्द आला आहे. साळी माळी ह्याच मूळ क्षत्रिय नांवांपासून आले असावेत. एका प्रांतांत जी जात प्रतिष्ठेप्रत चढली किंवा पूर्वी प्रतिष्ठेत होती तीच दुसऱ्या प्रांतांत हीनत्वाप्रत गेलेली अशीं आणखीही उदाहरणें ह्या अफाट देशांत आहेत. बंगाल्यांत माळी ही जात अस्पृश्य आहे, ती मालाकार म्हणजे फुलमाळी ह्या जातीपासून अगदी वेगळी आहे. मालाकार हे नवशाखा शूद्रांपैकी आचरणीय आहेत. माळी अनाचरणीय आहेत. हरप्रसाद शास्त्री म्हणतात त्याप्रमाणें पूर्वीचें मल्ल राष्ट्र पूर्वी बौद्ध असून मुसलमानांच्या स्वारीनंतर बौद्ध धर्माचा उच्छेद झाल्यामुळें बहिष्कृत झालें असावें. झालिया (जाळीं विणणारे) म्हणून दुसरी बहिष्कृत जात आहे ती झल्ल असावी. महाराष्ट्रांत जसे मांगाबरोबर महार, तसे आंध्रदेशांत मादिगाबरोबर माल म्हणून एक अस्पृश्य ग्रामबाह्य जात आहे. मराठ्यांचा महारांशीं मांगांशीं जसा सेव्य सेवक अथवा जेते जित असा संबंध आहे, तसाच आंध्र देशांत रेड्डी ह्यांचा मालांशीं आणि मादिगांशीं आहे. रेड्डींनी (रट्टांनी) ह्या मालांना आपल्या मूळ मगध देशांतून निघतांना तेलंगणांत आपल्या ग्रामसंस्थेच्या योगक्षेमासाठी बरोबर आणिलें असावें. महारांप्रमाणेंच मालही बलुतेदार आहेत. त्यांची महारांप्रमाणें मरीअम्मा ही ग्रामदेवता प्रत्येक गावाच्या शिवेवर असते. तिला रेड्डी फार भजतात. कित्येक ठिकाणीं ह्या मरीअम्मेचा पूजारीपणाही रेड्डींकडेच असलेला मीं पाहिला आहे. पण मुळांत ही मारी अम्मा मालांचीच ह्यांत शंका नाही. बुद्धाचे काळीं मार नांवाचें जें दुष्ट व खुनशी दैवत होतें त्याचीच नातलग ही मरी दिसते. ओरिसाच्या पश्चिमेकडील डोंगराळ प्रदेशांत खोंड वगैरे रानटी जाती ह्या मरी आईला भयंकर रीतीने नरबळी देत असत. ते बंद करण्याचे प्रयत्न लॉर्ड डलहौसीच्या काळापर्यंत ब्रिटिश सरकार करीत आलें. पण अद्यापि हा प्रकार तुरळक चालू आहेच. मार आणि मरी हे शब्द फार चिंतनीय आहेत. मॅक्स मूलरने आपल्या *Physical Religion-Gifford Lectures* मध्यें पान

तिसऱ्या अध्यायाच्या आरंभीं आचार विलक्षण सांगितला आहे. ह्या अध्यायाची ७६ वी ओवी अशी आहे.

म्हाराचा मूळ पुरुष सोमाजी नाम । दैवत शिव, देस मार्वड उत्तम । रुषि मार्कंडेय तयाचा उत्तम । घाई पूर्ण गरजतसे ॥७६॥

सहाव्या अध्यायांत ४९ व्या ओवीपासून आद्य शून्यवादाचें वर्णन आहे. ह्यांत महायान बौद्ध धर्माची छटा दिसते. सातव्या अध्यायांत कर्त्याचें नांव आहे.

"पूर्वी व्यास वाल्मिक मुनी । सुखसनकादिक आदि करुनी । तयानें हें म्हार म्हात्म्य रत्नखाणी । कल्पित करोनी ठेविलें ॥ १६ ॥ तयाची चतुरा ऐसी । कलियुगीं अवतरला बाळकदास । त्यांनीं ह्या म्हार म्हात्म्याचा प्रकास । करोनि दाखविला कलियुगी ॥

सातव्या अध्यायाच्या शेवटीं ग्रंथसमातीचें स्थळ व काळ सांगितला आहे.

"पूर्वे सन्निध पने पाकन । पावणे दोन योजन । दक्षिणेस गोदावरी पूर्ण । तीन योजने जाण वा ॥८०॥ पश्चिमेस नीराबाई मध्ये । उत्तरभागी पाडेगाव आहे । ग्रंथ कर्त्याचा अवतार पाहे । तेथे झाला जाणिजे ॥ ८१ ॥ शके १८८८ (?) । सर्वधारी नाम संवत्सर प्रवेसी । वैशाख वद्य पंचमीस । ग्रंथ समाप्त झाला पै ॥ ८२ ॥ चंद्रवार ते दिसि । सोमवंश प्रवेसी । प्रथम प्रहारासी । ग्रंथ समाप्त केला हो ॥ ८३ ॥

शके १८८८ असें चुकून पडलें असावें. शके १७८८ असावें. येरवीं पुढील ओवीचा प्रास जुळणार नाही. शके १८८८ पुढे यावयाचें आहे.

माल (बंगाल, आंध्र)

माल, मालो, माली : ह्या नांवाच्या जाती बंगाल, ओरिसा, तेलंगण देशांत पुष्कळ आहेत. त्या अगदी महाराप्रमाणेंच आहेत. हे वंशाने एकच असावेत असें म्हणवत नाही. त्यांचा आपसांत रोटी बेटी व्यवहारही होत नाही. त्यांची व्युत्पत्ति मल्ल आणि मार ह्या दोन भिन्न शब्दांपासून संभवते. गौतम बुद्धाचे काळीं, झल्ल, मल्ल नांवाची

क्षत्रिय राष्ट्रें शाक्यांच्या शेजारीं राहात होतीं. किंबहुना तींही शाक्यांचीच पोटजात असावींत. कालवशाने हीं राष्ट्रें झालो, मालो ह्या नांवाने अस्पृश्यतेप्रत पोचलीं असावींत. तुकारामाच्या अभंगांत साळो, मालो म्हणजे यःकश्चित माणूस ह्या अर्थाने हा शब्द आला आहे. साळी माळी ह्याच मूळ क्षत्रिय नांवांपासून आले असावेत. एका प्रांतांत जी जात प्रतिष्ठेप्रत चढली किंवा पूर्वी प्रतिष्ठेत होती तीच दुसऱ्या प्रांतांत हीनत्वाप्रत गेलेली अशीं आणखीही उदाहरणें ह्या अफाट देशांत आहेत. बंगाल्यांत माळी ही जात अस्पृश्य आहे, ती मालाकार म्हणजे फुलमाळी ह्या जातीपासून अगदी वेगळी आहे. मालाकार हे नवशाखा शूद्रांपैकी आचरणीय आहेत. माळी अनाचरणीय आहेत. हरप्रसाद शास्त्री म्हणतात त्याप्रमाणें पूर्वीचें मल्ल राष्ट्र पूर्वी बौद्ध असून मुसलमानांच्या स्वारीनंतर बौद्ध धर्माचा उच्छेद झाल्यामुळें बहिष्कृत झालें असावें. झालिया (जाळीं विणणारे) म्हणून दुसरी बहिष्कृत जात आहे ती झल्ल असावी. महाराष्ट्रांत जसे मांगाबरोबर महार, तसे आंध्रदेशांत मादिगाबरोबर माल म्हणून एक अस्पृश्य ग्रामबाह्य जात आहे. मराठ्यांचा महारांशीं मांगांशीं जसा सेव्य सेवक अथवा जेते जित असा संबंध आहे, तसाच आंध्र देशांत रेड्डी ह्यांचा मालांशीं आणि मादिगांशीं आहे. रेड्डींनी (रट्टांनी) ह्या मालांना आपल्या मूळ मगध देशांतून निघतांना तेलंगणांत आपल्या ग्रामसंस्थेच्या योगक्षेमासाठी बरोबर आणिलें असावें. महारांप्रमाणेंच मालही बलुतेदार आहेत. त्यांची महारांप्रमाणें मरीअम्मा ही ग्रामदेवता प्रत्येक गावाच्या शिवेवर असते. तिला रेड्डी फार भजतात. कित्येक ठिकाणीं ह्या मरीअम्मेचा पूजारीपणाही रेड्डींकडेच असलेला मीं पाहिला आहे. पण मुळांत ही मारी अम्मा मालांचीच ह्यांत शंका नाही. बुद्धाचे काळीं मार नांवाचें जें दुष्ट व खुनशी दैवत होतें त्याचीच नातलग ही मरी दिसते. ओरिसाच्या पश्चिमेकडील डोंगराळ प्रदेशांत खोंड वगैरे रानटी जाती ह्या मरी आईला भयंकर रीतीने नरबळी देत असत. ते बंद करण्याचे प्रयत्न लॉर्ड डलहौसीच्या काळापर्यंत ब्रिटिश सरकार करीत आलें. पण अद्यापि हा प्रकार तुरळक चालू आहेच. मार आणि मरी हे शब्द फार चिंतनीय आहेत. मॅक्स मूलरने आपल्या *Physical Religion-Gifford Lectures* मध्यें पान

३२० वर म्हटलें आहे.—"पाली भाषेमध्यें मारु असें पद दुष्ट देवते-संबंधीं योजलेलें आढळतें." मला वाटतें ह्या पदांत मल अथवा मर = डोंगर ही द्राविड धातू मूळ असावी. तिच्यापासून मार, माल, म्हार वगैरे पर्याय होणें अगदी संभवनीय आहे.

मेघ (पंजाब गुजराथ)

मघ, मेघ, मेघवाळः—Maggi मॅग्गी नांवाची एक जादूटोणा करणारी इराणी लोकांची देवपूजक जात इराणच्या पश्चिमेकडे होती. ती सूर्योपासक होती. शिवदेवतेचा सूर्याशीं संबंध आहे. हिंदुस्थानांत पूर्वी जेथे जेथे सूर्योपासना चालू होती तेथे त्याच जातीकडे पौरोहित्य होतें.

"सूर्यानें प्रसन्न होऊन आपली प्रत्यक्ष तेजोमयी मूर्ति सांबाला पूजेकरितां दिली. उपास्य मिळाल्यामुळें सांबाला आनंद झाला. व त्याने सूर्याच्या आज्ञे-वरून चंद्रभागेच्या तीरावर मनोहर देवालय बांधिलें. तेथे देवस्थानाच्या पूजाअर्चादि व्यवस्थेकरिता हे सूर्यभक्त 'मग' नांवाचे ब्राह्मण सांबानें शक-द्वीपांतून आणिले. तेथें निमंत्रणावरून मगांची आठरा घराणीं राहिलीं."

—चित्रावशास्त्रोक्त चरित्रकोश, पान ४२०;
(सांबपुराण, २६; भविष्यपुराण, ब्राह्मखंड, ११७)

वरील सांब हा शिबि कुलांतली जांबवती नांवाची 'अस्पृश्य' (!) कन्यका श्रीकृष्ण वासुदेवांनी वरिलेली तिच्या पोटीं श्रीशंकराच्या प्रसादाने झालेला, पुढे राजा झाला, असा महाभारतांत उल्लेख आहे. हे मग लोक हिंदुस्थानांत जिकडे तिकडे तिरस्करणीय मानले गेले, असेही पुराणां-तून उल्लेख आहेत. ह्या मघ अथवा मेघ ह्याला,र हा द्राविडी अनेक वचनी प्रत्यय लागून मेघर असा शब्द तयार होतो. त्याचा अपभ्रंश मेहर होणें अगदी सहज आहे. हे मेहर, म्हेर, मेर आसामांत, राजपुतान्यांत, मध्यप्रांतांत विपुल आहेत. पंजाबांतील मेघ आणि गुजराथेंतील मेघवाळ ह्या अस्पृश्य जाती तर प्रसिद्धच आहेत.

येणेंप्रमाणें तीन अगदी भिन्न व्युत्पत्ति आपल्या पुढे आहेत त्या अशा.—

महत्तर, म्हेतर, म्हार—ह्यांत मह = मोठा, जुना, पसरणारा, ह्या अर्थाची संस्कृत धातु आहे.

मार, माल—ह्यांत मर—मल=डोंगर ह्याअर्थाचा द्राविड धातु आहे.

मघ, मेघ—ह्यांत मघ धातु. हे एका वंशाचें (Maggi) नांव होतें. कदाचित् ह्या तीन्ही शब्दांचे मागे मद = पसरणें अथवा मर = पर्वत हीच धातु असावी. व्युत्पति कशीही असो, महार ही जाति पुरातन असून अभिजात असावी, असें माझें मत झालें आहे.

मांग (महाराष्ट्र)

ह्या जातीचे दक्षिणेंत कानडी व तेलगु देशांत मादिग, मध्यें महाराष्ट्रांत मांग, आणि उत्तरेकडे सुरतेच्या आसपास व गुजराथेंत मांगेले असे तीन प्रकार आढळतात. मात्र मांगेले हे अस्पृश्य समजले जात नाहीत. तरी पण जात एकच. हे मुळांत कोल (कोळी) वंशाचे असावेत. मादिग अथवा मातंग हें संस्कृतीकरण मृताहराप्रमाणें मागा हूनचें शहाणपण दिसतें. मूळ माँग, मांग, मंग हाच शब्द खरा. हा ब्रह्मी शब्द मनुष्य अथवा भाऊ ह्या अर्थाचा असावा. इंग्रजी भाषेंत आडनांवाच्या मागे मिस्टर जसा लागतो तसा ब्रह्मी भाषेंत माँङ् हा लागतो. गल् हा प्रत्यय अनेकवचनी आहे, तो द्राविडी आहे. माँगल हे राष्ट्रवाचक नांव असें तयार झालें. माँगल, मांगेला, मोग्गल अशीं रूपें जुन्या पाली भाषेंत, तशींच अद्यापि मराठी प्रचारांत प्रसिद्ध आहेत. किष्किंधा म्हणून तुंगभद्रेच्या काठावर जो प्राचीन देश होता; त्यांत मंग (माँग) ह्या राष्ट्राची वस्ती होती. त्यांची रामायणांत वानरांत गणना केलेली आहे. पण ती केवळ लक्षणा होय. मग म्हणजे वानर असा कानडी शब्द आहे. तो द्राविडी असून तोच इंग्रजींतल्या मंकी ह्या शब्दांतही आहे. मातंग असा शब्द सामान्य नाम आणि विशेष नाम ह्या दोन्ही रूपाने पाली आणि संस्कृत पौराणिक वाङ्मयांत आढळतो. पण तेथे कोठेही जातिवाचक अर्थ नाही. असलाच तर तो अगदी अलीकडचा प्रचार होय. थोर आणि श्रेष्ठ अशा अर्थाने नाग शब्द आढळतो, त्याच—हत्ती किंवा सर्प अशा—अर्थाने मातंग हा शब्द आढळतो. महाभारताच्या अनुशासन पर्वांत २७–२९ अध्यायांत मतंगाची कथा आहे. चांडाल असून ब्राह्मण होण्यासाठी ह्याने घोर तप केलें. ह्याला स्वर्गीय ऐश्वर्य मिळालें पण ब्राह्मण्य मिळालें नाही. ब्राह्मण्य कर्मावर अवलंबून नसून केवळ जन्मावरच अवलंबून आहे असा अर्थ

दाखविण्यासाठी ही कथा आहे. अर्थात् हें मागाहून आलेलें शहाणपण महाभारतांत घुसडून दिलेलें आहे, हेंही उघडच आहे.

इ.स.च्या ६व्या शतकाच्या अखेरीस मांगलीश नांवाच्या चालुक्य राजाने मातंगांना जिंकलें अशा अर्थाचा एक शिलालेख बादामी येथील माकुटेश्वराच्या देवळाजवळ पडलेल्या एका जयस्तंभावर आढळतो. मांगलांना जिंकणारा म्हणून मांगलीश हें नांव ह्या राजाला पडलेलें ह्यावरून दिसतें. ह्या ठिकाणीं मांगलांचें राज्य होतें. माकुटेश्वर=मांग+कुट+ईश्वर हा मांगांचाच देव दिसतो. गोव्याकडे मंगेश व शांतादुर्गा अशीं जीं दोन दैवतें आहेत, तीं ह्या लोकांचीं मूळचीं नसावींत कशावरून? "मंगेश देवस्थान इतिहास" ह्या पुस्तकाच्या पान ३ वर जी मंगेश नांवाची व्युत्पत्ति दिली आहे ती, मंग नांवाच्या पुरुषापासून ह्या देवस्थानाची उत्पत्ति आहे अशी दिली आहे. शांतारी ह्या नांवाची मांगांची कोंकण किनाऱ्यावर देवी आहे.

तिरुपति येथील वेंकटेशाला मंगापति असें एक नांव आहे. हें नांव त्या प्रांतांतील ब्राह्मणेतरांत, विशेषतः नायडू लोकांत, आढळतें. मंगा ही वेंकटेशाची एक पत्नी. 'अलमेल मंगा' = कमलावर प्रतिष्ठित झालेली मंगा, अशा नांवाने हिचें एक विस्तीर्ण आणि सुंदर देवालय तिरुपती टेकडीच्या पूर्वेस सुमारें सात मैलांवरील तिरुचन्नूर ह्या गांवांत आहे. तिरुपतीहून पश्चिमेस चंद्रगिरीस जातांना वाटेंत मंगापूर म्हणून एक गांव आहे. तेथे मंगा देवीचें एक भव्य पण ओसाड देऊळ आहे. आत देवीची मूर्ति मात्र नाही. वेंकटेशाची मूर्ति एका बाजूस अंधारांत पडली आहे. ह्या ठिकाणीं मंगा देवीशीं वेंकटेशाचें लग्न झालें. पण पुढे वेंकटेशाने कोल्हापुरच्या महालक्ष्मीशीं लग्न लावलें म्हणून मंगादेवी रुसली व वरील तिरुचन्नूर गावीं अलमेलमंगा ह्या नांवाने प्रतिष्ठित झाली. हिला येथे पद्मावती असेंही नांव आहे. हे देखावे मी स्वतः जाऊन पाहिले व ह्या कथा निरनिराळ्या लोकांच्या तोंडून ऐकल्या आहेत. मंगापूर येथील मांगवाड्यांत एका वृद्ध मांग गृहस्थांच्या तोंडून वरील मंगावतीचें नांव जंबावती असें ऐकून तर माझ्या मनावर निराळाच प्रकाश पडला. आठव्या शतकांतील तिरुमंगाई नांवाच्या एका वैष्णव आळवारने ह्याच वेंकटेशाचीं हरिहर ह्या रूपाने कांही

स्तोत्रें रचलीं आहेत. एकंदरींत मंग हें नांव फार जुनें असावें हें सिद्ध होतें. मंगल, मांगल नांवाच्या राष्ट्राचें राज्य ह्या प्रांतीं होतें. तें चालुक्यांनी नष्ट केल्यावर ह्यांना हीनदशा प्राप्त झाली. ह्या झटापटीशीं ह्या मंगादेवीचा संबंध कसा काय पोचतो हा भावी संशोधकांनी शोधून पाहण्यासारखा विषय खास आहे. चंडी जशी चंडालांची, मुंडी जशी मुंडाळांची तशीच मंगा उर्फ मातंगी ही देवी मांगांची हें ठरण्यास मात्र फारशा संशोधनाची जरूरी लागेल असें मला वाटत नाही.

हुलया, पुलया (कर्नाटक, तामील नाड)

ह्या नांवाची शेतावरच्या गुलामांची जात द्राविडदेशांत–कर्नाटक आणि मलबारांत–अफाट पसरली आहे. जुन्या कानडींतील प ह्या अक्षराचें नव्या कानडींत ह असें रूपांतर होतें. जसें, पल्लु – हल्लु = दांत, पालु–हालु=दूध, इत्यादि. पुलय हाच मूळचा शब्द, तो पुल्कस किंवा पुलह ह्याचा अपभ्रंश होय. पुल–हुल=विटाळ, हा द्राविडी अर्थ रूढीमुळें मागाहून झाला असला पाहिजे. रावण हा पौलस्त्य होता. मलबारांत आणि वनवासींत पूर्वी पुलयाचें राज्य होतें असा उल्लेख वर झालेलाच आहे. हें राज्य मयूरवर्मा नांवाच्या उत्तरेकडील कदंब घराण्यांतील राजाने इ. स. सहाव्या शतकाच्या सुमारास दक्षिणेकडे केलेल्या स्वारींत नष्ट झालें असावें. मयूरवर्म्याने अहिक्षेत्राहून ब्राह्मण आणिले. ते हल्ली हैंग, शिवळ्ळी ह्या नांवाने नैऋत्य किनाऱ्यावरील जामिनींचे मालक होऊन बसले आहेत. त्यांच्या दक्षिणेस नंबुद्री ब्राह्मणांनी जमिनीची मालकी पटकावली आहे. त्यांच्या जमिनींवर हे हुलया आणि पुलया जातीचे हतभागी लोक हुट्ट आळ, पण्णु आळ, मूळाड, सालाड, म्हणजे प्राचीन कर्जाखाली दडपून गेलेले पिढीजाद गुलाम बनून जनावराप्रमाणें कसा तरी गुजराणा करीत आहेत. (आळ ह्याचा अर्थ माणूस व राष्ट्र असा कानडी भाषेंत होतो.) महाराष्ट्रांतील महारांचा व आंध्रांतील मालांचा तेथील रट्टांनी मालकी हक्क हिरावून, त्यांना बलुत्याचा तरी हक्क दिला आहे. पण नैऋत्येकडील ब्राह्मण जमीनदारांनी तोही न देतां केवळ गुलामगिरींत ह्यांना पुरून टाकिलें आहे.

चेरुमा (मलबार)

मलबारांत पुलयांनाच चेरुमा असें दुसरें नांव आहे. ह्याचा अर्थ चेर माक्कळ म्हणजे चेर पुत्र, चेर देशाचे मूळ रहिवाशी, असा होतो. एल. के. अनंत कृष्ण अय्यर, ह्यांनी आपल्या 'कोचीन एथ्नोग्राफी सर्व्हे नं. ६' (इ. स. १९०६) ह्या ग्रंथांत म्हटलें आहे की पुलय हेच पूर्वी मलबारचे राजे होते. एक्कर यजमान नांवाचा पुरुष त्या राजवंशांतला समजून अद्यापि सर्व चिरुमा जातींतले लोक त्याला फार मान देतात. त्रावणकोरची राजधानी त्रिवेंद्रमजवळ वेली नांवाचे तळ्याचे काठीं 'पुलयनार कोटा' नांवाची टेकडी आहे, तेथे पुलयांचें सिंहासन होतें. मी स्वत: ही टेकडी पाहिली व कथा ऐकली आहे. ओढिया जगन्नाथाच्या मूर्तीशीं जसा तेथील अस्पृश्य शबरांचा, म्हैसूर इलाख्यांतील मेलकोट येथील मूर्तीशीं जसा तेथील होलयांचा संबंध आहे, तसाच त्रिवेंद्रम् येथील पद्मनाभाच्या देवळाशीं व मूर्तीशीं तद्देशीय पुलयांचा संबंध आहे. तथापि ह्या देवळांत आता ब्राम्हणांशिवाय इतर सर्वांस मज्जाव आहे. महात्मा गांधींनाही तेथे मज्जाव झाला हें प्रसिद्धच आहे. एकाद्याचें राज्य पत्त्विण्यास त्याचें देवस्थान पत्त्वावें लागतें. ही राजनीति आर्यांना कोणी शिकवायला नको. चेरुमान पेरुमाळ अशी मलबारच्या राजाला पूर्वी संज्ञा होती. पुलया हे पूर्वी बौद्ध होते. अद्यापि त्यांच्या देवतांना चाटन=शास्ता अशीं नांवें आहेत. संस्कृतांत त्यांची पारंगतता आहे. 'कुरळ' हा आदिद्राविड ग्रंथ एका पुलयानेच केला आहे.

परैय्या [परयन्] (तामील नाड)

हें नांव तामीळ भाषेंत परै म्हणजे ढोल ह्या अर्थाचा शब्द आहे, त्यावरून पडलें असावें, असा तामीळ देशांत बऱ्याच विद्वानांचा समज असलेला मला आढळून आला. पण ही व्युत्पत्ति, मृताहर शब्दापासून महार ह्या नांवाचा छडा लावूं पाहण्यासारखीच असमर्थनीय आहे. तामीळ भाषेंत परयन् असा एकवचनी व परयर असा अनेकवचनी नांववाचक हा शब्द आहे. ह्यांत मूळ पर अशी धातु. तिला य असा आदेश लागला आहे; जसा मलबारांत मल=डोंगर ह्याला य लागून

मलयन असा नांववाचक शब्द तयार झाला आहे, तसाच हाही तयार झाला असला पाहिजे. बिशप् कॉल्डवेलच्या "द्राविडी भाषांचें तौलनिक व्याकरण" ह्या पुस्तकाच्या इ. स. १८७५ सालीं प्रसिद्ध झालेल्या दुसऱ्या आवृत्तीच्या पान ४६३ वर तौलनिक शब्दांची एक यादी दिली आहे. डॉ. गुंडर्टचे मतें द्राविड भाषेंतून संस्कृतांत शिरलेले जे कांही शब्द आहेत अशांची ही यादी आहे. ह्या यादींत फल ह्या संस्कृत शब्दाचें मुळरूप पळ असा द्राविड शब्द असून त्यांत पर=प्राचीन, जुना, अशा अर्थाची अस्सल द्राविड धातु आहे असें कॉल्डवेलचें म्हणणें आहे. संस्कृतांत पर=थोर, प्राचीन, असा शब्द आहे तोहि द्राविडच ठरतो. त्यापासूनच परयन् हें नांव आलें असावें असा माझा तर्क आहे. मह=मोठा, महत्तर=म्हातारा, ह्यापासून म्हार हें नांव जसें आलें, तसेंच परपासून परयन् हें ह्या प्राचीन थोर जातीचें नांव उद्भवणें इतिहासाला अधिक धरून आहे. ह्या जातीला हीनत्व आल्यावर ही ढोलकें वाजविण्याचें हीन काम करूं लागली आहे. पण अनादि कालापासून ही जात ढोलकेंच वाजवीत होती, असें समजणें महार अनादि कालापासून मेलेलीं ढोरें ओढत आले आहेत असें समजण्याप्रमाणें निराधार आहे. अगोदर ह्या हतभागी लोकांचें स्वातंत्र्य व ऐश्वर्य हिरावून घ्यावयाचें आणि नंतर त्यांचा इतिहासही हिराऊन घ्यावयाचा आणि सर्वांवर कळस म्हणून त्यांच्या हल्लीच्या हीनत्वाला शोभेल अशीच त्यांच्या नांवाची निराधार व्युत्पत्ति त्यांना चिकटवावयाची ! हा प्रकार अन्यायाला अडाणीपणाची जोड देऊन दुःखावर पुनः डाग देण्याप्रमाणेंच निष्ठुर आहे. हें सर्व जाणून बुजून होत नसलें तरी अनुकंपनीय खास आहे. पर धातु आर्य भाषेंतली असो, द्राविड भाषेंतली, किंवा दोन्ही भाषांतली समान असो. तिचा अर्थ पिकलेला, प्राचीन, जुना, थोर असा आहे खास. त्यापासून परयन् हें नांव पडणें, म्हणजे त्या प्रदेशांत नवीन आलेल्या वंशांनी जुन्या वंशांना हें नांव देणें, अधिक संभाव्य आहे.

भाषेशिवाय इतिहासाचाही अधिक पुरावा आहे. बिशप् कॉल्डघेल ह्या विद्वान भाषाशास्त्र्याने ह्याच पुस्तकांत (पान ५४०–५५४) परयर हे मूळचे द्राविड आहेत, की कोणी भिन्नवंशी आहेत, ह्यावर साधकबाधक प्रमाणें दिलीं आहेत. ते वंशाने कोणी असोत, दर्जाने मोठे अभिजात होते, हें मात्र उघड होतें. तीं सर्व प्रमाणें येथे देण्यास

स्थळ नाही. कॉल्डवेलचा एकच उल्लेख मार्मिक आहे तो येथे दिल्या-शिवाय मात्र गाहवत नाही. मद्रास शहरांत जॉर्जटौन नांवाचा एक जुना भाग आहे. त्यांत मारी देवीचा एक वार्षिक उत्सव होत असतो. ही मारी उर्फ शीतला म्हणजे भूमि माता हीच देवी होय. आमच्याकडील तुळशीच्या लग्नाप्रमाणें हें मारीचें वार्षिक लग्न असतें. त्या वेळीं मारी देवीच्या गळ्यांत ताळी बांधावयाची असते; ती अर्थात् तिच्या नवऱ्यानेच बांधावयाची असते. ती बांधण्याचा अधिकार परयाहून इतर कोणा-लाही मिळूं शकत नाही. ह्यावरून परया हाच भूमीचा अर्थात् देशाचा पहिला पति असा स्पष्ट ध्वनि निघतो असें कॉल्डवेलचें म्हणणें आहे. ह्या विधीला " एगत्ताळ " असें नांव आहे. अशा प्रकारचा थोरपणाचा मान महाराष्ट्रांत म्हारांना व राजपुतान्यांत भिल्लांना मिळत असलेले पुरावे पुष्कळ गोळा करितां येतील असें मला वाटतें.

येझ्वा अथवा तिय्या (मलबार)

ह्या जातीची मोठी संख्या मलबार, त्रावणकोर व कोचीन संस्था-नांत आढळते. त्रावणकोर संस्थानचे इ. स. १९०१च्या खाने-सुमारीचे अधिकारी एन्. सुब्रह्मण्यय्यर हे आपल्या रिपोर्टांत पान २७८ –७९ वर ह्या जातीच्या नांवाच्या व्युत्पत्तीची मीमांसा करितांना लिहितात की ही जात मूळ सिंहलद्वीपांतून मलबारांत व तामीळ देशांत आली. सिंहल ह्या नांवाचा अपभ्रंश ईझम् असा होऊन, त्यापासून येइवा असें हल्लीचें नांव आलें. इळ्वा असाही अपभ्रंश होतो. तिय्या असेंही ह्यांना नांव आहे. तें द्वीप ह्या शब्दाचा अपभ्रंश होय. नायर लोकांप्रमाणें ह्या लोकांची पूर्वी सैन्यांत भरती होत होती. ह्या लोकांनीच ताडीच्चे झाडाची लागवड सिंहलद्वीपांतून प्रथम हिंदुस्थानांत आणिली. ह्यांचा हल्लीचा धंदा शेतीचा–विशेषतः ताडी काढण्याचा व विकण्याचा आहे. त्यांची राहणी स्वच्छ आणि सुसंपन्न असूनही ताडीच्या निषेधामुळें ह्यांना अस्पृश्यता आली आहे. पण मूळचे हे अभिजात आहेत. ह्यांचा मूळ धर्म बौद्ध. तेंही एक ह्यांच्यावरील बहिष्काराचें मुख्य कारण आहे.

पळ्ळन् (तामीळ नाड)

महाराष्ट्रांत जशी महारांना मांगाची जोड, तशी तामीळ देशांत परैय्यांना पळ्ळांची जोड आहे. कर्नाटकाच्या खाली दक्षिणेंत सर्वत्र खालच्या वर्गांत बलगै (उजव्या हाता कडचे) आणि यडगै (डाव्या हाता-कडचे) असा भेद आढळतो. हा ग्रामसंस्थेंतील दरजाचा मान दिसतो. ह्या उजव्या डाव्या मानाबद्दल नेहमी तंटे आणि मारामाऱ्याही होतात. परयन् उजव्या मानाचा व पळ्ळन् डाव्या मानाचा आहे. पण हे दोघे अगदी भिन्न वंशाचे आहेत. कांचीचें पल्लव राजघराणें कोणी म्हणतात की इराणांतून आलेले पार्थव, तर कोणी म्हणतात इकडचे कोणी तरी मूळ एतद्देशीय. दुसऱ्या पक्षीं, हेच आता अस्पृश्य बनलेले पळ्ळ असावेत.

चक्किलियन अथवा शक्कीया (तामील नाड)

कातड्याचीं कामें करणाऱ्या ह्या जातीची संख्या ही मद्रासेकडे बरीच मोठी आहे. शिकलगार म्हणजे हत्यारांना शिकल करणारी, एक फिरस्ती गुन्हेगार जात मी कर्नाटकांत पाहिली आहे. त्यांचा व चक्किलियनांचा नांवाचा संबंध दिसतो. हत्यार पाजळण्यासाठी ह्यांच्या जवळ एक चाक किंवा चक्की असते. त्यावरून चक्किलियन हें नांव पडलें असावें. हत्यार पाजळण्याचा निषेध आहे व कातड्याचीं कामेंही घाणेरडीं असतात त्यावरून ह्यांना अस्पृश्यता आली असावी. बंगाल्यांतील शक्की जातीचाही ह्यांच्याशीं संबंध असावा.

चांभार (सर्व प्रांत)

सर्व मानीव अस्पृश्यांमध्ये चांभारांची संख्या अतिशय मोठी म्हणजे १,११,३७,३६२ आहे. ह्याचें कारण हिंदुस्थानांतील बहुतेक प्रांतांत कातड्याचीं कामें करणारे ह्याच नांवाने ओळखले जातात. पण ह्यावरून हे सारे एकाच वंशाचे असावेत, असें मुळीच नाही. अस्पृश्यता किंवा बहिष्काराच्या दृष्टीनेही ह्यांची स्थिति सर्व प्रांतांत सारखी नाही. ह्या दृष्टीने कांही प्रांतांत हे इतरांपेक्षा उच्च दरजाचे आहेत, तर दुसऱ्या प्रांतांत नीच दरजाचे आहेत. चेहरेपट्टीवरून व वर्णावरून

कांही प्रांतांत हे इतके उजळ आणि नीटस दिसतात की ते आर्यच असावेत, अशी खात्री होते. ते वेदकाळांत खात्रीने अस्पृश्य व बहिष्कृत नव्हते. असते तर तसा उल्लेख असता. चांभार हा चर्मकार ह्या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे. मोची म्हणून जी गुजराथेंत जात आहे ती मुळीच अस्पृश्य नाही. ह्यांचा धंदाही कमाईचा असल्याने व खाणें पिणें स्वच्छ असल्याने ह्यांना अलीकडे अस्पृश्यांत गणलेलें आवडत नाही.

नमशूद्र आणि राजबंशी (बंगाल)

नमशूद्र, राजबंशी, कोच, पोड, वगैरे बंगाल्यांत व आसामांत बऱ्याच जाती आहेत, त्यांना बऱ्याच शतकांपासून जी चांडाल ही संज्ञा होती ती भाषेच्या दृष्टीने खरी असो किंवा नसो, ते पूर्वी अस्पृश्य व बहिष्कृत नसावेत. चंडाल म्हणून अगदी प्राचीन काळीं हें स्वतंत्र राष्ट्र असावें. हे लोक चंड असले तरी अस्पृश्य खास नसावेत. विशेषत: पोड (पौंड्र) हे व्रात्य क्षत्रिय होते असा मनुस्मृतींत उल्लेख आहे. अलीकडे जोराची चळवळ करून खानेसुमारींत ह्या जातीने आपली चंडाल ह्या संज्ञेपासून सुटका करून घेतली आहे. तथापि त्यांची अस्पृश्यता पार नाहींशी झालेली नाही. पूर्व बंगाल्यांत मी ह्यांच्यामध्ये दोनदा जाऊन दोन चार महिने प्रत्यक्ष राहून ह्यांची घरगुती व सामाजिक स्थिति पाहिली आहे. त्यावरून ते पूर्वी बौद्ध असावेत, आणि ह्यांची एकंदरींत प्रागतिकता पाहून ह्यांची अस्पृश्यता हे लवकरच झुगारून देतील ह्यांत मला संशय वाटत नाही.

बाऊरी, बाथुरी (ओरिसा)

पहिल्या खंडांतील पांचव्या प्रकरणांत ह्या नांवाच्या जातीचा विस्तृत शोध कसा लागला ह्याचें वर्णन आहे (पान ६४–६६ पहा). हे मूळ ब्राह्मण जातीचे आर्य असावेत असें प्रसिद्ध बंगाली संशोधक बाबू नगेंद्रनाथ बसू ह्यांचें म्हणणें आहे. व त्यांनी सिद्धान्ताडंबर ह्या बाथुरी लोकांच्या ओरिया भाषेंतील ग्रंथावरून आपल्या *Modern Buddhism* ह्या ग्रंथांत (पान २३–३० भाग १ ला) तसें सिद्ध केलें आहे.

सवर, शवर (ओरिसा)

शवर, शक वगैरे जातीही व्रात्य क्षत्रिय म्हणून प्रसिद्ध आहेत. ही आता हीनत्वाला पोचलेलीं प्राचीन राष्ट्रें ओरिसा देशांतील, रानावनांतून हल्ली आपल्या बुद्ध धर्माचें गुप्तपणें अनुष्ठान लपून छपून करीत आहेत. त्यांच्या कित्येक जाती अगदी अस्पृश्य मानल्या जाऊन बहिष्कृत झाल्या आहेत, वगैरे माहिती मागील प्रकरणांतून वरील *Modern Buddhism* ह्या ग्रंथावरूनच दिलेली आहे.

बळाई (माळवा)

उत्तर हिंदुस्थानांत विशेषत: माळव्यांत ह्या जातीची मोठी संख्या आढळते. ह्यांना अस्पृश्य गणावें की नाही हा मोठा प्रश्न आहे. हे शेतकरी गुलाम असावेत. ह्यांच्यापैकी पुष्कळांनी वैष्णव धर्म स्वीकारून मांसाहार अगदीच वर्ज्य केला आहे. तरी दरजा फारसा वर चढला नाही. ह्या नांवाची व्युत्पत्ति नीटशी लागत नाही. बळ–बढ–बुढ–वृद्ध=प्राचीन, असा मी तर्क करीत आहें. पण ह्याला ऐतिहासिक पुरावा नाही.

ढाणक (गुजराथ गंगथडी वगैरे)

ह्या जातीची संख्या फार मोठी आहे. ह्यांची अस्पृश्यता अनिश्चित आहे. हे गुजराथेंत जंगली असले तरी अस्पृश्य नाहीत. स्थानिक अथवा धान्यक ह्या संस्कृत शब्दापासून ह्या नांवाची व्युत्पत्ति असावी. जैनांत ढाणक असा पंथ आहे. त्यांच्या नांवाचें मूळ स्थानकवासी असें आहे. ही जमात अगदी मूळची एतद्देशीय असावी. हे मूळचे शेती करणारे असावेत. त्यावरून धान्यक हें मूळचें नांवही संभवतें. कापड विणण्याचा धंदा जसा वर्ज्य ठरवून घेड खादी विणणारे जसे अस्पृश्य ठरले तसेच कृषिकर्म करणें वर्ज्य ठरवून जैनांनी प्रथम व इतर हिंदूंनी नंतर ह्या शेतकरी गुलामांना अस्पृश्य ठरविलें असल्यास हिंदी इतिहासाच्या परंपरेला अगदी धरूनच आहे !

तूबयाझा (ब्रह्मदेश)

ब्रह्मदेशांतील अस्पृश्य जातींत तूबयाझा या नांवाची जात प्रमुख आहे. ह्या नांवाची मूळ व्युत्पत्ति अशुभराजा असा संस्कृत शब्द आहे. हल्ली ह्या लोकांकडे जरी ब्रह्मदेशांत थडगीं खणण्याचें काम आल्याने त्यांच्या वसाहती स्मशानाजवळच आढळतात, तरी ब्रह्मदेशांत मध्ययुगीन काळांत ज्या वेळोवेळीं राज्यक्रांत्या झाल्या त्या वेळीं यशस्वी राजांनी जिंकलेल्या राजघराण्यांतील सर्व माणसांनाच नव्हे तर प्रजेलाही गुलाम करून त्यांना हलक्या दरजांत डांबून कसें ठेविलें ह्याचें वर्णन पहिल्या खंडांत ब्रह्मदेशाचे प्रकरणांत आलेंच आहे. आता व्युत्पत्तीच्या दृष्टीनेही हीच माहिती खरी ठरते. ब्रह्मीभाषेंत संस्कृत मूळ च, स, र, ह्या वर्णांचा उच्चार अनुक्रमें स, त, य, असा होतो असेंही त्या प्रकरणांत सांगितलें आहे. अशुभराजा ह्या शब्दाच्या पहिल्या अचा लोप होतो. कांही असो. ही जात पूर्वी अतिशय अभिजात होती हें सिद्ध होतें.

संडाला, डूनसंडाला (ब्रह्मदेश)

संडाला हें नांव संस्कृत चंडाल आणि डूनसंडाला हें डोम चंडाल ह्या नांवांचा अपभ्रंश आहे हें उघडच आहे. पूर्वी चंड, मुंड, गंड, वगैरे प्रतापी मोगलवंशी राष्ट्रें होतीं. त्यांत आळ ह्या पदार्चा भर पडून चंडाळ, मुंडाल=मंडल अशीं रूपें सिद्ध झालीं आहेत. आळ हा शब्द द्राविड असून, त्याचा अर्थ राष्ट्र असा आहे. मलयाळ ह्या शब्दांतही हाच आळ शब्द आढळतो. मुंडाळ नांवाचेंही राष्ट्र असावें. मुंडारी ही भाषा मुंडाळांचीच असावी. पूर्व बंगाल्यांतील अनेक नमःशूद्र घराण्यांना 'मंडळ' असें उपनांव असलेलें मी पाहिलें आहे. तें नांव मुंडाल ह्या शब्दारूनच आलें असावें. चंड म्हणजे प्रतापी असा संस्कृतांत जो शब्द आहे तो व चंडी, मुंडी, चामुंडी ह्या देवतांचीं नांवें पुराणांत आढळतात त्यावरूनही चंडाल, मुंडाळ, हीं राष्ट्रें फारच प्राचीन इतकेंच नव्हे तर अभिजातही असावींत, पण राजकारणाच्या धकाधकींत फार प्राचीन काळींच त्यांना ही अवनति प्राप्त झाली असावी, असा तर्क करण्यास जागा आहे.

'बुद्ध' शब्दाचा आश्चर्यकारक अपभ्रंश

फयाचून अथवा फयाकून (ब्रह्मदेश)

ह्या नांवाची व्युत्पत्ति पूर्णपणें समाधानकारक लागत नाही. तरी अर्धामुर्धी लागते. फया हा शब्द बुद्ध ह्या शब्दाचा ब्रह्मी भाषेतील अपभ्रंश आहे हें वाचून पुष्कळांस आश्चर्य वाटेल. पण तो तसा आहे हें निश्चित आहे. बुद्ध = बुद्ध = बुन्ह = फुर्र = फय्य = फया, अशी उत्क्रांति झाली आहे. शेवटीं आश्चर्य हें की फया म्हणजे देव असाच अर्थ होऊन न राहतां देवूळ असाही अर्थ झाला आहे. पण चून ह्या शब्दाची व्युत्पत्ति शोधून काढावयास मला ब्रह्मदेशांत वेळच मिळाला नाही. कदाचित फया सूनु = देवूळ पुत्र, देवळी, असा अर्थ असेल. पण सूनु ह्याचा अपभ्रंश तूनु असा व्हावयाला पाहिजे. आणि तूनु ह्याचा पुढे चून अथवा कून कसा झाला हें सांगवत नाही. तरी तें संभवनीय आहे. व्युत्पत्ति कशीही असो. पगानच्या अनिरुद्ध नांवाच्या ब्रह्मी राजाने दक्षिण ब्रह्मदेशांतील मनुहा ह्या नांवाच्या तेलंग राजाला इ.स.च्या ११व्या शतकांत युद्धांत पादाक्रांत करून पगान येथे त्याच्या परिवारासह नेऊन देवळी गुलाम बनविलें ह्याचें वर्णन पहिल्या खंडांत आलेंच आहे.

प्रकरण नववें

धर्म

आतापर्यंतच्या विवेचनावरून दिसून आलें असलें पाहिजे की हिंदुस्थानांत हल्ली ज्या मानीव अस्पृश्यांच्या असंख्य जाती आहेत त्या अगदी भिन्न भिन्न वंशांतून आलेल्या आहेत व त्यांची संस्कृति आणि दर्जाही भिन्न आहे; इतकेंच नव्हे तर त्यांच्या संस्कृतींत मध्यन्तरीच्या इतिहासांत चढउतार बरेच झाले आहेत. पण हेंही खरें की आजकालच्या अस्पृश्य जातींपैकी ज्यांनी प्राचीन काळीं वैभव भोगिलें असावें अशांवरही पुढे अस्पृश्यतेचा परिणाम बरींच शतकें होत आल्याने स्वाभाविकपणें त्यांच्या संस्कृतीचा फार बिघाड झालेला आहे. ह्या आणि

पुढील प्रकरणांतील विषयाचा विचार करितांना ह्या जातींमध्यें घडलेल्या मध्यंतरींच्या कालवाकालवीकडे दृष्टि ठेवणें जरूर आहे. येरवी आमच्या विचारांना एकांगीपणा येऊन, ह्या विचाऱ्यांवर आणखी एका नवीन अन्यायाचा बोजा पडेल !

ह्या प्रकरणांत धर्म हा जो शब्द योजण्यांत आला आहे तो सामुदायिक धर्म म्हणजे धार्मिक पंथ किंवा संघ ह्या अर्थानेच योजिला आहे. धर्मांचा जो आध्यात्मिक अथवा पारमार्थिक अर्थ आहे तो केव्हाही व्यक्तीपुरताच असतो. तो सामुदायिक होऊं शकतच नाही. सामुदायिक अर्थ म्हणजे पंथ अथवा संघ हा देश, काल अथवा जनसमाज यांच्या संकेताप्रमाणें बदलणारा भिन्न असतो. धर्माचा खरा अर्थ आध्यात्मिक असतो तो कांही कोणा समूहाच्या संकेताप्रमाणें बदलणारा नसतो. तो सनातन असून केवळ व्यक्तीच्या अनुभवांतच आढळून येणारा असतो. ती व्यक्ति स्त्री, पुरुष, गरीब, श्रीमंत, सुशिक्षित, अशिक्षित कशीही असो. प्रौढ वय आणि शुद्ध भावना असली की पुरे. तिच्या अनुभवांत आणि जीवनव्यवहारांत कमी अधिक मानाने हा सनातन धर्म आढळणारच. हा सनातन धर्म ह्या प्रकरणाचा मुळीच विषय नव्हे. इतकेंच नव्हे, ह्या सार्वत्रिक धर्माला हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती वगैरे नांवांनी संबोधितांही येणार नाही.

येथून पुढील प्रकरणांत, अस्पृश्यतेचा, अर्थात् हिंदुस्थानांत आज हजारों वर्षें वर दिलेल्या व्याख्येनुसार बळी पडलेल्या असंख्य जनसमूहाचा प्रश्न धसाला लागत आहे. पहिला प्रश्न हा आहे, की ह्या अवाढव्य अस्पृश्य समाजाचा धर्म कोणता ? म्हणजे सामाजिक आणि कायद्याच्या व्यवहाराच्या दृष्टीने सुधारलेल्या जगांत हल्ली जे दहापांच मोठे मोठे सर्वमान्य धर्मसंघ, अथवा गट, रूढ झाले आहेत, त्यांपैकी कोणत्यांत ह्यांचा समावेश होत आहे किंवा होण्यासारखा आहे ? कोणी सहज विचारतील की हा प्रश्नच मुळी कसा उद्भवतो ? अर्थात् हे सर्व लोक हिंदु धर्मसंघांत आजपर्यंत वावरत आले असून आताच ही विशिष्ट दीर्घ शंका कां आली ? शंका दीर्घ असो की विशिष्ट वाटो, ती अनाठायी नाही. अगोदर हिंदु धर्माचीच ठाम व्याख्या होत नाही. यहुदी, झरदुष्ट्री (पार्शी), बौद्ध, जैन, ख्रिस्ती, मुसलमान, ह्या मोठ्या आणि प्राचीन, किंवा शीख,

लिंगायत, ब्राह्म समाज, आर्य समाज, देवसमाज वगैरे अर्वाचीन लहान संघांप्रमाणें, हिंदु संघाच्या मर्यादा इतिहासाच्या दृष्टीने, किंबहुना लोकव्यवहाराच्या दृष्टीनेही ठाम ठरवितां येत नाहीत. हिंदु धर्म ही एक केवळ पुरातन काळापासून चालत आलेली रूढि आहे. कोणत्याही रूढीच्या मर्यादा ठरविणें जितकें कठीण आहे, त्याहूनही ह्या हिंदुधर्मरूपी पुरातन रूढीच्या मर्यादा ठरविणें अनंत पटीने जास्त दुरापास्त आहे. जवळ जवळ हें काम अशक्य आहे. हिंदु धर्म हें एक मायपोट आहे ! ह्यांत सगळ्या जगाचाही समावेश करूं पाहणाराचा हात कोणालाही निदान तर्कशास्त्राचे दृष्टीने धरतां येणार नाही. कोणी म्हणेल हिंदु म्हणजे जातिभेद मानणाऱ्यांचा एक गट आहे. पण शीख, लिंगायत, ब्राह्मसमाज वगैरे अलीकडचे जातिभेद न मानणारे पंथही खानेसुमारीच्या अहवालांत बिनबोभाट हिंदु ह्या सदरांत गणले जात नाहीत काय ? परवापर्यंत मिश्रविवाह करूं पाहणाऱ्यांना आपण हिंदु, मुसलमान, खिस्ती वगैरेपैकी कोणी नाही असें लिहून दिल्याशिवाय इंग्रज सरकारचे रजिस्ट्रार त्यांचा विवाह नोंदण्याचें नाकारीत असत. पण अलीकडे सर हरिसिंग गौरच्या ह्या कायद्यांतील सुधारणेमुळें ही खुटीही अगदी ढिली झाली आहे. गौरच्या सुधारणेपूर्वीही अनेक मिश्रविवाहितांनी आपले विवाह नोंदून घेण्याचेंच मुळी साफ नाकारलें आहे. म्हणून तेवढ्यानेच ते हिंदू नाहीत असें कोण म्हणूं शकेल ? मनुस्मृतींत वर्णसंकराचा कितीही बाऊ दाखविला असला, तरी प्रत्यक्ष मनुस्मृतीच्या काळांतही चार वर्णांच्या मर्यादा ठरविणें जें अशक्य होतें, तें आता शक्य थोडेंच झालें आहे ? तात्पर्य काय की हिंदुधर्माची खरी व्याख्या म्हणजे जो कोणी आपल्यास हिंदु म्हणवीत असेल, तोच हिंदु. जो हिंदु असूनही म्हणवून घेण्यास तयार नसेल त्याच्यावर कोण जबरी करूं शकेल ? रोजच्या व्यवहाराच्या दृष्टीने इतक्या खोल पाण्यांत शिरण्याची तसदी कोणी घेत नाही. पण खानेसुमारी तयार करणारावर ह्या खोल पाण्यांत शिरण्याची जबाबदारी अलबत पडते; ती त्याला टाळतां येणार नाही. आजच्या आमच्या ह्या खंडवजा मोठ्या देशांत असे अनेक असंस्कृत मागासलेले जनसमूह आहेत की, ते आपण हिंदु आहोंत की नाही, ह्या प्रश्नाला कांहीच उत्तर देऊं शकत नाहीत; किंबहुना देऊं इच्छितही नाहीत. अशा असंख्य

असंस्कृतांच्या आचारविचारांची नीट पाहणी करून व त्यांच्या लक्षणांची व्याख्या ठरवून त्यांना धर्माच्या सदरांत एक विवक्षित जागा देणें खानेसुमारीच्या खात्याला भाग पडतें.

इ.स. १९०१ सालीं हिंदी खानेसुमारीचें प्रमुखत्व जेव्हा सर एच. एच. रिस्ले ह्या नामांकित समाजशास्त्रज्ञाकडे सोपविण्यांत आलें, तेव्हा त्याला अशा अनेक असंस्कृत जाती ह्या देशांत आढळून आल्या की त्यांच्या धार्मिक आचारविचारांना आणि भावनांना हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती वगैरे-पैकी कोणत्याच रूढ नांवाखाली समाविष्ट करणें अशक्य झालें. आणि साधारण गणकांना तर कांही तरी वट्ट हुकूम फर्मावणें भाग पडलें. म्हणून धर्माचा प्रश्न आल्याबरोबर अशा धर्माच्या सदराखाली त्या त्या असंस्कृत जातींचेंच कामचलावू नांव नमूद करण्याविषयीं हुकूम देणें रिस्ले ह्यांना भाग पडलें. याप्रमाणें गणकांचें काम सोपें झालें. तरी अशा अनेक जातींना प्राथमिक प्राकृत धर्मांची लक्षणें पाहून कांही तरी एक सामान्य नांव नवीनच कल्पणें भाग पडलें. देशी रूढ भाषेंत असें नांव आढळेना. (१) Fetishism (जडवस्तुपूजा),(२) Shamanism (श्रमणवाद उर्फ पंचाक्षरी मार्ग), Animism (३) (भूतपूजा), हीं तीन नांवें त्यांनी आधुनिक समाजशास्त्रांतून अथवा तौलनिक धर्मशास्त्रांतून निवडून, त्यांपैकी सारासार विचार करून तिसरें भूतधर्म अथवा पिशाचपूजा हें नांव पसंत केलें. व त्या नांवाच्या सदराखाली या सर्व जातींची सरगणना करण्यांत आली. सन १९०१ सालीं हिंदुस्थान, बलुचिस्थान आणि ब्रह्मदेश मिळून एकंदर लोकसंख्या २९,४३,६१,०५६ आणि एकंदर हिंदूंची संख्या २०,७१,४७,०२६ भरली. त्या हिंदूंशिवाय वरील भूतधर्मीयांची संख्या एकूण ८५,८४,१४८ दाखविण्यांत आली आहे. (खाने० रिपोर्ट १९०१; खंड १–अ, भाग २–कोष्टकें; कोष्टक ६ पान ५८ – ६२ पहा.). त्याच रिपोर्टाच्या पहिल्या पुस्तकांतील पुरवणी भागांत शेवटीं पान ५६०–५६९ पर्यंत एकंदरींत सर्व हिंदी लोकांचा सामाजिक दर्जा दाखविणारीं जीं कोष्टकें दिलीं आहेत त्यांत निगनिराळ्या प्रांतांतून जो अस्पृश्य मानलेल्या अनेक जातींची संख्या दिली आहे तिचा वट्ट आंकडा ५,१७,३८,६७३ हा तयार होतो. या विशिष्ट प्रांतवार कोष्टकांवरून उघड दिसतें की रिस्ले यांनी या मानीव अस्पृश्यांना पूर्ण विचाराअंतीं व जबाबदारीपूर्वक

हिंदु-धर्म-संघांतच समाविष्ट केलें आहे. शास्त्रीय आणि केवळ औपपत्तिक दृष्टीने कांही ठरो, चालू लोकमत आणि लोकव्यवहार या दृष्टीने पाहतां, या गणनेंत आक्षेपार्ह असें कांही नाही असें कोणासही वाटेल; आणि मलाही असेंच वाटतें. पुढील दशवार्षिक म्हणजे इ. स. १९११ सालच्या शिरगणतीचें काम ई. ए. गेट यांचेकडे सोपविण्यांत आलें. हे गृहस्थ इ. स. १९०१ सालींही रिस्ले साहेबांचे सहकारी होते. या दहा वर्षांत पुढीलप्रमाणें वरील वट्ट आकड्यांत वाढ झालेली दाखविली आहे. एकूण हिंदी लोकसंख्या ३१,३५,४७,८४०, एकूण हिंदु २१,७५,८६,८९२, एकूण भूत-धर्मीय १,०२,९५,१६८. या दहा वर्षांत हिंदूंच्या वट्ट लोकसंख्ये-विषयीं मुसलमानांनी वाद उपस्थित केला होता. पण तो या भूतधर्मीयांच्या संख्येबद्दल नसून केवळ अस्पृश्यांना हिंदूंत गणावें की वेगळें गणावें याबद्दल होता. इ. स. १८६७ सालापासून म्हणजे खानेसुमारी हिंदु-स्थानांत सुरू झाल्यापासून या भूतधर्मीयांची संख्या हिंदूंपासून अलगच दाखविण्यांत येत आहे; म्हणून त्यांच्यासंबंधाने वादाला कारणच नव्हतें, पण अस्पृश्यांच्याबद्दल वाद उपस्थित होण्यास सबळ कारण होतें. मानीव अस्पृश्यांची जेव्हा इ. स. १९०१ सालच्या खानेसुमारींत जवळ जवळ ५॥ कोटी ही संख्या प्रांतवार पसरलेली आढळली, इतकेंच नव्हे पण या मानीव अस्पृश्यांतही कांही प्रांतांतून कांही कांही अस्पृश्य जाती भूतधर्मीयांच्या सदरांत दाखविलेल्या आढ-ळल्या, तेव्हा सर्वच मानीव अस्पृश्यांसंबंधीं वाद उपस्थित होणें साहजि-कच होतें. कदाचित् या वादाला कांही अंशीं बळी पडून म्हणा, किंवा ही कटकट चुकविण्याच्या हेतूने म्हणा इ. स. १९११ सालीं मानीव अस्पृश्यांची संख्या वेगळी दाखविण्यांत आली नाही. इतकेंच नव्हे तर स. १९०१ सालाप्रमाणें हिंदुधर्मांतर्गत निरनिराळ्या समाजांचा अथवा जातींचा परस्पर उच्चनीच दर्जा दाखविणारीं कोष्टकेंच स. १९११ सालच्या खानेसुमारींतून वगळण्यांत आलीं. त्यामुळें ह्या भूतधर्मीयां-पैकी किती जाती व त्यांची किती संख्या मानीव अस्पृश्य आहे, आणि उलट पक्षीं, ह्या मानीव अस्पृश्यांतील किती जाती व त्यांची किती संख्या भूतधर्मीय आहे, हें नक्की ठरविण्यास मार्गच उरला नाही.

कांही असो. मानीव अस्पृश्यांच्या प्रचंड लोकसंख्येंत कांही तरी भूत-धर्मीयांची गणना झालेली आहे ह्यांत शंका नाही. तथापि सर्वच मानीव अस्पृश्य भूतधर्मीय, असेंही म्हणतां येत नाही. कारण पहिल्यांची वट्ट संख्या दुसऱ्यांच्यापेक्षा पांच पटींहून उघड उघड अधिक भरत आहे.

हा निर्णय झाला आधुनिक लोकमतानुसारें व लोकव्यवहाराच्या दृष्टीने. पण अगदी प्राचीन काळीं जेव्हा वेदधर्मीय आर्य (?) नांवाचे लोक हिंदुस्थानांत येऊन वसाहत करूं लागले त्या वेळीं हिंदुधर्माचा व्याप आणि अर्थ आजच्यासारखा व इतका स्पष्ट असणें शक्य नाही. अस्पृश्यतेची संस्था आर्यांच्या वसाहतीपूर्वी किंवा वसाहतीच्या काळीं ह्या देशांत होती की नव्हती हें निश्चित ठरविण्यास साधन नाही. वेदसंहितेचा काळ खिस्ती शकापूर्वी हजार बाराशें वर्षें इतका अलीकडे मानला तरी त्या काळच्या वाङ्मयांत अथवा अन्य प्रकारें अस्पृश्यतेचा ग्रांथिक अथवा लेखी पुरावा मुळींच सापडत नाही, हें आपण पहिल्या खंडांत पाहिलें. मानीव अस्पृश्य त्या वेळीं असले तरी, त्यांची संख्या आणि आपत्ति आजच्या-सारखी आणि इतकी तीव्र असणें शक्य नव्हतें. कारण तत्कालीन सामाजिक घटना आजच्याप्रमाणें सुसंघटित व दृढमूल झालेली नव्हती. पाणिनीच्या कालापासून अस्पृश्यतेचे उल्लेख मिळूं लागतात. यास्काचार्यांनी आपल्या निरुक्तांत अध्याय ३, खंड १६, मंत्र १० ह्यावर भाष्य करितांना केलेला "चत्वारो वर्णा निषादः पंचम इति औपमन्यवः।" हा पंचम वर्णाचा उल्लेख संस्कृत वाङ्मयांत जवळ जवळ पहिलाच होय. वर्ण तर चारच. पांचवा जन म्हणजे वर्णबाह्य निषादांच्या जाती असा पंचम शब्दाचा अभिप्राय आहे. औपमन्यवांच्या काळींही निषाद म्हणून जो लोकसमूह होता, तो सर्व आताप्रमाणें अस्पृश्य मानला जात होता ह्याला पुरावा नाही. निषाद म्हणजे आर्यांच्या वसाहतीबाहेरचे लोक; स्वतः वसाहत करून स्वतंत्रपणें राहणारे. त्यांचा व आर्यांचा संबंधच येत नसल्याने आधुनिक बहिष्काराचा व अस्पृश्यतेचा प्रश्नच त्यांच्या संबंधीं उद्भवत नाही. (मागे पान २६–२८ पहा.)

आजची अस्पृश्यता मनुस्मृतीच्या काळीं पूर्णत्वाला आलेली आढळते. ह्या अस्पृश्यांची पूर्वपीठिका आणि हे कोणत्या कारणांनी अस्पृश्य ठरविण्यांत आले, ह्याविषयीं मनुस्मृतीची मीमांसा निराधार

व अनैतिहासिक आहे, असें मी वर प्रतिपादिलें आहे. तरी त्या काळीं आजचा बहिष्कार व अस्पृश्यता ह्यांचा जम पूर्ण बसला होता असें मानण्याला मनुस्मृतीचा पुरावा अगदी बिनतोड आहे, ह्यांत शंका नाही. मनूच्या दहाव्या अध्यायांत वर्णसंकराने उत्पन्न झालेल्या कोणत्या जाती कशा व किती हीन, म्हणून अस्पृश्य व बहिष्कृत, ह्याचा निर्णय दिला आहे. ब्राह्मण स्त्री आणि शूद्र पुरुष ह्याच्या प्रतिलोमसंकरजन्य संततीला चंडाल ही संज्ञा देऊन ती जात पहिल्या पायरीची अस्पृश्य कल्पिली आहे. पण हा चंडाल आणि निषाद स्त्री ह्यांच्या संकरसंततीला व अंत्यावसायी, पुक्कस, कारावर, आहिंडिक, सोपाक, वगैरे जातींना, चंडालाहून अधिक नीच पायरीचे ठरविण्यांत आलें आहे. चांडाल झाला तरी शूद्रापासून म्हणजे वर्णांतर्गत शेवटच्या वर्णापासून झाला म्हणून तो तुलनेने बरा. पण वर्णबाह्य निषाद आणि हा अस्पृश्य चांडाल ह्यांच्या संकराला अधिकाधिक नीच मानण्यांत आलें आहे. तरी पण स्वतः निषाद हा अस्पृश्य असण्याचें कारणच नव्हतें. कारण त्यांचा व आर्य वसाहतींचा अर्थाअर्थी संबंधच येत नव्हता. त्याचप्रमाणें हल्लीही बृहद् हिंदु समाजाशीं अगदी फटकून राहणाऱ्या जंगली भूतधर्मीय जाती अस्पृश्य मुळीच नाहीत. ज्या असंस्कृत आर्येतरांचा आर्य वसाहतीशीं केवळ हीन कामधंद्यासाठी संबंध आला, किंबहुना ज्या स्वतंत्र जातींना जिंकून अगर त्यांच्याशीं समजुतीने वागून, वसाहतीला चिकटूनच पण अगदी बाहेर डांबण्यांत आलें त्याच तेवढ्या जमाती आजकालच्या बहिष्कृत अस्पृश्य जाती होत. केवळ जिंकण्यामुळें, अगर हीन धंद्यामुळेंच नव्हे तर पाखंडी धर्मावरील क्रूर बहिष्कारामुळेंही वेळोवेळीं व देशोदेशीं या बहिष्कृतांत भर पडत जाऊन आजकालची अवाढव्य संख्या कशी तयार झालेली आहे, हें मागील प्रकारणांत सिद्ध झालेंच आहे. पण अजून ज्यांचा वसाहतींशीं संबंध आलेला नाही, अशा जंगली जाती आजही अस्पृश्य नाहीत. पण त्यांचा धर्म मात्र प्राथमिक दर्जाचा म्हणजे भूत-प्रेत-पिशाचादिकांची पूजा हा आहे.

आमचा प्रस्तुतचा मुद्दा 'अस्पृश्यांचा' धर्म कोणता हें ठरविण्याचा आहे. आज हजारों वर्षें मानीव अस्पृश्य जाती शहरांतून व खेड्यांतून वरिष्ठ म्हणविणाऱ्या हिंदु, मुसलमान इत्यादिकांच्या वसाहतींबाहेर राहत आल्या आहेत. त्यांचा धर्म कोणता ? त्यांचे देव कोणते ? त्यांचे सण कोणते ? त्यांचे उत्सव कोणते ? त्यांचे विधी कोणते ? त्यांचे संस्कार कोणते ? त्यांचे पुरोहित कोण ? त्यांचे उपाध्याय कोण ? त्यांचे गुरु कोण ? त्यांचे आचार कोणते ? त्यांचे विचार कोणते ? त्यांचे उच्चार कोणते ? त्यांचे प्रचार कोणते ? त्यांचे आहार कोणते ? त्यांचे विहार कोणते ? त्यांचे व्यवहार कोणते ? त्यांचे संसार कोणते ? त्यांचे परिवार कोणते ? त्यांचे प्रकार कोणते ? त्यांचे आकार कोणते ? त्यांचे विकार कोणते ? त्यांचे संस्कार कोणते ? त्यांचे उपचार कोणते ? त्यांचे प्रपंच कोणते ? त्यांचे परमार्थ कोणते ? त्यांचे स्वार्थ कोणते ? त्यांचे पुरुषार्थ कोणते ? त्यांचे कर्तव्य कोणते ? त्यांचे अकर्तव्य कोणते ? त्यांचे पाप कोणते ? त्यांचे पुण्य कोणते ? त्यांचे स्वर्ग कोणते ? त्यांचे नरक कोणते ? त्यांचे मोक्ष कोणते ? त्यांचे बंधन कोणते ? त्यांचे मुक्ति कोणते ? त्यांचे भक्ति कोणते ? त्यांचे शक्ति कोणते ? त्यांचे युक्ति कोणते ? त्यांचे अनुभव कोणते ? त्यांचे प्रभाव कोणते ? त्यांचे स्वभाव कोणते ? त्यांचे गुण कोणते ? त्यांचे दोष कोणते ? त्यांचे रोग कोणते ? त्यांचे उपाय कोणते ? त्यांचे औषध कोणते ? त्यांचे पथ्य कोणते ? त्यांचे अपथ्य कोणते ? त्यांचे आयुष्य कोणते ? त्यांचे मरण कोणते ? त्यांचे जीवन कोणते ? त्यांचे जीवित कोणते ? त्यांचे जीवितकार्य कोणते ? त्यांचे जीवितध्येय कोणते ? त्यांचे जीवितहेतु कोणते ? त्यांचे जीवितसाधन कोणते ? त्यांचे जीवितसाध्य कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्य कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंधसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंधसंबंधसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंधसंबंधसंबंधसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंधसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंध कोणते ? त्यांचे जीवितसाधनसाध्यसंबंध

जवळ त्यांच्या सेवेंत राहत आल्यामुळें, या मानीव वरिष्ठांच्या धर्माच्या व राहणीचा थोडा फार परिणाम या मानीव अस्पृश्यांवर होणें अगदी साहजिक आहे. बौद्ध, लिंगाईत, शीख, खिस्ती, मुसलमान हे धर्मपंथ प्रसारक आणि प्रागतिक असल्याने मानीव अस्पृश्यांचा शिरकाव या निरनिराळ्या नवीन पंथांत हजारांनीच नव्हे तर लक्षांनी झाला आहे. येरवी या परकीय व पाखंडी समजले गेलेल्या पंथांना तरी प्रथम प्रथम रिक्रूट भरती कोठून मिळणार ? बंगाल्यांत, मध्यप्रांतांत, विशेषत: मद्रासेंत आणि मलबारांत हल्लीच्या मुसलमानांच्या व खिस्त्यांच्या संख्ये-पैकी शेकडा नव्वद हे मूळचे 'अस्पृश्य'च आहेत, असें जें खानेसुमारीच्या रिपोर्टांत म्हटलेलें आढळतें, तें मुळीच अतिशयोक्तीचें नाही. या नवीन सुधारक पंथांत न शिरतां, मागे सनयीच्या जोरावर ज्यांची मोठी संख्या पूर्व स्थितींत राहिली त्यांच्यापैकी बहुसंख्येवर हिंदु-धर्मांतील हीन देवता आणि अडाणी विधिसंस्कार यांचा परिणाम काल-वशात् झाला असलेला आता दिसतो व म्हणून त्यांना हिंदू हें नांव पडलें आहे यांत काय नवल ? नवल हेंच की परकीयांनी व 'पाखंड्यांनी' या अस्पृश्यांचा एवढा मोठा भाग काबीज करून घेतला असतां, उलट सोवळा हिंदुधर्म मात्र अद्यापि या बिचाऱ्यांना झिडकारून हिरमुसले करीत आहे ! इतकेंच नव्हे तर त्यांचें हाडवैर संपादन करीत आहे. तें कसेंही असो. अशा स्वाभाविक ओघाने अस्पृश्यांचा समावेश हिंदु-धर्मांत झालेला आता दिसत आहे. ते संस्कारत: हिंदू नसून, केवळ संसर्गत: किंबहुना स्वभावत: हिंदू बनले आहेत असें म्हणणें क्रमप्राप्त आहे.

एकाद्या मेजवानीचे वेळीं पक्वान्नाचा ताजा वाटा सर्व 'वरिष्ठ' वर्गांना जाऊन मातींत मिसळलेल्या उष्ट्या पत्रावळी उकिरड्यावर टाकल्यावर, ज्याप्रमाणें खेड्यांतील 'अस्पृश्यां'ना चाटावयाला मिळतात, त्याचप्रमाणें हिंदुधर्माचा हीन भाग मात्र नेमका यांच्या वाट्याला येतो. बंगाल्यांतला चैतन्यांचा वैष्णव भक्तिमार्ग, शिखांचा सत् अकाल, महाराष्ट्रांतील ज्ञानबा-तुकारामांचा वारकरी संप्रदाय अनुसरण्यास आणि द्राविडांतील कांही वरवरचीं सांप्रदायिक चिन्हें आचरावयास त्यांना मुभा आहे. पण उच्चवर्णी वैष्णवांत कोणी अस्पृश्य वैष्णवाने अगर शैवाने समान दरजाने मिसळूं म्हटलें किंवा देवळांतच काय पण कांही देवळांच्या

नुसत्या वाटेवर पाय ठेवूं म्हटलें तर त्यांच्या जीवावरच्च येऊन बेतते. इतकेंच नव्हे तर सार्वजनिक शांतीच्या सबबीवर इंग्रज बहादुरांचें सोटेशाही पोलीस व लष्कर सोवळेवाल्यांचीच बाजू घेऊन या हतभाग्यांवरच्च घसरतें. असो, या अपवादक गोष्टी सोडून दिल्या तर आज मानीव अस्पृश्यांचा बहुजनसमाज भुताखेतांच्या पूजेंतच गुरफटलेला दिसत आहे. तो केवळ नामधारी खानेसुमारींतलाच हिंदू आहे असें म्हटल्यास निदान तज्ज्ञांचा तरी आम्हांवर राग होणार नाही अशी आशा आहे.

बहुतेक मानीव अस्पृश्यांच्यीं प्रमुख प्रमुख प्राचीन राष्ट्रें, उदाहरणार्थ महाराष्ट्रांतील महार मांग, मद्रासेकडील पारिया पुलया, बंगाल्यांतील नमशूद्र राजबंसी इ०, यांचें मूळ राष्ट्रदैवत म्हणजे एकच; ती मरी आई हेंच होय. हें दैवत भूमिमातेचेंच एक रूपक अथवा प्रतीक आहे, हें तौलनिक धर्मशास्त्राने सिद्ध होण्यासारखें आहे. हें आद्य दैवत केवळ आजकालच्या अस्पृश्यांचेंच नव्हे, तर प्राचीन काळच्या बहुतेक साऱ्याच प्राथमिक राष्ट्रांच्या देव्हाऱ्यावर कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपाने प्रतिष्ठित होतेंच. इतकेंच नव्हे तर आजही हिंदुस्थानांतील ब्राह्मण, क्षत्रिय आदिकरून वरिष्ठ गणलेल्यांचें कुलदैवत अगर इष्ट दैवत दुसरें कितीही उच्च असलें, तरी त्यांच्या बायकांकडून प्रसंगाविशेषीं, शितळादेवी, सटवाई, मेसाई, मरी आई या गांवाच्या शिवेवर ठाण मांडून बसलेल्या माताच पूजेचा मान आणि हक्काचा नैवेद्य उगाविल्याशिवाय राहत नाहीत. शिव आणि काली हीं दैवतें जीं प्रसिद्धपणेंच मूळच्या रहिवाश्यांचीं होतीं तीं मागाहून आलेल्या सुधारलेल्यांनी आपलींशीं करून घेतलीं. त्यांना आता प्रतिष्ठा आली आहे. पण वरिष्ठ वर्गांच्चे लौकिक व्यवहार आणि लोकभ्रम यांजकडे दृष्टि फेकली तर पिंपळावरच्चा मुंजा, भिंतीवरच्चा नागनरसोबा, नदीनाल्यांतल्या जकण्या, दाट झाडींतली काळूबाई, यांचा अंमल 'अस्पृश्यां'प्रमाणें अद्यापि 'स्पृश्यां'वर देखील इतका जारी चालू आहे की या हिंदुधर्माच्या मायपोटांत संस्कृत धर्माची हद्द संपते कोठे व प्राकृतधर्माची सुरू कोठे होते, हें शोधणें म्हणजे मृगजळाच्या मर्यादा शोधण्याप्रमाणें व्यर्थ ठरतें. अशा परिस्थितींत बिचाऱ्या 'अस्पृश्यां'नाच हसण्यांत कोणता शहाणपणा आहे! वरिष्ठ

वर्गाचा असला तिरस्कार व छळ सोसून अद्यापि या भोळ्या जाती आपल्यास हिंदू म्हणविण्याचा आग्रह सोडीत नाहीत हेंच वरिष्ठ म्हणविणारांनी आपलें मोठें भाग्य समजावें. असें असून आजकालच्या वर्णाश्रम स्वराज्य परिषदा अस्पृश्यांना तर दूर लोटतात इतकेंच नव्हे, पण त्यांच्या वतीने दोन समजुतीच्या गोष्टी सांगावयास येतों म्हणणाऱ्या अस्सल ब्राह्मण विद्वानांना, देशाभिमानी पुढाऱ्यांना व विरक्त संन्याशांना देखील आपल्या आजूबाजूला फिरकूं देत नाहीत, या अन्यायाला काय म्हणावें ! म्हणावयाचें काय, ह्या अपूर्व अन्यायाचेंच नांव अलीकडे 'सनातनी हिंदु धर्म' असें रूढ झालें आहे.

केवळ संघाच्या दृष्टीने पाहतां मात्र ह्या अस्पृश्यांच्या प्रचंड समूहाला हिंदुधर्मांत जागा आहे असें मानण्यांच्या उलट आणखी एक मोठा प्रबळ व प्रतिकूल पुरावा अभेद्य परंपरेने चालत आलेला आहे, तो दृष्टिवेगळा करून चालावयाचें नाही. हिंदु संघाच्या शेजारीं राहून अनुकरणवशात् मानीव अस्पृश्यांतील कांही सुधारलेल्या समाजांनी हिंदु उपासनेचा स्वीकार केला तर तिकडे हिंदु धर्माचा पुरोहित वर्ग फार तर दुर्लक्ष्य करील. प्रत्यक्ष हरकत करण्याची दगदग करणार नाही. पण स्वत: जाऊन अस्पृश्यांचें पौरोहित्य आजवर कोणत्याही प्रांतांत कोणाहीं ब्राह्मणाने केलेलें नाही. किंवा त्यांच्याकडे जाऊन त्यांना आपल्या धर्माचा नुसता उपदेशही केलेला नाही ! लग्नविधि, असो किंवा स्मशानविधि असो, बारसें असो किंवा मृताचा दिवस असो, अशीं सर्व शुभाशुभ धर्मकृत्यें करावयाला ह्या सर्व अस्पृश्य जातींचे आपल्यापैकीच गुरु अथवा गोसावी असतात. त्यांच्या परंपरा चालत आलेल्या असतात. त्यांना जातीकडून अथवा क्वचित् राजाकडूनही उत्पन्नें असतात. व्यक्तिश: दक्षिणाही मिळते. ह्यावरून धर्मसंघाच्या दृष्टीने ह्या ग्रामबाह्य जाति आचारबाह्य आहेत असें स्पष्ट होतें. लोकमान्य टिळकांनी

प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता ।
उपास्यानामनियमः एतद्धर्मस्य लक्षणम् ॥

अशी एकदा हिंदुधर्माची एक कामचलावू व्याख्या केली होती. ती किती जरी ऐसपैस त्या वेळीं वाटली, तरी ह्या जातींला ती देखील लागू पडत

नाही. 'उपास्यानामनियमः' आणि 'साधनानामनेकता' हीं व्यतिरेकी लक्षणें तर अजागळवत् व्यर्थच आहेत. कारण हीं व्यतिरेकी लक्षणें जीं अधर्माचीं आहेत, तींच पुनः धर्माचीं कशीं होऊं शकतील ? तीं कांही तरी विधायकच असलीं पाहिजेत ना ? खिस्ती व मुसलमानी धर्मसंघांत उपास्यांचा नियम आहे. तो हिंदुधर्मसंघांत नाही. येवढ्यावरून तो हिंदूंचें वैशिष्ट्य होऊं शकत नाही. कारण असा अनियम बौद्ध व इतर समाजांतही आढळतो. 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु' म्हणजे वेद प्रमाण मानणें हेंही तत्त्व व्यवहारांत फारच गैरसोयीचें झालें आहे. कोणाही स्पृश्य ब्राह्मणेतराचे घरीं पूजा अथवा गृह्यसंस्कार चालविण्यास ब्राह्मण गेला तर तेथे वेदमंत्र म्हणण्यास तो तयार नसतो. ब्राह्मणेतरांसाठी पुराणोक्त निराळे मंत्र तयार आहेत. जेथे ब्राह्मणेतरांच्या बाबतींत स्वतः ब्राह्मणांचीच प्रामाण्यबुद्धि अशी लटपटते, तेथे अस्पृश्यांच्या आणि वेदांच्या संबंधाची नुसती कल्पनाही कशी शक्य होणार ! मग अस्पृश्य हिंदु कसे हा एक खरोखर प्रश्नच आहे. आज ज्या क्षुद्र देवतांच्या उपासना अस्पृश्य करीत असलेले दिसतात, त्यांची उपासना वरिष्ठ म्हणविणारे हिंदूही राजरोस करितात एवढ्यावरूनच अस्पृश्यांना हिंदु म्हणावयाचें ना ? पण ह्या देवता अस्पृश्यांनी स्पृश्यांपासून घेतल्या की स्पृश्यांनी अस्पृश्यांपासून ? कोणी म्हणेल स्पृश्यास्पृश्यतेचा उद्भव होण्यापूर्वीपासूनच ह्या देवता आणि त्यांची उपासना सर्वत्रच चालू आहे. पण मग तेवढ्यानेच अस्पृश्य हिंदु कसे ठरतात ? अशा उपासना महायान बौद्ध धर्माच्या हीन अनुयायांमध्यें अद्यापि हिंदुस्थानाच्या सरहद्दीवर व बाहेरही चालू आहेत. मग तेही हिंदुच काय ? मुसलमान ताबूत करितात, व त्यांचें पाहून कांही हिंदु मुसलमानांपेक्षाही अधिक बेहोष होऊन ताबुतापुढे नाचतात, म्हणून हिंदूंना काय मुसलमान म्हणावयाचें ? की ताबुतांना हिंदुधर्माचें साधन म्हणावयाचें ? ह्या विक्षिप्त संबंधाला जसें केवळ अनुकरणसंबंध म्हणतां येईल, तसेंच स्पृश्यांच्या व अस्पृश्यांच्या दरम्यान आज दिसणारा धार्मिक संबंधही केवळ अनुकरणसंबंध का म्हणूं नये ? हा संबंधही केवळ उपासनेच्या कांही भागापुरताच दिसतो. सर्वच उपासना तरी स्पृश्यांप्रमाणें अस्पृश्यांत कोठे रूढ आहेत ? गाय, ब्राह्मण आणि तुळशीवृंदावन हीं तीन पूजास्थानें

हिंदु बहुजनसमाजामध्यें रूढ आहेत, तशीं तीं अस्पृश्यांमध्यें आहेत काय? मुळींच नाहीत. खिस्ती–मुसलमानांप्रमाणें, शीख आणि लिंगायतांनी पुष्कळ प्रमाणाने व शैव वैष्णवांनी थोड्या प्रमाणाने ह्या बहिष्कृत वर्गांना आपल्यांत घेण्याचा प्रयत्न केला; पण खिस्ती-मुसलमानांचें ह्या बाबतींतलें यश उत्तम, शीख–लिंगायतांचें यश मध्यम, आणि शैव–वैष्णवांचें यश कनिष्ठ का ठरलें? लिंगायतांत च्छलवादी आणि शीखांत मजबी अथवा लालबेग म्हणून जे लोक असतात ते अस्पृश्यांतूनच आलेले असतात. ते अद्यापि अस्पृश्यच आहेत! पहिल्यांनी अस्पृश्यांना एकदम आपल्या धर्मसंघांत एकजीव करून घेतलें, दुसऱ्यांनी घरसोड चालविली आहे, व तिसऱ्यांनी तर अस्पृश्यांना आपल्या वेदांच्या, देवळांच्या आणि संघाच्या बाहेर लांब ठेवलें आहे. हिंदुधर्माची परंपरा, सांघिक शासन, विधि संस्कार, पठन पाठन, मग तें वैदिक असो, पुराणोक्त असो, संस्कृत असो वा प्राकृत असो, त्याचा अधिकार मानीव अस्पृश्यांना स्वप्नांत देखील मिळणें शक्य नाही. तो मिळविण्यासाठी अस्पृश्याने मरून पुनः स्पृश्यांत जन्मलें पाहिजे; येरवी नाही. असाच खरोखर त्यांच्या वरील बहिष्काराचा अर्थ आहे. ह्या अर्थाचा निषेध व निराकरण करून धमक असेल तर हिंदु समाजाची व संघाची नवी घडी घालणें हें सुधारकाचें काम आहे. नुसती अर्थाची शाब्दिक लावालावी करून वास्तविक बदल कसा घडेल! तोंवर अस्पृश्यांच्या धर्मांचें कोडें कसें उकलणार!

हिंदुस्थानांतील कोट्यवधि अस्पृश्य आज कित्येक शतकें बिनबोभाट आपल्यास हिंदु म्हणवीत आहेत, त्यांचा प्रत्यक्ष छळ करणारे स्पृश्य वर्गही नुसतें नांवाने हिंदु म्हणवून घेण्याला त्यांना हरकत करीत नाहीत. इतकेंच नव्हे, कपट राजनीतींत कुशल असलेल्या इंग्रज सरकारच्या खानेसुमारी खात्याच्या प्रमुखांनी प्रति दशवार्षिक अहवालांत, निर्विकार समाजशास्त्राचें आलोडन करूनही अस्पृश्य वर्गांची गणना हिंदु धर्माच्या सदराखालीच केली आहे. असें असूनही त्यांच्या हिंदुत्वाविषयीं मी जी वर शंका प्रगट केली आहे, ती कांही आमच्या राष्ट्राच्या परसांतील गृहकलह जो एकदा कसा तरी दृष्टीआड झाला आहे त्याची खपली पुनः उकरून नसतें नवीन वितुष्ट माजविण्याच्या कुत्सित हेतूने नव्हे. तर हें जें आमच्या राष्ट्रशरीराचें अगदी जुनाट हाडव्रण, आज जें भरून आल्याप्रमाणें

दिसत आहे, तें आंतून भरून आलें नसून, नुसतें बाहेरून वरवर भरलेलें दिसतें. तें केव्हा ना केव्हा आणि पुनः पुनः चिघळणारच अशी प्रामाणिक भीति मला वाटत आहे. अशा प्रकरणांत भिडस्तपणा किंवा चालढकलपणा फार घातकी आहे. म्हणून वरील इषारा देणें मला अगदी जरूर वाटतें. मला हेंही ठाऊक आहे की अलीकडे–विशेषतः आमच्या महाराष्ट्रांत–अगदी सोवळे ब्राह्मण भटजी केवळ दक्षिणेच्या आशेने महारवाड्यांत आणि मांगवाड्यांत कांही इकडचे तिकडचे श्लोक म्हणून लग्नें लावतांना आणि सत्यनारायणाच्या पोथ्याही वाचतांना आढळतात. पण अशा प्रसंगीं ते किती सुरक्षित रीतीने दूर उभे राहतात, आणि आपणच शिजविलेला सत्यनारायणाचा प्रसाद असूनही स्वतः आपण सेवन करण्याचें कसें टाळतात; आणि अशा लपंडावांमुळें लग्नें आणि पोथ्या तात्पुरत्या पार पडल्या तरी चतुर अस्पृश्यांच्या मनाला अपमानाच्या नवीन जखमा होऊन नवीन वाद व नव्या चळवळी कशा जोरावतात, तेंही ध्यानांत घेणें जरूर आहे. पुराणोक्ताची धूळ डोळ्यांत सलूं लागल्यामुळें स्पृश्य ब्राह्मणेतरांत ज्याप्रमाणें सत्यशोधकांची चळवळ सुरू होऊन ब्राह्मणांचा शिरकाव कांही झालें तरी आपल्या धर्मकृत्यांत घडूं द्यावयाचा नाही, अशी नवी तेढ बळावूं लागली आहे, तिचाच प्रसार अस्पृश्यांमध्यें अलीकडे होऊं लागला आहे. आणि समंजस अस्पृश्य लोकही आपले संस्कार आपल्याच लोकांकडून करून घेऊं लागले आहेत. ह्याला जबाबदार कोण ? तोंड दाबून बुक्क्यांचा मार कोठवर सहन होणार ? बुक्क्या तरी बंद नाही तर तोंड तरी मोकळें झालेंच पाहिजे ना ! महारांची दक्षिणा पाहिजे पण त्यांचा स्पर्श नको, हें व्हावें कसें ?

हिंदु धर्माची आणि समाजाची एकता व दृढता न्यायाच्या दृष्टीने निर्विवाद सिद्ध व्हावी ही कळ आता हिंदुमहासभेसारख्या उद्धारक संस्थांना, पंडित मालवीय व डॉ. मुंजे सारख्या सोवळ्या आणि ओवळ्या ब्राह्मण पुढाऱ्यांना सारखीच भासूं लागली आहे. कोल्हापूरच्या क्षात्रिय जगद्गुरूंनी शेंकडो अस्पृश्यांना क्षत्रियत्वाची दीक्षा स्वहस्तें दिली, मालवीयजींनी आपल्या हातांनी अस्पृश्यांच्या गळ्यांत जानवीं अडकविलीं, रत्नागिरीकडे डॉ. सावरकरांच्या अविश्रांत परिश्रमाने व डॉ. कुर्तकोटीसारख्या सुधारक शंकराचार्यांच्या अनुज्ञेने अस्पृश्यांना

तोंडून प्रत्यक्ष वेदमंत्र म्हणून मूर्तींची षोडशोपचार पूजा झाली, इतकेंच नव्हे तर थाटाचें सर्व जातींचें सहभोजनही झालें, अशा वर्तमानपत्रांतून नित्यशः बातम्या प्रसिद्ध होत आहेत. प्रसंगविशेषीं एखादें आड बाजूचें मारुतीचें देऊळ किंवहुना शेट जम्नालाल बजाज सारख्या देश-भक्ताच्या वैयक्तिक वजनाखाली चाललेलें मोठें देऊळही अस्पृश्यांना उघडें होतें. ही धामधूम अशीच खरोखर सर्वत्र चालून अखेर ज्या दिवशीं लहान थोर अस्पृश्य स्त्रीपुरुष हिंदु स्पृश्यांच्या सहवासांत समसमान दर्जाने सर्वच बाबतींत वावरूं लागतील, तेव्हाच त्यांची गणना हिंदुधर्मांत यथार्थ झाली, असें कोणीही म्हणेल. असें झाल्यावर अस्पृश्य हे खरे हिंदु आहेत की भूतधर्मीय आहेत, का आणखी कोणी आहेत, हें पाहण्यासाठी सरकारी खानेसुमारीचीं पुस्तकें चाळण्याची कशाला जरूरी पडेल? असें होणार नसेल, तर हीं पानें चाळून तरी काय फायदा!

शेवटीं एका नाजूक गोष्टीचा उल्लेख करून हें प्रकरण आटपूं. वर जी मी शंका प्रदर्शित केली ती केवळ काल्पनिक नाही. सांघिक धर्माची व राजकारणाची नेहेमी गुंतागुंती पडते. परवा डॉ. आंबेडकरांनी कलकत्त्यास सायमन कमिशनच्या पोटकमिटीचे एक सभासद ह्या नात्याने २३ आक्टोबर १९२८ रोजीं भरलेल्या त्या कमिशनच्या संयुक्त परिषदेपुढे साक्ष दिली; तेव्हा त्यांनी स्पष्ट आणि जबाबदारीपूर्वक सांगितलें की, –"There is really no link between the Hindus and the Depressed classes. Therefore we must be regarded as a distinct and independent community, separate from the Hindus." (अर्थ–"अस्पृश्यांचा व हिंदूंचा अर्थाअर्थी कांही संबंध नाही. त्यांचा एक स्वतंत्र निराळा असा अल्पसंख्याक समाज आहे, असें समजून त्यांना तसें वागविण्यांत यावें.") डॉ. आंबेडकरांच्या ह्या विधानाला व मागणीला सर्वच अस्पृश्यांचा पाठिंबा आहे, असें मुळीच नाही. पण कोणाच्या कोणत्या विधानाला ह्या जगांत कधी सर्वांचाच पाठिंबा मिळाला आहे? म्हणून डॉ. आंबेडकरांच्या ह्या विधानांची आम्हांला हेटाळणी करतां येईल? असो. ह्या मुद्द्याचा विचार पुढे राजकारणाच्या प्रकरणांत अधिक करणें बरें होईल. तूर्त असेंच आणखी एक अगदी गैरसोईचें विक्षिप्त विधान अगदी अनपेक्षित दिशेने मला आढळलेलें येथे उल्लेखिल्याशिवाय मला राहवत नाही.

म्हारम्हात्म्य नांवाच्या एका विक्षिप्त पुराणाचे मी मागील प्रकरणांत बरेच उतारे दिले आहेत. पुढील दोन उतारे मासलेवाईक दिसतात.

नाना जाती आठरा वर्ण । ह्यांचे उच्छिष्ट न खावें म्हाराने ।
मिलंची वेगळा करोन । इतर जातीचें न खावें ॥ १४
मिलंची आणि म्हार जाण । ही दोन्ही चंद्रवंशीं उत्पन्न ।
म्हणोनि तयाचे घरचें अन्न । खावें म्हारानें वेद घाये (?) ॥ १५
(अध्याय ५ वा).

येथे मिलंची हा शब्द म्लेंच्छ ह्याचा अपभ्रंश आहे. त्याचा अर्थ मागील तिसऱ्या अध्यायांत मुसलमान असाच शब्द योजून कर्त्याने स्पष्ट केला आहे.—

सेख सैय्यद मोंगल पठाण । अरब रोहिलेही मुसलमान ।
रंगारी आत्तार बागवान । त्याच्या पोटी जावें ॥ १८
म्हार आणि मुसलमान । हे दोघे एक वंशे उत्पन्न ।
चंद्र वंश पूर्ण । सोम ह्मणताति यालागे ॥ १९

डॉ. आंबेडकर हे महारांचे एक विद्वान आणि प्रतापी पुढारी आहेत. त्यांना सर्वांचा नाही तरी पुष्कळांचा पाठिंबा आहे. त्यांच्या-साठी प्रत्यक्ष जीवाचीही आहुति देण्यास कांही अनुयायी तयार आहेत. ह्या 'म्हार म्हात्म्य' पुराणाचे कर्ते बाळकदास हे म्हारांचे एक पुरोहित गोसावी बुवा दिसतात. ह्यांनी आपल्या ग्रंथाच्या समाप्तीचा काळ व स्थळ हीं शेवटीं दिलीं आहेत. शके १८८८ असें लेखकाचे चुकीने पडलें असावें. संदर्भावरून शके १७८८ हें साल दिसतें. नीरानदीचे काठीं पुणें जिल्ह्यांत पाडेगांव म्हणुन एक गांव आहे. तें स्थळ ग्रंथाचे शेवटीं दिलें आहे. ह्या गावीं म्हार गोसाव्यांचीं प्रसिद्ध घराणीं आहेत. ते असले ग्रंथ करितात, असें ऐकतों. ह्या बुवांच्या वरील मुसलमानां-संबंधीं विधानाला म्हारांचा पाठिंबा आज मिळेल असें वाटत नाही. तरी म्हार मुसलमानांच्या कडे जेवतात. ते मुसलमानाप्रमाणें डुकराचें मांस अत्यंत त्याज्य मानून, गाईचें मांस मात्र उघड खातात हें प्रसिद्ध आहे. मुसलमान व महार हे दोघे चंद्रवंशीं उत्पन्न झाले असें वर 'म्हारमहात्म्या'तून अवतरण दिलेंच आहे. चांद्रमास व

निशाणावर चंद्राची कोर मुसलमानांची प्रसिद्धच आहे. मुसलमानी आमदानींत म्हारांवर त्यांच्या संस्कृतीचा परिणाम थोडा थोडका झाला असेल असें नाही. इंग्रज सरकाराचा व ख्रिस्ती मिशनऱ्यांचा आताही तसाच होत आहे. ह्या सर्व गोष्टींचा विचार करितां सुमारें पाऊणशें वर्षांमागें ह्या गोसाव्याने असें विधान केलेलें पाहून विशेष आश्चर्य मानावयाला नको. अशा विक्षिप्तपणाला 'उपास्यानां अनियमः । साधनानां अनेकता' अशी व्याख्या करून लो. मा. टिळकांनी जरी आपली मूक संमति दिली आहे, तरी तिची मजल येथवर जाईल असें कोणालाही वाटणार नाही. कांही असो, आजकालच्या राजकारणाच्या ओढाताणींत आपण मुसलमान होऊं अशी धमकी केव्हा केव्हा अस्पृश्य पुढारी देत असतात तिचा कोणताही संबंध वरील गोसाव्याच्या विधानाशीं मुळींच दिसत नाही. असता तर आपल्या पुराणांत तशी अधिक शिकवण दिल्याशिवाय तो न राहता. तें कसेंही असो, हिंदु धर्माची शुद्धि व उत्कर्ष, आणि हिंदु-समाजाचें ऐक्य आणि दृढता वगैरेची चाड बाळगणाऱ्या सर्वांनी अस्पृश्य वर्गांच्या खास प्रतिनिधीचे वरीलप्रमाणें उद्गार अगदीच टाकाबू ठरवून घर्मेंडींत अतःपर राहूं नये, येवढाच तूर्त इषारा आहे.

मंदिरप्रवेशाचा मुद्दा ह्याच प्रकरणाखाली येईल असें कोणासही वरवर पाहतां वाटेल. पण त्यांत धर्म नसून अस्पृश्यांचें राजकारण आहे. आणि तें योग्यच आहे. व्हायकोम येथे प्रथम मंदिरप्रवेश सत्याग्रह झाला तेव्हा मी स्वतः त्यांत भाग घेतला. कारण सार्वजनिक देवळांत जाण्याचा प्रत्येक हिंदूचा धार्मिकच नव्हे तर सामाजिकही हक्क आहे. तो सामाजिक हक्क बजावण्यासाठी साधु शिवप्रसाद नांवाचे एक ब्राह्मसमाजाचे प्रचारक व मी तेथे गेलों. साधू शिवप्रसाद हे ब्राह्म होण्यापूर्वी तिय्या ह्या अस्पृश्य जातीचे होते; म्हणून त्यांनाही व्हायकोमच्या देवळाच्या नुसत्या वाटेवरही फिरण्याची मनाई झाली. ह्याचा खुलासा करून घेण्याकरितां मला ब्राह्मसमाजाच्या वतीने व्हायकोमला जावें लागलें. मी त्या वेळीं दाक्षिण कानडा जिल्ह्यांत मंगळूर ब्राह्मसमाजाचा आचार्य होतों. व्हायकोम गांव त्रावणकोर संस्थानांत आहे. कलकत्त्याच्या साधारण ब्राह्मसमाजाने त्रावणकोर दरबारला शिवप्रसाद ह्या ब्राह्म प्रचारकाला झालेल्या मनाईबद्दल खुलासा विचारला असतां, कांहीच उत्तर मिळालें नाही.

म्हणून मी तेथे गेलों. शिवप्रसादाच्या हातांत हात घालून मी सत्याग्रहाच्या फाटकांत शिरण्याचा प्रयत्न केला. पण मी येणार ही बातमी अगोदरच प्रसिद्ध झाल्याने मुख्य पोलीस सुपरिंटेंडंट स्वतःच फाटकावर कडेकोट तयारीने उभे होते. त्यांनी मला वाट दिली इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष मंदिरांतही नेऊन दाखविण्याची तयारी दर्शवली. पण शिवप्रसादांना फाटकाच्या आंत जाऊं देईनात. सर्व पोलीस आम्हांशीं आदराने व तितक्याच जबाबदारीपूर्वक निश्चयाने वागले. मग हें प्रकरण मी थेट त्रिवेंद्रम येथे दिवाणाकडे नेलें. त्यांनी प्रथम, झालेल्या प्रकाराबद्दल औपचारिक खेद प्रदर्शित केला. पण शेवटीं त्यांनी असा दफ्तरी सल्ला दिला की शिवप्रसादाने आपण हिंदू नाही असें कबूल करावें. मग ते ब्राह्म असोत, आर्यसमाजाचे असोत, कोणी असोत; त्यांना फाटकांत जाण्याची परवानगी मिळेल. अर्थात् हा विक्षिप्त सल्ला स्वीकारण्यांत आला नाही. तें प्रकरण तेथेच थांबलें. पुढे पालघाट म्हणून एक गाव ब्रिटिश मलबारांत आहे तेथे आर्यसमाजांत प्रविष्ट झालेल्ला अस्पृश्यांबाबत प्रश्न उत्पन्न झाला असतां, स्वामी श्रद्धानंद हे प्रसिद्ध आर्यसमाजाचे संन्यासी तेथे गेले. तरी अशा अस्पृश्यांना मंदिरप्रवेशाचाच नव्हे पण मंदिराच्या वाटेवरही फिरण्याचा हक्क मिळाला नाही. सार्वजनिक शांतताभंग होईल म्हणून उलट ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या भिडेला श्रद्धानंदांना मात्र बळी पडावें लागलें. असें प्रत्यक्ष स्वामीजींनीच मला सांगितलें. एकूण काय तर अस्पृश्य जोंवर हिंदु धर्मांत राहण्याचा आग्रह धरतील, तोंवरच त्यांच्यावर हा मंदिर बहिष्कार आहे ! ज्या दिवशीं खिस्ती अगर मुसलमान यांसारख्या सत्ताधारी धर्मांचा ते उघड स्वीकार करतील, त्या दिवशीं त्यांच्यावर बहिष्काराचें शस्त्र उगारण्याची इच्छा हिंदुलोकांत असो वा नसो, सामर्थ्य मात्र खास नाही, हीच गोष्ट वरील दक्षिण देशांतील सत्याग्रहाने सिद्ध झाली आहे !

व्हायकोमचा सत्याग्रह केवळ कॉंग्रेसच्या जोरावर बरेच महिने मोठ्या चिकाटीने चालला. तरी त्याला पूर्ण यश आलें नाही. त्यानंतर महाराष्ट्रांत उमरावतीची अंबाबाई, पुण्याची पर्वती, नाशिकचा काळा राम वगैरे देवळांपुढे सत्याग्रह पद्धतशीर झाला, पण कोठेच यश आलें नाही. महाड येथील तळ्यावरील पाणवठ्याचा सत्याग्रह मात्र

बहुतांशीं यशस्वी झाला आहे. वरील सर्व मंदिरप्रवेशाच्या सत्याग्रहांना यश येईपर्यंत अस्पृश्य हे हिंदू आहेत की नाहीत हा प्रश्न पुनः अनिश्चितच राहतो. तें कसेंही असो. वरील सत्याग्रही आपल्या धार्मिकच नव्हे तर सामाजिक हक्काबद्दलही भांडत आहेत. तरी पण ह्या धकाधकींत धर्म अथवा समाजसुधारणा नसून उभय पक्षांचें राजकारणच आहे असें माझें प्रांजल मत झालें आहे. आता ह्या राजकारणाला केवळ स्पृश्यांच्या हट्टाचें स्वरूप आलें आहे. स्पृश्यांनी हिंदुमहासभेचें व कॉंग्रेसचें ऐकून अस्पृश्यांना सामोपचारें ह्यापूर्वीच सर्व मंदिरें खुलीं करून दिलीं असतीं तर अस्पृश्य मोठे धार्मिक व भक्तिमान् झाले असते, असें नव्हे. पण आजच्या त्यांच्या राजकारणाला खात्रीने निराळें वळण लागलें असतें. त्यांना–निदान त्यांच्यापैकी जे स्वतंत्र मतदारसंघ मागत आहेत त्यांना तरी–आपल्या आग्रहाला आधार उरला नसता. पण कांही अदूरदर्शी व आपमतलबी हिंदूंच्या हट्टामुळेंच स्वतंत्र मतदारसंघाची मागणी आज अगदी न्याय्यच नव्हे तर अवश्य ठरत आहे. तिच्यामुळें राष्ट्राला धोका आहे हेंही खरेंच आहे. तो धोका हा की ह्या मागणीला आधिकच उग्र स्वरूप येऊन, पुढे सर्व सार्वजनिक देवळेंच नव्हत, तर खासगी देवघरेंही अस्पृश्यांना मोकळीं केलीं तरी त्यांचा हट्ट कदाचित कांही काळ तसाच कायम राहील. अशाने अस्पृश्यांचें म्हणण्यासारखें मोठेंसें कल्याण झालें नाही तरी परकीयांच्या कांही चेष्टेचें मात्र आणखी थोडें जास्त प्रदर्शन होईल. ह्यापेक्षा जास्त ह्या मंदिरप्रवेशाच्या मुद्द्याचा विचार ह्या प्रकरणांत करणें मुळींच जरूर नाही.

प्रकरण दहावें

सामाजिक स्थिति

'परदुःख शीतळ' ह्या खोचदार म्हणीचें मर्म मानीव अस्पृश्यांच्या आजच्या समाजस्थितीची अटकळ करतांना फार चांगलें ध्यानांत भरतें. पुष्कळ सहृदय पण वरवर विचार करणाऱ्या माणसांना, किंबहुना खोल विचार करणाऱ्या पण अनेक व्यवहारांच्या दगदगींत गुंतलेल्या मुत्सद्द्यांना अलीकडे असें वाटणें अगदी सहज आहे की अस्पृश्यांचा प्रश्न प्रथमदर्शनीं वाटतो तितका उग्र आणि तळमळीचा आता उरला नाही. चहूकडे चाललेल्या केवळ अस्पृश्यतानिवारक प्रयत्नांमुळेंच नसलें तरी, हल्लीच्या सार्वजनिक हालचालीमुळें जग जें सहजच पुढे ढकललें जात आहे, त्या धकाधकींत अस्पृश्यांची स्थिति आता पूर्वीप्रमाणें घोर कष्टमय उरली नाही. कांही भावनामय सुधारकांचे तर, 'ह्या जुन्या जुलुमाचा अलीकडे उगाच बाऊ करून ठेविला आहे, तिकडे आता कमी लक्ष दिलें तरी चालेल,' वगैरे अभिप्राय व उद्गार अलीकडे उघड उघड ऐकूं येत आहेत. अशा परदुःखशीतळांना जगांतलें कोणतेंही दुःख, मग तें सामाजिक असो की व्यक्तीचें असो, अगदी हलकेंच वाटणार! उलट पक्षी एखाद्या उदासीन विरक्ताला अगर मायावादी वेदांत्याला तरी ह्या गोष्टीची कशी तळमळ लागणार आहे? फार तर काय, स्वतः अस्पृश्य जनतेचा असा एक भला मोठा भाग, ह्या अवाढव्य देशाच्या कानाकोपऱ्यांत, किंवा जागृतिहीन निश्चल प्रदेशांत असा खुशाल वावरत आहे की त्यालाच आपल्या स्वतःच्या हीन स्थितीची जाणीव नाही! मग अस्पृश्यांच्या प्रस्तुत स्थितीची योग्य अजमावणी, वर निर्दिष्ट केलेल्या भिन्न प्रकारच्या धन्य पण अपवादक व्यक्तींना कधीच होणें शक्य नाही. मानवी जीविताचें ध्येय काय, सुधारलेल्या जगाची मजल आज कोठवर गेली आहे, आणि ह्या जागतिक सुधारणेंत स्वतः हिंदुस्थानाने मागे किती कर्तृत्व बजावलें आहे व पुढे किती बजावायचें आहे, ह्या सर्व पूर्वापार वृत्तान्ताचा आढावा घेऊन, आजही हिंदु समाजाच्या

केवढा मोठा भाग हीन दीन स्थितींतच दबून गेला आहे ह्याची पूर्ण जाणीव करून घेणें आमच्या खऱ्या पुढाऱ्यांना अगदी जरूर आहे. ती जाणीव होईपर्यंत अस्पृश्यांच्या आजच्या समाजस्थितीची योग्य आजमावणी शक्य नाही, हें खास.

ह्या दुसऱ्या खंडाच्या पहिल्या प्रकरणांत अस्पृश्य जातींच्या संख्या देतांना स्वच्छ आणि अस्वच्छ असे दोन भेद केलेले आहेत. त्यांवरून दिसेल की सर्वच अस्पृश्य अगदी ओंगळ आणि हीन दशेंत आहेत असें नाही. बंगाल्यांतील नमःशूद्र व राजवंशी आणि मलबारांतील येझवा अथवा तिय्या या जाती इतरांच्या मानाने राहणीने स्वच्छ, खाऊन पिऊन सुखी, इतकेंच नव्हे तर आत्मोद्धाराच्या मार्गाने झपाट्याने चाललेल्या आहेत.पण त्यांच्यावरही अद्यापि निरर्थक सामाजिक बंधनें आहेत व त्यांनाही पदोपदीं अपमान सहन करावा लागतो; त्यामुळें त्यांच्या जागृत झालेल्या मनाला तीव्र वेदना होतात, की ज्या अज्ञानांधकारांत सुखी झोपलेल्या इतर हीन जातींला होणें शक्य नाही. हीनता नाही तेथे टोचणी आहे, टोचणी नाही, तेथे गाढ हीनता आहे. पण हे दोन्ही भाग अपवादच होत. ह्या दोघांमध्यें असणारा जो बहुसंख्याक अस्पृश्य वर्ग त्यांत हीनता आहे आणि टोचणीही आहे. म्हणून एकंदर मानीव अस्पृश्य समुदाय प्रबुद्ध भारताच्या विचाराचा व प्रयत्नाचा सतत विषय असणें जरूर आहे. असें नसेल तर स्वतः भारतच प्रबुद्ध नाही; म्हणून तोच समग्र नष्ट होण्याला योग्य आहे, असेंच म्हणणें क्रमप्राप्त होईल !

अस्पृश्यांचे विद्वान आणि कर्तृत्ववान पुढारी डॉ. भीमराव आंबेडकर ह्यांनी लोदियन फ्रँचाइस कमिटीचे एक सभासद ह्या नात्याने, तिच्या रिपोर्टाला आपली एक स्वतंत्र मतपत्रिका जोडली आहे. (पुस्तक १लें पान २०४ पहा.) तिच्यांत त्यांनी बिहार आणि ओरिसा प्रांताच्या इ.स. १९२१ सालच्या खानेसुमारीचे सुपरिंटेंडेंटचा एक मार्मिक उतारा दिला आहे. त्यांतलें पुढील एक वाक्य विशेष लक्षांत घेण्यासारखें आहे.—

But because the facts of everyday life make it impossible to follow the same practical rules as were followed a hundred years ago, it is not to be supposed that the

distinctions of pure and impure,touchable and untouchable, are no longer observed....." ह्यानंतर डॉ. भीमराव स्वत:चें मत देतात–आणि तें निराळ्या टाइपांत छापलें आहे–तें असें.–" If this is a correct statement of facts of life, then the difference between untouchability in its literal and notional sense is a distinction which makes no difference to the ultimate situation; for as the extract shows, untouchability in its notional sense persists even where untouchability in its literal sense has ceased to obtain. This is why I insist that the test of untouchability must be applied in its notional sense." ह्याच अभिप्राय अधिक स्पष्ट करून दाखविणें जरूर आहे. आजकाल व्यवहाराच्या जरूरीमुळें अगदी जुन्या मताचे पुरुषच नव्हेत तर बायकाही बाजारांत, यात्रेंत, कच्चेऱ्यांतून व आगगाडींतून अस्पृश्यांशीं मिसळतात. घरीं आल्यावर स्नान करून शुद्ध होतात किंवा होतही नाहीत. तरी अशा व्यवहाराचे प्रसंग नसतांना ते अस्पृश्यांशीं कधी मिसळणार नाहीत हें उघड आहे. कारण त्याच्या मनांतील अस्पृश्यतेची भावना कायमच असते. कितीही जुन्या वळणाचा माणूस असला तरी कोणत्याही स्पृश्य जातीशीं भेटीव्यवहार करण्यास तो कचरत नाही. परंतु अस्पृश्यांना भेटण्याचा प्रसंगच आला तर स्पृश्य जातींतील माणसें मनांतून तरी कचरतील व त्याबाबतींत शक्य तितकी टाळाटाळ करतील. ह्यावरून अस्पृश्यतेची गोम बाहेरील वागणुकीवर नसून मनांतील समजुतीवरच अवलंबून आहे हें सिद्ध होतें. आज इंग्रज सरकाराच्या तुरुंगांतील कैद्यांच्या भोजनव्यवहारांत जातिभेद कोठे केव्हाच पाळला जात नाही. पण आज शेंकडो वर्षें हा तुरुंगांतील अभेदभाव चालूनही तेवढ्यावरूनच तुरुंगाबाहेरील जातिभेद कमी झाला, असें मानणें जसें समर्थनीय होणार नाही, त्याचप्रमाणें आगगाडींतून, बाजारांतून, प्रत्यक्ष होटेलांतूनही अस्पृश्यांशीं स्पृश्य मिसळतात, म्हणून तेवढ्यावरूनच अस्पृश्यता नाहीशी झाली किंवा तिची तेढ व्हावी तितकी कमी झाली, असें मानणेंही समर्थनीय होणार नाही. अस्पृश्यतेची समजूत, तिची मळमळ, मनाच्या तळाशीं दडून बसली आहे, तींपर्यंत ती केव्हा कशी बाहेर फुटून येईल, ह्याची खात्रीच धरवत नाही. फार

तर काय, सुधारकांनी आणि देशभक्तांनी एखाद्या एम्. सी. राजांना किंवा आंबेडकरांना मोठ्या सार्वजनिक सन्मानाने एखाद्या ब्राह्मण सभेच्या मंदिरांत बरोबर जेवणास घेतलें, तरी सिद्ध काय होतें की इतर पुष्कळ जुनी जनता त्यांना बरोबर घेऊन जेवायला तयार नाही हेंच ! येरवी असले समारंभ झालेच नसते; कारण त्यांची जरूरीच नसती ! ह्यावरून मी अशा सुधारणेचें महत्त्व कमी मानतों असें मुळींच नव्हे. माझें म्हणणें एवढेंच की रोगी औषध आनंदाने घेतो; आणि औषध गुणकारी आहे, एवढ्यावरून रोगच उरला नाही असें समजण्याची दिशाभूल स्वतः सुधारकांचीच केव्हा केव्हा होण्याचा संभव आहे. मग ज्यांना अशा सुधारणेची दगदग करावयाचीच नसते त्यांच्या तर्कटाला किती ऊत येईल ह्याची नुसती कल्पनाच करणें बरें !

कुणबाऊ गुलामगिरी

असो. आजकालच्या जगाच्या सुधारलेल्या स्थितींतही हिंदुस्थानातील अस्पृश्यांची निरनिराळ्या दिशेने कशी हलाखी चाललेली आहे ह्या विषयींच्या कांही बाबींचा केवळ उदाहरणार्थ विचार करूं. अस्पृश्यतेच्या लक्षणांपैकी एक मुख्य लक्षण म्हणजे अस्पृश्यजन हा एक जमिनीवरचा परंपरागत गुलाम आहे; त्याची ती गुलामगिरीच होय. ही शेतकरी गुलामगिरीची परंपरा द्राविड देशांत विशेषतः नंबुद्री ब्राह्मण आणि नायर जमीनदारांच्या दडपशाहीमुळें मलबार प्रांतांत अद्यापि फारच कष्टप्रद आहे. ह्या गुलामगिरीचें मूळ दोन ऐतिहासिक कारणांत आहे. तीं कारणें म्हणजे एक नायरांची मुलूखगिरी आणि दुसरी नंबुद्रीची जमीनदारी. नायर लोकांनी जेव्हा मलबार प्रांत पादाक्रांत केला व ते आपण राजे बनले, तेव्हा त्यांनी तेथील मूळचे जमिनींचे मालक पुलया, चेरुमा, नायाडी, इत्यादि जातींना त्यांच्याच जमिनीवर वंशपरंपरेचे राबणारे गुलाम केलें. जमिनी काबीज केल्या तरी वाहण्याला मजूर पाहिजेच होते. ह्या नवीन राजकीय कैद्यांपेक्षा अधिक चांगले फुकटे मजूर दुसरे कोण मिळणार ? आजकाल आसाम, सिंहलद्वीप वगैरेकडील गौरकाय चहाच्या मळेवाल्यांना आपल्या बादशाही सत्तेमुळें जसे

मुदतबंदी मजूर उर्फ गुलाम मिळतात तसेच पुरातन काळच्या नायरांना हे आयते मजूर अधिक सवलतीने मिळाले. इल्लोऱ्या चहाच्या मळ्यांतून मजुरांना गुरांप्रमाणें वागाविण्यांत येतें; त्यांची, दाद सहजासहजीं लागणें शक्य होत नाही. त्याचप्रमाणें नायर राजांच्या कारकीर्दीत ह्या गुलामांची स्थिति होती. त्या वेळीं एखाद्या साध्या नायर शिलेदाराने एखाद्या चेरुमाचा करमणुकीखातर जरी प्राणही घेतला, तरी चालत असे, असे तद्देशीय गॅझेटियर मधून उल्लेख आढळतात! रावांचा रंकावर थोडक्या शतकांपूर्वी असा दरारा पाश्चात्य सुधारलेल्या देशांतही चालत असे, मग मलबारांत अशा गोष्टीचा पुरावा शोधण्याची जरूरीच नाही. चेर देश हा मूळचा चेरुमांचाच. हें त्यांच्या नांवावरूनच सिद्ध होतें. पण तो आज आपल्या मायभूमींत आपणच बंदा गुलाम झाला. कालांतराने मलबारांत नंबुद्री ब्राह्मणांकडून आपला धार्मिक ताबा स्थापण्यांत आला. आता बहुतेक जमनि नंबुद्रीची अशी रूढि झाली आहे. चोरावर मोर असा हा न्याय आहे! ह्या राजकीय–धार्मिक जोड पकडीला ब्रिटिश रियासतीच्या छत्राखाली भांडवलशाहीचा तिसरा पाठिंबा मिळाला आहे. ब्रिटिश सत्ता म्हणजे भांडवलशाहीची इष्टदेवताच. मग मलबारांतील कुणबावा कसा चालत असेल ह्याची कल्पना देखील सहज होणें कठीण. मलबारांतील जमीनदार नंबुद्री ब्राह्मण झाल्यावर कुणबी उर्फ जामिनी वाहणारे हे नायर किंवा तिय्या जातीचे झाले आहेत. पण त्यांच्या शेतांवर प्रत्यक्ष देह झिजविणारीं जनावरें म्हणजे मूळ मालक 'चेरुमा' हेच आहेत. जमिनीवरच तात्पुरत्या झोपड्या बांधून हे चेरुमा वंशपरंपरेने असतात. एखाद्या जमिनीची विक्री अगर मोबदला झाला तर त्या जमिनीवरचीं झाडें, दगड, माती, निधि, निक्षेप ह्यांची सुद्धा जशी विक्री अगर बदला झाला असेंच समजण्यांत येतें, तसेंच ह्या जमिनीवरील झोपडया आणि त्यांत राहणाऱ्या मानवी जनावरांचाही सहकुटुंब मोबदला होतो. ते नव्या मालकाचे कायदेशीर ताबेदार होतात. त्यांनी ह्या नव्या मालकाविरुद्ध कांही हलगर्जीपणा केला, तर आजकालचा सुधारलेला ब्रिटिश कायदा देखील तात्त्विक न्यायापेक्षा व्यावहारिक रूढीच्या बाजूलाच अधिक कलतो. हे सर्व प्रकार तेथे जाऊन बारकाईने आणि सहानुभूतीने निरीक्षण केल्याशिवाय कळून येणें शक्य नाही.

तर काय, सुधारकांनी आणि देशभक्तांनी एखाद्या एम्. सी. राजांना किंवा आंबेडकरांना मोठ्या सार्वजनिक सन्मानाने एखाद्या ब्राह्मण सभेच्या मंदिरांत बरोबर जेवणास घेतलें, तरी सिद्ध काय होतें की इतर पुष्कळ जुनी जनता त्यांना बरोबर घेऊन जेवायला तयार नाही हेंच! येरवी असले समारंभ झालेच नसते; कारण त्यांची जरूरीच नसती! ह्यावरून मी अशा सुधारणेचें महत्त्व कमी मानतों असें मुळींच नव्हे. माझें म्हणणें एवढेंच की रोगी औषध आनंदाने घेतो; आणि औषध गुणकारी आहे, एवढ्यावरून रोगच उरला नाही असें समजण्याची दिशाभूल स्वतः सुधारकांचीच केव्हा केव्हा होण्याचा संभव आहे. मग ज्यांना अशा सुधारणेची दगदग करावयाचीच नसते त्यांच्या तर्कटाला किती ऊत येईल ह्याची नुसती कल्पनाच करणें बरें!

कुणबाऊ गुलामगिरी

असो. आजकालच्या जगाच्या सुधारलेल्या स्थितीतही हिंदुस्थानातील अस्पृश्यांची निरनिराळ्या दिशेने कशी हलाखी चाललेली आहे ह्या विषयींच्या कांही बाबींचा केवळ उदाहरणार्थ विचार करूं. अस्पृश्यतेच्या लक्षणांपैकी एक मुख्य लक्षण म्हणजे अस्पृश्यजन हा एक जमिनीवरचा परंपरागत गुलाम आहे; त्याची ती गुलामगिरीच होय. ही शेतकरी गुलामगिरीची परंपरा द्राविड देशांत विशेषतः नंबुद्री ब्राह्मण आणि नायर जमीनदारांच्या दडपशाहीमुळें मलबार प्रांतांत अद्यापि फारच कष्टप्रद आहे. ह्या गुलामगिरीचें मूळ दोन ऐतिहासिक कारणांत आहे. तीं कारणें म्हणजे एक नायरांची मुलूखगिरी आणि दुसरी नंबुद्रीची जमीनदारी. नायर लोकांनी जेव्हा मलबार प्रांत पादाक्रांत केला व ते आपण राजे बनले, तेव्हा त्यांनी तेथील मूळचे जमिनीचे मालक पुलया, चेरुमा, नायाडी, इत्यादि जातींना त्यांच्याच जमिनींवर वंशपरंपरेचे राबणारे गुलाम केलें. जमिनी काबीज केल्या तरी वाहण्याला मजूर पाहिजेच होते. ह्या नवीन राजकीय कैद्यांपेक्षा अधिक चांगले फुकटे मजूर दुसरे कोण मिळणार? आजकाल आसाम, सिंहलद्वीप वगैरेकडील गौरकाय चहाच्या मळेवाल्यांना आपल्या बादशाही सत्तेमुळें जसे

मुदतबंदी मजूर उर्फ गुलाम मिळतात तसेच पुरातन काळच्या नायरांना हे आयते मजूर अधिक सवलतीने मिळाले. हल्लीच्या चहाच्या मळ्यांतून मजुरांना गुरांप्रमाणें वागाविण्यांत येतें; त्यांची, दाद सहजासहजीं लागणें शक्य होत नाही. त्याचप्रमाणें नायर राजांच्या कारकीर्दीत ह्या गुलामांची स्थिति होती. त्या वेळीं एखाद्या साध्या नायर शिलेदाराने एखाद्या चेरुमाचा करमणुकीखातर जरी प्राणही घेतला, तरी चालत असे, असे तद्देशीय गॅझेटियर मधून उल्लेख आढळतात! रावांचा रंकावर थोडक्या शतकांपूर्वी असा दरारा पाश्चात्य सुधारलेल्या देशांतही चालत असे, मग मलबारांत अशा गोष्टीचा पुरावा शोधण्याची जरूरीच नाही. चेर देश हा मूळचा चेरुमांचाच. हें त्यांच्या नांवावरूनच सिद्ध होतें. पण तो आज आपल्या मायभूमींत आपणच बंदा गुलाम झाला. कालांतराने मलबारांत नंबुद्री ब्राह्मणांकडून आपला धार्मिक ताबा स्थापण्यांत आला. आता बहुतेक जमिनि नंबुद्रीची अशी रूढि झाली आहे. चोरावर मोर असा हा न्याय आहे! ह्या राजकीय-धार्मिक जोड पकडीला ब्रिटिश रियासतीच्या छत्राखाली भांडवलशाहीचा तिसरा पाठिंबा मिळाला आहे. ब्रिटिश सत्ता म्हणजे भांडवलशाहीची इष्टदेवताच. मग मलबारांतील कुणबावा कसा चालत असेल ह्याची कल्पना देखील सहज होणें कठीण. मलबारांतील जमीनदार नंबुद्री ब्राह्मण झाल्यावर कुणबी उर्फ जामिनी वाहणारे हे नायर किंवा तिय्या जातीचे झाले आहेत. पण त्यांच्या शेतांवर प्रत्यक्ष देह झिजाविणारीं जनावरें म्हणजे मूळ मालक 'चेरुमा' हेच आहेत. जमिनीवरच तात्पुरत्या झोपड्या बांधून हे चेरुमा वंशपरंपरेने असतात. एखाद्या जमिनीची विक्री अगर मोबदला झाला तर त्या जमिनीवरचीं झाडें, दगड, माती, निधि, निक्षेप ह्यांची सुद्धा जशी विक्री अगर बदला झाला असेंच समजण्यांत येतें, तसेंच ह्या जामिनीवरील झोपडया आणि त्यांत राहणाऱ्या मानवी जनावरांचाही सहकुटुंब मोबदला होतो. ते नव्या मालकाचे कायदेशीर ताबेदार होतात. त्यांनी ह्या नव्या मालका-विरुद्ध कांही हलगर्जीपणा केला, तर आजकालचा सुधारलेला ब्रिटिश कायदा देखील तात्त्विक न्यायापेक्षा व्यावहारिक रूढीच्या बाजूलाच अधिक कलतो. हे सर्व प्रकार तेथे जाऊन बारकाईने आणि सहानुभूतीने निरीक्षण केल्याशिवाय कळून येणें शक्य नाही.

मी एकदा ब्रिटिश मलबारांत फिरतीवर असतांना कालीकत येथे रारीचन् मुप्पन् नांवाच्या एका श्रीमंत नायर मित्राकडे पाहुणा म्हणून उतरलों होतों. चेरुमा जातीचीं पुष्कळ पिढीजाद मजूर कुळें त्याच्या इष्टेटीवर शेंकडो होतीं. आमच्याकडील शेतकरी ज्याप्रमाणें आपल्या शेतावर आपल्या बैलांना औताचें काम नसेल तेव्हा दुसऱ्याच्या शेतावर किंवा इतर कामावर आपले बैल भाड्याने देतात, तसें हे राजश्री मुप्पन् आपल्या ताब्यांतल्या मजुरांना आपलें काम नसेल तेव्हा दुसरीकडे भाड्याने पाठवीत व त्यांचें भाड्याचें उत्पन्न खुशाल आपण घेत. ही गोष्ट त्यांनीच प्रांजलपणें मला सांगितली! ह्या गुलामांच्या योगक्षेमाची व्यवस्था ज्या रूढीमुळें ह्यांच्या मालकी घराण्याकडे आली होती, त्याच रूढीच्या जोरावर ह्या प्राण्यांच्या कष्टांचें उत्पन्न ह्या मालकाकडेच येणें क्रमप्राप्तच होतें. मग हा व्यवहार ऐकून मला आश्चर्य का वाटावें ह्याचेंच उलट कोडें रा. मुप्पन्न ह्यांना पडलें! थोड्याच चौकशीनंतर चेरुमांचा कायदेशीर दर्जा मला कळला व माझी हळहळ मिटली! नाइलाजाची खात्री पटल्यावर व्यर्थ हळहळ काय उपयोगाची!

अशा गुलामाचें भाडेंच काय, पण रीतसर खरेदीपत्र करून अशा गुलामाची विक्री झाल्याबाबतचा एक खटला स. १९१४ सालीं झालेला मी वर्तमानपत्रांत वाचला. खालील अर्थाची तार असोशिएटेड प्रेसची मी वाचली. उत्तर मलबारांत कॅलांडी जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटपुढे हा खटला सुनावण्यांत आला. पलचेरुवट महमद व कोरोथ महमद नांवाचे दोन श्रीमंत मोपले गृहस्थ होते. पहिल्याने दुसऱ्यास वेलन् नांवाच्या आपल्या ताब्यांतील चेरुमा जातीच्या दासाला (Serf) अवघ्या दहा रुपये किमतीला विकलें. सुमारें दोन वर्षांनी नव्या मालकाच्या जुलमाला कंटाळून वेलन् हा पळून गेला. तो परत मिळावा म्हणून कोरोथने पलचेरुवर ही फिर्याद जिल्ह्याच्या मुनसफाकडे केली. तेव्हा कोठे ब्रिटिश कायद्याचे डोळे उघडले. मुनसफांनी अर्थात् हा विक्षिप्त दावा काढून तर टाकिलाच. पण हें प्रकरण कागदपत्रांसह पोलिस चौकशीसाठी मॅजिस्ट्रेटकडे पाठविण्यांत आलें. कारण मनुष्यविक्रीचा फौजदारी गुन्हा घडल्याचा पुरावा मिळाला, वगैरे वगैरे. सुमारें ७५ वर्षांपूर्वी गुलामगिरीचा कायदा हिंदुस्थानांत पास झाला असूनही

त्या वेळीं मलबारांत हा क्रयविक्रय इतक्या उघड रीतीने–कदाचित् न कळत–चालावा हाच मुद्दा मुख्य आहे. शिमगा संपला तरी कवित्व उरतें, ह्या न्यायाने गुलामगिरी कायद्याने बंद झाली, तरी अद्यापि ह्या बिचाऱ्यांची ताबेदारी कोणत्या ना कोणत्या रूपाने तरी त्यांच्या स्वातंत्र्याच्या, सुखाच्या व प्रगतीच्या आड येत आहेच.

वर सांगितलेल्या जमीनदारीच्या जुलुमांत सावकारी जुलमाची पुनः अधिक भर पडते. कर्नल ऑल्कॉट ह्यांनी आपल्या *Poor Pariah* ह्या पुस्तकांत (पान ५ पहा) एका मासलेवाईक कर्जरोख्याचा उतारा दिला आहे. ह्याची तारीख २२ मे १९०० ही दिली आहे. हा रोखा रंग सैदिनी पदयाची नांवाच्या सावकाराला इरुला मोट्टयार नांवाच्या पारिया कुळाने लिहून दिला आहे. तो अशा अर्थाचा आहे:–

" तुमचे वडील नारायणस्वामी ह्यांनी आम्हांला ६८ रुपये कर्जाऊ दिले म्हणून आजवर मी स्वतः आणि माझीं तीन मुलें, वडील मुलगा पेरिआप्पल (वय १९ वर्षें), मधला चिन्न अप्पयल (वय १२ वर्षें), धाकटा चिन्न स्वामी (वय ९ वर्षें) सदर नारायणस्वामीची नोकरी करीत आलों. तुमच्या वडिलांनी आपल्या मागे तुमच्या हवालीं आम्हांला केलें आहे, म्हणून आणखी दोन वर्षें आम्ही चौघांनी तुमची नोकरी केली. वरील तारखेच्या नंतर तुमच्या वडिलांकडून व स्वतःकडून आम्हांला आणखी लहान लहान रकमा कर्जाऊ मिळून, एकंदर मुद्दल आजवर ९३ (रुपये त्र्याण्णव) झालें आहे. ह्याच्या व्याजांत मी, माझी पत्नी, माझीं तीन मुलें मजूरी घेऊन वरील मुद्दल फिटेपर्यंत नोकरी करीत राहूं. नोकरी करण्यांत कसूर होईल तर वरील रकमेची फेड करूं.

निशाणी हाताचा आंगठा. "

ह्या शतकांतही असे कर्जरोखे सर्व कुटुंबास गहाण ठेवून त्यांच्या तारणावर लिहून घेतले जात आहेत हाच मुद्दा लक्षांत घेण्यासारखा आहे. ह्याहून आश्चर्य हें की असलें कर्ज पिढ्यानुपिढ्या फिटत नसतें. असले रोखे अलीकडे कमी झाले असले तरी हा मासलेवाईक हवालदीलपणा अजीबात नष्ट झाला आहे, असें नाही. इ. स. १९१८ सालीं मद्रास इलाख्यांत तंजावर त्रिचनापल्लीकडे जमीनदार आणि कुळें ह्यांच्यामध्यें कटकट उत्पन्न झाली होती म्हणून मी आमच्या मिशनच्या बंगलोर

शाखेच्या सुपरिंटेंडेंटला बरोबर घेऊन हें प्रकरण स्वतः पाहून कांही इलाज घडत असल्यास पाहावें म्हणून गेलों. त्या वेळीं लॉर्ड पेंटलंड हे मद्रासचे गव्हर्नर होते. त्यांनी अस्पृश्य वर्गांच्या हिताकरितां लेबर ऑफिसर म्हणून एक खास अधिकारी नेमला होता. जमिनीचा मालकी हक्क अस्पृश्यांना नव्हता, म्हणून त्यांना कांही जमिनी खास मालकी हक्काने करतां याव्या म्हणून काही पड जमिनी अस्पृश्यांच्या वहिवाटीला देण्याकरितां मद्रास सरकारकडून राखून ठेवण्यांत आल्या होत्या. अस्पृश्यांना हे हक्क प्राप्त झाल्यास मोठी आपत्ति घडेल ह्या भीतीने ह्या जिल्ह्यांतील जमीनदारांनी मोठाच गिल्ला चालविला होता. मद्रासेंत प्रत्यक्ष गव्हर्नर साहेबांची गाठ घेऊन त्यांची सहानुभूति संपादून आम्ही दोघे ह्या जिल्ह्यांत गेलों. त्याच वेळीं हिंदु मुसलमानांची राष्ट्रीय एकी घडविण्यासाठी 'लखनौ पॅक्ट' लो. टिळकांनी घडवून आणिला होता. आणि पुणें मुंबई येथे मी आणि आमच्या मिशनचे अध्यक्ष सर नारायणराव चंदावरकर ह्यांनी स्पृश्य आणि अस्पृश्य ह्यांची एकी घडविण्यासाठी मोठ-मोठ्या जंगी जाहीर सभा भरवून अस्पृश्यांची जोड राष्ट्रकार्याला व राष्ट्रीयसभेची जोड अस्पृश्योद्धाराला मिळविण्याचा प्रयत्न चालविला होता. पण कांही झालें तरी आम्ही वरील चौकशी करण्याकरितां त्रिचनापल्लीकडे गेलों असतां, तेथील जमीनदारांनी आमच्या जीवालाच धोका येईल अशा धमक्या दिल्या, आणि राष्ट्रीय व सामाजिक कार्यांतील आमच्या कांही पुढारी मित्रांनी तर ज्या खेड्यांतून हें रण माजलें होतें तेथपर्यंत आम्हांला जाऊंच दिलें नाही ! आमच्या सुरक्षितपणाचा प्रश्न कसाही असो (त्याविषयीं प्रत्यक्ष गव्हर्नर साहेबांनी आश्वासन दिलें होतें तरी), आमच्या जाण्याने स्वतः अस्पृश्यांच्या हिताला च अपाय घडेल व त्यांच्या बाजूने जो प्रयोग सुरू झाला होता त्यालाच मोठी खीळ पडेल हा पोक्त सल्ला आम्हांला ऐकणें भाग पडलें. आम्ही परत फिरलों. कार्यबाहुल्यामुळें पुनः इतक्या दूर जाणेंच झालें नाही. ही मोठी नामुष्कीची गोष्ट झाली !

ह्या दक्षिण देशांत अस्पृश्य वर्गांतून ख्रिस्ती धर्मांत मोठी प्रचंड भरती झाली आहे हें प्रसिद्धच आहे. खेड्यांत ह्या लोकांची वर सांगितलेली दैना; तर शहरांत आम्हांस काय प्रकार प्रत्यक्ष ख्रिस्ती झालेल्या

पारिया लोकांचा दिसला ! त्रिचनापल्ली हें एका मोठ्या जिल्ह्याचें राजधानीचें शहर. ह्या ठिकाणीं खिस्ती मिशनचीं मोठमोठीं केंद्रें जाणि मंदिरें आहेत. वरिष्ठ वर्गांतून खिस्ती झालेल्यांची स्थिति सुसंपन्न असून किती तरी व्यक्ति ब्रिटिश दरबारांत अधिकारारूढ दिसल्या. पण बहुजनसमाजाची स्थिति कशी दिसली ? एके दिवशीं मी एका मोठ्या रस्त्याने चाललों असतांना समोरून एक मोठा म्युनिसिपालिटीचा अवजड केराचा छकडा रखडत येत होता. त्यास एकीकडे एक म्हातारा रेडा जुंपला होता व दुसऱ्या बाजूस एका तरुण मजुरानेच आपली मान लाविली होती. मोठ्या करुणेने मी त्या तरुणास त्याची जात विचारली. पण त्याने मोठ्या आढ्यतेने आपण रोमन कॅथॉलिक (खिस्ती) आहों असें सांगितलें. मला पूर्वीच आलेली शंका हें उत्तर ऐकून अर्थात् तुफान वाढली. मी धैर्य करून व अत्यंत सहानुभूतीने त्याच्या पूर्वाश्रमाची जात विचारिली. त्याने 'पारिआ' असें सांगितलें. पुढे काय सांगावयाचें आहे !

बंगालकडे ब्रिटिश सरकारांनी पुढचा मागचा विचार न करितां केवळ आपली बैठक बळकट बसावी म्हणून कायम जमीन–धारा–पद्धति रूढ केली आहे. तेथील जमिनींची मशागत करणारा वर्ग मुख्यतः नमःशूद्र, राजबंशी, वगैरे अद्यापि अस्पृश्य असलेले वर्ग किंवा अशाच वर्गांतून मुसलमानी धर्मांत शिरलेले कष्टाळू गरीब स्पृश्य वर्ग आहेत. मद्रासेइतकी त्यांची स्थिति हताश नाही. तरी जमीनदार वर्गाकडून शिक्षण, आरोग्य, धार्मिक व घरगुती वहिवाटीच्या नाजूक बाबतींत खेड्यांत राहणाऱ्या ह्या कुळांना, उघड बोलून दाखवितां येत नाही अशा प्रकारें, उपसर्ग पोचत असलेला मी त्यांच्यांतच मिसळून असतांना माझ्या कानावर वारंवार येत असे. फार तर काय, खेड्यांत उकिरडा साचला तर खत म्हणून विक्री करणें, किंवा केवळ त्याची घाण आपल्या घरापासून दूर करण्याच्या बाबतींतही जमीनदाराचा दील खुष करूनच काम होणें शक्य होत असे. ह्यांच्यांतील न्हावी, धोबी, ब्राह्मण वगरे सर्व शागिर्दपेशा जरी अस्पृश्य जातीचाच पूर्वीपासून असला तरी तोही मातब्बर जमीनदारांच्याच भ्रुकुटीवर नाचणारा. नमःशूद्रासारख्या पुढारलेल्या वर्गांची जर अशी अनास्था, तर मग हारी, पान, डोम इ० अति कंगालांची स्थिति काय वर्णावी ? पण, नंगेसे खुदा बेजार ह्या न्यायाने उलट ह्या

कंगालांचींच स्थिति केव्हा केव्हा बरी म्हणवत असे ! प्रतिष्ठित नमःशूद्रांना मात्र त्यांची मानहानि अत्यंत दुःसह होत असे.

आमच्या महाराष्ट्रांत हाडकी हाडोळीचीं क्षुद्र वतनें आणि अलुत्या बलुत्याचे लहानसान हक्क महारामांगांचे आहेत. पण अलीकडे महारांच्याच पुढाऱ्यांच्या लक्ष्यांत ही गोष्ट येऊन चुकली आहे की जोंवर ह्या हक्कावर हा प्रचंड वर्ग हात टेकून आहे तोंवर ह्यांचा पाय पुढे कधीच पडणार नाही. शेत पिकलेंच तर थोडें बलुतें मिळणार. पण गांवकऱ्यांचा, रयतेचा, येणाऱ्या जाणाऱ्या बड्या अधिकाऱ्यांच्या सरबराईचा ससेमिरा महारांच्यामागे कायमचाच लागलेला आहे. जेथे पांच महार गांवकामासाठी पुरतात तेथे पंचवीस झाले तरी ते सर्व आपापल्या पाळीची वाट पाहात स्वस्थ बसणार ! ही स्थिति आता पालटत आहे, तरी जी एकदम बंद झाली पाहिजे ती हळू हळू पालटत आणि लोंबकळत ठेवण्यांत काय फायदा ? परंपरेचा मोह सुटत नाही, हा अस्पृश्यांचाच दोष होय. तेच हट्ट धरून बसतात. त्यांत सरकार आणि रयत ह्यांचा फायदाच आहे. डॉ. आंबेडकरांनी मागे ह्या बाबतींत एक बिल आणिलें होतें. पण तें कौन्सिलच्या टेबलापर्यंत पोचण्यापूर्वीच लोकांच्या हट्टामुळें मध्येंच गहाळ झालें. तूर्त अशा विधायक कार्याकडे कोणाचेंच लक्ष लागणें कठीण झालें आहे. हे महारांचे हक्क आणि त्यांचीं कर्तव्यें इतकीं जुनीं आणि त्यांनाच अवनतिकारक झालीं असूनही ह्या गोष्टी त्यांच्या ध्यानांत भरत नाहीत. परकीय सरकार उदासीन असल्यामुळें, ह्या बाबतींत कायद्याच्या जोरावर सुधारणा करूं इच्छीत नाही. सरकारी अधिकाऱ्यांना ह्या बाबतींत सुधारणा होण्यांत स्वतःची मोठी गैरसोय होणार हें माहीत आहे. कारण खेड्यांत फिरतीवर गेलें असतां विशेषतः मुलकी आणि पोलीस खात्याच्या अधिकाऱ्यांना आपली सरबराई ह्या गरिबांकडून हल्ली थोड्या मजूरीवर पण वाटेल त्या धाकदपटशाहीने करतां येते. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे ह्या अडाणी लोकांवर एक प्रकारची पुरातन वेठ बिगार आजही राजरोस चालली आहे. आणि त्यांच्या मूर्ख हट्टामुळें ते ह्या अन्यायाला अगदी पात्रच ठरतात.

पाणवठ्याचा हक्क

हिंदु त्रैवर्णिक वरिष्ठ वर्गांनी ह्या प्रचंड अस्पृश्य वर्गांना आपल्या वसाहतींच्या बाहेर शिवेला लागूनच स्वतःच्या हीन कामकाजासाठी

डांबून ठेवलें, त्याच वेळीं त्यांच्या पाणवठ्याची सोय करावयाची होती. पण ज्यांचें स्वातंत्र्य हिरावून घेतलें त्यांचीच पुनः कीव करून पाणवठ्याची, शाळांची वैगेरे सामुदायिक सोयी कराव्दात असें म्हणणें, हें वैयक्तिक अथवा सामुदायिक मानसशास्त्राच्या सिद्धान्नाला पटण्यासारखें नाहीं. प्राचीन काळीं जें झालें तें स्वाभाविक होऊन गेलें. पण हल्ली म्युनिसिपालिट्या लोकलबोर्डें स्थापन होऊन त्यांची करवसूली इतकीं वर्षें जातिधर्मांचा भेदाभेद न करतां होत असूनही सामुदायिक सोय करण्याची वेळ आली असतां ह्या स्थानिक संस्था अगर बादशाही सरकार दोघेही कशी डोळेझाक करतात हें मात्र ह्या देशांतील दृश्य पाहण्यालायख आहे ! अस्पृश्यतानिवारकांनी ह्या बाबतींत कसून प्रयत्न चालविले असतां हीं स्थानिक अथवा बादशाही सरकारें आपण ज्या अगदीच अपुऱ्या सोयी केल्या अगर नुसत्या करूं घातल्या तिकडे बोटें दाखवून मोकळीं होतात. आणि जास्त सोई न करण्याचें कारण सांगण्यांत येतें की अस्पृश्य वस्तींतले लोक इतके कंगाल आहेत की त्यांच्याकडून करवसूलीच होत नाही. आता कोणत्याही कंगाल लोकसमूहाकडून कर मिळत नाही, म्हणून त्यांचें शिक्षण, औषधोपचार, निदान नित्याचा स्वच्छ पाण्याचा पुरवठा करण्याची सरकारी जबाबदारी चुकते, असें कोणीही म्हणूं शकणार नाही. येथील सरकारें असें म्हणतात असें नाही, पण तीं म्हणण्यासारख्या सोयी करितात असेंही नाही. खेडोंखेडीं स्पृश्यांच्या पाणवठ्यांवरून अस्पृश्यांच्या बायका, आणि केव्हा केव्हा पुरुष आपल्या घागरी पुढे ठेवून तासानुतास केवळ पाण्याची भीक मागत आहेत हें दृश्य अद्यापि पुष्कळ ठिकाणीं दिसतें हें खरें ! ज्या ठिकाणीं ह्या लोकांसाठी स्वतंत्र विहिरी आहेत त्यांची व्यवस्था पाहिल्यास, त्या विहिरी नव्हत सार्वजनिक रोग उत्पन्न करण्याचीं तीं पेवेंच होत अशी खात्री पटते. अस्पृश्य वर्गांचा समाजांत दर्जा अद्यापि घरांतल्या तान्ह्या मुलाप्रमाणें आहे, हें आमचीं सरकारें ध्यानांत ठेवूं इच्छीत नाहीत. तान्ह्या मुलांस वापरण्यास कपडे दिल्यास ते धुवून स्वच्छ राखण्याची जबाबदारी मुलांची नसून कपडे देणाऱ्यांची आहे. पण अस्पृश्यांच्या बाबतींत हें तत्त्व पटण्यास अद्यापि किती युगें जाणार हें कळत नाही.

ह्या बाबतींत सरकारांच्या खालोखाल स्वत: अस्पृश्यांचाही दोष आहे, हें लपवून ठेवणें शक्य नाही. सर्वत्रच अस्पृश्यांची स्थिति आज तान्ह्या मुलाइतकी परावलंबी उरलेली नाही. तुरुंगांत जाण्याची तयारी करून, किंबहुना पोलिसांच्या किंवा स्पृश्यांच्या लाठीखाली वेळ आलाच तर प्राणही अर्पावयाला तयार होऊन, ज्या खेड्यापाड्यांतून अस्पृश्य स्वयंसेवकांचे थवे हौसेने देवळाच्या दारांत प्रवेशाचा सत्याग्रह करावयास येतात त्याच खेड्यांतल्या खास अस्पृश्यांच्या विहिरी असाव्या तशा स्वच्छ व दुरुस्त का नसाव्यात हा एक अडचणीचा प्रश्नच आहे ! ह्याचें कारण हेंच की मनुष्यप्राणी उद्योगप्रिय नसून उत्सवप्रिय आहे ! हीच उत्सव-प्रियता काँग्रेसच्या सत्याग्रह्यांपेक्षाही कांकणभर जास्त मंदिरप्रवेशार्थ सिद्ध झालेल्या खेडवळ स्वयंसेवकांत आढळली तर त्यांच्यावर टीका न करतां त्यांच्या उत्सवस्फूर्तीचें अभिनंदनच करणें अधिक शोभतें. पण विहिरी स्वच्छ ठेवाव्यात कोणी ? जिल्हाबोर्ड अगर म्युनिसिपालिटी केव्हा तरी आपलें कर्तव्य करीत असली तरी, किंवा न करील तरी, पाणवठे स्वच्छ ठेवण्यापुरती खबरदारी अस्पृश्यांनीच घेण्याची वेळ आता आली आहे. पण ह्या बाबतींत एक चमत्कारिक अडचण उत्पन्न होते. पुष्कळ ठिकाणीं, विशेषत: खेड्यांतून, महारवाडे, चांभारवाडे, आणि मांगवाडे एकमेकां-जवळ असतात. जेथे मुळीच विहीर मिळावयाची नाही, तेथे एखाद्याच्या परिश्रमाने सार्वजनिक खास विहीर अस्पृश्यांना मिळालीच तर ह्या निर-निराळ्या अस्पृश्य वर्गांत रुसवा फुगवा, तेढ, मारामारी माजते, ती इतकी की रोग बरा पण औषध नको अशी स्थिति होऊन जाते. म्हणजे विहीर नसलेली पुरवली; पण ही आपसांतली मारामारी नको, असें होतें. स्पृश्य आणि अस्पृश्यांमधली अस्पृश्यता ज्या मानाने कमी होऊं लागली तित-क्याच मानाने जणूं अस्पृश्यां–अस्पृश्यांमधली पोट अस्पृश्यता बळावते की काय, अशी शंका येते ! जी स्थिति खेड्यांतल्या विहीरींची, अगर नळांची, तीच स्थिति अस्पृश्यांसाठी उघडलेल्या खास शाळांची किंवा वाचनालयांची!

शिक्षण

महाराष्ट्रापुरतेंच बोलावयाचें तर महार, चांभार आणि मांग ह्या तीन मानीव अस्पृश्य जाती एकमेकांस अगदी पाण्यांत पाहात अस-

तात. चांभारांना स्वतंत्र धंदा असल्याने निदान सांपत्तिक बाबतींत तरी ते साधारण मानाने महारांच्या पुढे आहेत. तितकेच, किंबहुना जास्त, मांग हे महारांच्या मागे आहेत. आम्ही जेव्हा भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीच्या शाळा उघडल्या तेव्हा अगदी प्रथम तर कोणीच येईनात; कारण तेव्हा शाळेंत नियमितपणें जाण्याची सवय ह्या लोकांमध्यें अगदी क्वचितच होती. पुढे लवकरच महार अगोदर येऊं लागले. पण तेवढ्याच कारणावरून हें आमचें मिशन महार, मांग, चांभार ह्यांचा सबगोलंकार करणारें असेल अशा संशयावरून चांभार येईनासे झाले. मांग तर अझून यावे तसे व तितके येत नाहीत. आपसांतल्या उच्चनीचतेच्या कल्पनांमुळें, ह्या अगोदरच इतरांनी पायांखाली तुडविलेल्या जाती, त्यांच्या हितकर्त्यांनी चालविलेल्या प्रयत्नांचा फायदा घेण्यापासून कशा अंतरतात, हें आमच्या डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या खाली दिलेल्या कोष्टकांतील पांच वर्षांच्या आकड्यावरून ध्यानांत येण्यासारखें आहे. ह्यावरून चांभार महारांपेक्षा शिक्षणांत मागासलेले आहेत असें सिद्ध होत नसून, केवळ महाराच्या व मांगांच्या पंक्तीला बसून आमच्या मिशनाचा फायदा घेण्यापेक्षा त्याला अंतरणेंच त्यांना बरें वाटलें, हेंच सिद्ध होत आहे.

भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीच्या निरनिराळ्या प्रांतांतील सर्व शाळांतील पटांवरील मुलांचे जातवार तुलनात्मक आकडे

इ. सन	महार धेड व्हलयार	चांभार समगार	मांग मादिग	ढोर	भंगी मेहेतर	वरिष्ठ वर्गीय स्पृश्य	एकूण वर्षअखेर पटावरील संख्या
१९११	५९६	१३४	३०	३०	५	१४८	१०८४
१९१२	७७१	११३	५०	२२	७६	१७९	१२३१
१९१३	८०८	११०	७६	१३	७९	२०८	१२५४
१९१४	११६५	९८	३८	३७	४४	२८५	१६७२
१९१५	८५२	९२	६५	२४	७६	३४०	१५६४

वरील कोष्टकांत १९१५ सालचे आकडे कमी असण्याचें कारण मद्रास इलाख्यांतील शाळांचे आकडे मुख्य कचेरीकडे आले नाहीत हें होय. चांभार आणि ढोर जातींचे आकडे सारखे कमी होत गेले आहेत आणि इतर अस्पृश्यच नव्हे तर स्पृश्य जातींचे आकडेही वाढत गेलेले स्पष्ट दिसत आहेत. मुंबई, पुणें, हुबळी, बंगळूर मंगळूर, नागपूर ह्या ठिकाणीं मंडळीची विद्यार्थी वसतिगृहें होतीं तेथे जेवणाची वगैरे सर्व सोयी फुकट होत्या. पण महारांबरोबर नुसतें शाळेंत बसण्याची ज्यांची नाखुषी, ते चांभार त्यांच्याबरोबर बसून जेवणार कसे ? जातिभेदाविषयीं तडजोड करण्याचें मंडळीने कधीच धोरण ठेवलें नाही. वरिष्ठ वर्गीय स्पृश्यांचीं कंगाल अनाथ मुलें आमच्या वसतिगृहांत कांही येत असत, पण चांभारांचीं फारतर दोन चारच आलीं असतील ! सन १९२१ च्या सुमारास पुणें येथे मुंबई सरकाराने आपलें एक अस्पृश्यांकरितां खास वसतिगृह उघडलें तेव्हा त्यांत कांही केल्या महार व चांभार एकत्र जेवावयास बसेनात. पुण्याचे इन्स्पेक्टरांनी एक स्पृश्य स्वयंपाकी पाहून देण्यास मला विनंती केली. तेव्हा " जातिभेदाला अशा प्रकारें उत्तेजन देण्याचें धोरण न पत्करतां आमच्या मिशनने जर इतकीं वर्षें बिनबोभाट सहा वसतिगृहें चालविलीं, तर सरकारानेच आता अशी हार का खावी ?" ह्या माझ्या प्रश्नाला सरकारी इन्स्पेक्टरही निरुत्तर झाले. ह्यावरून अस्पृश्यांचा प्रश्न कसा गुंतागुंतीचा आहे, हें कळतें.

मुरळ्या वाहण्याची चाल

पश्चिम आणि दक्षिण हिंदुस्थानांत मुरळ्या व देवदासी म्हणून कोवळ्या वयाच्या मुलींना देवाला वाहण्याची चाल मागासलेल्या जातींतून अद्यापि आहे. अस्पृश्य वर्गांत—विशेषत: कर्नाटकांत—ती अलीकडे तर फार वाढत आहे, असें नुकतेंच ह्या जातीच्या हिताकरितां नेमलेल्या सरकारी बोर्डाच्या सेक्रेटरीने मला आपल्या जबाबदार अधिकाराने सांगितलें ! आम्ही आमचें मिशन सुमारें २५ वर्षांपूर्वी उघडलें, तेव्हाच मुरळ्यांची चाल बंद करण्याविषयीं कायदेशीर इलाज व्हावा म्हणून एक स्वतंत्र चळवळ आम्ही केली. त्यांत युरोपिअन सभ्य गृहस्थ, मोठे

मोठे खिस्ती मिशनचे अधिकारी, हिंदु व मुसलमान पुढारी होते. जरी सरकारने तेव्हा नवीन कायदा करण्याचें नाकारिलें तरी पण पिनल कोडच्या जुन्याच ३७२-३७३ कलमाचा अंमल जारीने केला. तेव्हां ह्या दुष्ट चालीवर तात्पुरता थोडा आळा बसला. पण पुढे एका खटल्यांत हायकोर्टाकडे अपील होऊन मुरळी सोडणारावर प्रत्यक्ष अनीतीच्या मार्गाला उत्तेजन देण्याच्या हेतूचा आरोप शाबीत झाला नाही, म्हणून त्याची सुटका झाली. ह्या प्रकारें प्रस्तुतचा कायदा अपुरा ठरल्यामुळें अलीकडे ह्या अनिष्ट गोष्टीने पुनः उचल खाल्ली आहे. कदाचित् मुंबई कौन्सिलांतून एखादें नवें बिल येईल किंवा मध्यवर्ती असेंब्लीपुढे असलेल्या बिलामुळेंही कांही इलाज होईल अशी वरील सेक्रेटरींनी आशा प्रकट केली.

मोठमोठ्या शहरांतून व्यभिचाराचें मान अलीकडे फारच भडकूं लागलें आहे. तेथे खालच्या जातीच्या ज्या बाजारबसव्या राजरोस आढळतात, त्यांत कानडी बोलणाऱ्याच पुष्कळ असतात. ह्यावरून कर्नाटकांत कायदेशीर कडक अमलाची जरूरी जास्त दिसते. इतर सर्व शाखांपेक्षा आमच्या मिशनच्या हुबळी शाखेला ह्या दुष्ट चालीविरुद्ध फारच अधिक झगडावें लागलें. वरिष्ठ वर्गांवर जीं अनेक सामाजिक व घरगुती बंधनें आहेत तीं ह्या तिरस्कृत वर्गांवर नसल्यामुळें व त्यांना इतर प्रामाणिकपणाचे धंदे करण्याला इतरांसारखा वाव नसल्याने साहजिकच त्यांचा पाय अधिकाधिक खोलांत उतरतो. शिक्षणाने, धार्मिक व नैतिक उपदेशाने किंवहुना आर्थिक मदतीनेही ह्या बाबतींत लवकरच परिणामकारक उपाय होणें शक्य नाही. अजीबात व्यभिचार बंद करणें कोणत्याही कायद्याच्या अगर धर्माच्या आवाक्याबाहेरचें आहे, हें खरें. पण अज्ञान वयांतल्या आतल्या पोटच्या मुलींना अगर इतर नात्यांतील स्त्री आश्रितांना देवाला वाहण्याचें मिष करून त्यांच्या व्यभिचाराच्या उत्पन्नावर पोट भरण्याचा मोह अडाणी पालकांना होतो. त्याला तात्काळ आळा घालण्याचें सामर्थ्य कायद्याशिवाय व त्याच्या प्रामाणिक परिणामकारी अंमलबजावणीशिवाय इतर कशांतही नाही हें खास.

वरील सारख्या अनेक अन्यायांना व अडचणींना कांही अंशीं स्पृश्यांची उदासीनता, जोरजबरी किंवा आपमतलबच कारणीभूत आहेत, तर बऱ्याच अंशीं स्वतः अस्पृश्यांचेंच अज्ञान आणि दुराग्रहही कारण आहेत. शेवटीं आणखी एका अडचणीचा उल्लेख करितों. त्यांत मात्र स्पृश्यांचाच दुराग्रह कारण आहे. अलीकडे निदान शहरांत सुशिक्षित आणि कांही सुसंपन्न अस्पृश्य व्यक्ति आढळतात. पण त्यांना त्यांच्या दरजाप्रमाणें व कामाच्या सोयीप्रमाणें चांगल्या वस्तींत योग्य तें भाडें देऊनही राहण्याला घेर किंवा स्वतःचें घर बांधण्याला जागाही मिळणें अझून शक्य नाही. वकील, डॉक्टर, सरकारी अधिकारी किंवा सामाजिक पुढारी, कोणीही असो, जोंवर त्याने धर्मांतर केलें नाही किंवा आपली जात यशस्वीपणाने लपविली नाही, तोंवर कोणाही मानीव अस्पृश्याला प्रतिष्ठित हिंदु वस्तींत राहावयास जागा मिळत नाही. ह्या अडचणीला कायद्याचें सामर्थ्यही कांहीच उपाय करूं शकत नाही. ही बाब केवळ लोकमतावर व व्यावहारिक सहानुभूतीवरच अवलंबून आहे. सुधारकांनी अगर सरकाराने, फार तर काय, प्रत्यक्ष कॉंग्रेसने अगर हिंदुसभेने थोडी जोरजबरी केली तरी शेवटीं दुष्परिणाम अस्पृश्यांनाच भोगावा लागेल. ह्यावरून स्वराज्य मिळालें तरी ह्या बिचाऱ्यांच्या वाट्याला सुराज्य मिळेल काय ह्याची शंकाच वाटते.

प्रकरण अकरावें

राजकारण

ह्या पुस्तकाचीं मागील १० प्रकरणें १९३२ सालच्या आगष्ट महिन्यांतच तयार करून छापखान्याकडे पाठविण्यांत आलीं होतीं. अलीकडे दोन चार वर्षांत अस्पृश्यांच्या राजकारणाला अगदी चुरशीचें स्वरूप आल्यामुळें, विशेषतः महात्मा गांधींच्या १९३२ सालच्या सप्टेंबर महिन्यांतील उपोषणामुळें हें प्रकरण लिहिण्याचें लांबणीवर टाकून कांही काल वाट पाहावी लागली. पुढे पुण्याचा करार झाला. चालू (१९३३) सालच्या मे महिन्यांत महात्माजींनी पुनः २१ दिवस उपोषण केलें. आता ह्यापुढे हें पुस्तक तावडतोब प्रसिद्ध झालें पाहिजे. म्हणून हें प्रकरण लिहून संपविलें आहे.

अस्पृश्यांचें राजकारण किंवा त्याच्यासंबंधीं स्पृश्यांचें राजकारण म्हणजे कांही नुसती आजकालची धामधूम आहे अशांतला मुळीच अर्थ नव्हे. हें राजकारण अस्पृश्यतेइतकेंच पुरातन आहे, असें म्हणण्यांत मुळींच अतिशयोक्ति होणार नाही. माझी तर स्वतःची अशी खात्री होऊन चुकली आहे की, हिंदूंतील अस्पृश्यता म्हणजे त्यांच्या दूषित राजकारणाचा एक मासला होय. पहिल्या प्रकरणांत केलेल्या व्याख्येप्रमाणें अस्पृश्यतेचें संघटित स्वरूप म्हणजे प्राचीन वर्णाभिमानी हिंदूंच्या दूषित राजकारणाचा यशस्वी विकासच होय. ह्या विकासाची पोलादी चौकट मागे केव्हा एकदा जी घडविली गेली, ती आजवर जशीच्या तशीच जवळ जवळ शाबूत आहे. म्हणून घडविणाराच्या दृष्टीने हिला यशस्वी म्हटलें आहे. मूळ चार वर्णांच्या कालांतराने पुढे हजारो जाती पोटजाती झाल्या, कालमाहात्म्याने त्यांचें आपसांत स्थलांतर व रूपांतरही झालें. पण ह्या चौकटीबाहेरील अस्पृश्यांवर प्रत्यक्ष काळाच्या हातूनही कांही अनुकूल परिणाम घडवितां आले नाहीत. उलट वहिवाटीच्या दाबाखाली जणूं काय ते कायमचेच दडपले गेले आहेत असें दिसतें. 'सवय म्हणजे प्रति सृष्टिच' ही म्हण सार्थ झाली आहे.

ह्या प्राचीन राजकारणाचा खडान् खडा इतिहास उपलब्ध नाही, हें खरें आहे. त्या काळचा प्रत्यक्ष जेत्यांचाच इतिहास उपलब्ध नाही, तेथे जितांचा कोठून असेल ? ज्यांचें सर्वस्व गेलें, त्या जितांचा इतिहास तरी कसा उरणार ? असा कोण जेता आहे की जो आपल्या कृतकर्मांची कथा जशीच्या तशीच लिहून ठेवील ? आणि स्वतःचा इतिहास लिहिण्याची अक्कल आणि करामत असती तर हे बिचारे आजचे अस्पृश्य जित तरी कां झाले असते ? ह्या प्रकरणीं इतिहास मागणें म्हणजे बाप दाखीव नाही तर श्राद्ध कर म्हणण्याप्रमाणेंच आहे. बिचारे बाप कोठून दाखवतील ? मुकाट्याने श्राद्ध करीत आहेत, झालें ! तथापि अगदी तपशीलवार इतिहास नाही तरी त्याचें दिग्दर्शन कांही अंशीं मागील प्रकरणांतून आलेलेंच आहे. त्यावरूनही ज्यांना अंदाज करण्याची इच्छा होत नाही, त्यांच्यापुढे समग्र इतिहास आणून ठेविला, म्हणून तरी काय लाभणार आहे ?

ह्या इतिहासाची पुनरावृत्ति जगांत वेळोवेळीं पुष्कळदा झाली आहे. गेल्या पांच शतकांत अमेरिका खंडांत ती झाली आहे व हल्ली आफ्रिकेंत, आस्ट्रेलियांत वगैरे चालली आहे. यूरोपांतून सुधारलेलीं म्हणविणारीं अनेक राष्ट्रें उत्तर व दक्षिण अमेरिकेंत जाऊन तेथील मूळ राहिवाश्यांचा हळूहळू नाश करून किंवा त्यांना दूर घालवून देऊन त्यांच्या जमिनीवर आता आपलें ठाणें मांडून बसलीं आहेत. प्राचीन भारतवर्षांत वाहेरून अशींच अनेक राष्ट्रें वेळोवेळीं आलीं. त्यांनी एतद्देशीयांचा नाश केला, त्यांच्यापैकी कित्येकांना घालवून दिलें व कित्येकांना आपल्या दास्यांत ठेविलें. अमेरिकेंतील अत्याचारांचा इतिहास उपलब्ध आहे व तो प्रसिद्धही होत आहे. येथला होण्याची आशा नाही. हाच काय तो फरक. अमेरिका हें नांवही जेत्यांनी आपलें दिलें तसेंच भारत हें नांवही जेत्यांचेंच आहे. अमेरिकेंतील मूळ एतद्देशीयांचा नायनाट झाला आणि जे अगदी थोडे उरले ते उपऱ्या जेत्यांच्या खिजमतीला खुशी अगर लायख नव्हते, म्हणून नवीन वसाहत करणारांना आपल्या कावाडकष्टासाठी इतर खंडांतून दासांना धरून जबरीने आणावें लागलें. हिंदुस्थानांत वसाहत करणारांची गरज येथल्या येथेच भागली. पण जोरजबरीचा मामला दोहोकडे सारखाच आहे. अमेरिकेंतील प्रकार निष्ठुर होता आणि येथला फार

कनवाळूपणाचा होता असें भासविण्याचा वेळोवेळीं आमच्यांतले कांहीं इतिहासकार प्रयत्न करितात, तो एक नुसता कोडगेपणाचा मासला आहे ह्यापेक्षा अधिक कांहीं म्हणवत नाही. गेल्या दहा प्रकरणांत, मलबारांतले नंबुद्री आणि नायर जातींच्या जमीनदारांनी आज हजारो वर्षे तेथील चेरुमा, पुलया वगैरे अस्पृश्य जातींना किती घोर अवस्थेंत आपल्या मालकीच्या अगर खंडाच्या शेतांवर गुरांप्रमाणें राबविलें आहे, ह्याचा उल्लेख आलाच आहे. त्यावरून, ज्या ज्या काळीं अशा क्रांत्या घडून आल्या त्या काळच्या राजकारणाचें उग्र स्वरूप दिसून येणार आहे.

जगांतील राजकारणाचें मुख्य लक्षण म्हणजे बलिष्ठाने दुबळ्यावर सत्ता चालविणें हें आजकालच्या सुधारलेल्या काळांतही खरेंच आहे. ही सत्ता एकदा आपल्या हातीं आल्यावर नामोहरम झालेल्या जातींनी अथवा राष्ट्रांनी पुनः आपलें डोकें वर काढूं नये म्हणून त्यांचा राजकीयच नव्हे तर सामाजिक दरजाही खाली दडपून बेपत्ता करण्यासाठी सामुदायिक अस्पृश्यता हें प्राचीन राजकारणांतील एक घोर साधन आहे व हें साधन हिंदुस्थान व सरहद्दीवरील देशांत मध्ययुगांतही उपयोगांत आणिलें गेलें ह्याचा पुरावा ब्रह्मदेशाचा जो मिळतो त्याचें वर्णन सहाव्या प्रकरणांत केलेंच आहे. इतकेंच नव्हे तर बौद्ध धर्मांतून हिंदू धर्मांत, बंगाल व मद्रासकडे परत क्रांति झाली तेव्हा, ज्या पाखंडी समजलेल्या जमाती हिंदु शासनाखाली सहजासहजीं आल्या नाहीत, त्यांना हिंदु धर्माधिकाऱ्यांच्या कारवाईला बळी पडावें लागलें. तत्कालीन हिंदु राजांनी अशा स्पृश्य जमातींना एकजात अस्पृश्य आणि बहिष्कृत कसें ठरविलें तें पांचव्या प्रकरणांत सांगण्यांत आलें आहे. ह्यावरून प्राचीन राजकारणाचा हा तोडगा, ह्या देशांत अगदी मध्ययुगाच्या अंतापर्यंत बिनदिक्कत चालविण्यांत आला आहे हें दिसून येत आहे. आता आपण ह्या वर्णद्वेषाच्या पायावर उभारलेल्या राजकारणाच्या टप्प्यांचे कालानुक्रमें पुरावे म्हणून वाङ्मयांतून कांही उतारे मिळाल्यास पाहूं.

वैदिक कालांतील कटकट

ऋग्वेदकालीन आर्यांची शासनपद्धति कशी होती ह्यासंबंधीं, कलकत्ता विद्यापीठांतील एक अध्यापक प्रफुल्लचंद्र वसु ह्यांनी

Indo Aryan Polity ह्या नांवाचा इ.स. १९१९ सालीं इंग्रजींत एक प्रबंध प्रसिद्ध केला आहे. त्यांतील सहावें प्रकरण, Polity (राज्यव्यवस्था) मननीय आहे. अर्थात् ही आर्यांच्या किंवा आर्य म्हणविणाऱ्या जमातींशीं मिळतें घेऊन राहणाऱ्या आर्येतर जमातींपुरतीच होती, हें सांगावयास नको. ह्या काळीं आर्यांची समजली जाणारी तीन वर्णांची किंवा हुना चार वर्णांची व्यवस्था बनत चालली होती. पण ह्या चातुर्वर्ण्याबाहेर ज्या आर्येतर जमाती हिंदुस्थानांत पूर्वीच ठाणें मांडून राहिलेल्या होत्या, ज्यांच्याशीं आर्यांच्या लढाया होत, त्या जमाती सर्व आर्यांहून कमी संस्कृतीच्या होत्या असें मुळीच नव्हे. उलट कांही जमाती तर आर्यांहून पुष्कळ सुसंपन्न व सुसंघटित स्थितींत होत्या. कांही असो; ह्या दोन्ही दर्जांचे आर्येतर अस्पृश्य किंवा बहिष्कृत स्थितींत मुळीच नव्हते. ते येथील मूळचे रहिवाशी किंवा आर्यांच्या पूर्वी बाहेरून आलेले व येथे कायम वसाहत करून राहिलेले, पण भिन्न संस्कृतीचे होते. मात्र त्यांच्याशीं आर्यांचे संधिविग्रह होऊन (१) जे आर्यांशीं समानबल किंवा अधिक सुसंपन्न होते ते आर्यांच्या तीन्ही वरिष्ठ वर्णांत गुणकर्मशः समाविष्ट झाले; (२) जे किंचित् कमी संस्कृतीचे होते ते आर्यांतील चवथा शूद्रवर्ण झणून त्यांच्यांत मिसळले; ह्याशिवाय जो मोठा कमी अधिक संस्कृत वर्ग आर्यांनी अगदी पाडाव केला (३) तोच काल-वशाने पुढे अस्पृश्यत्वाप्रत पोचला; आणि (४) जो कधी विशेष संस्कृत नव्हता, आणि ज्यांचा आर्यांशीं संबंधच आला नाही, किंवा जे आर्यांच्या कटकटीला कंटाळून डोंगर, झाडी, किनारा, बेटें वगैरेंचा आश्रय करून दूर राहिले, ते अद्यापि त्याच स्थितींत आहेत. पण ह्या चारी प्रकारच्या आर्येतरांना वेदमंत्रांतून दस्यु अथवा दास, हें एकच सामुदायिक नांव आहे. ह्याशिवाय कित्येक विशेषणवाचक नांवें ऋग्वेदांतून आढळतात, त्यांच्याशीं आर्यांचा किती द्वेष होता व त्यांच्या एकमेकांशीं कशा लढाया होत हें वर पाहिल्या खंडांतील दुसऱ्या प्रकरणाचे शेवटीं ज्या ऋचा अवतीर्ण केल्या आहेत त्यांवरून कळण्यासारखें आहे.

ह्या परजातीच्या द्वेषाचें मुख्य एक कारण, त्यांच्या धार्मिक भावना, उपासना व आचार भिन्न असत हें होय. ह्यामुळें परकीयांना अब्रह्मा, अव्रत, अयज्यु, अश्रद्ध, अक्रतु, अकर्म, अमानुष, अदेव्य, अशा अनेक

शिव्या दिलेल्या वेदमंत्रांतून आढळतात. ह्याच शिव्यांचा व द्वेषभावनांचा विकास, पुढे ज्या काळीं ह्या परकीयांचा पूर्ण पाडाव होऊन ते आर्यांच्या राजकीय व आर्थिक गुलामगिरींत दडपून गेले त्या काळीं आताच्या अस्पृश्यतेंत व बहिष्कारांत झाला हें उघड आहे.

अच्छा कविं नृमणोगा अभिष्टौ स्वर्षाता मघवन् नाधमानम् ।
ऊतिभिस्तमिषणो द्युम्नहूतौ नि मायावानअब्रह्मा दस्युरर्त ॥

ऋग्वेदसहिता, मं. ४. सू. १६. ऋ. ९.

ह्यांत मायावान् व अब्रह्मा म्हणजे 'जादूगार' व 'ब्रह्म म्हणजे स्तुति किंवा प्रार्थना न करणारा' अशी निंदा आहे.

न्यक्रतून् ग्रथिनो मृधवाचः पणींरश्रद्धाँ अवृधाँ अयज्ञान् ।
प्र प्र तान् दस्यूँरग्निर्विवाय पूर्वश्चकारापराँ अयज्यून् ॥

ऋग्वेदसंहिता, ७. ६. ३.

ह्यांत पणी नांवाचें दस्यूंचें एक निराळेंच राष्ट्र निर्दिष्ट झालें आहे. मद्रासेकडील हल्लीचे पळ्ळ नांवाचे अस्पृश्य किंवा प्राचीन फिनिशयन यांच्याशीं ह्याचा संबंध येतो की काय हा संशोधनीय विषय आहे. अग्नीने त्यांचा अत्यंत नाश केला असा ह्या श्लोकाचा अर्थ आहे.

प्रान्यच्चक्रमवृहः सूर्यस्य कुत्सायान्यद्वरिवो यातवेऽकः ।
अनासो दस्यूँरमृणो वधेन नि दुर्योण अवृणङ् मृधवाचः ॥

ऋग्वेदसंहिता, ५. २९. १०.

ह्यांत दस्यूंना अनास असें म्हटलें आहे. अनास = तोंड, भाषा नसलेले = म्लेच्छ, असें सायणाचार्य म्हणतात. अनास = नाक नसलेले = नकटे असें मॅक्स मूलर म्हणतात.

हे दस्यू किती जरी अधार्मिक, कुरूप व दुर्गुणी असले तरी त्यांच्याशीं लढण्याचीं हींच तेवढीं कारणें नसून, ते संपत्तिमान्, सुसंस्कृतिवान् आणि सुसंघटित होते आणि त्यांच्या संपत्तीचा आर्यांना हेवा वाटत होता, हें दुसरें अधिक बलवत्तर कारण होतें. दस्यू हे किल्ले बांधून शहरांत राहत असत. आर्यांपेक्षाही ते अधिक स्थाईक झालेले होते.

इंद्राग्नी नवतिं पुरो दासपत्नीरधूनुतम् । साकमेकेन कर्मणा ॥

ऋग्वेदसंहिता, ३. १२. ६.

इंद्र व अग्नि ह्या दोघांनी दासांच्या आधिपत्याखालील नव्याण्णव पुरें म्हणजे किल्ले एकदम पाडून टाकले. असा ह्या मंत्राचा अर्थ आहे.

प्र ते वोचाम वीर्या या मन्दसान आरुजः । पुरो दासीरभीत्य ॥

ऋग्वेदसंहिता, ४.३२.१०

मन्दसानः = सोम पिऊन माजलेला (इंद्र)

आरुजः = (किल्ल्याचा) फडशा उडविला.

आभिः स्पृधो मिथतीररिषण्यन् अभित्रस्य व्यथया मन्युमिन्द्र ।
आभिर्विश्वा अभियुजो विषूचीरार्याय विशोऽवतारीर्दासीः ॥

ऋग्वेदसंहिता, ६.२५.२.

ह्या मंत्रांत, आर्यांभोवती दासांचा वेढा पडला आहे, किंवा आर्यांच्या वस्तीभोवताली दस्यूंच्या वसाहती आहेत; इंद्राने त्यांचा नाश करून आर्यांच्या सेनेचें रक्षण करावें, असा अर्थ आहे.

प्र ये गावो न भूर्णयस्त्वेषा अयासो अक्रमुः ।
घ्नन्तः कृष्णामपत्वचम् ॥

ऋग्वेदसांहिता, ९.४१.१.

कृष्ण नांवाचा एक काळ्या रंगाचा असुर होता, तो दहा हजार सेनेसह अंशुमती नदीचे काठापर्यंत चाल करून आला, त्याचा पराभव झाला, त्याच्या अंगाची कातडी सोलून काढिली, वगैरे कथा आहे. मं. १ सू. १३० ऋ. ८ पहा. अमेरिकेंतील हल्लीचा लिंचिंगचा असाच प्रकार आहे.

उत दासं कौलितरं बृहतः पर्वतादधि । अवाहन्निन्द्र शम्बरम् ॥

ऋग्वेद संहिता, ४.३०.१४.

कुलितराचा मुलगा शंबर ह्याला इंद्राने मोठ्या पर्वताच्या खाली ओढून मारिलें.

त्वं तदुक्थमिन्द्र बर्हणा कः प्र यच्छता सहस्रा शूर दर्षि ।
अव गिरेर्दासं शम्बरं हन् प्रावो दिवोदासं चित्राभिरूती ॥

ऋग्वेद संहिता, ६.२६.५.

हा शंबरासुर व दिवोदास (आर्य) ह्यांच्यामध्यें बरीच कटकट झालेली दिसते. ह्या कटकटीला कंटाळून शंबर डोंगरी किल्ल्याचा आश्रय घेऊन राहिला. हा शंबर, वरील कृष्ण व इतर अनेक आर्येतर

नायक सुसंपन्न व सुसंघटित नेते होते. त्यांच्या संस्कृतीचा एक विशेष असा होता की ते अभिचार उर्फ जादूक्रिया वगैरे गूढविद्येंत प्रवीण होते. सुमारें २३०० वर्षांपूर्वी लिहिला गेलेल्या कौटिलीय अर्थशास्त्र नामक ग्रंथाच्या **प्रलंभने भैषज्यमन्त्रयोगः** । ह्या १७८व्या प्रकरणांत ह्या आर्येतर राजांचा खालील पुनः उल्लेख आढळतोः—

बलिं वैरोचनं वन्दे शतमायं च शम्बरम्।
भण्डीरपाकं नरकं निकुम्भं कुम्भमेव च ॥
देवलं नारदं वन्दे वन्दे सावर्णिगालवम्।
एतेषामनुयोगेन कृतं ते स्वापनं महत् ॥
यथा स्वपन्त्यजगराः स्वपन्त्यपि चमूखलाः।
तथा स्वपन्तु पुरुषा ये च ग्रामे कुतूहलाः ॥

कौटिलीय अर्थशास्त्र (श्यामशास्त्री यांची आवृत्ति), पान ४१९

वरील मंत्राचा प्रयोग केला असतां रक्षक व इतर माणसांना झोप लागते अशी समजूत होती. हा प्रयोग करण्यापूर्वी एका श्वपाकी (मांगीण) कडून हातापायांचीं नखें विकत घेऊन तीं कृष्ण चतुर्दशीला स्मशानांत पुरावीत. तीं पुढच्या चतुर्दशीला उकरून कुटून त्यांच्या गोळ्या तयार कराव्यात. त्यामुळें सर्व निद्रिस्त होतात असें ह्याच प्रकरणांत सांगितलें आहे. आंध्र देशांत जादुटोणा करणारी एक विशिष्ट अस्पृश्य जात आहे. त्या जातींच्या बायकांची मदत वरिष्ठ वर्गही अशा कामीं घेतात असें मी त्या प्रांतांत फिरत असतांना ऐकिलें आहे. ह्याच प्रकरणांत पुनः खालील श्लोक आढळतात.

बलिं वैरोचनं वन्दे शतमायं च शम्बरम्
निकुम्भं नरकं कुम्भं तन्तुकच्छं महासुरम् ॥
अर्मालवं प्रमीलं च मंडोलूकं घटोद्भवम्।
कृष्णकंसोपचारं च पौलोमीं च यशस्विनीम् ॥
अभिमन्त्र्य गृह्णामि सिद्धार्थं शवसारिकाम् ॥

कौटिलीय अर्थशास्त्र (श्यामशास्त्री यांची आवृत्ति), पान ४२१

चण्डालीकुम्वीतुम्भकटुकसाराघः सनीरीभगोसि स्वाहा।

सदर, पान ४२३

हा मंत्र म्हटला असतां कसलेंही बळकट दार उघडतें आणि सर्वांना झोप लागते ! वरील मंत्रांतील पौलोमी ही चंडाली मोठी यशस्विनी

उपलब्ध नाहीत. इ. स. च्या १९ व्या शतकाच्या मध्यसमयीं महात्मा जोतीबा फुले ह्यांनी महारामांगांसाठी शाळा काढल्या, त्यांना आपली स्वत:ची विहीर मोकळी केली, किंबहुना आगरकरांनी त्या शतकाच्या शेवटीं सामाजिक समसमानतेची आपल्या "सुधारक" पत्रांत मोठी झोड उठविली म्हणून सामान्य लोकव्यवहारांत तेव्हा तादृश खरीच क्रांति घडली असें झालें नाही; तोच प्रकार बौद्ध जैनांच्या ह्या अपवादक औदार्याचा झाला. इतकेंच नव्हे, तर पुढे जेव्हा प्रत्येक बौद्ध भिक्षुसंघांतच, ज्यांच्या हाडींमासीं वर्णाश्रम भेदभावाची संस्कृति बेमालूम खिळली होती, अशा ब्राह्मणवर्गाचा बेसुमार शिरकाव झाला तेव्हा 'महायान' नांवाचें रूपांतर घडून बौद्ध धर्माचें हें वैशिष्ट्य लोपून गेलें. ह्यापुढचाही खेदकारक परिणाम असा घडला की राजकारणांत क्रांति घडून पुनः हिंदु मताभिमानी राजे व बादशहा प्रमुखपदारूढ झाल्यावर त्यांचें मंत्रिपद व गुरुपद ज्या वर्णाश्रम अतिवाद्यांकडे (extremists) सहजच गेलें त्यांच्याकडून अस्पृश्यांच्या बाबतींत मोठी जोराची प्रतिक्रिया सुरू झाली हें मनुस्मृतीसारख्या ग्रंथांतून ह्यांच्यासंबंधीं जे निर्घृण दंडक ठरविले गेले त्यावरून उघड दिसत आहे. ह्या दंडकांचा ऐतिहासिक पोकळपणा व कृत्रिमपणा कसा होता हें वर चवथ्या प्रकरणांत स्पष्ट झालेंच आहे. आता एवढें खरें आहे की जरी बौद्ध काळांतील सामान्य जनतेंत अस्पृश्यांच्या बाबतींत राजकीय अथवा सामाजिक क्रांति घडली असें दर्शविणारीं ऐतिहासिक उदाहरणें उपलब्ध नाहीत, तरी तत्कालीन सुशिक्षित व बहुश्रुत लोकमतांत केव्हा केव्हा बरेच उदार व प्रागतिक विचार प्रचलित झाले असावेत हें पाली वाङ्मयांतूनच नव्हे तर संस्कृत वाङ्मयांतीलही खालील उताऱ्यांवरून दिसून येण्यासारखें आहे.

बौद्धांचें औदार्य अगदीच नष्टप्राय झालें असें नसून तें भगवद्गीतेसारख्या हिंदूंच्या धर्मग्रंथांतूनच नव्हे तर शुक्रनीतीसारख्या राजकारणावर लिहिलेल्या ग्रंथांतूनही केवळ विचारसृष्टींत व उपदेशसृष्टींत अद्यापि चमकत आहे. चातुर्वर्ण्य हें गुणकर्मानुसार आहे असें गीता म्हणते तशीच शुक्रनीतींत खालील शिकवण स्पष्ट आहे. ही गीता, ही नीति वगैरे हल्लीच्या स्वरूपांत आढळणारी जी मनुस्मृति तिच्या काळांतल्या, म्हणजे बौद्ध धर्माला उतरती कळा लागल्यावर, म्हणजे गुप्त

साम्राज्यानंतरच्या इ. स.च्या ४ थ्या ५ पांचव्या शतकांतल्या किंवा पुढच्या आहेत. शुक्रनीतिसार ह्या ग्रंथांत पहिल्या व चौथ्या अध्यायांत व इतर ठिकाणींही पुढच्यासारखी विधानें स्पष्ट आढळतात.

न जात्या ब्राह्मणश्चात्र क्षत्रियो वैश्य एव न।
न शूद्रो नच वै म्लेच्छो, भेदिता गुणकर्मभिः ॥ ३८
ब्रह्मणस्तु समुत्पन्नाः सर्वे ते किं नु ब्राह्मणाः ?।
न वर्णतो न जनकाद् ब्राह्मतेजः प्रपद्यते ॥ ३९

शुक्रनीतिसार, अ० १.

अर्थः--ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र किंवा म्लेंछ हे वर्ण जातीने झालेले किंवा होणारे नसून केवळ गुण व कर्म ह्यांच्या भेदानेच होणारे आहेत. केवळ ब्रह्मापासून झाले म्हणून काय ते सर्व ब्राह्मण झाले ? ब्राह्म तेज कांही केवळ वर्णापासून किंवा बापापासून ठरत नाही.

त्यक्तस्वधर्माचरणा निर्घृणाः परपीडकाः ।
चंडाश्च हिंसका नित्यं म्लेच्छास्ते ह्यविवेकिनः ॥ ४४

सदर, अ० १.

अर्थ—ज्यांनी आपलें कर्तव्य सोडलें, जे निर्दय, परपीडक, उग्र, नेहमी हिंसा करणारे, अविवेकी तेच म्लेच्छ होत. चवथ्या अध्यायाच्या तिसऱ्या प्रकरणाच्या आरंभीं, जे सनातन देशधर्म, जातिधर्म आणि कुलधर्म आहेत त्यांची धारणा राजाने करावी; कारण तोच एक देव आहे दुसरा देव नाही, असें म्हटलें आहे; व पुढे प्रस्तुत जातिभेदाची मीमांसा अशी केली आहे.—

चतुर्धा भेदिता जातिर्ब्रह्मणा कर्मभिः पुरा ।
तत्तत् सांकर्यसांकर्यात् प्रातिलोमानुलोमतः ॥
जात्यानन्त्यं तु संप्राप्तं तद् वक्तुं नैव शक्यते ॥ १२
= यन्ते जातिभेदं ये मनुष्याणां तु जन्मना ।
त एव हि विजानन्ति पार्थक्यं नामकर्मभिः ॥ १३
कर्मणोत्तमनीचत्वं कालतस्तु भवेद्गुणैः ।
विद्याकलाश्रयेणैव तन्नाम्ना जातिरुच्यते ॥ १५

अर्थः—पूर्वी देवाने चारच जाती निर्माण केल्या. प्रतिलोम अनुलोम संकरामुळें ह्या मूळ जाती आता अनंत झाल्या आहेत. त्यांची आता व्याख्या करणें केवळ अशक्य आहे. जन्माने जे जाती मानतात

त्यांनाच पृथक्पणें ह्या जातींचीं नांवें व कामें माहीत असावींत ! (हा औपरोधिक टोमणा दिसतो !) पण खरें पाहतां कर्मापासूनच उत्तमपणा नीचपणा अंगीं येतो व कालांतराने ह्या कर्मज संस्कारांचें स्वभावगुणांत रूपांतर होतें. म्हणून विद्या आणि कलांच्या आश्रयामुळेच त्या त्या जातीची घटना तयार होते.

येणेंप्रमाणें शुक्राचार्यांच्या नांवावर विकणारा ह्या मध्ययुगीन ग्रंथाचा कर्ता बराच प्रागतिक मताचा दिसतो व तो स्वतः वर्णाश्रम-धर्माभिमानी असूनही बौद्ध विचारांच्या वळणाचा दिसतो. ह्याचीं विधानें नुसती तात्त्विकच नसून राजकारणांतही तो स्पष्टपणें प्रागतिक, शुद्ध बुद्धिवादी आणि निर्विकार आहे. सैन्याची भरती करतांना व सेनापतीची निवडणूक करतांना कोणत्या तत्त्वावर ती करावी हें सांगतांना याने दुसऱ्या अध्यायांत असें स्पष्ट म्हटलें आहे.—

नीतिशास्त्रास्त्रव्यूहादिनतिविद्याविशारदाः ।
अबाला मध्यवयसः शूरा दान्ता दृढाङ्गकाः ॥ १३७
स्वधर्मनिरता नित्यं स्वामिभक्ता रिपुद्विषः ।
शूद्रा वा क्षत्रिया वैश्या म्लेच्छाः संकरसंभवाः ॥ १३७
सेनाधिपाः सैनिकाश्च कार्य्या राज्ञा जयार्थिना ॥ १३९

अर्थः—नीति, शास्त्रें, अस्त्रें, व्यूह (सैन्याची रणांगणावर मांडणी) जाणणारे, लहान नव्हेत व म्हातारे नव्हत असे मध्यवयाचे, शूर, आत्मसंयमी, बळकट शरीराचे, केवळ आपल्याच कर्तव्यांत निरंतर लक्ष्य घालणारे, स्वामिभक्त व शत्रूला कधीही फितूर न होणारे, अशांनाच जय चिंतणाऱ्या राजाने सैनिक व सेनापति म्हणून निवडावें. मग ते जन्माने शूद्र असोत, क्षत्रिय, वैश्य, किंबहुना मिश्र जातीचे म्लेच्छही असोत ! केवळ लष्करी खात्याचेंच नव्हे तर मुलकी राज्यव्यवस्थेचें धोरण ठरवितांनाही ह्या शुक्राचार्यांनी स्पष्ट म्हटलें आहेः—

व्यवहारविदः प्राज्ञा वृत्तशीलगुणान्विताः ।
रिपौ मित्रे समा ये च धर्मज्ञाः सत्यवादिनः ॥ १६६
निरालसा जितक्रोधकामलोभाः प्रियंवदाः ।
सभ्याः सभासदः कार्या वृद्धाः सर्वासु जातिषु ॥ १६७

शुक्रनीतिसार, अ० २ (पृ. १३६).

लष्करांतील निवडणुकीहून भिन्न तत्त्वांवर दिवाणी आणि मुलकी कार्यसभेंतील समासदांची निवड सांगितली आहे. पण तींत सर्व जातींतून वरील सद्गुणी माणसें निवडावींत असें स्पष्ट म्हटलें आहे. हें सर्व खरें असलें तरी ह्या उदार धोरणाची अम्मलबजावणी प्रत्यक्ष अस्पृश्य मानलेल्या ग्रामबहिष्कृतांच्या वाट्याला कितपत आली होती ह्याचीं उदाहरणें दाखविणारें तपशीलवार ऐतिहासिक वाङ्मय ह्या मध्ययुगीन काळांतील तूर्त तरी उपलब्ध नाही ही मोठी खेदाची गोष्ट आहे. इतकेंच नव्हे तर ह्या उदारमतवादी ग्रंथांतही मधून मधून मनुस्मृतिकारांना शोभणारे खालच्या प्रमाणें पक्षपाती विचार कालमाहात्म्याने चमकतात हा मोठा चमत्कार आहे ! आणि तेही ह्या दुसऱ्याच अध्यायांत !! नौकरी आणि पगार देतांना शूद्र आणि ब्राह्मण ह्यांमध्यें तारतम्य कसें राखावें हें निर्भीडपणें ठरविलें आहे !

अन्नाच्छादनमात्रा हि भृतिः शूद्रादिषु स्मृता ।
तत्पापभागन्यथा स्यात् पोषको मांसभोजिषु ॥ ४०१
यद् ब्राह्मणेनापहृतं धनं तत् परलोकदम् ।
शूद्राय दत्तमपि यन्नरकायैव केवलम् ॥ ४०२

अध्याय २ (पान १९५).

अर्थः—शूद्र नोकरीस ठेवावयाचा झाल्यास नुसतें पोटाला अन्न आणि पाठीला वस्त्र इतकेंच द्यावें. मांस खाणाऱ्यांना ह्यांहून जास्त वेतन दिल्यास धन्याला पाप लागतें ! ब्राह्मणाने एखाद्याच्या घरचें धन चोरलें तरी ज्याचें धन गेलें त्याला स्वर्गप्राप्ति घडते. पण शूद्राला हात उचलून कांही दिलें तर उलट देणारा केवळ नरकालाच जातो !

"शूद्राला सामर्थ्य असलें तरी त्याने धनसंचय करू नये; असा श्रीमंत झालेला शूद्र ब्राह्मणाला बाधा करितो," ह्या मनुस्मृतीच्या शिकवणीची (मागे पृ. ६० पहा) ही अस्सल नक्कल दिसते. राणीच्या जाहीरनाम्यांत अघळपघळ समसमानता जाहीर करून प्रत्यक्ष किफायतीच्या कामावर नेमतांना विलायतेहून आलेल्या अस्सल गोऱ्या बाळांची ज्या धोरणामुळें वरणी लागते तें पाश्चात्यांनी ह्या शुक्रनीतींतूनच जणूं उचललें आहे की काय, अशी क्षणमात्र शंका येते !

सुमारें ख्रिस्ती शकाच्या ५०० वर्षांनंतर हिंदुस्थानांत बौद्ध धर्मास कायमची उतरती कळा लागून वर्णाश्रमाच्या पायांवर ब्राह्मणी उर्फ शब्द-संस्कृतीच्या सनातनी म्हणविणाऱ्या दुहीप्रिय सोवळ्या हिंदुधर्माची घडी कायम बसल्यावर बहिष्कृत अस्पृश्यतेचें उच्चाटन होण्याची शेवटची आशा नष्ट झाली. इतकेंच नव्हे तर हजारों वर्षांच्या सवयीने मानीव अस्पृश्यांना देखील ह्या सोवळ्या धर्माने ठरविलेली अत्यंत हीन स्थिति आपला स्वभावच आहे असें वाटूं लागलें. त्यांतच तृप्त राहणें हाच आपला स्वधर्म असून त्याच्या उलट प्रयत्न करणें मोठा अधर्म आणि सामाजिक गुन्हा होय अशी त्यांची स्वतःची मनोरचना झाली. मग अशा अभाग्यांचें स्वतंत्र राजकारण तें काय उरणार! जगाच्या कृत्रिम इतिहासांत जें आजपावेतों चमकत आलें आहे असें राजकारण चट सारें जेत्यांचेंच असणार. जितांच्या राजकारणाला वाव तरी कसा मिळणार? चुकून माकून अपवाद म्हणून कदाकाळीं वाव मिळालाच, तरी त्याला लेखी इतिहासांत प्रवेश कसा मिळणार! ही अपवादक घटना जितकी मानवी स्वभावाच्या विरुद्ध आहे, तितकीच सृष्टिक्रमाच्याही उलट आहे. कारण मानवी स्वभाव हा तरी एक सृष्टिक्रमच आहे ना! ह्या क्रमाला स्थितिस्थापकतेच्या दडपणाखाली गारद झालेला हिंदुस्थानच कसा अपवाद होणार! असो. धर्मक्रांति आणि राजक्रांति हीं जुळीं भावंडेंच होत. धर्म म्हणून जो शब्द येथे योजिला आहे, त्याचा अर्थ मतलब येवढाच खरा आहे. शुद्ध अध्यात्मांत क्रांतीला वावच नाही. तें स्वयंभू स्वप्रकाशित आणि निरंतर सरळ उन्नतीच्या मार्गानेच जाणारें असतें. त्याच्या उलट धर्म म्हणून जो रज आणि तमोगुणाचा प्रकार आहे, तो राजकारणाहून मुळींच भिन्न नाही. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र इत्यादि वरून भिन्न भासणारे किती तरी बैल ह्या धर्म उर्फ राजकारणाच्या गाड्याला जुंपले असले, तरी गाडा एकच आहे. ह्या सर्वांची आपसांत एकी असते, तोंवर हें गाडें सुरळीत चाललेलें दिसतें. वितुष्ट माजलें की क्रांति झाली असें इतिहासांत नमूद होतें.

हिंदुस्थानांत अशा क्रांत्या वेळोवेळीं झाल्या आहेत. पण ज्या क्रांत्या वर्णव्यवस्थेच्या आभिमानी चालकांनी घडवून आणिल्या त्यांना बहुतकरून

क्रांति हें नांव मिळत नाही. ज्या वर्णव्यवस्थेच्या उच्छेदकांनी घडवून आणिल्या त्या एक तर यशस्वी झाल्या नाहीत, आणि जो त्यांचा भाग यशस्वी झाला तो इतर सामान्य विकासांत असा बेमालूम समरस झालेला आहे, की त्याला ही क्रांति हें नांव मिळत नाही; कारण त्याची क्रिया हळू व अदृश्य पद्धतीने घडलेली असते. म्हणून ती कोणाच्याही डोळ्यांवर येऊं शकत नाही. अर्थात् कृत्रिम इतिहास तर अशा विकासाला बोलून चालून डोळ्यांआडच राखणार. येरवी त्याला तरी कृत्रिम हें नांव कोण देऊं शकेल !

राजपूत, जाठ, गुरखे, मराठे, कुणबी, चित्पावन, नंबुद्री, नायडू, मुदलियार, नायर, पाळेगार (पळ्ळीकार), बेडर (व्याध), इ. कांही उपऱ्या जमाती, आणि येथे अगोदरपासूनच मिरासीचें ठाणें मांडून बसलेल्या कांही इतर जमाती, बराबाईट पराक्रम अथवा निदान अतिक्रम तरी करून आता हिंदुधर्माच्या पोलादी चौकटींत वरिष्ठ पदवी पटकावून आहेत. पण ह्या सर्वांच्या आधी येथे असलेले. जे एकदा पादाक्रांत झाले त्यांना मात्र पुनः पराक्रम करावयाला वाव मिळाला नाही, म्हणून ते आज ह्या चौकटीच्या बाहेर पण हद्दीवरच गुलामगिरींत दिवस कंठीत आहेत. आणि ज्या प्राचीन जमाती पराक्रम नाही तर नाही पण नुसता अतिक्रम करूनच रानावनांतून अद्यापि आपलीं पोटें जाळीत आहेत त्यांची गणना " गुन्हेगारी जाती " ह्या सदरांत होत आहे. असो, कसें कां होईना; अनादि किंवा सनातन हिंदु संस्कृतीचा हा गांवगाडा ह्या खंडवजा अवजड देशांत, आरबस्थानांत ७ व्या ८ व्या शतकांत इस्लामी धर्माचा उद्रेक होईपर्यंत, कसाबसा रखडत चालला होता. एकाएकीं ह्या इस्लामी परचक्राच्या टोळधाडी ह्या गाड्यावर येऊन आदळूं लागल्यापासून ह्या देशाला आधुनिक युग प्राप्त झालें. ह्या युगांत तरी अस्पृश्यता नष्ट झाली असें, मुळीच नव्हे. जिचें निवारण बौद्धाच्या मवाळ औदार्याने झालें नाही तें मुसलमानांच्या कठोर अत्याचाराने थोडेंच होणार आहे. तलवारीच्या जोरावर मुसलमानांनी आपला धर्म व संस्कृति हिंदूंमध्यें पसरली असाही बोलवा आहे. तो खरा असो खोटा असो. येथील मानीव अस्पृश्यांमध्यें जें इस्लामी जुलमामुळें धर्मांतर झालें त्याचें प्रमाण उत्तर हिंदुस्थानांत पंजाब, संयुक्तप्रांत, बंगाल वगैरे प्रांतांत ज्या मानाने पडतें त्या

मानाने नर्मदेच्या दक्षिणेस मुळीच पडत नाहीं हें खरें. ह्याचीं कारणें तीन. एक, उत्तर हिंदुस्थानांत, विशेषतः बंगाल्यांत व बहारांत बौद्ध धर्मसंप्रदाय फार दिवस जीव धरून होता. त्याला शेवटची गचांडी ह्या मुसलमानांच्या स्वाऱ्यांनी दिली. ह्या धामधुमींत जे बौद्धसमाज मुसलमानी संप्रदायांत शिरले ते वाचले. ज्यांनी मागे बौद्धच राहण्याचा आग्रह धरिला ते नवे अस्पृश्य कसे बनले, तें वर पांचव्या प्रकरणांत सविस्तर सांगण्यांत आलें आहे. दुसरें कारण असें, की उत्तरेपेक्षा दक्षिणेकडील अस्पृश्यता अधिक दृढमूल आणि उग्र स्वरूपाची होती. म्हणून तिला बळी पडलेल्या हीन जातींकडे इस्लामची नजर गेली नाही किंवा तिच्या संख्याबलाची मातबरी मुसलमानांनाही फारशी वाटली नाही. तिसरें कारण असें की उत्तरेइतका जोम व करारीपणा स्वतः मुसलमानांतच दक्षिणेकडे आल्यावर राहिला नाही; म्हणून इकडे आलेल्या मुसलमानांना स्वतः हिंदूंच्या पोलादी चौकटीशींच तारतम्याने आणि गोडीगुलाबीने वागावें लागलें हें इकडील बहामनी राज्यांतील बादशाहांच्या नरमपणावरूनच उघड होतें. कांही असो, मुसलमानांच्या हादळ आपट अमलाखाली येथील अस्पृश्यांनी मुसलमानी धर्माचा आश्रय घेतल्यामुळें जी त्यांची संख्या कमी झाली असेल, त्याहूनही ह्या निराश्रित व बेबंदशाही धामधुमींत घडलेल्या धर्मक्रांतीमुळें व नवीन हिंदुधर्मांच्या जुलुमामुळें नवीन अस्पृश्यांच्या भल्या मोठ्या संख्येचीच अधिक भर पडली हेंच खरें आहे. जे मुसलमान झाले, ते राजमान्य झाल्यामुळें प्रतिष्ठित स्पृश्य झाले. त्यांचें जें राजकारण झालें असेल त्याचा अस्पृश्याच्या राजकारणाशीं (जो आमच्या प्रस्तुत विषय आहे) अर्थाअर्थीं मुळीच संबंध नाही. आणि मागे जे अस्पृश्यच उरले, ते जितांचे जित ह्या नात्याने दुहेरी गुलामगिरींत रुतून पडले. मग अशांचें राजकारण तें काय असणार ! जेथे ह्यांच्यावर आजपर्यंत जय गाजविणारांचीं तोंडें खालीं झालीं, तेथे ह्या गरीबांनी तोंडें कशीं वर करावी ? अकबरासारख्या प्रथम प्रथम जम बसविणाऱ्या बादशहांनी आपलें बूड जड करण्यासाठी हिंदूंना कितीही लष्करी व मुलकी कामगिऱ्या दिल्या असल्या तरी त्यांनी, अशा ह्या दुहेरी गुलामांपैकी ज्यांनी आपला हिंदूपणा उर्फ अस्पृश्यता कायम राखिली अशांना आचारी, पाणके आणि हलालखोर ह्यापलीकडे फारसें जवळ केलेलें दिसत नाही. ह्यापलीकडे फाजील दया

दाखविणें व्यवहाराला जरूर नव्हतें; आणि जरी कोठे अशीं अपवादक व व्यक्तिविषयक उदाहरणें घडलीं असलीं, तरी बेगुमान बखरकारांना अशा अपवादक उदाहरणांची तमा थोडीच वाटणार आहे? अशा अनेक कारणांमुळें मुसलमानांची कारकीर्दही आमच्या या प्रस्तुत विषयाच्या दृष्टीने अगदी सुनीसुनी भासत आहे, हें खरें!

अस्पृश्यांच्या राजकारणाचा माग काढीत काढीत आम्ही येथवर मुसलमानी अंमलाच्या अखेरीस आलों. तरी हें राजकारण मृगजलाप्रमाणें आमच्या डोळ्यांपुढे लांबच दिसत आहे, पण हाताशीं प्रत्यक्ष लागत नाही. ह्या वेळीं देशांत आणखी एक राज्यक्रांति घडली. तिला आम्ही आमचे मनाच्या समाधानासाठी क्षणभर स्वराज्य म्हणूं या. हें स्वराज्य जरी शिराळशेटी थाटाचें औट घटकेचें ठरलें, तरी तें शिराळशेटाप्रमाणें केवळ काल्पनिक नसून खरेंखुरें व बऱ्याच दृष्टीने अभिमानास्पदही होतें. ह्या परत मिळालेल्या स्वराज्यांत तरी अस्पृश्यांची आर्थिक व राजकीय स्थिति कशी होती तें आता पाहूं या.

ज्याला आम्ही वर स्वराज्य म्हटलें त्याचें एक मुख्य लक्षण, महाराष्ट्रांत देशी उर्फ मराठी वाङ्मयाचा उदय, हें होय. ह्या वाङ्मयांत मानभावांचे व पंढरपूर संप्रदायाचे नुसते धर्मग्रंथच नसून ऐतिहासिक बखरी, सनदा, महजर, टिपणें वगैरे अमूल्य महाराष्ट्राच्या इतिहासाचीं साधनें आहेत. ह्या मराठी वाङ्मयाचें महत्त्व संस्कृत पौराणिक वाङ्मयाहून भिन्न व अधिक भरीव अर्थाचें आहे. हें इतिहासाला तारक व बोधक आहे, पुराणांप्रमाणें इतिहासाला भ्रामक किंवहुना मारक नाही. ह्यांतून मिळतील ते उतारे घेऊन आमच्या विषयाची संक्षेपाने सजावट करणें भाग आहे.

मनुस्मृति, पुराणें वगैरे धर्मशास्त्राच्या दृष्टीने पाहतां अस्पृश्य मानलेल्या जाती असून नसल्याप्रमाणेंच होत्या. पण खरा प्रकार असा नसून महाराष्ट्राच्या पुरातन ग्रामसंस्थेंत ह्या पुरातन जातींचें महत्त्व अद्याप जीव धरून होतें. त्यांतल्या त्यांत महार जात महाराष्ट्रांत मुख्य बलुतेदार म्हणूनच नव्हे तर वतनदार म्हणून नांदत होती; ह्यासंबंधीं जे पुरावे अद्यापि तुरळक आढळतात, ते फार महत्त्वाचे आहेत. ह्यासंबंधीं योग्य संशोधन झाल्यास मी म्हणतों त्याप्रमाणें महाराष्ट्राची

पहिली वसाहत महारामांगांची असून पुढे ती मराठ्यांनी बळकावलेली आहे, हें सिद्ध होण्याचा पुष्कळ संभव आहे. मूळ ज्यांनी गांव वसवावा त्यानेच त्या गांवाचा पाटील व्हावें आणि तत्कालीन जी कोणी मध्यवर्ती राज्यसत्ता असेल तिच्याशीं जुळतें घेऊन गांव राखावा. हिला राजवाड्यांनी 'गणराज' पद्धति म्हटलें आहे. ही पद्धति महाराष्ट्राची, मराठे येथे येण्यापूर्वी व आल्यावरही चालत असली पाहिजे. मराठे येण्यापूर्वी जे गांवाचे वतनदार पाटील होते ते मराठ्यांपुढे हार खाऊन त्याचे अव्वल बलुतेदार आश्रित होऊन राहिले. येरवीं आजही गांवाला अगदी लागून असलेल्या अस्सल प्रतीच्या जमिनी महारकी वतनाच्या काय म्हणून असाव्यात ? ह्याचें एकच कारण की गांवचे आणि राष्ट्राचे नवीन मालक जरी हे अधिक सुधारलेल्या शिस्तीचे मराठे झाले तरी त्यांनी देशाचे लष्करी संरक्षणाचा अधिकार मात्र आपल्याकडे ठेवून, उरलेले स्थानिक संरक्षणाचे उर्फ पोलिस अधिकार ह्या मूळ मालक लढाऊ जातीकडेच राखिले असावे. म्हणून महार जागला हा नुसता मुलकी बलुतेदार नसून राजकारणी पोलीस–कोतवाली हक्काचा ग्रामाधिकारी–मराठ्याहून पुरातन असावा असें दिसतें. इतकेंच नव्हे तर बऱ्याच गांवच्या पाटीलक्या ह्या महारांच्या होत्या. त्या इतरांनी कालवशात् कशा बळकावल्या ह्याचें एक उदाहरण खाली दिलें आहे. ह्याचप्रमाणें हवेली तालुक्यांतील देहू गावची पाटीलकी व भीमथडी तालुक्यांतील बाबुर्डी गांवची पाटीलकी मूळ महारांची आहे असें. कांही महारांचें म्हणणें माझ्या कानीं आलें आहे. अशा वतनाचा वाद माजला असतां, अव्वल मराठेशाहींत कोणतें तरी दिव्य करून आपला हक्क दिवाणांत शाबीत करावयाचा रिवाज असे. खालील उताऱ्यावरून ' धार दिव्य ' म्हणजे लढाईत तलवार गाजविण्याचें दिव्य करून ताब्यांतून गेलेल्या पाटीलकीचे हक्क महारांनी पुनः मिळविले अशी साक्ष पटते.

नागेवाडीचा महार पाटील व किले वैराटगड

भारत–इतिहास–मंडळाचें सप्तम–संमेलन–वृत्त, पान ५४, वर संशोधक शंकर ना. जोशी वाईकर ह्यांनी पुढील महत्त्वाच्या एका महजराचा शोध लावल्यासंबंधाचें स्पष्टीकरण प्रसिद्ध झालें आहे.

एका महार वीराचें धारदिव्य

" छत्रपति संभाजीनंतर मराठेशाहींत अव्यवस्था होऊन ती मोडकळीस आली असतां महाराष्ट्रांतील ब्राह्मण, मराठे, प्रभु वगैरे सर्व जातींनी स्वराज्यप्रेमाने एकदिलाने व मुत्सद्देगिरीने नेटाचे प्रयत्न करून अनेक संग्राम करून, मराठेशाहीस सावरून धरिलें व तींस बळकटी आणिली. त्या कामीं मराठे, ब्राह्मण, प्रभु ह्याप्रमाणेंच स्वराज्यप्रेमी महारांनीही संग्राम, पराक्रम केले.....

" मौजे नागेवाडी प्रांत वाई येथील कदीम पाटीलकी मूळची महाराची. छत्रपती राजारामाचे वेळीं महजूर सेटी बिन नागनाक महार हा पाटील होता. त्याने नागेवाडी येथील नागवड सिद्ध ह्या देवाची पूजा करून राहण्याकरितां घांडेघर व गौडाली येथील मोरोजी व चिंतामणी हे दोन गुरव आणिले. हे दोन गुरव येऊन राहिल्यानंतर त्यांनी पाटलाशीं ' मारेचुरे ' करून त्याची पाटीलकी बळकावली. तेव्हा सदर पाटलाने गुरवाविरुद्ध परशरामपंत प्रतिनिधीकडे फिर्याद केली. प्रतिनिधींनी गुरवास बोलावलें, पण ते आले नाहीत. तेव्हा प्रतिनिधींनी सिवधडे ह्यास (म्हणजे नागेवाडी जवळील गावचे मुकदमास) विचारलें. त्यांनी पाटीलकीचें वतन महाराचेंच, गुरवांनी देव पूजून असावें; पाटलकीस त्यांचा अर्थाअर्थी संबंध नाही असा महार पाटलाचे बाजूचा निकाल दिला. उभयतां गुरवांनी पुनः छत्रपतीकडे फिर्याद नेली. त्यावेळीं छत्रपति रांगण्यास होते. तेव्हा ही पाटीलकीची फिर्याद पुनः आलेली पाहून राजारामांनी महारास धार दिव्य करण्यास सांगितलें. म्हणजे मोंगलांनी घेतलेला वैराटगड (हा वाईजवळ आहे) स्वराज्यास जोडन द्यावा व पाटीलकीचें वतन अनुभवावें असा निकाल दिला. त्या वेळीं मोगलांनी एकएक किल्ला घेऊन पुढे जावें व मागून मराठ्यांनी ते ते किल्ले स्वराज्यास जोडावे असें चालू होतें. अशांतच वैराटगड हा नागेवाडीच्या महारांनी मोंगलाशीं लढून घेतला व पाटीलकीचें वतन मिळविलें. ह्या पाटीलकीच्या वतनाबद्दल नागेवाडीच्या गुरवांमहारांमध्यें तीन वेळां फिर्यादी झाल्या. तीनही वेळां महाराचेंच वतन ठरलें. शेवटची फिर्याद शके १६७४ मार्गशीर्ष शु. ४ इ. स. १७५३ दिजंबर, ता. ९ रोजीं होऊन अखेर निकाल झाला."

हा झाला नुसता मुलकी पाटीलकीचा हक्क. मेटे-नाइकी म्हणून एक केवळ लष्करी हक्क आहे. प्रत्येक डोंगरी किल्ल्याच्या शिबंदी संरक्षणासाठी किल्ल्याच्या उतरणीवर ठिकठिकाणीं जेथे थोडी सपाटी असेल तेथे कायम वस्ती करण्यांत येत असे. त्याला मेट्ट = मेटें अशी संज्ञा असे. हा मूळ शब्द कानडी आहे. हे मेट्टकर बहुधा महारच असत. उदाहरण.—

मेटे नाइकी

भा. इ. सं. मंडळ पुरस्कृत शिवचरित्रसाहित्य खंड ३ रा पान १९७ वर लेखांक ६०९ ह्या बाबतींत महत्त्वाचा असा आहे:—

शके १६६८; इ. स. १७४६.

" करीना (हकीकत) खंडनाक वलद रामनाक महार मौजे करांजिये त. भोर ता. रोहीडखोर लेहोन दिल्हा ऐसाजे. इदिलशहा निजामशहाचे कारकिर्दीस किल्ले रोहिडा येथे आपले बापाचा चुलता काळनाक महार मौजे मजकूर व येसनाक महार सोंडकर ह्या दोघांच्या नाइक्या होत्या. ते समयीं वतनदारीचे चाकरीस कमळनाक महार मौजे नाटंबी ता. मजकूर व वाडी व धावडी ता. उतरोली हे दोघेजण दुतर्फाचे (किल्ल्याच्या दोन्ही बाजूंच्या उतरणीवर) महार होते. निमे निमे प्रमाणें उत्पन्न घेऊन चाकरी करून होते. त्या दोघांनी बदमामली (कांही गैरवर्तणूक) केली म्हणून अजम सेखजी किल्लेदार किल्ले रोहिडा यांणी दोघाचीं डोचकीं मारावीसीं केलीं व मुलें बाळें ढाणकासी (ढाण्या वाघास खाण्यास रानांत सोडणें !) द्यावींसीं केलीं. ते सोंडकरानें रदबदली करून कमळनाक महार मौजे नाटंबी यासी आपले हातीं घेऊन खंड कबूल केला. वाडी धावडीचा महार अटकेंत ठेविला...त्यावरी किल्ला महाराज राजश्री थोरले स्वामीस (श्री शिवाजीस) हस्तगत झाला. मोगलाई बुडाली. तेव्हां काळनाकाची नाइकी व सोंडकर महाराची नाइकी करार केली आणि वाडीचा महार अटकेंत होता त्यास खंडाचा पैका न मिळे, याकरितां त्यास सर्जा बुरुजाच्या (रायगड) खाली पायांत घालावयाचा हुकूम महाराजांनीं केला. त्यावरून...घातला. त्यावरी काळनाक व सोंडकर महार मयत झाला. पोरांडा झाला. त्यावरी रामनाक आपला बाप गावावरी आला त्याणें रायगडास जाऊन महा-

राज राजश्री कैलासवासी पूर्वीचा दाखला मनास आणून पूर्ववतप्रमाणें सनद दिली. ते किल्ल्यास आणिली; मेटे (ठाणीं उतरणीवरचीं) वसविलीं. नाइकी वतनदारी चालवूं लागला. पुरातन घरठाणा बांधला, टाके पाणी खावयासी एक दिल्हे...त्याचा लेक आपण. भोजनाक राजाणी वस्ती वाडी ता. उत्रोली त्याची लेकी लग्नाची केली. ते लहान म्हणोन त्याचे घरीं येके ठायीं राहिलों. वतनदारीची चाकरी व किल्ल्याची नाइकी करीत होतों.....आपण वेगळा निघालों तेव्हां भोजनाक कजिया करूं लागला. दसरीयाचे शांतीच्या टोणग्याचे सीर आपले वडील व आपण घेत. भोजनाकाने कजीयाखाले सीर नेत होता. त्यास आपण दोही दिली. त्यातागाईत दरवाजानजीक श्री. जननीजवळ टोणगीयाचे सीर पुरूं लागला."

रा. जोशी ह्यांनी वर दिलेल्या स्पष्टीकरणापुढे आपल्याला सापडलेला मूळ अस्सल महजर जोडला आहे. त्यांत सरकारी दिवाणांतून व गांवचे गोताकडूनही मंजूरी वेळोवेळीं कशी मिळत गेली ह्याविषयीं स्पष्ट उल्लेख आहेत.

हे गोत म्हणजे केवळ वादी प्रतिवादीचे वारसदार नातेवाईकच नव्हत. तर ज्या व्यक्तींच्या अथवा गांवांच्या हद्दीबद्दल अगर इतर हक्कांबद्दल तंटा माजुन दिवाण उर्फ पंचायत भरविण्यांत येई तिच्यांत भाग घेण्यास त्या त्या गांवांच्या सर्व लहान थोर जातींचीं वडील माणसें जमविण्यांत येत असत, त्या सभेस 'गोत' अशी संज्ञा असे. व अशा गोतांत महारही प्रामुख्याने असत. ह्याला उदाहरण खालील गोत दिलें आहे. त्यांत प्रत्यक्ष छत्रपती मातोश्री जिजाबाईचे शेजारीं बापनाक भिकनाक महार आढळतो.

गोतांत महाराचा समावेश

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १६ कानदखोरे मरळ देशमुख प्रकरणीं पान ३७ वर लेखांक २२ असा आहे.

"महजरनामा सके १५८८ पराभव नाव सवछरे माघ सुध दसमी वार गुरुवार तदिनी हाजीर मजालसी गोत व मातुश्री आवाजी (जिजाबाई श्रीशिवाजीची आई) स्थल मुक्काम सों. धानीब ता. कानदखोरे." ह्या गोतांत हाजर असलेल्यांच्या नांवांत प्रथम जिजाबाईचे नांव आल्यावर मग पुढे वेदमूर्ति ब्राह्मण, मराठे, तेली, न्हावी, गुरव,परीट वगैरे अनेक जातींचीं नांवें झाल्यावर शेवटीं बापनाक व भिकनाक माहार वृत्तिकार

हा झाला नुसता मुलकी पाटीलकीचा हक्क. मेटे-नाइकी म्हणून एक केवळ लष्करी हक्क आहे. प्रत्येक डोंगरी किल्ल्याच्या शिबंदी संरक्षणासाठी किल्ल्याच्या उतरणीवर ठिकठिकाणीं जेथे थोडी सपाटी असेल तेथे कायम वस्ती करण्यांत येत असे. त्याला मेट्ट = मेटें अशी संज्ञा असे. हा मूळ शब्द कानडी आहे. हे मेट्टकर बहुधा महारच असत. उदाहरण.—

मेटे नाइकी

भा. इ. सं. मंडळ पुरस्कृत शिवचरित्रसाहित्य खंड ३ रा पान १९७ वर लेखांक ६०९ ह्या बाबतींत महत्त्वाचा असा आहे:—

शके १६६८; इ. स. १७४६.

" करीना (हकीकत) खंडनाक वलद रामनाक महार मौजे करांजिये त. भोर ता. रोहीडखोर लेहोन दिल्हा ऐसाजे. इदिलशहा निजामशहाचे कारकिर्दीस किल्ले रोहिडा येथे आपले बापाचा चुलता काळनाक महार मौजे मजकूर व येसनाक महार सोंडकर ह्या दोघांच्या नाइक्या होत्या. ते समयीं वतनदारीचे चाकरीस कमळनाक महार मौजे नाटंबी ता. मजकूर व वाडी व धावडी ता. उतरोली हे दोघेजण दुतर्फाचे (किल्ल्याच्या दोन्ही बाजूंच्या उतरणीवर) महार होते. निमे निमे प्रमाणें उत्पन्न घेऊन चाकरी करून होते. त्या दोघांनी बदमामली (कांही गैरवर्तणूक) केली म्हणून अजम सेखजी किल्लेदार किल्ले रोहिडा यांणी दोघाचीं डोचकीं मारावीसीं केलीं व मुलें बाळें ढाणकासी (ढाण्या वाघास खाण्यास रानांत सोडणें !) द्यावींसीं केलीं. ते सोंडकरानें रदबदली करून कमळनाक महार मौजे नाटंबी यासी आपले हातीं घेऊन खंड कबूल केला. वाडी धावडीचा महार अटकेंत ठेविला...त्यावरी किल्ला महाराज राजश्री थोरले स्वामीस (श्री शिवाजीस) हस्तगत झाला. मोगलाई बुडाली. तेव्हां काळनाकाची नाइकी व सोंडकर महाराची नाइकी करार केली आणि वाडीचा महार अटकेंत होता त्यास खंडाचा पैका न मिळे, याकरितां त्यास सर्जा बुरुजाच्या (रायगड) खाली पायांत घालावयाचा हुकूम महाराजांनीं केला. त्यावरून...घातला. त्यावरी काळनाक व सोंडकर महार मयत झाला. पोरांडा झाला. त्यावरी रामनाक आपला बाप गावावरी आला त्याणें रायगडास जाऊन महा-

राज राजश्री कैलासवासी पूर्वीचा दाखला मनास आणून पूर्ववतप्रमाणें सनद दिली. ते किल्ल्यास आणिली; मेटे (ठार्णी उतरणीवरचीं) वसविलीं. नाइकी वतनदारी चालवूं लागला. पुरातन घरठाणा बांधला, टांके पाणी खावयासी एक दिल्हे...त्याचा लेक आपण. भोजनाक राजाणी वस्ती वाडी ता. उत्रोली त्याची लेकी लग्नाची केली. ते लहान म्हणोन त्याचे घरीं येके ठायीं राहिलीं. वतनदारीची चाकरी व किल्ल्याची नाइकी करीत होतों.....आपण वेगळा निघालों तेव्हां भोजनाक कजिया करूं लागला. दसरीयाचे शांतीच्या टोणग्याचे सीर आपले वडील व आपण घेत. भोजनाकाने कजीयाखाले सीर नेत होता. त्यास आपण दोही दिली. त्यातागाईत दरवाजानजीक श्री. जननीजवळ टोणगीयाचे सीर पुरूं लागला."

रा. जोशी ह्यांनी वर दिलेल्या स्पष्टीकरणापुढे आपल्याला सापडलेला मूळ अस्सल महजर जोडला आहे. त्यांत सरकारी दिवाणांतून व गांवचे गोताकडूनही मंजूरी वेळोवेळीं कशी मिळत गेली ह्याविषयीं स्पष्ट उल्लेख आहेत.

हे गोत म्हणजे केवळ वादी प्रतिवादीचे वारसदार नातेवाईकच नव्हत. तर ज्या व्यक्तींच्या अथवा गांवांच्या हद्दीबद्दल अगर इतर हक्काबद्दल तंटा माजून दिवाण उर्फ पंचायत भरविण्यांत येई तिच्यांत भाग घेण्यास त्या त्या गांवांच्या सर्व लहान थोर जातींचीं वडील माणसें जमविण्यांत येत असत, त्या सभेस 'गोत' अशी संज्ञा असे. व अशा गोतांत महारही प्रामुख्याने बसत. ह्याला उदाहरण खालील गोत दिलें आहे. त्यांत प्रत्यक्ष छत्रपती मातोश्री जिजाबाईचे शेजारीं बापनाक भिकनाक महार आढळतो.

गोतांत महाराचा समावेश

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १६ कानदखोरे मरळ देशमुख प्रकरणीं पान ३७ वर लेखांक २२ असा आहे.

"महजरनामा सके १५८८ पराभव नाव सवछरे माघ सुध दसमी वार गुरुवार तदिनी हाजीर मजालसी गोत व मातुश्री आवाजी (जिजाबाई श्रीशिवाजीची आई) स्थल मुक्काम सों. धानीब ता. कानदखोरे." ह्या गोतांत हाजर असलेल्यांच्या नांवांत प्रथम जिजाबाईचे नांव आल्यावर मग पुढे वेदमूर्ति ब्राह्मण, मराठे, तेली, न्हावी, गुरव,परीट वगैरे अनेक जातींचीं नांवें झाल्यावर शेवटीं बापनाक व भिकनाक माहार वृत्तिकार

मौजे घानीव, आणि खंडनाक व भिकनाक, वरगण ता. मजकूर, ह्यांचाही स्पष्ट उल्लेख आहे. शेवटीं म्हटलें आहे कीं "सदरहू गोत बैसोन, बाबाजीराव झुंझाररात्र देशमुख तर्फ कानदखोरे ह्यांचे भाऊ मलोजी पतंगराव या हरदो जणामध्यें वृत्तीचा कथळा होत होता. त्याबद्दल सदरहु गोत बैसोन हरदो जणाचे वाटे केलें, व घरांतून वेगळे निघाले."

त्याच खंडांत लेखांत ५८ पान ६६ वर खालील निवाडा असा आहे. "बिदाणें इनाम राजश्री बावाजी बिन नारायणजी झुंझाररात्र मरळ देशमुख ता. कानदखोरे यांचे इनाम मौजे गेवंढे येथे आहे, त्याची बिदाणें (चिन्हें) श्रीचा अंगारा बादनाक व मातनाक बिन् धाकनाक व धारनाक बिन राधनाक माहार मौजे म॥ यांणीं सत्य स्मरोन सांगितलें. शके १७०३ प्लवनाम संवछरे वैशाख व॥ पंचमी शनवार सन इहिदे समानीन मया व अलफ."

अशा मामुली हक्काच्या वादांत जीं दिव्यें करून निकाल लावण्याची वहिवाट असे, त्यांत घार दिव्य, ऐरण दिव्य, रवा दिव्य असे प्रकार असत. आणि हीं दिव्यें करण्यास माहार हीच जात उत्तम प्रकारें पात्र ठरलेली असे. कारण ती पुरातन, विश्वासू आणि वादविषयक हक्काची मूळ मालकीण म्हणूनच होय. केव्हा केव्हा तर अशीं दिव्यें ही न करतां केवळ वतनदार महार मेहतराच्या तोंडी साक्षीवरूनही निवाडा होत असे, हें वरील लेखांक ५८ वरून स्पष्ट होतें.

ऐरण दिव्य

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १५, पान २९९ वर लेखांक २९०, शके १६३१ श्रावण वद्य १ चा, खालीलप्रमाणें आहे.

"सु॥ अशर मया अलफ कारणे झाले साक्षपत्र एसे जे मौजे माडरदेव प्र॥ वाई व मौजे अबडे व बललु व नेरे ता. उत्रोली या गांवांत सिवेचा गरगशा (तंटा) होता. म्हणौन खोपडे देशमुख व माडरे मोकदम हुजूर राजश्री पंतसचीव स्वामीजवळ जावून राजश्री सुभेदारास व समस्त गोतास आज्ञापत्रें घेऊन आले की सिवेवरी जाऊन सीव नजर गुजार करून हरहक निवाडा हुजूर लिहिणें.....त्यावरून रा. सुभेदार व समस्त गोत मौजे अबडे येथें येऊन, खोपडे व माडरे आणून खोपडिया पासून दिव्य घ्यावें. त्यास अनसोजी व वयाजी माडरे

याणी रद्दबदली करून दिव्य आपण करितों म्हणून मागोन घेऊन राजीनामा लिहोन दिला. त्यावरून श्रावण शुद्ध द्वादसी सणवारी **गोदनाक** बिन **भाननाक माहार** मौजे माडरदेव ह्याच्या हातास साबण लावून दोन्ही हात धुतले. **कृष्ण न्हावी** मौजे खेडी बु॥ प्र॥ सिरवळ ह्याजकडून नखे काढून हाताचीं निशाणें लिहिलीं. मग दोही हाती पिशव्या घालून लखाटा केला. कैदेंत राखिला. दुसरे दिवसी आदितवारीं..... सिवेवर जेथें माडरे जाऊन उभे राहिले तेथे रा. सुभेदार व समस्त गोत बैसोन क॥ **सिरवळचा** लोहार आणवून त्याजकडून ऐरण ताविली. महार उभा करून हातीच्या पिशव्या काढून सात मंडळें काढिली. पहिल्या मंडळांत उभा करून हातावरी सेवल घालून त्यावरी सात पाने पिंपळाचीं ठेवून त्यावरी लोणी घातलें. लोहारानें सांडसे ऐरण धरून महाराच्या हातावरी ठेविली. सात मंडळें चालून सिवेवरी वोल्या गवताचा भारा ठेवला होता, त्यावरी टाकली. डोंब जाला. महाराचे हाती पिसव्या घालून लखाटा केला. कैदेंत ठेविला. तीन रात्री होऊन चौथे दिवसीं बुधवारीं रा. सुभेदार व समस्त गोत बैसोन हातीच्या पिसव्या काढिल्या. हात पाहातां महार दिव्यास लागला. (म्हणजे हातास जखमा होऊन दिव्य अपयशी ठरलें.) उजव्या हातास आंगठ्यापाशी मधले रेघेवर फोड पावट्याप्रमाणें एक, व त्याच बोटास पुढे लहान फोड दोन जाले. डाव्या हातास मधल्या बोटापाशीं एक फोड व त्याचे सेजारी संधीस एक फोड आला. सदरहूप्रमाणें दिव्यास लागला. खोटा झाला. हें साक्ष पत्र सही छ १४ माहे जमादिलावर."

ह्या दिव्याने खोटा ठरला तो महार नव्हे, तर मूळ मराठा वादीच होय. बिचाऱ्या महाराचे हात मात्र हकनाक जळले. ह्या धोक्याला भिऊनच वादी प्रतिवादी स्वतः आपण दिव्य करण्यास धजत नसत. हें पुढील रवा दिव्यावरून दिसत आहे.

रवा दिव्य

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १८, लेखांक ४, पान ६ वर परगणे पुणें, कसबें सुपे, मौजे वढाणा येथे शेताचे शिवेबाबत तंटा पडून खून झाला. त्या बाबत महजर होऊन निवाडा झाला त्याची हकीकत आहे. हा काळ शहाजी महाराजाच्या अंमलाचा आहे. शके १५४०

मार्गशीर्ष व॥ १२ रोजीं शहाजीच्या सांगण्यावर हा दिवाणी महजर घडला आहे. ह्या निवाड्यांत "शके १४४६ तारण संवच्छरे मार्गेश्वर वद्य रवौ तादिनी दसकत कान्हो लुखो, पेधो लुखो, मलो कोडों माहार विर्तिकार मौजे वढाणे आत्मसुखें पेधो मालोस व पेधाई मालीस लेहोन दिधले ते से जे मौजे चिचोली मजरा सुपाचा तेथील सिवेची सेतें वढाणे याखाली पडली होती. तें दिव करून साधली तें लेकुराचें लेकुरी औलादी अफलादीनसी खाइजे ए बाबे मी उभा राहे माझीए बंसीचा उभा राहे...."वगैरे मागील पुराव्याचा कागद पुढे आणला होता. पण हा कागद मंजूर केला गेला नाही. कारण " जे वक्ती दिव होते ते वक्ती हरदो माहालीचे कारकून व देशमूख व देशक व जबार व कोने कुए मेळवून दिवाण होते तेथे महजर त्यांचीं नांवें निशाणे करून महजर करताती. ए कागदी तैसा अमल नाही. यासी तो कागद रुजू न पडे...." नंतर ह्या खटल्यांत महाराने ऐरण दिव्य करावें, असें सुचविण्यांत आलें. पण तेंही साधेना म्हणून शेवटीं खुनापर्यंत पाळी आली. तेव्हा रवा दिव्य करावयाचें ठरलें. म्हणजे "तेल ८८५ व तूप ८८५ ऐसे तपेलियांत घालून तावून दोघा मोकदमाचे (वादी प्रतिवादीचे) हात एकवट बांधोन घालावें...." पण शेवटीं गोताने दोघा मोकदमांची समजूत घालून प्रकरण आपसांत मिटवलें. रवा दिव्य करण्याचें धाडस कोणी केलें नाही. बिचाऱ्या महारांची दगदग वाचली.

नुसती पाटीलकी अगर मेटे नाइकीच नव्हे तर अस्सल सरदारीचेंही उदाहरण, जें पेशवाईअखेर भडकलेल्या सोवळ्याच्या दिव्यांतूनही टिकून उरलें तें तर हृदयंगम आहे. तें असें:—

शिदनाक महार

भारतवर्ष मासिक पुस्तकांतून जुन्या ऐतिहासिक गोष्टी ह्या मथळ्याखाली कृष्णाजी विष्णू आचार्य कालगावकर, शाळामास्तर कासेगांव, ह्यांनी लिहिलेल्या व प्रसिद्ध कै० पारसनीस ह्यांनी इ. स. १९०० मध्यें छापलेल्या हकीकती पुणें येथील इतिहास मंडळाचे संग्रहीं आहेत. त्यांत ३२ वी गोष्ट शिदनाक महाराची खालीलप्रमाणें फार मनोरंजक आढळते.

" सातारा जिल्ह्यांत तासगांव तालुक्यांत कळंबी म्हणून एक गांव आहे, तेथचा हा वतनदार महार. औरंगजेबाचे हातून संभाजी मारला

गेल्यावर पुढें जी महाराष्ट्रांत बंडाळी माजली, ती पंचवीस तीस वर्षें जास्त कमी चालूंच होती. त्या वेळीं शिदनाकानें महार लोकांचें एक पथक उभारून धामधूम केली. पुढें त्याचा मराठे लोकांस पुष्कळ उपयोग झाला. शाहुराजा मोंगलांचे कैदेंतून सुटून ताराबाईपासून आपलें राज्य मिळविण्याकरितां आला, तेव्हां जे लहान मोठे सरदार त्यास मिळाले त्यांत हा शिदनाकही मिळाला. शाहूस राज्यप्राप्ति झाल्यावर ज्यांनी त्यास मदत केली, त्या सर्वांस त्याने त्यांच्या योग्यतेप्रमाणें देणग्या दिल्या. त्या वेळीं शिदनाक ह्यास कळंबी गांव इनाम दिला. तो अद्यापि त्याच्या वंशजाकडे चालत आहे.

" ह्या शिदनाकाचा नातू त्याच्याच नांवाचा होता, तो खर्ड्याच्या लढाईंत होता. खर्ड्याच्या मैदानावर जेव्हां मराठ्यांच्या फौजेचा तळ पडला तेव्हां सरदार आपापल्या लोकांसह मिसली (मानाचा हक्क) प्रमाणें उतरले. शिदनाकाच्या गोटाच्या आसपास दुसऱ्या ब्राह्मण व मराठा सरदारांचे गोट होते. पेशवाईंत सोंवळ्या ओंवळ्याचा विचार बराच फाजील वाढत चालला होता, त्यामुळें कित्येकांनीं सवाई माधवराव कचेरीच्या डेऱ्यांत बसले असतां, विनंती केली कीं, महाराचा गोट मध्येंच आहे तो बाजूस काढावा. पेशव्यांनीं विनंती ऐकून आपल्या बाजूस बसलेल्या हिरोजी पाटणकर नांवाच्या वयोवृद्ध सरदाराकडें पाहिलें. तेव्हां तो मराठा सरदार बोलला कीं ही कांहीं जेवणाची पंगत नव्हे, म्हणून मध्येंच महाराचा गोट असल्यास हरकत नाहीं. ही तरवार धरणाऱ्या शूरांची पंगत आहे. येथे जातीचा विचार नाही. 'ज्याची तरवार खंबीर तो हंबीर' पाटणकराचें बोलणें ऐकून पेशव्यांनीं मान डोलविली.

" पुढें लढाईचे दिवशीं सरदार लोक पेशव्यांस मुजरे करून लढाईस चालले. तेव्हां शिदनाकही मुजऱ्यास आला. मुजरा करून हात जोडून पेशव्यांस म्हणाला, " महाराज ! मी शिदनाक महार आहें. मी महार म्हणून कांहीं लोक माझा तिरस्कार करीत आहेत. आज आपल्या पायाचा दास कामगिरी कशी करितो ती पाहावी. असें म्हणून निघून गेला. पुढे लढाई चालूं झाली. परशुरामभाऊवर पठाणांनीं मोठी गर्दी करून भाऊस घोड्यावरून खालीं आणिलें. त्या वेळीं मराठे व पठाण ह्यांची जी चकमक झाली तींत शिदनाकाने अप्रतिम शौर्य

दाखविलें. त्याची पटवर्धन मंडळीने मोठी तारीफ केली. पेशवाई बुडाल्यावरही हा शिदनाक बरींच वर्षें होता. चिंतामणराव अप्पा सांगलीकर दुखण्यानें फार आजारी असतां, त्यांच्या भेटीस हा गेला होता. तेव्हां त्यांनीं मोठ्या सभारंभानें ह्याची मुलाखत घेतली. आणि आपल्या पदरच्या मंडळीस त्याची माहिती करून दिली. "

महारांचे बावन हक्क

महारांच्या मुलकी हक्कांत त्यांचे विशेष गाजलेले 'बावन हक्क' हें एक विशेष प्रकरण आहे. त्याच्या दोन सनदा महत्त्वाच्या आहेत. पैकी एक बेदरचा बहामनी बादशहा दुसरा महमदशहा (१४६३–१४८२) याच्या काळापासूनची आहे. तिच्या नकलेची नकल म्हणून एक प्रत संशोधक राजवाड्यांनी प्रसिद्ध केली, तिचा आशय पुढे दिला आहे. दुसरी सनद ह्याच तोडीची मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड विसावा, ले. १७४, पान २२४ वर प्रसिद्ध झाली आहे. हिच्यांत महाराचे बरोबर ५२ हक्क लहानसान मिळून दिले आहेत. ही निझामशाहींतली शके १५६७ राक्षस नाम संवच्छरे (इ. स. १६१५) मधली आहे. ह्या दोन्ही सनदांतील हक्कांच्या तपशीलाचा मेळ बसत नाही. पण पहिली अधिक जुनी, तपशीलवार, अधिक हक्कांची आणि महत्त्वाची आहे. दुसरा महमदशहा बाहमनीच्या कारकीर्दीत इ. स. १४७५ सालीं दक्षिणेंत भयंकर दुष्काळ पडला होता. त्या वेळीं मंगळवेढ्यास दामाजीपंत नांवाचा सात्त्विक ब्राह्मण कमावीसदार होता. त्याने दुष्काळांत सरकारी धान्य दुष्काळपीडितांस वाटलें, ही आख्यायिका प्रसिद्ध आहे. त्या प्रकरणांत मंगळवेढ्यांत एक विठू महार होता त्याने दामाजीपंताचें सरकारी देणें आपलें स्वत:चें पुरून ठेवलेलें धन देऊन भागविलें, आणि वरील सनद स्वत: दामाजीपंताच्या हातून लिहिलेली बादशहाकडून मिळविली असें राजवाड्यांचें म्हणणें खाली दिलें आहे. पण सनदेंत अंबरनाक असें महाराचें नांव आहे. अमृतनाक महारास ही मूळ सनद मिळाली असें कित्येक महारांचें म्हणणें मी ऐकलें आहे. ह्या सनदेची नक्कल हस्तलिखित मी माझ्या कांही महार मित्रांकडेही पाहिली आहे. ह्या सनदेंतील हक्कांचें विशेष स्वरूप खाली दिल्याप्रमाणें दिसतें.

हाडकी हाडोळी वगैरे केवळ ग्रामसंस्थेंतील निकृष्ट हक्कच ह्यांत नमूद नसून, ब्राह्मण मराठ्यांपासून तों चांभार, मांग आणि फासेपारधी अशांच्याही लग्नावर महारांचा कर दर लग्नास २। रु. स्पष्ट नमूद आहे. लग्नांत मराठे ब्राह्मणांचा वर घोड्यावर, महारांचा बैलावर (कर्नाटकांत विशेष) व मांग व इतर कनिष्ठांचा हेल्यावर बसवून वरात काढण्याची वहिवाट असे. ह्या सनदेंत कोणत्या जातीचा वर घोड्यावरून, कोणाचा बैलावरून, कोणाचा रेड्यावरून निघावा ह्याचा तपशील स्पष्ट केला आहे. त्यांत महारांनी घोड्यावरचा हक्क संपादन करण्याचें कारण अंबरनाकाने बादशहाची बेगम विश्वासूपणाने संभाळली असें दिलें आहे. ह्याशिवाय जकातीचे हक्क; बाहेरून येणाऱ्या पुष्कळ मालावर दर गाडीमागें किंवा पशूमागे किती कर घ्यावयाचा तो स्पष्ट उल्लेखिला आहे. हे हक्क केवळ बलुत्याचे नसून प्रत्यक्ष राजसत्तेने उपभोगावयाचे असतात. ते महारांस कसे मिळाले? हे केवळ बाहमनी बादशहाने नवीन दिल्याने मिळण्यासारखे नसून, पुरातन चालत आलेले, मध्यंतरीं मागे पडलेले व पुनः उजळलेले दिसतात. अशी महत्वाची सनद मुंगी पैठण (महाराष्ट्राची अति प्राचीन राजधानी) येथे ब्रह्मवृंदाची व इतर हक्कदारांची सभा होऊन देवळांत मंजूर झालेली आहे. हे हक्क ब्राह्मण मराठ्यांकडूनच उगवून घ्यावयाचे नसून,तेली, तांबोळी, कोष्टी, न्हावी, परीट, चांभार, मांग, जीनगर इ. वरील खालील तमाम जातींकडून महारांनी आपली कामें काय काय करून घ्यावयाचीं हेंही तेथे सांगितलें आहे. लग्नटक्का २। व पाय तांदूळ वगैरे हक्क आता जे ब्राह्मण घेत आहेत, ते महारांना मिळावयाचे असें स्पष्ट नमूद आहे. ह्यांत मांग वगैरे हतर अस्पृश्यांचा संबंध नाही अशीही सोडवणूक केली आहे. ह्यावरून पूर्वी मांगांचेही असेच मालकी हक्क असावेत अशी शंका येते. कारण कांही प्रांतांत मांगांचीं लहान सान राज्यें होतीं असें मागें आठव्या प्रकरणांत सांगितलें आहे. (पान १२६ पहा) जकातीचे हक्क हल्ली आंग्लाईत मध्यवर्ती बादशाही आहेत. पण मध्ययुगांत हे रस्ते राखण्याचें काम जंगलांत व डोंगरांत राहणाऱ्या ह्या विश्वासू व काटक जातीनेच केल्यामुळें हा जकातीचा हक्क त्यांच्याकडेच उरला असल्यास नवल कोणतें? आणि प्रत्येक गांवशिवाराची अतिशय उत्पन्नाची जमीन महारांच्या मिराशीची असल्याचें तरी काय

नवल १ अशा महत्त्वाच्या सनदेची पहिली उजळणी झाली तेव्हा "एणे प्रमाणें सनद पैठणचे मुक्कामीं एकनाथस्वामीचे रावळांत जाहली हें तुम्हास कळावें. पांढरीस कळावें. आठरा लख सोमवंशास कळावें." अशी दखलगिरी आभिमानाने करणें साहजिक आहे.

भारत इतिहास संशोधक मंडळाचें चतुर्थ–संमेलन–वृत्त, पान ५२ वर प्रसिद्ध संशोधक वि. का. राजवाडे ह्यांचा खालील आशयाचा कागद प्रसिद्ध झाला आहे.

दामाजीपंत व विठ्या महार

१ " सातारकर महाराजांच्या दप्तरांत नकलेची नकल केलेला एक महजर सापडला. त्यांत शहरांत व खेड्यांत महारांना कोणकोणते हक्क पूर्वापार आहेत यांची याद दिली आहे. मूळ महजर बेदरची पादशाहत असतांना झाला. तदनंतर एकनाथ स्वामीच्या मृत्यूनंतर पैटणास एकनाथाच्या देवालयांत पुनः मूळ महजराची उजळणी झाली. ही उजळणी हिजरी सन १०५१ श्रावण शुद्ध १३ रविवारीं झाली. (शके १५६३).....महारांच्या हक्कांचा तपशीलवार निर्देश केल्यावर खालील वाक्यें ह्या सारांशांत आलीं आहेतः–

" हें देणें पाच्छायाचें व दामाजीपंत ह्यांच्या हातचा कागद असे. विठ्या महार मंगळवेढ्याचा पाच्छायाचे कामीं पडला. व दामाजीपंत कामीं पडला म्हणोन पादशहाणी विठ्या महारास हक करून दिले. "

ह्या वाक्यानंतर आणखी कांही राहिल्यासाहिल्या हक्कांचें गणन करून पुनः खालील हकीकत लिहिली आहेः–

"बेदरास जाऊन पाच्छया व याची लेक बेगम आनली आणि पाच्छाव यासी हात जोडोन उभा राहिला. पाछाव याचे घोड्याची जागल करावयास गेला. तो तेथे मांग चोरीस आला. तेव्हां महार जागा होता. मग पाच्छाव यास जागे केलें. विश्वासूक महार ठरला. म्हणोन घोडा वरातीस दिल्हे. आंबरनाक माहार यास कृपा करून दिल्हे. बाच्छाव याची तीळकोठींतील कोठाडी लुटल्या त्याजबद्दल तगादा दामाजीपंतास केला. ते वेळेस श्री विटोबाचे विठया महारानें रूप धरून बाच्छाव याची रसद पोचती केली. दामाजीपंताचा पैका भरून विठया महारानें दिल्हा आणि बाच्छायाणे पुनः पावती दिली व दामाजीपंत याजपाशीं विठ्या महारानें आनोन दिल्ही. बाछाव यांणी

चौकशी केली व दामाजीपंत याची चौकशी केली. त्याजवरून विठ्या माहार यास दर उपकार पोटास भाकरी व बसावयास जागा करून दिल्ही. माहाराचे बंदोबस्त करून दिल्हे."

ह्या महजरीवरून राजवाडे ह्यांचें असें म्हणणें आहे की, मंगळवेढ्यास विठ्या नांवाच्या एका खरोखर असलेल्या ऐतिहासिक महार गृहस्थाने दामाजी पंतावर आलेलें संकट जाणून आपल्या स्वतःचें जमिनींत पुरलेलें द्रव्य परस्पर बादशहाकडे भरणा करून त्याची पावती दामाजीपंतांना आणून दिल्ही. पुढे ह्या गोष्टीला काव्यमय स्वरूप येऊन विठ्या महाराचे ऐतिहासिक अस्तित्वाचा लोप झाला. व त्याला श्री विठोबाचें रूप आलें.

तें कसेंही असो. वर निर्दिष्ट केलेले जे ५२ किंवा जास्त हक्क आहेत त्यांपैकी कांही क्षुल्लक आहेत तर कांही फारच मोठे म्हणजे खुद्द राजकीय सत्तेनेच उपभोगावयाचे आहेत. शिवाय हे हक्क एका दोघा महार व्यक्तीचे नसून ग्रामसंस्थेंत प्रतिष्ठित झालेल्या सगळ्या माहार जातीने हे हक्क उपभोगावयाचे आहेत, हें वर निर्दिष्ट केलेल्या " आठरा लाख सोमवंशाला कळावें " ह्या घोषणेवरून सिद्ध होतें, हें ध्यानांत घेण्यासारखें आहे.

हल्ली अस्पृश्य बनलेल्या सर्वच जातींनी पूर्वी राजवैभव किंवा जमिनीचा मालकी हक्क अनुभवलेला आहे असें माझें म्हणणें मुळीच नाही. पण ह्यापैकी बऱ्याच जाती पूर्वी उत्तम स्थितींत होत्या, त्याचे पुरावे अशा ह्या सनदांतून अद्यापि संशोधकांस आढळतात, येवढेंच सांगणें आहे. इतकेंच नव्हे, ह्या दैवहतक जातींचें पूर्वीचें वैभव गेलें तें गेलेंच, उलट मध्ययुगांतील ह्यांच्या गुलामगिरीचेही पुरावे अशा सनदांतून आढळतात, तेही उघडकीस आणणें आमचें काम आहे.

शिवेचा वाद पडल्यास ह्या पुरातन मालकांची साक्ष घ्यावी, त्यांच्याकडून दिव्यें करावींत हें ठीक आहे. पण एखाद्या किल्ल्याची भिंत चढेनाशी झाली, एखाद्या तळ्यास पाणी टरेनासें झालें, तर त्या खालीं नेमकें एका गरीब महारास किंवा घेडास बळी द्यावयाचा रिवाज होता. तो त्याच्या असह्य गुलामगिरीचा द्योतक आहे.

प्राचीन रोमन राष्ट्रांत एखादें दिव्य करावयाचें असल्यास आपल्या घरच्या विकत घेतलेल्या गुलामांकडून तें करावयाचें अशी चाल असे. किंवा

पेन्शनर इतिहासज्ञ श्री. बाबासाहेब देशपांडे ह्यांनी मोठ्या अभिमानाने महारासंबंधीं अत्यंत अनुकूल अभिप्राय मला समक्ष दिला आहे.

नाशिक आणि ठाणें ह्या दोन जिल्ह्यांचे हद्दीवर सह्याद्रीच्या घाट-माथ्यावर वाघेरा म्हणून एक जुना डोंगरी किल्ला आहे. तो आतां ओसाड पडला आहे. आजू बाजूस कोळी लोकांची वस्ती आहे. तेथे पूर्वी परवारी जातीचा राजा होता अशी माहिती मिळते. पण परवारी जात सेन्सस रिपोर्टांतही आढळत नाही. महारांना तिकडे परवारी म्हणत असावेत. हल्ली ब्रिटिश पलटणींतून पेन्शन घेतलेली जी कोणी सुभेदार जमादार कोकणी महार मंडळी माझ्या ओळखीची आहे त्यांच्या जुन्या सर्व्हिस बुकांतून त्यांची जात परवारी असें नमूद केलेलें मी स्वत: पाहिलें आहे. पूर्वी मद्रासेकडे प्रथम पारिया पलटणी इंग्रजांनी उभ्या केल्या त्यानंतर इकडील कांही कोंकणी महारचांभारांची इंग्रजी लष्करांत भरती झाली. त्यांनाच चुकून परवारी असें म्हटलें असणें संभवनीय आहे. वाघेऱ्याच्या ह्या परवारी राजाचें राज्य गेलें. त्याच्या तैनातींतले कांही महार, कोळी वगैरे सावरगांव, गोरठाणें वगैरे ठिकाणीं राहत आहेत अशी ऐकीव माहिती आहे, पण हा राजा स्वत: महार, मांग, की कोळी होता हें निश्चित होत नाही. मात्र तो मारला गेल्यावर त्याची बायको सती गेली व जवळ जो घाटरस्ता आहे त्याला, हल्ली सतीघाट हें नांव आहे, असें सांगतात. इकडील कोळी मृतमांस खातात असेंही एकाने सांगितलें. पण ते अस्पृश्य खास नाहीत. सुरतेकडे मांगेले नांवाचे कोल=कोळी वंशाचे लोक आहेत. पण तेही अस्पृश्य नाहीत. (मागें प्रकरण आठवें पान १२५ पहा.)

तें कसेंही असो. कोणत्याही जातीचा मनुष्य असो, तो लष्करी पेशांत राहून वाढला किंवा निदान पोलीसांत राहून मानमान्यतेला चढला तर त्याला एक प्रकारचा सामाजिक आढ्यपणा येतोच. त्याबरोबर सामान्य धर्माचा सोंवळेपणाही येऊन, तो धर्मगुरु ब्राह्मणांच्या आश्रयाखाली जाऊं पाहतो. महारांची लग्नें ब्राह्मण उपाध्यायांनी लावण्याचा रिवाज नाही असें मी म्हटलें आहे. (मागे प्रकरण ९ वें, पान १४४, १४७ पहा). पेशवाईच्या अखेरीस लष्करी नोकरपेशांत इभ्रतीस चढलेल्या कांही महारांनी आपल्या जातींतील कांही लग्नें ब्राह्मण वतनदार जोशांकडून

लावून घेण्याचा आग्रह धरिला व तो कांही वेळ टिकवलाही. पण अखेरीस सवाई माधवरावांकडे फिर्याद होऊन महारांचा हा डाव फसला. तो येणेंप्रमाणें:—

महारांचीं लग्नें जोशांनी लावण्याबाबत

सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी (वाड यांनी संपादिलेली, —भाग १८, पान २७९—इ. स. १७८५-८६)

" रघुनाथ ज्योतिषी बिन त्रिंबक ज्योतिषी व कृष्ण ज्योतिषी बिन दामोदर ज्योतिषी मामले पाल पंचमहाल याणी हुजूर विदित केलें की तर्फ कोरबरशे उर्फ पौड खोरे येथील वृत्ति पुरातन आमचेकडे आहे, त्यांत महारांची लग्नें तर्फ मजकुरीं ज्योतीष्यानीं लावण्याची चाल पुरातन नसतां सन अर्बा समानीनांत आप्पाजी कृष्ण कमावीसदार याजकडे तर्फ मजकूरचे महार फिर्याद होऊन आपलीं लग्नें ज्योतिषी यांणी लावावीत, ते लावीत नाहीत म्हणोन सांगितल्यावरून पुर्ती चौकशी न करिता पेशजी रखमाजी वाकडे हवालदार कोरीगडास होते त्यांचे वेळेस किल्ल्याचे चाकरमाने महारांचें लग्न लावण्याचें होतें, ते समयीं लग्न लावणार मेढ्या महार हाजर नव्हता सबब किल्ले मजकूर हवालदार व सबनीस याणी आमचा बाप, भाऊ विनायक ज्योतिषी दहापंधरा वर्षांचा अज्ञान होता, त्यावर निग्रह करून महारांचें लग्न लावलें. त्यास आजमासें पंचावन वर्षें झालीं. तेवढ्याच दाखल्यावरून महारांचीं लग्नें ज्योतिषांनीं लावीत जावीं म्हणोन कमाविसदारांनी महारास भोगवटीयास पत्र करून दिल्हें. आम्ही अतिशूद्राचे लग्नास मूहूर्त मात्र सांगतों, लग्नें लावण्याची नवी चाल होणार नाही असें उत्तर केलें. कमावीसदारानीं विषाद मानून...जबरदस्ती करून आमचे वतनाची जप्ती करून वृत्तीचे कामकाजास नवा गुमास्ता ठेवला....येविशीची चौकशी करून दाखले मनांत आणतां, महारांचीं लग्नें ज्योतिषांनीं लावण्याची चाल फार करून नाहीं, कोठे कोठे लावीतही असतील परंतु कोंकणप्रांतीं नाही, त्यांचे जातींत मेढेमहार आहेत तेच लावतात. याप्रमाणें तळकोंकणचे जमीदार व ज्योतिषी हुजूर आहेत त्यांणी विदीत केलें. वेदमूर्ती रंग जोशी जुन्नरकर यांणी लिहून दिल्हे कीं शहर जुन्नर बरहुकूम पेठासुद्धा व तर्फेचें

गांव पाऊणशें व शिवनेर वगैरे किल्ले पांच ह्या ठिकाणीं ज्योतिषपणाची वृत्ति परंपरागत आपली आहे परंतु आपले वृत्तींत अतिशूद्राचीं लग्नें आम्ही लावीत नाहीं. अतिशूद्रांच्चे जातींत ढेगोमेगो (पुढारी) आहेत, तेच त्यांचीं लग्नें लावीत आले असतां, पूर्वी एक वेळ किल्ल्याचे चाकर माने व प्रांतांतील दोनचार हजार पर्यंत महार मिळोन गवगवा करोन औरंगजेब बादशहाजवळ फिर्याद केली, तेव्हा त्याणीं पुरातन चाल मनास आणून ज्योतिषी याणीं महारांचीं लग्नें लावूं नयेत असा ठराव केला, त्याप्रमाणें हा कालवर चालतें"....याचा निवाडा महाराच्या उलट व ज्योतिषांना अनुकूल झाला तो असाः—

"सदरहु अन्वयें समस्त महार तर्फ कोरबारसें उर्फ पौंडखोरें यांस-आपाजि कृष्ण यांजकडून पत्र करून घेतलें आहे, तें ज्योतिषी याजवळ माघारां देणें. तुमचे जातीमध्यें मेढे महार लग्नें लावीत असल्याप्रमाणें लावतील या उपरी ज्योतिषी ह्यास खटला केल्यास मुलाहिजा होणार नाहीं."

मागें धर्म ह्या नवव्या प्रकरणांत मंदिर प्रवेशाच्या हल्लीच्या सत्याग्रहाच्या चळवळीला राजकारण म्हटलें आहे (पान १५० पहा). त्याच-प्रमाणें ह्याही प्रयत्नाचा मी राजकारणांतच समावेश केला आहे. असो. आतां आपण मराठेशाहीच्या अखेरीस व हल्लीच्या ब्रिटिश अमलाच्या अगदी हद्दीवर येऊन पोंचलो आहों. येथून अगदी नव्या मनूंत आम्ही शिरणार, हें वाचकांनी ध्यानांत आणावें; व आपला दृष्टिकोण अगदी बदलून पुढील विषयाचें अवलोकन करावें.

भारतीय राज्यघटनेवर द्राविड, आर्य, शक, हूण, म्लेंच्छ इ. अनेक नांवाखालीं हल्ले ह्या कालापर्यंत झाले. पण त्यांत समाजशास्त्रदृष्टीने विशेष फरक नव्हता. पण दोन शतकांपूर्वीपासून हिंदी राज्यपद्धती-वरच नव्हे तर समाजपद्धतीवरही युरोपांतून जो अपूर्व हल्ला चढविण्यांत आला आहे त्यांत एक विशेष आहे. ह्या हल्ल्याने नुसत्या भारतीय बादशाहींत क्रांति झाली इतकेंच नव्हे; तर प्रत्यक्ष युरोपांतच एका नव्या जागतिक क्रांतीच्चा उदय झाला होता, तिचा प्रवेशही ह्या जरठ भारतीय समाजांत होऊं लागला. ही क्रांति म्हणजे औद्योगिक जगतांतील मजूरांच्या बाहुबळांत यांत्रिक शक्तीची अपूर्व भर पडून, अगोदर समाजाचा सांकेतिक पायाच बदलला आणि मग त्यावरची केवळ रूढिवशात्

चाललेल्या वर्गावर्गींची तारांबळ उडाली हें दृश्य होय. मात्र ही उलाढाल एकाच रात्रीं घडून आली असें नव्हे. उलट ह्या भरतखंडांत दोन भिन्न दृष्टीने जी समाजरचना दृढ बनून जवळ जवळ अनादि भासूं लागली होती ती रचना आज झपाट्याने बदलत आहे. मात्र ती अझूनही नामशेष व्हावयाला वेळ लागणार आहे.

पहिली दृष्टि धर्माची आणि केवळ भावनेची. तिच्यामुळें वर्ण-व्यवस्था म्हणून एक रचना घडली होती. व दुसरी तिच्याहून पुरातन, स्वाभाविक व बळकट दृष्टि अर्थाची, जी मानवी गरजांच्या पायावर रचली गेली होती; तिच्यामुळें ग्रामसंस्थेचा पाया घातला गेला. भारतवर्षांत मौर्य कालापासून जरी मोठमोठालीं साम्राज्यें विकास पावलीं व विस-कटलीं तरी भारतवर्ष म्हणजे केवळ खेडेगांवांचा समुदाय आणि कृषि-प्रधान समाजांचा एक अवाढव्य गट होता. अयोध्या, मथुरा, अवंती, कांची, काशी, द्वारावती अशीं शहरें केवळ हाताच्या बोटांवरच मोजण्या-सारखीं होतीं किंवा उरत. जीं नाश पावत त्यांचा पुनः खेड्यांतच विलय होत असे. नद्या जसे आपलें ओघ बदलत आल्या आहेत, तशींच रणांगणें व नृपांगणें, क्षेत्रांगणांतून आपलें रूप बदलीत असत. इतकेंच काय ! पण ब्राह्मण क्षत्रिय म्हणविणाऱ्या स्वयंमन्य जमाती धुळीस मिळून शूद्र अति-शूद्र बनल्या आहेत व उलटही प्रकार सामाजिक इतिहासाच्या परड्यांत घडले आहेत. फक्त पाहणारास डोळे व ऐकणारास कान मात्र पाहिजेत !

ग्रामसंस्था ऊर्फ **गांवगाडा** नांवाचें एक अस्सल मराठी भाषेच्या साध्या सौंदर्यांत नटलेलें पुस्तक इ. स .१९१५ सालीं श्री. त्रिंबक नारायण अत्रे ह्यांनी लिहून प्रसिद्ध केलें आहे. हे अत्रे ब्रिटिश मुलखांतील एक मुलकी अधिकारी असून बादशाही संशोधन खात्यांतील एक मार्मिक मदतनीस होते. भारतवर्षांतून विशेषतः महाराष्ट्रांतून ग्रामसंस्थेचें जें उच्चाटन ब्रिटिश रियासतींतून जाणून व नेणूनही चाललें आहे, तें विशेष न शिकलेल्या लोकांनाही ह्या लहानशा पुस्तकावरून कळणार आहे. तीन्ही वर्णांचा व शूद्रातिशूद्रांचाही प्रचंड ओघ आज दोनशे वर्षें खेड्यांतून शहरा-कडे चालला आहे, त्यामुळें वरील गांवगाड्याचें स्वरूप थोड्याच काळांत केवळ अशा पुस्तकांतूनच उरणार आहे. कुणबी म्हणजे शूद्र; आणि अडाणी म्हणजे कुणबी अथवा प्रत्यक्ष श्रम न करणारे, वरचे अथवा

खालचे सर्व प्रतिष्ठित अप्रतिष्ठित वर्ग, अशा मार्मिक अर्थाने हे शब्द ह्या पुस्तकांत वापरले आहेत. " फुकटखाऊपणाचे सर्व अवगुण अडाण्यांत जसे शिरले तसे कुणब्यामध्येंही उतरले. चौकोनी चिरा बनविण्यासारखी परिस्थिति जातिधर्माने व वतनी पद्धतीने गुदमरली म्हणून कुणबी व अडाणी ह्यांचें सर्वसामान्य ज्ञान अगदीं शून्यावर येऊन बसलें. तसेंच अनेक शतकांच्या गुलामगिरीमुळें दुसऱ्याच्या पागोट्यावर नजर ठेवण्याची खोड त्यांना लागली, आणि स्वाभिमान व प्रामाणिकपणा नष्ट झाला. हा त्यांचा दोष नव्हे. जातिधर्म व त्याचें अपत्य वतनपद्धति ह्यांचा हा दोष आहे." (गांवगाडा–पान २१७) हें विधान अत्यंत खोल आणि खरें आहे. चूक येवढीच की, जातिधर्म व त्याचें अपत्य वतनपद्धति असें नातें नसून वतनपद्धति व तिचें अपत्य जातिधर्म असा वारसा संबंध हिंदी समाजशास्त्र ओरडून सांगत आहे ! वतनपद्धति जातिधर्मांहून फार पुरातन आहे. कारण हिंदी ग्रामसंस्था हिंदू वर्णव्यवस्थेला आजीबाई शोभेल इतकी जुनी आहे. वर्णव्यवस्था ही एक भावनेचें जाळें आहे. ग्रामसंस्था स्वाभाविक गरजांच्या नियमावर उभारली आहे. म्हणून अधिक काळ टिकली आहे. जातिधर्म हा एक भावनेचा विंचू आहे. तर अस्पृश्यता तिला मागाहून फुटलेली नांगी आहे. पुरातन ग्रामसंस्थेंत एकामागून एक विकास पावलेल्या जातिधर्माने व शेवटीं अस्पृश्यतेने आपापलीं घरें केलेलीं आहेत. पण भारतवर्षात युरोपियनांबरोबर आलेल्या जागतिक क्रांतीमुळें ही घरें उर्फ छिद्रें आता हळूहळू बुजत चाललीं आहेत.

मोगलाईंतील व स्वराज्यांतील कांही मराठी उताऱ्यांवरून दिसून येतें की निदान महाराष्ट्रांतील कांही अस्पृश्य मानलेल्या जाती केवळ अलुते–बलुतेदारच नसून, चांगले परंपरेचे वतनदार होते, इतकेंच नव्हे त्यांतील कांही व्यक्तींनी शिलेदारी करून आपल्या तलवारीचें पाणी स्वकीय परकीय गलीमांना पाजण्याची मिळालेली दुर्मिळ सुसंधी दवडलेली नाहीं. इतर प्रांतांतील जुनें नवें वाङ्मय असेंच धुंडाळल्यास भावी संशोधकास इतर प्रांतांतल्या 'अस्पृश्यां'मध्येंही अशा जाती व व्यक्ती सहज आढळतील. आणि मी जो ह्या हतभागी जातींच्या उज्वल भूतकालाचा सुगावा ह्या ग्रंथद्वारें हुडकीत आहें, तो त्यांना सापडून ते माझ्यापेक्षा अधिक यशस्वी होतील.

तें कसेंही असो, मध्ययुगांत, आज अस्पृश्य मानलेल्या सर्व जाती, धर्म आणि अर्थ या दोन्ही दृष्टींनी केवळ नामोहरम झाल्या होत्या. गांवगाड्यांतील श्रमविभाग आणि हक्कवारसा खालीलप्रमाणें टरला होता. उच्च म्हणविणारे वरील तीन्ही वर्ण अडाणी उर्फ बैठे किंवहुना ऐतखाऊ बनले. काळी असो पांढरी असो, जमीनीचा मालक कोणीही ठरो, तिचा कामचलावू ताबा मात्र कुणब्याकडे आला. व ते केवळ श्रमाचे अधिकारी झाले. गांवकीच्या कसबी कामाची जबाबदारी व हक्कवारसा अठरा पगड जातींनी उर्फ बलुतेदारांनी उचलला. ह्यांत ज्योतिष्यांपासून तो ढोरांभंग्यांपर्यंत सर्वांच्या मिसली उर्फ हक्कमर्यादा निर्विवाद ठरल्या. मैला उचलणारा भंगी व फाशी देणारा मांग (अर्थात ह्यांचीं कामें शहरांतूनच चालणारीं) ह्यांनी देखील आपली मिराशी ठरविली होती. म्हणजे त्यावरील अतिक्रमण त्यांना असह्य असे. शेवटीं शिल्लक उरली ती बेकारी उर्फ महारकी. " गांवकीच्या कसबी कामाची जातवार वाटणी झाल्यावर बेगार काम उरलें. तें कोणतीही हुन्नरी जात पतकरीना. असें हें पडून राहिलेलें काम महारांच्या गळ्यांत पडलें; म्हणूनच महार म्हणत की आम्ही काय पडल्या कामाचे चाकर. जें काम करण्याला अभ्यास, कला किंवा विशेषसें ध्यान नको त्याला बेगार म्हणतात. रोख मेहनतान्यावाचून करावें लागतें त्या कामाला तेलंगणांत ' वेट्टी ' म्हणतात; तेव्हां ह्या शब्दापासून ' वेठ ' शब्द निघाला असावा. गांवगाड्याचा खराखुरा वेठ-बिगारी किंवा हरकाम्या फरास महार होय." (गांवगाडा पान ४९). बेगार म्हटल्याबद्दल महारांना राग येण्याचें कारण नाही. महाराष्ट्रांत दुसरी बेहुन्नरी जात अगर जमात म्हणजे मराठे अगर कुणबी हीच होय. महारांत मराठ्यांत फरक इतकाच की रोख मेहनतान्यावाचून मराठा कधी कोणतीही बेगारी करणार नाही—मग ती बेगारी मुलखगिरीच्या नांवाने खपो अगर भांडीं घासण्याच्या नांवाने चालो. महाराला रोखीचा हक्क नसे. तो मराठ्याचा हुकमी बंदा. पण त्याला पुरातन जमीनीचे वतनी हक्क असत. बेगारी मराठा बहुधा उपऱ्याच असणार. महाराष्ट्रांत मराठ्यांच्याही पूर्वीचा महार खास होता. मध्ययुगांत केव्हाही मराठा स्वतंत्र आणि अतिक्रमण करणारा, पण महार गुलामगिरींत रखडणारा आढळतो. हाच प्रकार इतर प्रांतांतल्या

क्षत्रिय व अस्पृश्य गणलेल्या वर्गांच्या परस्पर संबंधाचा आहे. म्हणून भारतीय अस्पृश्यता ही एक भारतीयांचें भलें मोठें दुष्ट राजकरण आहे, असें मीं म्हणत आलों आहें. ह्यांत क्षत्रिय, ब्राह्मण, वैश्य ह्या तिघांची भागी आहे.

"मुलकी फौजदारी संबंधाने महारांचीं मुख्य कामें येणेंप्रमाणें:— पट्टीसाठी असाम्यांना बोलावणें, वसूल तहसिलींत नेणें, कागदपत्र परगांवीं पोंचविणें, पाटील कुळकरण्यावरोबर गांवांत व शिवारांत हिंडणें आणि परगांवीं जाणें; गांवांत मुक्कामाला मोठे लोक अधिकारी आले म्हणजे त्यांच्यासाठी सरपण चारा आणणें, जनावरांची मालीस करणें, दाणापाणी दाखविणें, शेण लीद काढणें, त्यांच्या तळावर 'बशा' बसून राहणें, गांवची व कामगाराची वेठ बिगार वाहणें, वाटसरांना जंगलांतून नेऊन पोंचविणें, दौंडी देणें, गांवची शीव व शेताच्या बांध उरुळ्या ध्यानांत धरणें, त्या न मोडल्या जातील अशी खबरदारी घेणें व त्याबद्दलच्या भांडणांत पुरावा देणें, दरोबस्त पिकें व खळीं राखणें, रात्रीं काळींत पांढरींत गस्त घालणें, गांवची जंगल व झाडें जतन करणें, जंगली जनावरें मारणें, रात्रंदिवस घाटांत पहारा करणें, चोरवाटा व माऱ्याच्या जागा ह्यांची माहिती मिळाविणें व त्या रोखणें, गांवांत आल्यागेल्याची खबर काढणें, न देखल्या माणसावर नजर ठेवणें, वहिमी माणसाची पाटलांना वर्दी देणें; गांवांतल्या माणसान् माणसांची चालचलणूक लक्षांत ठेवणें, चोरांचा तपास लावणें व माग काढणें; चावडीपुढे, वेशीपुढे व गांवचे रस्ते झाडणें, गांव साफ ठेवणें, मेलें जनावर ओढणें, वगैरे होत. ह्या शिवाय घरकी कामें महार करीत. गांवकीवर नेमून दिलेल्या महारांना **पाडेवार** म्हणत. घरकी कामें करणाऱ्याला **राबता महार, घर महार** म्हणत." (गांवगाडा पान ४९,५०)

गावचें पोलीस, लष्कर, दिवाणी, वसुली, पोष्ट, हेर, सरबराई, म्युनिसीपालिटी, समाजसेवा, वगैरे कुल जबाबदारी महारावर होती. अर्थात् ही सर्व जबाबदारी अखेर मराठा पाटलावर होती पण पाटलाला हरकदम महार जबाबदार होता. गांवगाड्यांतच नव्हे तर बादशाही दरबारांतही देशमुख देशपांड्याचा तसाच पाटील कुलकर्ण्याचा हस्तक, तसाच पाठीराखा महार होता. तसा कायद्याने किंवा रिवाजांत इतर कोणी नव्हता. मग ही जात मराठ्याबरोबर किंबहुना कांकणभर जास्तच

राजकारणी होती म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. "वतनदार महाराचीं घरकी कामें येणेंप्रमाणें आहेतः—कुणब्याचें बी, औत, काठी, वगैरे ओझ्याची शेतांत ने आण करणें, दागपुढे झाडणें, गुराचे गोठे साफ ठेवणें, सर्पण आणणें व फोडणें, मुऱ्हाळीं जाणें, मिरासदार परगांवीं जाण्यास निघाला असतां त्याचेबरोबर गड्याप्रमाणें जाणें, चिठ्ठ्या चपाट्या परगांवीं नेणें, मौतीची खबर परगांवीं पोंचविणें, सरण वाहणें इत्यादि." (गांवगाडा पान ५०) एकूण महार म्हणजे नुसता एक सरकारी गुलाम नसून ग्रामसंस्थेंतील एक पिढीजाद सार्वजनिक गुलाम होता. हें रहस्य कांही और आहे.

महाराप्रमाणें मांगही एक बिनहुन्नरी बेकार दिसतो. पण तो गांवगाड्यांत महारापेक्षांही खाली दडपला गेला आहे. ह्या दडपण्यांत महाराचाही हात दिसतो. ह्यावरून महाराच्याही पूर्वीचा हिंदभूमीचा पुत्र मांग दिसतो. वर (पान १९६) जो दामाजीपंत आणि विठू महाराच्या नांवाने एका महत्त्वाच्या जुन्या महजरीचा उल्लेख आला आहे, त्यांत महाराच्या विशेष हक्कांची नोंद असून "त्यांत मांगांचा कांही संबंध नाही" असें ठिकठिकाणीं बजावलें आहे. "हरकी माहारकी सीतादेवी (जमीन) कुणब्याची मळणी जाहलेवर कुणब्यानें सेतांत महारास देत असावी... १ मांगाचें लग्न रानांत करावें ते दिवसीं तिखटीचा मांडव घालून तीन मेढीचा करावा व रानांत हल्यावर वरात काढावी. गावांत मिरवू नये, गांव पांढरीचा विडा त्यास द्यावा. १ नगरीचे होळीचा नैवेद्य महाराने घ्यावा. १ पोळ्याचा निव्वेद व बैलाची ववाळणी माहाराने घ्यावी. १ माहाराचे लग्नास मांगाणें पागुट व लुगडें देत जावें. १ गाव पांढर मिळोन सरकारांचे पागेंतला घोडा महाराचे वरातीस द्यावा. मांगाहून वहिवाट-चालक हा खरा. मांगाचा त्याचा संबंध नाही. मांगाबद्दल कोणी बोलूं लागल्यास तो जातीबाहेर पडेल" (भा. इ. स. मंडळाचे चतुर्थ संमेलनवृत्त, पान ६४). येणेंप्रमाणें बेदरच्या बादशहाचे वेळीं महाराने मांगावर वर्चस्व गाजवूनच न राहतां, गांवगाड्यांत त्रैवर्णिकाची जी खासगी गुलामगिरी उर्फ राबती त्याला करावी लागत होती, त्या राबतीच्या जाचांतूनही स्वतःला सोडवून घेण्याची कारवाई केल्याचा वरील महजरींतच स्पष्ट उल्लेख आहे, तो असाः—"देशमुख याचे घरांत राबती महारांने करावी, त्यास पोटास भाकरी घालावी. पाटील

ह्याचे घरीं महाराने रावती करावी सबब त्याजला धड्डत पांघरुनाबद्दल रुपये ६ देत जावें; दर रोज पोटास भाकरी घालावी. ह्या सिवाय जमीन हराटीचे पांच बिघे देऊन रावती घ्यावी. नाही पेक्षां रावती विसी बोलूं नये." (सदर वृत्त. पान ६३). मराठी स्वराज्यांत आणि विशेषतः आंग्लाईत ही रावतीची जबाबदारी महाराने अगदी संपुष्टांत आणिली आहे. कर्नाटकांतील देसाई देशपांड्यांचे पुरातन घराण्यांतूनही होलयांचीं रावतीचीं उदाहरणें अद्यापि आढळतात, तितकी महाराष्ट्रांत महाराचीं आढळत नाहीत. परंतु गांव स्वच्छ ठेवण्याची सार्वजनिक जबाबदारी खेड्यांतून अद्यापि महाराकडेच आहे. " हें काम खासगी नसून सरकारी आहे, आणि तें घरकीचें आहे अशी महारांची समजूत होऊं देऊं नये, असें ता. २८ जून १८८८ च्या सरकारी ठराव नं. ४२७३ मध्यें फर्मावलें आहे.... गांवचे रस्ते झाडण्याचें ते साफ नाकारतात. कोणी मोठा अम्मलदार गांवीं येणार असल्यास ते गांवकऱ्याचे मागे जिकडे तिकडे साफसफ करण्याची निकड लावतात. आणि आपण फार तर चावडीपुढे आणि कांही ठिकाणीं येण्याजाण्याच्या रस्त्यावर खराटा फिरवितात. ज्याचे हद्दींत घाण असेल त्याचेवर फौजदारी खटला होतो. त्यामुळें स्वतः राबून किंवा महारामांगाना मोल देऊन जो तो आपली जागा साफ राखतो." (गांवगाडा पान ९४).

गांवगाड्याची ही वतनी पद्धत ह्या युगांत कोणत्याही दृष्टीने पाहतां गैरसोयीची व कटकटीची आहे हें नवीन इंग्रज सरकारच्या लक्षांत प्रथमपासूनच आलें आहे. इतकेंच नव्हे तर पेशवाईअखेर आणि आंग्लाई–आरंभ दोन्ही डोळ्यांनी पाहून, लोकस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण करणाऱ्या **परशराम** कवीने केव्हाच्च भाकीत केलें,—

पाटील कुळकर्णी नांव उगीच घालून दमले येरझारा
सत्ता साहेबी अगदी बुडाली महाराचा त्यांहून तोरा ॥

(गांवगाडा पान ९४) ह्या वरून लोकांना ही पद्धती डोईजड झाली होती. "इ.स.१८३९ च्या ॲक्ट २७ अन्वयें शेव, फसकी, वाणगी सारखे यच्चयावत् पांढरी हक्क उर्फ मोहतर्फा उकळण्याची झाडून सर्व वतनदारांना सरकारनें मनाई केली आहे. सर्व्हे सेटलमेंट प्रमाणें परगणे वतनदार व पाटील कुळकर्णी ह्यांना घुगरी, सळई, बलुत्यासारखे काळीचे

हक्क उकळण्याची बंदी केली; आणि पाटील कुलकर्ण्यांची चाकरी वंश-परंपरेने कायम करून त्यांच्या परभारे उत्पन्नाबद्दल वसूली रकमेवर रोकड मुशाहिरा तोडून दिला आहे. महार जागले ह्यांना मात्र मामूलप्रमाणें बलुते हक्क उकळण्याची मोकळीक सरकारने ठेविली आहे " (सदर पान ६८) कुळकर्ण्यांचीं कायमचीं वतनेंही पुढें सरकारनीं रद्द केलीं व पगारी तलाठी नेमले. पण माहारामांगांच्या बलुत्याची कटकट अद्यापि दोहोंपक्षीं चालूच आहे. ह्यासंबंधीं कायदे मंडळांत अगदी अलीकडेही महाराष्ट्रांत आणि वऱ्हाडांत बरीच चळवळ वेळोवेळीं झालेली आहे. पण सोक्षमोक्ष झाला नाही. गांव आणि महारवाडा ह्यांचे कांही मासलेवाईक तंटे मात्र ध्यानांत घेण्यासारखे आहेत.

" **लाखेफळ**, तालुका शेवगाव, जिल्हा अहमनगर येथे महारांचा व गावचा लढा पडला. गांवचीं घरें १२५ लोकवस्ती सुमारें ८०० आणि महारांची लोकसंख्या सुमारें २००. कालींत सुमारें १०० नांगर चालत होते. लोक नांगरामागे महारांना चार पायल्या धान्य व रोजची भाकर देण्याला कबूल होते. महारांचें म्हणणें असें पडलें की, गावाला आठ महार लागतात, तर आम्हांला रोज दर घरची एक भाकर, सणावाराला सर्व महारवाड्याला वाढणें, पड्याची माती व कातडें, आणि शेतांत पिकेल त्याचा दहावा हिस्सा बलुतें ह्याप्रमाणें मिळालें पाहिजे... सन १९०५ सालीं महार जागल्यांच्या वतनासंबंधाने चौकशी चालू होती तेव्हा ते स्वच्छ म्हणत कीं, माणसीं दहा रुपये दरमहा दिला तरी परवडणार नाही. टाकळी, भान, तालुके नेवासे येथील महारांना पांच वर्षें सस्पिंड केलें; तेव्हा पुनः कामावर रुजू करून घेण्याच्या खटपटीसाठी हजार रुपये देण्यास कबूल झाले. सन १९१२ सालीं पारनेर तालुक्यांत वडनेर बुद्रुक गांवीं निजामशाहींतील एक महार आला, आणि त्याने एकाचे दोन रुपये चौथ्या दिवशीं देण्याचा धंदा सुरू केला. ह्या धंद्यांत सदर गांवच्या महारांनी ६००–७०० रु. घातले." (गांवगाडा, पान १०६–७) ही एक बाजू झाली. पण हिला दुसरी बाजू आहे. ती 'गांवगाडा' कर्त्याच्या ध्यानांत इ.स.१९१५च्या सुमारास आली नसली तरी अस्पृश्यतानिवारणाच्या तीन तपांनंतर आता प्रत्येक तालुक्यानिहाय खेडोखेडीं उदयोन्मुख अस्पृश्य पुढारी आणि सनातनी हिंदू

ह्यांच्यामध्यें नुसता वादच नव्हे तर मारामाऱ्या व रक्तस्राव होत असतात व आमच्या मिशनला मध्यस्थी करावी लागते हें कांही खोटें नाही. अस्पृश्यांनी मृतमांस न खाण्याची शपथ घ्यावी, पड ओढण्याचें नाकारावें, की लगेच बलुत्याची गोष्ट दूरच राहिली पण अस्पृश्य डोईजड झाले म्हणून सनातन्यांनी त्यांना सडकून काढावें, त्यांचीं पिकें कापावींत, त्यांचें पाणी बंद करावें असा क्रम चालला आहे व त्याची नीट दाद लागत नाही. ब्रिटिश मुलूखच नव्हे तर उत्तरेकडे इंदूर अथवा दाक्षिणेकडे भोर सारख्या संस्थानांतूनही अशा कटकटी आमच्याकडे नित्य येत आहेत. मात्र ह्याला राजकारण हें नांव मिळत नाही !

आता आपण ब्रिटिश रियासतींत अस्पृश्य वर्गाची लष्करांत भरती कशी काय झाली, ह्या रहस्यमय विषयाकडे वळूं या. ५।७ हजार मैलांवरून येऊन मूठभर इंग्रज लोकांनी जो सारा भरतखंड आता आपल्या मुठींत वळला आहे तो कांही सर्व लष्कर विलायतेहून आणून वळला नाही. मुसलमान लोकांचे हल्ले झाले ते त्यांच्या तयार लष्करी टोळ्यांनी केले. हल्ले यशस्वी होतात हें पाहून ह्या टोळ्यांच्या मुख्यांनी येथे बादशाह्या स्थापल्या. तसें युरोपियनांचें झालें नाही. डच, पोर्चुगीज, फ्रेंच, इंग्रज हे सर्व तलवारी घेऊन नव्हे, तागडी घेऊन व्यापाराकरितां येथे आले. पैकी फ्रेंचांनीच राज्यस्थापनेची हाव प्रथम धरली. पण मायदेशांतच म्हणजे फ्रान्स देशांत क्रांती झाल्याने बारभाई माजून इतक्या दूरदेशांतलें विधायक राजकरण फ्रेंचांना आवरलें नाही. म्हणून इंग्रजांनी फ्रेंचांचा डाव आपल्या मनावर घेऊन तो आपण यशस्वी केला. इंग्रजांच्या लष्कर-उभारणीचा इतिहास त्यांच्या राजकारणी काव्याला अगदी शोभण्यासारखा आहे. त्यांच्या प्रथम सुरत, मद्रास, कलकत्ता येथे माल उतरण्याच्या व भरण्याच्या वखारी होत्या. त्यांच्या राखणीसाठी लाठीकाठीवाल्यांची शिबंदी होती. तिचाच विकास हल्लीच्या अजस्र बादशाही सैन्यांत झाला आहे. क्लाइव्हसारखें आपल्या बापाला नकोसें झालेलें उनाड पोर मद्रासच्या वखारींत कारकुनाचें काम करीत असतां अर्काटच्या हल्ल्यांत शिपायाचा पोषाख करून गेलें. तेथे त्याला राज्यस्थापनेचीं स्वप्नें पडूं लागूं लागलीं ! मद्रासेकडे अर्काट येथे त्याला अकस्मात विजय मिळाला, म्हणून त्याने आपली मद्रासेकडील खोगीर भरती टोळी

कलकत्त्याकडील कटकटींत नशीब काढण्यासाठी नेली. त्या भरतींत प्रथम शिरलेले तामील पारियाही होते. पारियाइतका स्वस्ता शिपायी जगांतकोठे मिळणार ? आपण भातावरचें पाणी पिऊन भात गोऱ्या सोजिरांना देणारा भाडोत्री शिपायी म्हणून त्याने इतिहासांत नांव कमावलें आहे ! अर्काटचा वेढा इ.स.१७५१ सालीं झाला. ह्यानंतर बंगालची कारवाई होऊन इ.स. १७५७ मध्यें प्लासीच्या लढाईनंतर दिल्लीच्या बादशाहीचे इंग्रज हेच दिवाण बनले. पुढे इ.स.१८१७-१८१८ मध्यें इंग्रजांच्या पळपुट्या दुसऱ्या बाजीरावाशीं खडकी, कोरेगांव व शेवटीं अष्टें येथे तीन चकमकी उडाल्या. पेशवाई बुडून इंग्रजांची वाट साऱ्या हिंदुस्थानांत निष्कंटक झाली. मराठ्यांच्या लढायांत ज्या पारिया पलटणी म्हणून दक्षिणेकडील लष्कर होतें, त्यांत महाराष्ट्रांतील शूर महारही पुष्कळ होते. त्यांचें नांव पारिया पलटणी पडण्याचें कारण हिंदुस्थानांत लष्करांत भरती प्रथम अस्पृश्यांतील पारियांचीच होय. म्हणूनच महार शिपायांची जात परवारी अशाच नांवाने नमूद होत असे. (पान २०० पहा.)

मराठ्यांनी शेवटचा मिळविलेला विजय म्हणजे खर्ड्याची लढाई. तींत शिदनाक नांवाचा महार सरदार, पहिल्या शाहूच्या एकनिष्ठ मराठी सरदाराचा नातू होता. तेव्हापर्यंत मराठ्यांशीं एकनिष्ठ राहिलेले महार कोरेगांवच्या लढाईचे वेळीं सन १८१८ सालीं म्हणजे अवघ्या २३ वर्षांत उपऱ्या इंग्रजांना इतके कसे वश झाले, हा मोठा चिंतनीय विषय आहे. कोरेगांवची लढाई इंग्रज बहादरांनी मोठ्या ईर्ष्येने मारली. तेथे आता एक जुना रणस्तंभ भीमेच्या काठीं उभा आहे. त्या लढाईत कामास आलेल्या शेंकडो शिपायांचीं नांवें ह्या खांबावर कोरलेलीं आढळतात. त्यांत एकंदर खालील २३ महार शिपायांपैकी पहिले २० शिपाई ठार झाले, व शेवटचे तीन जखमी झालेले आहेत. १ सोमनाक कमलनाक नाईक २ रामनाक येसनाक नाईक; पुढील १८ जण शिपायी होते, ३ गोदनाक कोठेनाक, ४ रामनाक येसनाक, ५ भागनाक हरनाक, ६ अंबनाक काननाक, ७ गणनाक बाळनाक, ८ बाळनाक कोंडनाक, ९ रूपनाक लखनाक, १० वपनाक रामनाक, ११ विटनाक धामनाक, १२ राजनाक गणनाक, १३ वपनाक हरनाक, १४ रैनाक बाननाक, १५ गणनाक धर्मनाक, १६ देवनाक आननाक,

१७ गोपाळनाक बाळनाक, १८ हरनाक हीरनाक, १९ जेटनाक धैनाक, २० गणनाक लखनाक. पुढील तीन शिपाई जखमी झाले– २१ जाननाक हीरनाक, २२ भीकनाक रतननाक, २३ रतननाक धाननाक. एका लढाईंत इतके महार कामास आले तर तेव्हा अवघ्या सैन्यांत हिंदुस्थानभर किती अस्पृश्य मानलेले शूर मर्द होते ह्याची आता नुसती पुसट कल्पना करण्यापलीकडे साधन उरलेलें नाही. निदान तूर्त आम्हांस उपलब्ध नाही. ही निष्ठेची थारेपालट होण्याला केवळ दुसऱ्या रावबाजींचा दिवटेपणाच कारण नव्हे. इंग्रजांची समयज्ञता, शिस्त आणि वेळेवर रोख पगार देण्याची प्रसिद्धि ह्या गुणांची भुरळ पडून इंग्रजांना अस्पृश्य मानलेलेच नव्हत, तर चांगले नरपति गजपति क्षत्रिय आणि भूदेव सोंवळे ब्राह्मण आपल्या तलवारी आणि लेखण्यांसह वश झाले. पण आमचा मुद्दा ही निष्ठापालट नसून, तो हा आहे की, अव्वल इंग्रेजींत जर अस्पृश्यांची इंग्रज लष्करांतही इतकी चहा होती, तर आता ती कशी आहे ?

लेफ्टेनंट जनरल सर **जॉर्ज मॅकमन्न** नांवाच्या एका लष्करी गृहस्थाने नुकतेंच म्हणजे इ.स. १९३३ फेब्रुवारी महिन्यांत *The Martial Races of India* (हिंदुस्थानांतील लढावू जाती) हें एक मोठें पुस्तक लिहून प्रसिद्ध केलें आहे. त्यांत इंग्रजांच्या पूर्वापार लष्करी धोरणाचें रहस्य चांगलें रेखाटलें आहे. अगदी प्रथम वाक्यांतच प्रस्तावनेंत ग्रंथकार स्पष्ट म्हणतात की हें पुस्तक हिंदुस्थानांत हल्ली बळावत असलेल्या महात्मा गांधी रूपी विषावर एक उतारा म्हणून लिहिलें आहे. लष्करी अथवा लढाऊ जातीची मीमांसा करीत असतां पहिल्या प्रकरणाच्या पहिल्याच प्यांऱ्यांत ग्रंथकाराने अशा जातींच्या यादींत मद्रासच्या पारियांचीच काय ती गणना केली आहे. ती अशी:–"शीख, पंजाबी, सरहद्द मुसलमान, मराठा, गुरखा, राजपूत आणि मद्रासचा पारिया." शेवटच्या पारियाविषयीं "Whom Baba Gandhi never fathered" म्हणजे "त्याला बाबा गांधीने कधीच आपल्या पंखाखाली घेतलें नाही." असा ग्रंथकाराने मार्मिक शेरा दिला आहे. अव्वल इंग्रेजींत हिंदुस्थानांत जी चहूकडे बेबंदशाही माजली होती तेव्हा इंग्रजांनी आपलें नशीब काढतांना प्रथम कोणकोणत्या जातींना हाताशीं धरलें तें सांगतांना ह्या ग्रंथकाराने काढलेले पुढील उद्गार नमुनेदार आहेत. "जसजशी ह्या देशांत अंदाधुंदी माजूं लागली, तस-

तसे हिंदुस्थानाच्या सर्व भागांतून व्यापारी वर्गाच्या तांड्यांची रखवालदारी करणारे अगर इकडून तिकडे जासूद अथवा हेर म्हणून कामगिरी करणारे कांही बाजारी वर्ग तेव्हा मुबलक आढळत असत. मद्रासेकडे (प्रथम ह्याच प्रांतांत ब्रिटिशांनी अकरा एतद्देशीय पलटणी उभारल्या) नेटिव्ह खिस्ती व पारिया जाती मोठ्या कामास आल्या. पोटांत दोन घोट दारू आणि खांद्यावर तपकिरी रंगाचा पट्टा मिळाला की एतद्देशीय रजवाड्यांच्या कसलेल्या सैन्यांच्या सामन्याला उभा राहवयाला पारिया गडी कधी अपात्र समजला जात नसे. (*Martial Races of India* पान १६९) ही झाली अव्वल इंग्रेजीची ढब.

पुढे जसजसें इंग्रजांचें बस्तान येथे बसत चाललें तसतसें लष्करांत एतद्देशीय लोकांची भरती करण्याचें बादशाही धोरण बदलत चाललें आणि तशी लष्करांतून ह्या अस्पृश्यांना हळूहळू बेमालूम बंदी होऊं लागली. मग इंग्रजांना येथील जातींचा लष्करी दृष्टीने अस्सल अथवा कम अस्सल हा भेदभाव सुचूं लागला आणि हिंदी लष्करांचें 'अस्सलीकरण' सुरू झालें. सदर ग्रंथकाराने ह्या निवडानिवडीला आपल्या नवव्या प्रकरणांत Brahmanization of the Army असें न समजतां म्हटलें आहे. सन १८५७ सालाच्या शिपायांच्या बंडापर्यंत बंगाली पलटणींत एक जात लखनौकडील राजपूत आणि पुरभय्ये ब्राह्मण शिपायांचीच भरती होत असे. ह्या मोठ्या बंडांत ह्या दोन जातींनी पुढाकार घेतला म्हणून पुढे ह्यांची भरती बंद झाली. ह्यापुढे हिंदी लष्करासाठी नव्या दृष्टीने निवड होऊं लागली. जातिवंत इभ्रतदार, वतनदार जातींतून ही भरती व्हावी असें वळण पडत चाललें.

"तिसऱ्या मराठा युद्धांत (इ. स. १८०२–३) मद्रासी सैन्याने आर्थर वेलस्लीच्या निशाणाखाली मोठी प्रसिद्धि मिळविली; लॉर्ड लेकच्या बंगाली सैन्यालाही मद्रासी सैन्याहून अधिक कीर्ती मिळवितां आली नाही. असें असूनही ह्या वेळेपासून एतद्देशीयांच्या भरतीच्या बाबतींत ब्राह्मणीकरणाचें (जातिवंत इज्जतीचें) धोरण माजूं लागलें. ह्याचें कित्येक जुन्या इंग्रज अम्मलदारांना फार दुःख वाटूं लागलें. अव्वल मद्रासी लष्करांत जुन्या पेंढारांची–पठाण, अरब, तुर्क अफगाण, हबशी, मेक्रानींची भरती होत असे. हे पेंढार दक्षिणेकडील मुसलमान बादशहाच्या लष्करांत पूर्वी-

पासून भरणा होत असे. अझूनी दक्षिण हैदराबादेस त्यांची भरती होतच आहे. ह्याचप्रमाणें दुसरा मोठा वर्ग पारियांचा. पोटांत दारूचे घोट आणि खांद्यावर पट्टा मिळाला की झाली ह्यांची युद्धाची तयारी! ह्यांनी हिंदी रजवाड्यांच्या बेशिस्त सैन्याशीं जरी मोठ्या नांव लौकिकाचा सामना केला तरी अखेरीस त्या त्रिचाऱ्यांना लष्करी इज्जत संपादन करतां आली नाही. ते राष्ट्रीय दर्जाचे नव्हते. इंग्रजांना जर भारतीयांवर राज्य करावयाचें होतें व तेंही त्यांच्या खुषीने, तर त्यांचे सैन्यांतील शिपाई भारतीय समाजांत ज्ञातीय मान्यता पावलेलेच असावयास पाहिजे होते. म्हणून ज्यांची गांवांत व शिवारांत मानमान्यतेची परंपरा आहे अर्थात् जे राष्ट्रमान्य आहेत अशांचीच लष्करी पेशांत भरती व्हावी अशी परंपरा पडूं लागली." (सदर, पृ. १७१)

चौथ्या मराठा युद्धांत 'मद्रासी तोफखाना' होता. त्यांत पारिया होते. मराठे महारही पुष्कळ पायदळांत होते. कोरेगांवच्या रणस्तंभावर त्यांचीं नांवें अझूनी चमकतात. तरी हे मॅकमन साहेब म्हणतात. "ह्या शेवटच्या मराठा युद्धांत, ह्या मद्रासी सैन्याने जयश्री मिळविली नाही. मराठा, मेवाडी रजपूत व पेंढाऱ्यांच्या हल्ल्याला मुख्य तोंड देण्याचें श्रेय केवळ इंग्रजांकडील आरबांनीच मिळविलें. (म्हणून) इंग्रजांना आपलें भरतीचें धोरण जातिवंतांच्या बाजूने वळवावें लागलें. (सदर, पान १७२). सन १८५७ सालच्या बंडानंतर भरतीच्या पिढीजाद पद्धतीचा (*System of Regular Indian Army*) अंतच झाला. आतापर्यंत बंगालच्या सैन्यांत जो अयोध्येकडील राजपूत आणि ब्राह्मण शेतकऱ्यांचा मक्ताच चालू असे, तो ह्यापुढे बंद पडला. पुढेपुढे इंग्रजी शांतिच्या झेंड्याखालीं जसजशी सुखासीनता वाढूं लागली तसतशी दक्षिण देशांतील (मद्रासी) सैन्याची लष्करी तडफ मंदावूं लागली. (सदर पान २२२).

" लॉर्ड किचनेरचे कारकीर्दीपासून तर हिंदुस्थानांतील जातींचें व वंशांचें लष्करी दृष्टीने अगदी बारीक अध्ययन सुरू झालें. तेव्हापासून मराठ्यांची विशेषतः कोंकणी मराठ्यांची आराधना (Cult) शिखरास पोंचूं लागली. शेवटच्या महायुद्धानंतर ११७ वें (मराठा लाइट् इनफंट्री) पायदळ हें ' रॉयल ' हा अत्यंत उज्ज्वल बहुमानाचा शिक्का मिरवीत आहे. " (सदर पान २९०).

ह्या संबंध पुस्तकांत महार चांभार वगैरे महाराष्ट्रांतील कोणत्याही अस्पृश्य जातीचा चुकून देखील कोठेही उल्लेख झालेला दिसत नाही. हें ब्रिटिश सरकाराचें धोरण मोठेंच निराशाजनक आहे. ह्याच्या प्रतिकारार्थ निदान महाराष्ट्रांत तरी जोराचे प्रयत्न झाल्याशिवाय राहिले नाहीत. ह्या बाबतींत पुण्यांतील महारांचे अनुभविक पुढारी श्री. शिवराम जानबा कांबळे ह्यांचें चिकाटीचें कार्य त्यांना भूषणावह आहे. त्यांनी प्रथम पुण्याजवळ सासवड येथे ५१ गांवच्या महारमंडळीची सभा भरवून मुंबई सरकाराकडे एक छापील अर्ज पाठविला त्यावर दूरदूरच्या डेक्कन व कोंकण येथील १५८८ महार बांधवांच्या सह्या झाल्या होत्या. त्यांतील अस्पृश्यांकरितां मागण्या पुढीलप्रमाणें होत्या:—(१) खालच्या दरजाच्या सरकारी नोकरींत घेणें, (२) सार्वजानिक सरकारी शाळेंत मुलांना घेण्याबद्दलचे अडथळे नाहींसे करणें, (३) पोलीसांत चाकरी करण्याची मुभा देणें (४) हिंदुस्थानच्या सैन्यांत चाकरी करण्याची परवानगी देणें.ह्यांपैकी पहिल्या दोन मागण्यांना सरकाराने कांहीतरी गुळमुळीत उत्तरें दिलीं, तिसऱ्या मागणीसंबंधीं जातीच्या निकृष्टपणाची सबब सांगितली आणि चौथ्यासंबंधीं मुंबई सरकार हात घालूं शकत नाही, असें स्पष्ट उत्तर आलें. ह्या अत्यंत असमाधानकारक उत्तरावर तेव्हाच्या प्रसिद्ध सुधारक पत्रांत महारांना अनुकूल अशी खरमरीत टीका आली आहे. (नवलकरकृत शि. जा. कांबळे ह्यांचें चरित्र, पान २५). यानंतर सन १९०५ मध्यें ह्या बाबतींत हिंदुस्तान सरकाराकडे दुसरा अर्ज करण्यांत आला. पण त्यालाही निराशाजनकच उत्तर आलें. ह्यानंतर आम्ही मुंबईत १९०६ सालीं निराश्रित साह्यकारी मंडळी (Depressed Classes Mission) स्थापन केली. तिची एक शाखा कांबळे ह्यांच्या विनंतीवरून पुणें येथे १९०८ सालीं उघडण्यांत आली. त्यानंतर ता. ५ एप्रिल १९१० रोजीं महार जातीची जेजुरी क्षेत्रांत मोठी परिषद भरविण्यांत आली. तेथे मी व आमच्या मिशनचे प्रतिनिधि हजर होतों. त्यांत २२ कलमांचा एक विस्तृत विचाराचा व बारीक माहितीने भरलेला अर्ज इंग्रजींतून ब्रिटिश पार्लमेंटकडे पाठविण्यांत आला. पनवेलचे सुभेदार बहादूर गंगाराम कृष्णाजी अध्यक्ष व श्री. शि. जा. कांबळे सेक्रेटरी ह्यांच्या सह्या होत्या. टाइम्स ऑफ इंडिया, बंगालचे केशवचंद्र सेन,पुण्याचे नामदार गोखले वगैरे थोर थोर पुरुषांचे अधिकारयुक्त अनुकूल अभिप्राय समा-

विष्ट केले होते. मुंबई सैन्यांतील निळनिराळ्या २१ पलटणींतून मोठी बहादुरीचीं कामें करून जमादार, सुभेदार, सुभेदार–मेजरच्या रँकेपर्यंत चढलेल्या एकंदर २३३ महार गृहस्थांची नावनिशीवार यादी दिली आहे. यांत एक सरदार बहादूरही आहेत ! हा एक मोठा विशेष होय. लॉर्ड किचनेरने हा महार चांभारांचा हक्क बुडवून मोठा अन्याय केला, हें उत्तम सिद्ध केलें आहे. जे महार गृहस्थ आपली जात व धर्म सोडून ख्रिस्ती होतात, त्यांना ख्रिस्ती धर्मांत धर्मगुरूचेंही स्थान मिळूं शकतें. व त्यांना युरोपियनांनाही उपदेश करण्याची पात्रता येते. पण त्यांच्याच भाऊबंदांनी केवळ आपली धर्मांची परंपरा राखली म्हणून, इंग्रजांना इमानाने रणांगणांत जीव मुठींत घरून राज्य मिळवून दिलें आणि टिकविलें तरी, शेवटीं सैन्यांतून नेमकी त्यांचीच हकालपट्टी व्हावी हें अत्यंत निराशाकारक व अन्यायाचें आहे, हें सिद्ध केलें आहे. (शि. जा. कांबळे चरित्र,पान १४२, १५७) शेवटीं हा सर्व प्रयत्न अरण्यरुदनाप्रमाणें निरर्थक ठरला. अशाच प्रकारचा प्रयत्न मागे दापोडीचे मास्तर बाबा **गोपाळराव वलंगकर** ह्यांनीही केला असें ऐकिवांत आहे. ह्याशिवाय वरील चरित्रांत श्री. कांबळे ह्यांनी पुण्यांतील पर्वतीच्या व नाशिक येथील काळा रामाच्या देवळांत प्रवेश करण्याचे जे आटोकाट श्रम केले त्याचीही साद्यन्त हकीकत दिली आहे.

असो, ज्या अस्पृश्यांनी इंग्रज हे हिंदुस्थानांत नवखे असतांना, फ्रेंचांविरुद्धच नव्हे तर प्रत्यक्ष पेशव्याप्रमाणें आपल्या एक वेळच्या धन्याच्याही विरुद्ध झुंजण्यांत शिकस्त केली त्यांना आता सैन्यांत लढाऊ कामावर घेण्यांत येत नाही. मध्यंतरीं महायुद्धांत त्यांची बरीच भरती झाली होती. पण तीही आता बंद झाली आहे. हें मोठेंच आश्चर्य ! औंधचे पंतप्रतिनिधीबरोबर रायगडचा प्रवास करून त्याचें वर्णन श्री. द. ग. कुलकर्णी ह्यांनी जुलै १९३३ च्या किर्लोस्कर मासिकांत दिलें आहे. त्यांतील पुढील उल्लेख ह्या बाबतींत मासलेवाईक आहे. (कि. मासिक पान ७२३)

" डाव्या बाजूस टकमक टोंक आहे. याला आज ' **रायनाक** ' टोंक म्हणतात. पेशवाईच्या अखेरच्या काळांत हा अभेद्य किल्ला सर करण्याची गुरुकिल्ली पाचाडच्या **रायनाक** नांवाच्या महाराने इंग्रजांना सांगितली आणि इंग्रजांनी त्याप्रमाणें जगदीश्वराच्या उजव्या हातच्या डोंगरावरून तोफा डागून अत्यंत बिकट जागीं असलेला मराठ्यांचा

दारूखाना उडविला. धूर्त इंग्रजांनी रायनाकाला पुढे ह्याच टोकावरून खाली लोटून दिलें म्हणून त्याच्या नांवाने तें आज ओळखलें जात आहे.” भावी सैन्यांतून होणाऱ्या हाकालपट्टीचें हा कडेलोट एक स्पष्ट पूर्वचिन्ह नव्हे तर काय ? ह्याला म्हणतात धोरण !

अस्पृश्य लोकांना लढाऊ लष्करांत भरती न करण्याच्या ब्रिटिश सरकारच्या धोरणामुळें ह्या लोकांच्या उद्धाराची एक अमूल्य संधी दवडण्यांत आली आहे ह्यांत संशय नाही. पण ह्या विक्षिप्त धोरणाला काय काय कारणें झालीं हें मोठें रहस्य आहे. महाराष्ट्रांतील महारांचे अनुभवी व सन्मान्य पुढारी, माझे दोघे मित्र व आमच्या डिप्रेस्ड क्लासेस मिशनमधले सहकारी श्री. **शिवराम जानबा कांबळे** व सुभेदार **राघोराम सज्जन घाटगे** ह्यांनी अधिकृत रीत्या मला ह्या बाबतींत पुढील माहिती पुरविली आहे. सुभेदार घाटगे ह्यांच्या दोन तीन पिढ्यांनी ब्रिटिश लष्करांत मोठ्या नेकीने नांव मिळविलें आहे.खुद्द घाटगे साहेबांनी गेल्या महायुद्धांत व अगोदरही चांगली कामगिरी केली आहे.सन १९२१ सालची गोष्ट. एडन जवळील नोबद दाकिन गांवाजवळ सरहद्दीवर १११व्या पलटणीचा तळ पडला होता. आरबी डाकूंची एक टोळी चाल करून येत आहे अशी हूल उठली. कंपनीचे नायक कॅपटन होल्सवर्थ ह्यांनी सुभेदार घाटगे ह्यांना ह्या टोळीला जवळच्याच खिंडींत थोपवून धरण्याचा हुकूम केला. जवळ कांही हत्यार नसतांना व अंगावर भरपूर पोषाकही नसतांना केवळ छातीच्या हिमतीने ह्या एकट्याच बहादराने ह्या टोळीस कांही तास थोपवून धरिलें व शिफारस मिळविली. हेच घाटगे हल्ली डी. सी. मिशनच्या पुण्याच्या शाखेचे सन्मान्य सेक्रेटरी, पुणें शहर म्युनिसिपालिटीचे लोकनियुक्त सभासद व सरकारनियुक्त बेंच मॅजिस्ट्रेट आहेत. दुसरे श्री. कांबळे हे तर महारांचे पुढारी म्हणून अखिल महाराष्ट्रांत सुप्रसिद्धच आहेत. ह्यावरून पुढील तीन प्याऱ्यांतील माहिती खरी मानण्यास हरकत दिसत नाही.

सुमारें १८९०–९१ पर्यंत ब्रिटिश लष्करांत महार चांभारांची भरती होत असतां तेव्हापासून प्रथम नवीन ऑफिसर मंडळीची भरती बंद झाली, नंतर पूर्वीच्यांनाही रजा मिळूं लागली. ह्याविषयीं दाद लावून घेण्याचे पहिले प्रयत्न महाड तालुक्यांतील रावडुल गांवचे पेन्शनर

हवालदार गोपाळनाक विठ्ठलनाक वलंगकर नांवाच्या वृद्ध गृहस्थाने मोठ्या चिकाटीने केले. महात्मा जोतीबा फुले, बाबा पदमजी सारख्यांची ह्यांना शिकवण व मदत होती. सन १८९५ सालीं पुण्यास भरलेल्या कॉंग्रेसचे वेळीं ह्यांनी चळवळ केली होती. दापोली येथील अस्पृश्य वर्गांतील महार चांभार लष्करी पेन्शनवाल्यांच्या वसाहतींत सदर गोपाळबाबांनी बरीच चळवळ केली. पण चळवळ नवीन असल्यामुळें यश आलें नाही. ह्यांनी हिंदुस्थान सरकाराकडे अर्ज केला असतां ह्या पेन्शनर लोकांना त्यावेळीं नुसत्या सह्या करण्याचेंही धैर्य झालें नाही. पुढे हीच चळवळ श्री. कांबळे ह्यांनी स. १९०३ पासून मोठ्या नेटाने इ. स. १९१० पर्यंत चालविली. ती अद्याप चालूच आहे.

लष्करांत भरती बंद होण्याचीं कारणें अनेक सांगतात. पूर्वी कामगिरी असलेल्या शिपायांना रोज दोन प्रहरीं २ तास, स्वयंपाक करून जेवण्यास वगैरे रजा मिळत असे. पण आणीबाणीचे वेळीं ही रजा देणें ही शक्य नसल्यामुळें त्यांच्यासाठी स्वयंपाकघर उघडण्याचें ठरलें. तेव्हा एकत्र जेवण्याचा प्रसंग येई, म्हणून जातवार पलटणी कराव्या लागल्या. पण ह्यापेक्षा अधिक खरें कारण म्हणजे इज्जतदार जातिवंत लढाऊ लोकांच्याच जातवार फलटणी कराव्या असें ठरलें, हें होय. त्यामुळें ह्या निकृष्ट वर्गांचा ह्या इज्जतीच्या पिशाच्चाला बळी द्यावा लागला. श्री. कांबळे ह्यांनी मुंबई आणि हिंदुस्थान सरकाराकडे व खुद्द ब्रिटिश पार्लमेंटकडे वेळोवेळीं अर्ज केले, तरी कांहीच दाद लागली नाही.

शेवटीं महायुद्ध ओढवलें. तेव्हा मराठ्यांच्या जयजयकाराबरोबरच महार चांभारांचाही उदो उदो सुरू झाला आणि १११व्या महार पलटणीची भरती सुरू झाली. त्यावेळीं मुंबई आणि पुणें टाऊन हॉलमध्यें आमच्या मिशनच्या साह्याने जाहीर सभा झाल्या. महार व इतर पुढाऱ्यांनी प्रयत्न केले. युद्ध संपलें. फत्ते झाली. पण अखेरीस चोहीकडे सामसूम झाल्यावर ही १११ वी पलटण सन १९२१-२२ चे सुमारास बरखास्त करण्यांत आली ! कांबळे साहेबांनी लष्करांत मोठी निषेधाची सभा भरविली. इ. स. १८९० पूर्वी ६ वी, ११ वी, १२ वी, १८ वी, २४ वी अशा अनेक फलटणींतून शेंकडो महार चांभार ऑफिसरांनी व हजारो शिपायांनी आपली आहुती दिली होती. स. १८५७ सालच्या बंडांत

ह्या अस्पृश्यांनी इंग्रजाच्या बाजूने मोठी अतुल स्वामिनिष्ठा दाखविली होती. म्हणून १८५७ सालच्या बंडांत कामास आलेल्या शिपायांचीं नांवें दिल्ली येथील काश्मरी गेटावर कोरलेलीं आढळतात. पण ह्या सर्वांचा कांहीच उपयोग न होतां, महायुद्धांत व नंतर १११ व्या फलटणीने ५।६ वर्षें मोठी नामांकित बहादरी करूनही पुनः शेवटीं ह्या बिचाऱ्या लढाऊ जातीला आता घरीं बसावें किंवा मोल मजूरी करून पोट जाळावें लागलें आहे. ह्या रहस्याला इतिहासांत दुसरी जोडच नाही !

असो. होतां होतां आम्ही अगदी आजकालच्या काळांत येऊन उतरलों. राष्ट्राचा योगक्षेम चालविण्याच्या कामांत राजे अथवा त्याची प्रभावळ उर्फ दरबार जसा भाग घेत आहे तसाच सर्व देशांत व सर्व काळांत अगदी सर्व जातींची प्रजाही भाग घेत आहे, हें हिंदुस्थानांतील गांवगाड्यावरून व इतर देशांतील तशाच संस्थांवरून दिसून येतें. तरी आधुनिक राजकारणाची हल्ली ह्यापुढेही बरीच मजल थडकत चालली आहे. केवळ अंतर्गत योगक्षेमांतच नव्हे तर सर्वच राजशासनपद्धतींत राजयंत्र प्रत्यक्ष हालविण्याचे कामीं सर्व दरजाच्या स्त्रीपुरुष प्रौढ व्यक्तींस वांव मिळावा, सर्वांना महत्वाचे बाबतींत प्रत्यक्ष मत देण्याचा अधिकार असावा, व अशा मतदान पद्धतीने कायदे मंडळांत व विधि मंडळांत व इतर स्थानिक कारभार मंडळांत सर्व जातींचे व हितसंबंधांचे योग्य प्रमाणांत वेळोवेळीं निवडून जाणारे प्रतिनिधि असावेत, व येणेंप्रमाणें ही राज्ययंत्राची धुरा खालपासून अगदी वरपर्यंत लोकसत्तेच्या मुठींत असावी हें नवीन मत आता ह्या जुनाट भारतवर्षांतही रुजत चाललें आहे. इ. स. १८८५ सालीं राष्ट्रीय सभा स्थापन झाली. प्रथम हिच्यांत शिकलेले पांढरपेशेच जाऊं लागले. युरोप, आफ्रिका व आशिया ह्या तीन्ही खंडांतील लोकांवर ज्या महायुद्धाचा परिणाम झाला, त्याच्या लांटांसरशीं ह्या नवीन भारतीय राजकारणावर परिणाम होऊन त्याचीं पाळेंमुळें खोल रुजत चाललीं. अखिल भारतीय अस्पृश्यांच्या उद्धारा-साठी सन १९०६ सालीं मुंबईस 'जी भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळी' स्थापण्यांत आली, तिचें कार्य आणि शाखा झपाट्याने सर्व देश-भर पसरून, केवळ शिक्षण; सामाजिक सुधारणा, आर्थिक उन्नती वगैरे-च्याच दृष्टीने नव्हे, तर ह्या नवीन राजकारणी दृष्टीनेही अखिल भारतांतील

अस्पृश्य जमातींची जागृति होऊं लागली. शेवटीं स. १९१४–१८ च्या महायुद्धानंतर हिंदी राज्यपद्धतींत जी मोठी सुधारणा होऊं घातली त्या वेळीं ह्या वरील मंडळीच्या प्रमुखांनी व प्रांतोप्रांतींच्या प्रचारकांनी मोठा भाग घेतला. अर्थात हे सर्व प्रचारक स्पृश्य वर्गांचेच असल्याने अस्पृश्यांनी ह्या नवीन जागृतीच्या कार्यांत राष्ट्रीय सभेशीं सहकार्य करण्यास शिकावें व नवीन मनूंत आपली जागा ठरवावी असें त्यांचें धोरण होतें. पण तेव्हापासून अस्पृश्यांतूनच कांही लहान मोठे प्रांताप्रांतांतून स्वत:चे पुढारी ह्या अनेक जातींतून पुढे येऊं लागले. त्यांना हें राष्ट्रीय सभेशीं सहकार करण्याचें धोरण पटेनासें झालें. ते कांही अंशीं स्पृश्यांच्या साह्याने तर बऱ्याच अंशीं केवळ आपल्याच धोरणाने व स्वतंत्रपणाने आपआपल्या हक्काची मांडणी करू लागले.

ह्या बाबतींत मुंबईचे डॉ. **आंबेडकर**, डॉ. **सोळांकी**, मद्रासचे रा. एम्. सी. **राजा**, **श्रीनिवासन्**, मध्यप्रांतांतले रा. **गवई**, **नंदा गवळी**, बंगालचे रा. **विश्वास मल्लीक** वगैरेंची कामगिरी ध्यानांत घेण्यासारखी आहे. १९१९ सालीं **साउथबरो** कमिटीपुढे तसेंच अलीकडे **सायमन** कमिशन व लोदियन कमिटीपुढे वगैरे ह्या व अशाच इतर वर्गांच्या पुढाऱ्यांनी जी कारवाई केली आहे ती नजरे आड करून चालावयाचें नाहीं. राउंड टेबलचें सत्र तर अद्यापि चालूच आहे. प्रथम प्रथम ह्या पुढाऱ्यांच्या स्वतंत्र मागण्यांचा अर्थ नीट न कळल्याने म्हणा किंवा कळूनही म्हणा, राष्ट्रीय सभेने प्रथम दुर्लक्ष केलें; नंतर ह्या पुढाऱ्यांच्या स्वतंत्र चळवळीला आवरून धरण्याचा यत्न करून पाहिला; महात्मा **गांधीजी** सारख्या धीरोदात्त पुढाऱ्यांच्याही पुढाऱ्याने असेंच अळम टळम करून शेवटीं भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीचाच दृष्टिकोण पतकरून आता सर्वस्वी ह्या निराश्रितांना आपला आश्रय देण्याकडे, किंबहुना त्यांचा आश्रय घेण्याकडे आपला कल वळविला आहे.

पण ह्या चालू गोष्टी आहेत. आमचें हें प्रकरण व सर्व पुस्तकच आता आपल्या घालून दिलेल्या मर्यादेवर येऊन ठेपलें आहे. शिवाय ह्या गोष्टी अस्पृश्यतानिवारणाच्या पुढील प्रकरणाखाली जातात. पुढील दुसरें पुस्तक ईशकृपेने तयार होईल तेव्हा त्यांतील पहिला खंड अस्पृश्य,

दलित समाजाच्या उद्धाराचा व अस्पृश्यतानिवारणाचा इतिहास आणि दुसरा खंड, उपायचिंतन व उपसंहार असे होतील त्यांतूनच शिल्लक उरलेल्या विषयाची मांडणी करणें बरें होईल.

हें पुस्तक व ह्यांतील निस्पृह आणि नवे विचार लोकादरास कसे काय पात्र ठरतात, हें पाहूनच पुढील विचारांची तयारी व मांडणी करण्यास उत्तेजन येणार आहे. हे सर्व विचार माझ्या गत आयुष्यांतील सार्वजनिक सेवेच्या प्रकाशांत मला ह्यापूर्वीच सुचलेले होते. ते आता प्रसिद्ध करण्यास कोणत्याही बाह्य उत्तेजनाची वास्तवीक पाहतां जरूर नसावी. तथापि प्रत्यक्ष मनुष्यकृति अंतर्बाह्य स्फूर्तीला केव्हाही वश होणार म्हणून वरील विनय प्रकट केला आहे. वाचकांकडून त्याचा योग्य तो स्वीकार होवो अशी ईश्वराजवळ प्रार्थना करून हें पुस्तक संपवितों.

•

—समाप्त—

संदर्भ ग्रंथांची यादी

१. प्रो. ब्लूमफील्ड : अथर्वसंहिता.
२. लो. बा. गं. टिळक : खाल्डियन व भारतीय वेद.
३. भगवद्गीता.
४. आपस्तंब धर्मसूत्र.
५. श्री. श्रीपाद दामोदर सातवळेकर : स्पर्शास्पर्श विचार.
६. ऋक्संहिता.
७. पाणिनीय अष्टाध्यायी.
८. बृहदारण्यकोपनिषद्.
९. छांदोग्योपनिषद्.
१०. तैत्तिरीय ब्राह्मण.
११. यास्ककृत निरुक्त.
१२. राजशेखर : काव्यमीमांसा.
१३. हरचरित चिंतामणि.
१४. Mac Donnell and Keith : *Vedic Index.*
१५. F. E. Pargiter : *Ancient Indian Historical Tradition.*
१६. महाउमग्ग जातक.
१७. डॉ. केतकर : ज्ञानकोश.
१८. Bishop Caldwell : *Comparative Grammar of Dravidian Languages.*
१९. Prof. Rhys Davids : *Buddhist India.*
२०. शामशास्त्री : कौटिलीय अर्थशास्त्र.
२१. माध्यंदिन (शुक्लयजुर्वेद) संहिता.
२२. Russel : *Tribes and Castes of the Central Provinces.*
२३. Sir Henry Maine : *Village Community.*
२४. मनुस्मृति.
२५. Col. Olcott : *The Poor Pariah.*
२६. Prof. M. S. Ramaswami Ayangar and V. Sheshagiri Rao : *Studies in South Indian Jainism.*
२७. Nagendranath Basu : *Modern Buddhism.*

२८. Risley & Gait : *Indian Census Reports* (Imperial & Provincial) *1901.*
२९. Swe Yo : *Burman His Life and Nation.*
३०. G. E. Harvey : *History of Burma.*
३१. Lord Lothian : *Indian Franchise Committee Report.*
३२. वाळकदास: म्हारन्हात्म्य.
३३. Max Müller : *Physical Religion (Gifford Lecture).*
३४. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव: चरित्रकोश.
३५. मंगेश देवस्थान इतिहास.
३६. Depressed Classes Mission of India Reports.
३७. Prof. Prafullachandra Basu : *Indo-Aryrn Polity.*
३८. प्रो. धर्मानंद कोसंबी : बौद्धसंघाचा परिचय.
३९. श्री. जीवानंद विद्यासागर भट्टाचार्य : शुक्रनीतिसार.
४०. वि. का. राजवाडे : मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.
४१. प्रो. द. वा. पोतदार : भारत इतिहास संशोधन मंडळाचीं वृत्तें.
४२. रा. व. गणेश चिमणाजी वाड : पेशवे रोजनिशी.
४३. श्री. त्रिंबक नारायण अत्रे : गांवगाडा.
४४. Sir George MacMunn : *Martial Races of India.*
४५. श्री. हरिश्चंद्र नारायण नवलकर : शिवराम जानवा कांवळे यांचें चरित्र.
४६. द. व. पारसनीस : भारतवर्ष मासिकांतील ऐतिहासिक गोष्टी.
४७. Dr. Sir R. G. Bhandarkar : *Vaishnavism and Shaivism.*

सूची

अत्रे, त्रिंवक नारायण, २०३
अनिरुद्ध, ७१, ७५, ८६, ८९, १३५
अपधर्म, १२, १३
अंवनाक काननाक, २११
अंवरनाक, १९४, १९५
अभिचार, १२, १७५
अभिनंदथू, ७२
अमृतनाक महार, १९४
अय्यर, एल. के. अनंत कृष्ण, १२८
अलमेल मंगा, १२६
अलेक्झँडर, ३७
'अशुभराजा' ७६–७७
अश्वघोष, ५६
अशोक, ४४, ४६, ५६
अस्पृश्य—
कुणबाऊ गुलामगिरी, १५६–१६०; ग्रामबाह्यता, ४९, ५०, ६०, १४४; जातवार संख्या, १०३–१०८; धार्मिक अन्याय, १४४–१४६; प्रांतवार संख्या, १०२, १०३; शिक्षण १६४–१६६; संख्या, ९१–११८; सामाजिक बहिष्कार, १५३–१५६; स्वतंत्र धर्मसंघ, १४४; हिंदुधर्म-बाह्यता, १४४–१४८
अस्पृश्यता—
आदरणीय, १५; कारणें, उत्तरयुगीन, ६८–७०; उदय, १२–१४; कालविभाग, १७, १८; तिरस्करणीय, १५; नित्य, १४; नैमित्तिक, १३, १४; मूळकारण, १३; जातीय उर्फ राष्ट्रीय १०–१४; रूढ होण्याचीं कारणें, ४०; संशोधन, १७; वर्गीकरण, ९४–९६; व्याख्या, १०, ११; व्याप्ति, १४
आगरकर, १७८
आचार्य, कृष्णाजी विष्णू, कालगांवकर, १९२
आयंगार, एम्. एस्. रामस्वामी, ५८
आर्यसमाज, १५१
आंबेडकर, डॉ., ५०, १४८, १४९, १५४, १५५, १६२, २२०
ऑल्कॉट, कर्नल, ५६, ५७, ६९, १५९
इदिलशहा निजामशहा, १८८
इरुलां मोट्टयार, १५९
इस्लामी परचक्र, १८३, १८४
उ. उत्तमा, ८१
उदयी राजा, २७
उ. नान, ८८
उ वा ल्विन, ७६, ८७, ८८
उ. पो. विन, ८०, ८१
उं. माँ. माँ, ८०
उ. सैन, ८३, ८५, ८६
एकनाथस्वामी, १९६
एक्कर यजमान, १२८
एगत्ताळ विधि, १३०
ऐरणदिव्य, १९०
औपमन्यव, २६, २८, १४०
औरंगजेब, १९२, २०२
कण्ह पांड्य, ५७, ५८
कमळनाक, महार, १८८
कमाविसदार, आप्पाजी कृष्ण, २०१, २०२

कॅंझिटा, ८६
काँग्रेस, १५१, १५२, १६०, १६८, २१८–२२०
कान्हो लुखो, १९२
कांवळे शिवराम जानवा, २१५–२१८
कॉल्डवेल, बिशप, ३९, १२९, १३०
काळनाक महार, १८८
किचनेर लॉर्ड, २१४, २१६
किमीदिन, ३५
कीथ, प्रो. २८
कुक, कॅप्टन, १६
'कुरळ' काव्य, ५७, १२८
कुर्तकोटी, डॉ. १३, १४७
कुलितर, १७४
कृष्ण, असुर, १७४
कृष्ण, ज्योतिषी, २०१
केवा, ७३, ७७–७८, ८१
कोरेगांवचा रणस्तंभ, २११–२१२
कोरोथ महंमद, १५८
कोसंबी, प्रो. धर्मानंद, १७७
क्लाईव्ह, २१०
खंडनाक रामनाक, १८८, १९०
खोमणे, हैवतजी नाईक, १९८
गंगाराम कृष्णाजी, २१५
गणराजपद्धति, १८६
'गणेशविभूति' काव्य, ६४–६६
गवई, रा., २२०
गांधी,महात्मा,११,१२८,१६९,२१२,२२०
गुंडर्ट. डॉ., १२९
गुरव, चिंतामणि, १८७
गुरव, मोरोजी, १८७
गेट, ई. ए., ९१–९२, १३९
गोखले, नामदार, २१५
गोदनाक भादनाक, महार, १९१
गौतमबुद्ध, १८–२१, ३१, ४८, ५९, ८०, १२२–१२३, १७६
गौर, सर हरिसिंग, १३७
ग्रामसंस्था उर्फ गांवगाडा, २०३–२०९
'घर महार,' २०६–२०७
घाटगे, सुभेदार राघोराम, सज्जन,२१७
घोडेसंटवाई, २५
चक्किलियन (शक्कीया), १३१
चंदावरकर, सर नारायणराव, १६०
चांडाल,२०,२२-२४,२५,५१-५५१२०१२
चाणक्य, २६
चातुर्वर्ण्य, द्रविड देशांतील, ३९
चांभार, १३१
चिबे, येसाजी नाईक, १९८, १९९
चेरुमा, १२८
जडवस्तुपूजा, १३८
जनक, १९
जाननाक हीरनाक, २१२
जांबवती, २९, ३०, ३२, ३३, १२४, १२६
जिजाबाई, १८९
जुन्नरकर, रंग जोशी, २०१
जेटनाक धैनाक, २१२
जोशी, शंकर ना., १८६, १८९
झरदुष्ट्र, १३
टिळक, लोकमान्य, १५,१४४,१५०,१६०
डलहौसी, लॉर्ड, १२३
डॉयसन, प्रो. पॉल, २९,
डिप्रेस्ड क्लासस मिशन, ५८, ६८, ८६, २१०, २१५, २१७, २१९, २२०
ढकलगार, १३, १६
ढाणक, १३३
तावू, १४–१७
ताराबाई, १९३
तिरुना वुक्करसर उर्फ आप्पार, ५८

तिरुमंगाई, १२६
तिरुवालुवर, ५७
तिरुज्ञानसंबंदर, ५८
तुकाराम, १२३
तु–डै–डो, ७४, ७८–८०
तूबायाझा ७३,७६,७७,८०,८७,८९,१३४
थिऑसॉफिकल सोसायटी, ५६
दक्षिणापथ, ३७
दस्यु, १७२, १७३
दामाजीपंत, १९४, १९६, २०७
दिवोदास, १७४
देवकाई, १९८–१९९
देशपांडे, श्री. बाबासाहेब, २००
देशमुख, बाबाजीराव झुंजारराव, १९०
धारद्दिव्य, १८६, १८७
धारनाक राधनाक महार, १९०
नंद, २७
नंदागवळी, रा., २२०
नमशूद्र, १३२
नवलकर, २१५
नवशाखा शूद्र, ६३
नाट् (नाथ), ८०,८२,८३
नाथनाक वहीरनाक, १९८–१९९
नारायणस्वामी, ५९
निषाद, २५–२९
न्हावी, कृष्ण, १९१
पॅगवे, ७३
पंचजन, २६–२८
पतंजलि, १८
पंतप्रतिनिधी, औंधकर, २१६
पंवाडा, १६
परशराम कवी, २०८
परांजपे, प्रोफेसर, वा. गो. ३१
परैय्या, १२८–१३०
पलचेरुवट महमद, १५८
पळळन्, १३१
पाखंड वहिष्कार, १४१
पाटणकर, हिरोजी, १९३
पाणवठ्याचा हक्क, १६२–१६४
पाणिनि, २१, २२, २६–२८, ३३, १४०
पारसनीस, कै. द. ब. १९२
पार्जिटर, एफ्. ई, २९
पिंगल, २७
पिल्ले, जी. टी., ५७
पुक्कस, पुल्कस, पौल्कस, २०, २२–२५
पुण्याचा करार, ११, १६९
पुरुपमेध, २४, २५
पेंटलंड, लॉर्ड, १६०
पेधाई माली, १९२
पेधो माळो, १९२
पेधो लुखो, १९२
पौंडवर्धन, ६७
पौलोमी, १७५
प्रतिनिधि, परशरामपंत, १८७, १९३
प्रज्ञापारमिता, २३
फयाचून, ७३, ७५, ७६, १३५
फुले, महात्मा जोतीबा,१२०,१७८, २१८
बजाज, शेट जम्नालाल, १४८
बलरामदास, ६४, ६५
बल्लाळसेन, ६२, ६३
बसू, बाबू नगेंद्रनाथ,६२,६४–६६, १३२
बळाई, १३३
बाऊरी (बाथुरी), ६५–६७, १३२
बाजीराव, ३२
बाजीराव, दुसरा, २११–२१२
बादनाक, महार, १९०
बापनाक भिकनाक, १८९
बाबा पदमजी, २१८

वाळकदास, १४९
बुद्धिवाद–गौतमाचा, २०
ब्राह्मसमाज, ६८, ७०, ८८, ९१, १५०
ब्लूमफील्ड, प्रो. १५
भट्टोजी दीक्षित, २१, २२
भाडवलकर, हणमंतजी नाईक, १९८
भांडारकर इन्स्टिट्यूट, ३१
भांडारकर, डॉ. सर रामकृष्ण, १५, २१ ७२, १२०
भारत–इतिहास–संशोधक मंडळ, ७१, १८६, १८८, २०७
भिकनाक, १९०
भिक्षुसंघ, २०, २१
भूतवाद, भूतपूजा, १२, १३८
मॅकमन्न, सर जॉर्ज २१२, २१४
मॅक्डोनेल, प्रोफेसर, २८
मॅक्समुल्लर, १२३,, १७३
मॅग्गी, १२४, १२५
मंग, १२५
मंगा, मंगापूर, मंगेश, १२६
मतंग, १२५
मंदिरप्रवेश सत्याग्रह, १५०–१५२, २०२
मनुहा, ७५, ७६, ८६, ८७, १३५
मयूरवर्मा, १२७
मलो कोंडो महार, १९२
मल्लीक, विश्वास, २२०
मस्तानी, ३२
महमदशहा दुसरा, (बहामनी), १९४
'महायान' बौद्ध पंथ, १४५, १७८
महार ११९–१२२, १८०–२१८
महारांचे बावन हक्क, १९४–१९७
महाराष्ट्र, ४७, ४८
महावीर, १९
महीधर, भाष्यकार, २८
मॅहेंद्रवर्मा, ५८
माकुटेश्वर १२६
मांग, १२५–१२७, २०७–२०८
मांगलीश, १२६
मातनाक, १९०
मातंग, १२५
माल, १२२–१२४
मालवीय, पंडित, १४७
मुंजे, डॉ. १४७
मुदतबंदी मजूर, १५७
मूरदेव, ३६
मेगास्थेनीस, ४३
मेघ, १२४–१२५
मेटे–नाइकी, १८८
मेढ्या महार, २०१
मेन, सर हेन्री ४५–४७
मौर्य, चंद्रगुप्त, २६
'म्हार म्हात्म्य', १२१, १२२, १४९
यातुधान, ३५
यास्काचार्य, २५, २६, २८, १४०
येझवा (तिय्या), १३०
येशू ख्रिस्त, १४
येसनाक महार १८८
रंग सैदिनी पदयार्चा, १ ५९
रवा–दिव्य, १९१
रसेल, आर. व्ही. ४५, ४६
राउंडटेवल परिषद, ११, २२०
राजबंशी, १३२
राजवाडे कै. वि. का. २७, ३३, ४०, ४५, १८६, १९४, १९६, १९७
राजवाडे, प्रिन्सिपाल, वै. का. ३४
राजशेखर, २७
राजा, एम्. सी. १५६, २२०
राजाराम, छत्रपति, १८७
रामचंद्र भंजदेव, ६४

२२ ... सूची ... ८/८/१९...

रायगड, १५८, २१६
रायसाक यॅक, २१६
'रॉयल मराठी लाइट इन्फंट्री' २१४
रारीचन् मुप्पन्, १५८
राष्ट्रीय सभा, १६०, २१८, २२०
रिस्ले, सर् एच्, एच, ९१, ९२, १३८
न्हिस डेव्हिडस्, प्रो. २१, ४१, ४२
लक्ष्मीनरसु, प्रोफेसर, ५८
लोदियन फ्रँचाईस कमिटी, ९९, १५४, २२०
वतनपद्धति, २०४–२०७
वर्णसंकर, ५०–५५, १४१
वर्ष, २७
वलंगकर, गोपाळराव, २१६, २१७
वसु, प्रफुलचंद्र, १७१
वाड, रा ब. ग. चि., १९८, १९९, २०१
वासुदेव, २९, ३०, ३२, १२४
विठू महार, १९४, १९६, १९७, २०७
वृषल, २५–२९, ३५
वैठविगार, २०५–२०६
वेलन् , १५८
वेलस्ली, आर्थर, २१३
शंकरस्वामी, २७
शंवरासुर, १७४,
शातवाहन, ४६, ४८
शिदनाक महार, १९२, १९३, १९४
शिवि, ३०, ३१, १२४
शिलालेख, वादामीचा १२६
शिवाजी छत्रपति १९९
शिश्नदेव, ३६
शुक्रनीतिसार, १७८–१८१
शुक्राचार्य, १८०
शेषगिरिराव, व्ही., ५८
श्रद्धानंद, स्वामी, १५१
श्रमणवाद, १३८
श्रीकृष्ण, २८, २९, ३३, ३४, ४२, १२४
श्री. श्रीनिवासन २२०
शेफिल्ड शेफिगल, ८२
शेवी, ७१
संडाला(डूनसंडाला), १३४
सनातन हिंदुधर्म, १४४
सवर (शवर), १३३
सवाई माधवराव, १९३, २०१
साऊथवरो कमेटी, २२०
सांगलीकर, चिंतामणराव अप्पा, १९४
सातवळेकर, २१
सांव, २९
सायणाचार्य, १७३
सायमन कमिशन, १००, १४८, २२०
सावरकर वि. दा. १४७
सिद्धराजा, १९८
'सुधारक' पत्र, १७८, २१५
सुनीत, १७६
सुब्रह्मण्यर, एन् , १३०
सुमंगल. एच, ५६
सेखजी किल्लेदार, १८८
सेन, केशवचंद्र, २१, २१५
सोपाक, १७६
सोळांकी डॉ., २२०
सौथवरो कमिटी, १००
स्टार्ट कमिटी, ९८
स्वतंत्र मतदार संघ, १५२
हरप्रसाद शास्त्री, ६२, ६८, ६९, १२३
हार्वे, जी. ई., ७१–७२
हिंदुधर्मसंघ–व्याख्या, १३७, १४४
हिंदुमहासभा, १४७, १५२, १६८
हीन जातीय, ४१–४२
हीन शिल्पी, ४१–४२
ह्यूएन्संग, ४७
हुलया (पुलया), १२७
ज्ञानपूर्ण, ५७

REFBK-0004812